# १

# तत्त्वज्ञान आणि शिक्षण

**प्रकरणाची रचना:**

१.० उद्देश
१.१ परिचय
१.२ तत्त्वज्ञानाचा अर्थ
१.३ तत्त्वज्ञानाच्या शाखा
१.४ शिक्षणाचा अर्थ
१.५ शिक्षणाचे तत्त्वज्ञान
    १.५.१ स्वरूप
    १.५.२ व्याप्ती
    १.५.३ कार्ये
१.६ तत्त्वज्ञान व शिक्षणामधील संबंध
१.७ सारांश
१.८ विभागवार अभ्यास
१.९ संदर्भ

## १.० उद्देश

या विभागाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थ्यांना पुढील बाबी शक्य होतील :

१) तत्त्वज्ञान व शिक्षणाचा अर्थावर चर्चा करणे.
२) शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाचा अर्थ स्पष्ट करणे.
३) शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करणे.
४) शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाच्या विविध कार्यांची यादी करणे.
५) तत्त्वज्ञान व शिक्षणामधील संबंधाचे वर्ण करणे.

## १.१ परिचय

तत्त्वज्ञान म्हणजे मुख्यत्वेकरून अटकळ बांधण्यापेक्षा निरीक्षणाच्या साधनांद्वारे मुल्ये व वास्तविकतेच्या सर्वसाधारण आकलनाचा शोध होय. मानवामधील त्यांना स्वत: व ज्या जगात राहतात, वावरतात व ज्या जगात त्यांचे अस्तित्व आहे त्या जाणून घेण्याची नैसर्गिक व आवश्यक अशी उत्कट इच्छा दर्शविते. पाश्चात्य तत्त्वज्ञान सत्याचा मुलत: बौद्धिक शोध घेण्यातील तत्त्वज्ञानाच्या व्युत्पत्तीशास्त्रीय कमी अधिक प्रमाणात बांधील राहिलेले आहे. हिंदू तत्त्वज्ञान अतिशय आध्यात्मिक आहे आणि त्याने नेहमीच सत्याची वस्तुत: प्राप्ती करण्याच्या निवडीवर जोर दिलेला आहे. तत्त्वज्ञान मानवी स्वभाव व

munotes.in

आपल्या वास्तवाचं स्वरूप यांच्या विषयी असलेल्या कल्पनांची सर्वसमावेशक पद्धत आहे. तत्त्वज्ञान जीवनाचे मार्गदर्शक आहे कारण मूलभूत व व्यापक समस्या संबोधित करते व त्याद्वारे आपण स्वीकारत असलेला जीवनमार्ग व आपण कसे वागतो हे ठरविले जाते. म्हणूनच आपण असू म्हणू शकतो की मानवी जीवनाची सर्व अंगे तत्त्वज्ञानविषयक विचाराद्वारे प्रभावित होतात व त्याद्वारे प्रदान केली जातात. अभ्यासाचे क्षेत्र म्हणून तत्त्वज्ञान सर्वात जुन्या विद्याशाखांपैकी एक शाखा आहे. तिला सर्व शास्त्रांची जननी समजले जाते. वस्तुत: म्हणजे सर्व जगाचे ज्ञानाचे मूळ आहे. शिक्षणाने त्याचे साहित्य विविध तत्त्वज्ञानविषयक पायातून मिळवलेले आहे.

तत्त्वज्ञानाच्या विविध क्षेत्रांचा शिक्षणाच्या विविध पैलूंवर जसे शैक्षणिक प्रक्रिया, अनुबद्ध क्रिया, धोरणे, योजना आणि त्यांची अंमलबजावणी यावर सैद्धांतिक तसेच प्रात्यक्षिक अशा दोन्ही दृष्टीने खाऊचा प्रभाव पडलेला आहे.

मानवी संस्कृतीची प्रगती म्हणजे शिक्षणाचे फलित आहे. परंतु प्रत्येक शैक्षणिक प्रश्नाचे उत्तर हेच सरतेशेवटी आपल्या जीवनाच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेले आहे. तत्त्वज्ञान आपल्याला जीवनातील मूल्यांशी परिचित करून देते आणि हीच मुल्ये कशी प्राप्त करायची हेच शिक्षण आपल्याला सांगते. अशा प्रकारे तत्त्वज्ञान व शिक्षण हे परस्परांशी घट्टपणे निगडीत आहे. म्हणूनच हा पाठ तत्त्वज्ञानाचे काही पैलू, ज्यांना शिक्षणाचा पाया म्हणून संबोधिले जाऊ शकते, त्यावर प्रकाशझोत टाकण्यासाठी समर्पित आहे.

## १.२ तत्त्वज्ञानाचा अर्थ

वेगवेगळ्या तत्त्वज्ञानांनी तत्त्वज्ञानाच्या वेगवेगळ्या व्याख्या दिलेल्या आहेत हे बघून तत्त्वज्ञानाचा अभ्यासक सुरुवातीला गोंधळून जातो. काही तत्त्वज्ञानी मानसशास्त्रीय तथ्यावर जोर देतात तर इतर जीवनमूल्यांना अधिक महत्त्व देतात. जॉन देवे यांच्यानुसार, “जेव्हा जेव्हा तत्त्वज्ञानाला अधिक गंभीरतेने स्वीकारले गेले, तेव्हा असे नेहमीच मानले गेले आहे की ते शहाणपण प्राप्त करणे दर्शविते जे जीवन जगण्याच्या पद्धतीवर प्रभाव टाकेल.” दुसऱ्या बाजूने बघता विंडेलबँड यांच्यानुसार तत्त्वज्ञान म्हणजे “वैश्विक मुल्यनाचे टीकात्मक शास्त्र आहे.”

तत्त्वज्ञान (फिलॉसॉफी Philosophy) या शब्दाचा शब्दश: अर्थ आहे. शहाणपणाप्रती प्रेम: हा शब्द ‘Phileo’ (प्रेम) आणि ‘Sophia’ (शहाणपण) या दोन ग्रीक शब्दांपासून तयार केला गेला आहे.
भारतीय व पाश्चात्य व्याख्यांमध्ये खूपच फरक असला तरी आपल्याला पाश्चात्य तत्त्वज्ञानांनी दिलेल्या खूपच वेगवेगळ्या व्याख्या आढळून येतात. या व्याख्यांपैकी काही तत्त्वज्ञानाच्या टीकात्मक बाजूवर जोर देतात तर काही त्याच्या कृत्रिम पालुंवर भर देतात. तत्त्वज्ञानाच्या या दोन प्रकारच्या व्याख्यांची काही उदाहरणे खाली दिली आहेत :

अ) तत्त्वज्ञान हे अनुभवांच्या जवळ जाण्याची टीकात्मक पद्धत आहे. या प्रकारच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे :

- "तत्त्वज्ञान म्हणजे अनुभवाविषयीच्या निष्कर्षांचा मुख्य भाग असण्यापेक्षा ते मुलत: अनुभवांच्या जवळ जाण्याचे चैतन्य किंवा पद्धत आहे." – एडगर एस. ब्राईटमन.
- ते म्हणजे निष्कर्षांच्या विशिष्ट समाविष्ट बाबी नव्हेत तर ज्यांच्याद्वारे ते प्राप्त केले जाता अशा पद्धती आणि चैतन्य आहेत, जे त्यांना तत्त्वज्ञानविषयक म्हणून वर्णन करण्याचा हक्क देतात...." – क्लिफोर्ड बॅरट.
- "या प्रश्नाच्या उत्तरासाठी मला जर एकाच ओळीत सिमित राहायाचे असेल तर ती म्हणेल की तत्त्वज्ञान म्हणजे टीकाकरणाचा सर्वसाधारण सिद्धांत होय" – सी.जे.ब्युकास.

आ) तत्त्वज्ञान हे सर्वसमावेशक कृत्रिम शास्त्र आहे – तत्त्वज्ञानाच्या पुढील व्याख्या ह्या त्याच्या कृत्रिम पैलूवर जोर देतात :

- "विज्ञानाप्रमाणे तत्त्वज्ञान हे पद्धतशीर चिंतनाचा परिणाम म्हणून प्राप्त केलेल्या अंर्तदृष्टीच्या सिद्धांतांना सामावते." – **जोसेफ ए. लीटन.**
- "एक वैश्विक विज्ञान म्हणून तत्त्वज्ञान हे प्रत्येक बाबीशी संबंधित आहे." – **हर्बर्ट स्पेन्सर.**
- आपला विषय हा विज्ञानाचा संग्रह आहे, जसे की ज्ञान, तर्कशास्त्र, विश्वउत्पत्ती शास्त्र, नैतिकता व सौंदर्यशास्त्र यांचे सिद्धांत तसेच तो एक एकत्रित सर्वेक्षण आहे." – **रॉय वुड सेलर्स.**

तत्त्वज्ञानाच्या वरील व्याख्या दर्शवितात की काही तत्त्ववेत्ते हे मुख्यत्वेकरून टीकात्मक तत्त्वज्ञानावर भर देतात तर इतर व्याप्ती एक कृत्रिम विद्याशाखा म्हणून व्याख्या करतात. वस्तुतः हे दोन्ही दृष्टीकोन एकांगी आहेत. तत्त्वज्ञानाचा शब्दशः अर्थ दर्शवितो की तत्त्वज्ञानी हा सतत व सर्व ठिकाणी सत्याच्या शोधात गुंतलेला असतो. तो अंतिम निष्कर्षावर पोहचण्याविषयी जास्त चिंता करत नाही आणि जीवनभर सत्याच्या शोधाचा पाठपुरावा करतो. त्याचे ध्येय म्हणजे सत्याचे स्वामित्व मिळविणे नसून सत्याचा शोध घेणे आहे. जे प्रवासाचा आनंद लुटतात ते अंतिम लक्ष्याविषयी जास्त काळजी करत नाहीत तसेच ते सततच्या दीर्घ प्रवासाने अंतिम लक्ष्य जरी दृष्टीतून हरवले तरीही अस्वस्थ होत नाहीत. तत्त्वज्ञानाच्या व्याख्या करण्याच्या प्रयत्नात एखादा अशा अडचणीत सापडतो की याबाबतीत तेथे ना वर्ग आहे ना भिन्नता आहे. एखाद्या विज्ञानाची व्याख्या करताना एक व्यक्ती वर्ग विज्ञानाकडे तसेच विशिष्ट विज्ञानाच्या विशिष्ट क्षेत्राकडे, जे त्याला इतरांपासून वेगळे ठरविते, निर्देश करते.

तथापि ही गोष्ट तत्त्वज्ञानाच्या बाबतीत शक्य नाही कारण तत्त्वज्ञान अनेक नसून एक आहे. म्हणूनच तत्त्वज्ञानाच्या अर्थापर्यंत पोहोचण्यासाठी तुम्हाला त्याच्या समस्या, दृष्टीकोन, पद्धती, प्रक्रिया, निष्कर्ष व परिणामावर चर्चा करावी लागेल. थोडक्यात म्हणजे


तत्त्वज्ञान म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण निष्कर्ष व परिणामांवर येण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण दृष्टीकोनातून वैशिष्ट्यपूर्ण पद्धतींद्वारे काही वैशिष्ट्यपूर्ण समस्या सोडविण्याची तत्त्वज्ञानविषयक प्रक्रिया आहे. काही जनांना ही व्याख्या अतिशय संदिग्ध व अपूर्ण वाटू शकते.

तर मग काय संदिद्ध व अपुरे आहे? म्हणजेच म्हणायचे आहे की तत्त्वज्ञान समजण्यासाठी एखाद्याने दृष्टीकोन, समस्या समजून घ्यायलाच हवे. यामुळे तत्त्वज्ञान व विज्ञानामधील भेद्सुद्धा स्पष्ट होईल जो बऱ्याच तत्त्वाज्ञानी जनांकडून दुर्लक्षिला गेला आहे.

## १.३ तत्त्वज्ञानाच्या शाखा

जेव्हा आपण एखाद्या तत्त्वज्ञानी तत्त्वज्ञानविषयक विचारांचा अभ्यास करतो, तेव्हा आपण त्याची विचारसरणी ही तत्त्वज्ञानाच्या विविध शाखेत अभ्यासतो.

तत्त्वज्ञानाच्या या शाखा पुढीलप्रमाणे आहेत :




**आकृती १.३.१)**

- ज्ञानशास्त्र / **ज्ञानमीमांसा** - तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञानाचा शोध होय. हा शोध सामिक्षरणात्मक आहे. म्हणुनच तत्त्वज्ञांनी जनासमोर येणारी पहिली समस्या ही ज्ञानाचे स्वरूप व त्याच्या मर्यादेंविषयी असते. याचमुळे ज्ञानशास्त्र ही तत्त्वज्ञानाची मुलभूत शाखा आहे. ते तत्त्वज्ञानविषयक दृष्टीकोनातूनसत्यता, ज्ञानाची वैधता, ज्ञानाच्या मर्यादा व ज्ञानाचे स्वरूप, जाणकार व जाण इ. ची चर्चा करते.

उदा. आदर्शवाद, निसर्गवाद, व्यावहारिकता इ.

- **आधिभौतिकशात्र / तत्त्वमीमांसा** – यात अस्तित्व, वास्तविकता किंवा मूलतत्त्वाचा अभ्यास आहे. याच्या प्रमुख शाखा पुढीलप्रमाणे :

munotes.in

१) **जगदुत्पत्तीविचार –** यात निर्मितीचा अभ्यास समाविष्ट आहे. जग निर्माण केले आहे की अनादि आहे? जगाची निर्मिती कशी झाली? त्याची निर्मिती का झाली? जगाची निर्मिती कोणी केली? या निर्मितीमागील हेतू काय? जगदुत्पत्तीविचाराच्या या सर्व समस्या आहेत.

२) **विश्वउत्पत्तीशास्त्र –** विश्वउत्पत्तीशास्त्राची प्रमुख समस्या म्हणजे जग एक आहे का अनेक आहेत का ते एक आणि अनेक असे दोन्ही आहेत?

३) **वास्तववाद –** वास्तववाद म्हणजे खऱ्याखुऱ्या वास्तविकतेचा अभ्यास आहे. वास्तविकता एक आहे किंवा अनेक आहेत किंवा त्या एक आणि अनेक अशा दोन्ही आहेत? जर वास्तविकता अनेक असतील तर या अनेक घटकांमधील संबंध काय? हे सर्व वास्तववादाचे प्रश्न आहेत.

४) **स्वतत्त्वज्ञान –** हे मुख्यत्वेकरून स्वत:च्या तत्त्वज्ञानविषयक विश्लेषणाशी संबंधित आहे. मी स्वत: कोन आहे? त्याचे शरीराशी काय नाते आहे? तो मुक्त आहे की शरीरावर अवलंबून आहे? तो एक आहे की अनेक आहे? या सर्व स्वतत्वज्ञानाच्या समस्या आहेत.

५) **मृत्युनंतरचे शास्त्र –** मृत्युनंतर आत्म्याची स्थिती, दुसऱ्या जगाचे (मृत्युनंतरच्या) स्वरूप इ. विषयीची चर्चा ही तत्त्वज्ञानाच्या या शाखेचे विषय साहित्य बनते.

- **मूल्य**शास्त्र /**मूल्यमीमांसा** – तत्त्वज्ञानाची ही शाखा जीवनमुल्यांचा तत्वज्ञानविषयक अभ्यास करते. तिचे खालील शाखात विभागण केले गेले आहे :

i. **आचारशास्त्र –** आचारशास्त्र हे योग्य व चांगले यांच्या निकषाच्या चर्चा करते.

ii. **सौंदर्यशास्त्र –** सौंदर्यशास्त्र हे सौंदर्याचे स्वरूप आणि निकष यांची चर्चा करते.

iii. **राजकारण –** ही शाखा राज्यकारभार करतांना जपावी लागणारी मुल्ये, नितीमुल्ये यांची चर्चा करते.

| **शाखा** | **वर्णन** | **मुख्य प्रश्न** |
|---|---|---|
| १) आधिभौतिकशास्त्र / **तत्त्वमीमांसा** | वास्तव काय आहे हे ठरविण्याचा एक प्रयत्न | • जीवनाचा अर्थ काय आहे?<br>• जीवनाला एखादा उद्देश आहे का?<br>• लोक चांगले किंवा वाईट जन्मतात का?<br>• विश्वाला एक आराखडा किंवा हेतू आहे का? |

munotes.in

| | | |
|---|---|---|
| २) ज्ञानशास्त्र / ज्ञानमीमांसा | ज्ञान जाणण्या-विषयीचे प्रश्न | ● ज्ञानाच्या मर्यादा कोणत्या?<br>● ज्ञानाचे स्त्रोत आपल्याला कोठे आढळतात?<br>● आपण ज्ञान कसे संपादन करावे?<br>● ज्ञानाची वैधता ठरविण्याचे मार्ग आहेत का?<br>● सत्य काय आहे? |
| ३) तर्कशास्त्र | युक्तीवादाच्या प्रक्रिया ज्या लोकांना वैध निष्कर्षाकडे जाणतात. | ● कल्पनांची वैधता काय आहे आणि काय कसे ठरविले जाऊ शकते?<br>● आपल्या स्वत:शी विरोधाभासी न होता आपण इतरांशी कसे संवाद साधू शकतो?<br>● आपल्या युक्तीवादाचा अर्थ काय? |
| ४) मुल्यशास्त्र / **मूल्यमीमांसा** | आचारशास्त्रीय व सौंदर्यशास्त्रीय मूल्यांच्या स्वरूपाविषयी जाणकार होणे | आचारशास्त्रीय :<br>● मुल्ये काय आहेत आणि ती महत्वाची का आहेत?<br>● आपण आपले जीवन कसे जगायला हवे?<br>● काय योग्य आहे व काय अयोग्य आहे?<br>सौंदर्यशास्त्रीय :<br>● आपण जे बघतो, स्पर्शतो, ऐकतो त्याचे अनुमान कसे करावे?<br>● सौंदर्य म्हणजे काय? |

**(आकृती १.३.२)**

## १.४ शिक्षणाचा अर्थ

इतिहास दर्शवितो की सर्वात आदिम जमातींनी शिक्षणाला सामाजिक एकता व एकसमानता प्राप्त करण्याचे साधन म्हणून बघितले. याकरिता जमातीतील 'शहाण्या माणसांच्या' मार्गदर्शनाखाली मुलांवर विशिष्ट अभ्यासातील सूचना लादल्या गेल्या. मध्ययुगीन काळात शिक्षणाचा वापर राजकीय व धार्मिक हेतू साध्य करण्यासाठी केला गेला. विद्येच्या पुनरुज्जीवानाने जीवनाच्या पूर्ण दृष्टीकोनात बदल घडून आला आणि शिक्षणाला स्वतंत्र व्यक्तिगत संस्कृती आणि व्यक्तिगत विकासासाठीचे साधन समजले जाऊ लागले. सुरुवातीला सुधारणा ह्या विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या सर्वोत्कृष्ट शैक्षणिक प्रभावाचे सातत्य म्हणून होत्या. परंतु बऱ्याच पंथ व संप्रदायांमुळे शैक्षणिक सरावामध्ये एक नवीन औपचारिकता सरपटत आली जी मध्ययुगीन विद्वत्तेपेक्षा जराशी वेगळी होती.



munotes.in

सतराव्या शतकातील वास्तववादी प्रवृत्तीसह आपल्याला शिक्षणात मानसशास्त्रीय, वैज्ञानिक व समाजशास्त्रीय चळवळींची सुरुवात आढळते. ज्या आज त्यांची शिखरे गाठायचा प्रयत्न करत आहेत.

**शिक्षणाचा व्युत्पत्तीविषयक अर्थ :**

लॅटीन शब्द 'एज्युकेटम' ('Eduvatum') म्हणजे प्रशिक्षित करणे. 'E' म्हणजे आतून आणि 'Duco' म्हणजे बाहेर काढणे किंवा वाढविणे. या दोघांच्या एकत्रिकरणातून **education** शब्द बनला ज्याचा अर्थ आतील बाहेर काढणे. शिक्षण ही एक प्रक्रिया आहे जी आतील गोष्टी बाहेर काढते. प्रत्येक मूल हे काही जन्मजात प्रवृत्ती, क्षमता आणि अनुवांशिक ताकदीसह जन्माला येते. शिक्षण मानवाच्या आतील शक्तींना बाहेर काढते आणि त्यांना पूर्ण विकसित करते. लॅटीन शब्द 'Educare' आणि 'Educere' म्हणजे वाढविणे, बाहेर काढणे आणि विकसित करणे. अशा प्रकारे education (शिक्षण) या शब्दाचा अर्थ म्हणजे एखाद्या मुळच्या जन्मजात गुणांचा पूर्ण विकास करणे. अशा प्रकारे शिक्षण (education) ही विकासाची एक प्रक्रिया आहे. तिचे स्वरूप व प्रगतीचा दर जाणण्यासाठी एखाद्यास शिक्षणाची सामग्री जाणणे अत्यावश्यक आहे.

**शिक्षणाचा संकुचित अर्थ :**

संकुचित दृष्टीने शालेय शिकवणीला शिक्षण म्हटले जाते. या प्रक्रियेत समाजातील प्रौढ व्यक्ती अध्यापनाच्या स्थापित पद्धतींद्वारे मुलांना ज्ञानाच्या पुर्वचीत निवडक गोष्टी प्रदान करून विशिष्ट कालावधीत पूर्वनिर्धारित लक्ष्य साध्य करण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. याचा उद्देश म्हणजे शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांचा बौद्धिक विकास प्राप्त करणे. या प्रक्रियेत शिक्षक हा सर्वात महत्वाचा घटक आहे आणि विद्यार्थ्याला एक दुय्यम भूमिका दिली गेली. यात विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाचे तयार डोस घोटत बसविणे हे शिक्षकाकडून अपेक्षित असते. यामुळे ते मूल त्याच्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास साधू शकत नाही. असे ज्ञान मुळच्या नैसर्गिक विकासाचा गळा घोटते आणि म्हणूनच असे ज्ञान हे त्याच्या खऱ्याखुऱ्या भावी जीवनासाठी काहीही उपयोगाचे नाही. असे असूनसुद्धा शालेय शिक्षणाचे स्वत:चे असे काही फायदे आहे. जॉन स्ट्यूअर्ट मिल यांच्या शब्दांत – "प्रत्येक पिढी ही त्याच्या उत्तराधिकाऱ्याना हेतुपूर्वक अशी संस्कृती देते जेणेकरून ते उत्तराधिकारी जीवनात किमान टिकून राहण्यास पत्र होतील. आणि शक्य झाल्यास जीवनात किमान टिकून राहण्यास पत्र होतील. आणि शक्य झाल्यास विकासाची जी पातळी प्राप्त केलेली आहे ती वाढेल."

काही शिक्षणतज्ञांची खालील मते ही शिक्षणाच्या संकुचित अर्थ दर्शवितात.

अ) "संकुचितदृष्ट्या शिक्षणाचा अर्थ म्हणजे आपली शक्ती विकासासाठी व रुजविण्यासाठी केलेला कोणताही जाणीवपूर्वक दिशानिर्देशित प्रयत्न असा घेतला जाऊ शकतो" – एस.एस. मॅकेंझी.

आ) "शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे ज्यात आणि ज्याद्वारे लहानांचे ज्ञान, चरित्र व वर्तन यांना आकार दिला जातो व त्याला साचेबद्ध केले जाते" – प्रो. ड्रेवर.

**शिक्षणाचा व्यापक अर्थ :**

व्यापक अर्थाने शिक्षण म्हणजे शिक्षकाद्वारा माहितीची आदानप्रदान करणे नव्हे किंवा मुलाद्वारा ज्ञान संपादन करणे नव्हे तर व्यक्तीमत्वाचा पूर्ण विकास साधने होय. शिक्षणात असे सर्व अनुभव सामावतात, जे व्यक्तीवर जन्मापासून मृत्यूपर्यंत परिणाम घडवितात. अशा प्रकारे शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे एक व्यक्ती तिच्या स्वभावानुसार एका मुक्त आणि अनियंत्रित वातावरणात तिच्या स्व चा विकास मुक्तपणे करते . ही वाढ व विकासाची एक आजीवन दीर्घ प्रक्रिया आहे. ती स्थळ, काळ व व्यक्तींच्या मर्यादेपर्यंत सिमीत नाही. कोणतीही व्यक्ती जी मुलाला एक नवीन अनुभव देते ती शिक्षक असते आणि असे कोणतेही ठिकाण जेथे ही देवाणघेवाण घडून येते त्याला शाळा संबोधले जाऊ शकते , अशा प्रकारे शिक्षण ही मुलत: वाढ व विकासाची एक प्रक्रिया आहे जी जीवनभर चालू राहते. रुसो यांनी त्यांच्या निसर्गवादाचे तत्त्वज्ञान शिक्षणाच्या या व्यापक आशयाला त्यांच्या दृष्टीकोनात ठेवून विकसित केले. पुढील प्रख्यात विद्वान शिक्षणाचे स्पष्टीकरण व्यापक स्वरुपात करतात.

अ) "व्यापक स्वरुपात ही एक अशी प्रक्रिया आहे जी जन्मभर चालू राहते आणि जी जीवनातील जवळजवळ प्रत्येक अनुभवाने वाढविली जाते." – **एस.एस.मॅकेंसी.**

आ) "माझ्या दृष्टीने शिक्षण म्हणजे मूल आणि माणसाच्या शरीर मन व आत्मा यातून सर्वोत्कृष्ट असे सर्वांगिकपणे बाहेर काढणे होय." **एम.के.गांधी.**

इ) "व्यापक दृष्टीने शिक्षणात असे सर्व प्रभाव सामावतात जे व्यक्तीच्या पाळण्यापासून ते कबरीपर्यंतच्या प्रवासात व्यक्तीवर कार्य करतात." – **ड्युम विले.**

**शिक्षणाचा विश्लेषणात्मक अर्थ :**

**अ) शाळेतील मुले –** याचा कार्यक्रम जन्मापासून मृत्यूपर्यंत चालू असतो. प्रत्येक जग जीवनभरात विविध अनुभव व कृतींद्वारे काहीना काही शिकत असतो. हे सर्व शिक्षण आहे.

**आ) मुलांच्या जन्मजात शक्तीचा विकास म्हणून शिक्षण –** शिक्षण म्हणजे , मुलाच्या मनात बाहेरून काहीतरी कोंबण्याऐवजी मुलाच्या मूळ देणगीचा विकास करणे होय. ॲडीसनने अगदी अचूक वर्तविले आहे, "शिक्षण जेव्हा एका उदात्त मनावर कार्य करते तेव्हा ते प्रत्येक अव्यक्त गुण व परिपूर्णता दृष्टोत्पत्तीस येण्यासाठी बाहेर काढते जे अन्यथा अशा मदतीशिवाय दृग्गोच्चर होणे कधीही शक्य नव्हते."

**इ) एक गतिमान प्रक्रिया म्हणून शिक्षण –** शिक्षण ही एक स्थिर प्रक्रिया नसून अतिमान प्रक्रिया आहे जी मुलाला बदलत्या परिस्थिती व काळानुसार विकसित करते. ही एक हेतुपूर्ण कृती असून ती सतत जीवनाच्या विशिष्ट उद्दिष्टांच्या पाठपुरावा कसे ज्यासाठी व्यक्ती स्वत:ला पूर्णपणे समर्पित करतो.

**ई) एक द्विध्रुवीय प्रक्रिया म्हणून शिक्षण -** ॲडम यांनी त्यांचे पुस्तक 'Evolution of Educational Theory' मध्ये शिक्षणाचे एक द्विध्रुवीय प्रक्रिया म्हणून स्पष्टीकरण दिले आहे.



munotes.in

१) "ही एक द्विध्रुवीय प्रक्रिया आहे, ज्यात एक व्यक्तिमत्व दुसऱ्या व्यक्तिमत्वाच्या विकासात सुधारणा करण्यासाठी दुसऱ्यावर कार्य करते."

२) "ही अशी प्रक्रिया फक्त जाणीवपूर्वक नाही तर एक बुद्धीपुरस्सर सुद्धा आहे. शिक्षकाचा विद्यार्थ्याच्या विकासात सुधारणा घडवून आणण्याचा स्पष्ट जाणलेला उद्देश असतो."

३) "विद्यार्थ्याचा विकास ज्याद्वारे सुधारला जाईल अशी साधने दुपदरी असतात :

४) शिक्षणदात्याच्या (शिक्षक) व्यक्तिमत्वाचे शिक्षणग्राहीच्या (विद्यार्थी) व्यक्तीमत्वाशी प्रत्यक्ष उपयोजन आणि,

५) विविध स्वरुपात ज्ञानाचा वापर."

ॲडम्सनुसार द्विध्रुवीय शिक्षणाचे दोन ध्रुव असतात. एकज टोकाला शिक्षक तर दुसऱ्या टोकाला मुल असते. शिक्षणात दोन्हीही सारखेच महत्त्वाचे आहेत. जर शिक्षक सुचवितात तर मुल अनुसरते. जर शिक्षक देतात तर मुल ग्रहण करतात. अशा प्रकारे शिक्षण प्रक्रियेत शिक्षक व मूल यांच्यात परस्पर देवाणघेवाण होते. शिक्षक मुळच्या व्यक्तीमतवाला आकार देण्याचा व सुधारित करण्याचा प्रयत्न करतात. जेणेकरून मुलाचे व्यक्तिमत्व पूर्णपणे विकसित होईल. शिक्षक व मुळच्या सक्रीय सहकार्याने शिक्षणाची प्रक्रिया ही सहजतेने व कार्यक्षमरित्या घडते.

**उ) एक द्विध्रुवीय प्रक्रिया म्हणून शिक्षण -** ॲडम्सप्रमाणेच जॉन देवेसुद्धा शिक्षणाला विकासाची प्रक्रिया मानतात. परंतु मानसशास्त्रीय दृष्टिकोनाचा स्विकार करताना ॲडम्स हे शिक्षक व मुलाच्या महात्त्वावर जोर देतात, तर जॉन देवे हे सामाजिक दृष्टिकोनावर जोर देतात. म्हणूनच जॉन देवे यांच्यानुसार शिक्षणाचे दोन आशय आहेत – मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय.

ते हा वाद स्विकारतात की शिक्षण हे त्याच्या मूळ देनागीनुसार असायला हवे. ते पुढे प्रतिपादन करतात की मुलाचा विकास हा निर्वातात घडून येत नाही. शिक्षक हे दोन्हीही, ज्या समाजात राहतात त्या समाजात व त्या समाजाद्वारे तो घडून येतो. हा तो समाज असतो, जो शिक्षणाचा हेतू, सामग्री व पद्धती ठरवेल.

या प्रकारे शिक्षणाची प्रक्रिया ही तीन ध्रुव सामावते. (१) शिक्षक, (२) मूल, (३) समाज. हे तीनही घटक शिक्षण प्रक्रीयेच्या कार्यक्षम व यशस्वी कार्यप्रणालीत सक्रियतेने सहकार्य करतात.

## पाश्चात्येकडील शिक्षणाचा अर्थ

ज्ञानाच्या प्रत्येक शाखाप्रमाणेच प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्यांचा तत्त्वज्ञानविषयक विचारविनिमयात शैक्षणिक विचारसरणी सुरु झाली. अशा प्रकारे पाश्चात्य जगात शिक्षांचा अर्थ हा सुरुवातीला प्लेटोच्याकार्यात आढळून येतो. हे नमूद करणे मजेशीर आहे की प्लेटोने दिलेल्या हजारो वर्षापूर्वीचा शिक्षणाचा अर्थ हा आजसुद्धा पाश्चात्य जगात थोड्या फार फरकाने अनुसरला जात आहे. प्लेटोने शिक्षणाला आजीवन प्रक्रिया म्हणून

परिभाषित केले जिची सुरुवात बालपणाच्या पाहिल्या वर्षापासून होऊन ती जीवनाच्या अंतापर्यंत टिकते." त्यांनी शिक्षणही संज्ञा अतिशय विस्तृत अर्थाने वापरली, "जी मानवाला नागरिकत्वाच्या आदर्श परिपूर्णतेच्या पाठपुराव्यासाठी उत्सुद बनविते आणि सुयोग्य करभार कसा करावा व आज्ञापालन कसे करावे हे शिकविते." शिक्षण फक्त ज्ञान व कौशल्येच प्रदान करत नाही तर जीवनमूल्ये, अंत:प्रेरणेचे प्रशिक्षण, योग्य प्रवृत्ती व सवयींची वाढ सुद्धा रुजविते.

Republic मध्ये प्लेटो निदर्शनास आणतात की, "खऱ्याखुऱ्या शिक्षणाची, मग ते कसेही असो, माणसांना त्यांच्या एकमेकांतील संबंधात व जे त्यांच्या छायाछत्रेखाली आहेत, त्यांच्या संबंधात सभ्य करण्याची ही शिक्षणाची मानवतावादी व्याख्या पाश्चात्य जगात आजसुद्धा शिक्षणाचा अतिशय मोठ्या प्रमाणावर स्विकृत अर्थ आहे. सर्वदूर शिक्षणाला जीवनमूल्ये रुजवणारी प्रक्रिया म्हणून बघितले जाते. प्लेटोनी सांगितल्याप्रमाणे, "आता मला म्हणायचे आहे की शिक्षण म्हणजे असे प्रशिक्षण जे मुलांमधील मूल्यांच्या प्रथम अंत:प्रेरणेला सुयोग्य सवयींद्वारे दिले जाते." प्लेटोचे हे दृष्टीकोन पाश्चात्य तसेच पौर्वात्य जगात सर्वानुमते स्विकृत झालेले आहेत. आदर्शवादी, व्यवहारवादी, निसर्गवादी व वास्तववादी तत्त्ववेत्यांद्वारे शिक्षणाची परिभाषा ही वेगवेगळ्या प्रकारे केली गेली आहे. तथापि, त्याचा अर्थ हा सर्वसाधारणपणे आदर्शवादी राहिलेला कुठल्याही प्रकारच्या आदर्शवादाशिवाय शिक्षण या शब्दाला काहीही अर्थ असू शकत नाही.

रॉबर्ट आर. रस्क यांच्या शब्दात, "आपण शिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे व्यक्तिमत्वाची सुधारणा किंवा समृद्धी म्हणून स्वीकारू शकतो ज्याचे भिन्नता दर्शविणारे वैशिष्ट्य म्हणजे वैश्विक मूल्यांना मूर्त रूप देणे होय." पाश्चात्य शैक्षणिक तत्त्ववेत्यांनी सर्वसाधारणत: मान्य केले आहे की मानवी मुलाची वाढ म्हणजे शिक्षणाचे सार आहे. ए.जी.ह्युजेस यांच्या शब्दात, "विद्याशाखेचे सार म्हणजे तिरस्कृत अत्याचाऱ्याच्या इच्छेपुढे बळजबरीची अधीनता नव्हे तर प्रशंसनीय वरिष्ठांच्या उदाहरणापुढे शरणागती होय."

मध्ययुगात कॉमेजिअसने अशी एक प्रक्रिया घोषित केले की ज्याद्वारे एक व्यक्ती ही धर्म , ज्ञान आणि नैतिकता यांच्याशी संबंधित गुण विकसित करते आणि त्याद्वारे त्याला माणूस म्हणून घेण्याचा अधिकार स्थापित करते. फ्रॉयेएबेस नुसार "शिक्षणाचे मुलभूत तत्त्व म्हणजे सूचना देणे व अध्यापन हे अधिकृत हुकुमदर्शक व हस्तक्षेप करणारे नसून ते निष्क्रिय व संरक्षणात्मक असायला हवे."

रुसो द्वारा दिल्या गेलेल्या शिक्षणाच्या व्याख्येत स्वातंत्र्याचे तत्त्व हे सर्वात प्रभावी अभिव्यक्ती म्हणून आढळते जेव्हा ते म्हणतात "आपण निसर्गाच्या हाकेचे पालन करू या. आपण हे बघायाला हवे की तिचे जोखड हे सोपे आहे आणि जेव्हा आपण तीचा आवाज लक्षपूर्वक ऐकू तेव्हा आपल्याला एक चांगल्या सदसदविवेकच्या उत्तरात आनंद आढळेल." इतरांनी शिक्षणाच्या सामाजिक अर्थावर जोर दिलेला आहे, ज्याद्वारे त्याचा उदेद्श व्यक्तीला समाजात सुयोग्य बनविणे हा आहे. ॲल्डॉस हक्झले यांनी याच अर्थाने म्हटले आहे, "एक परिपूर्ण शिक्षण ते अमृत असते जे प्रत्येक मानवाला तो किंवा ती सामाजिक पदानुक्रमात व्यापात असलेल्या स्थानात चपखल बसविण्यासाठी प्रशिक्षित

करते परंतु या प्रक्रियेत त्याविना त्याची किंवा तिची ओळख पुसली जाते." वरील सर्व व्याख्या कथन करतात की शिक्षण ही विकासाची प्रक्रिया आहे. म्हणूनच या विकासात काय सुचविलेले आहे, हे शोधणे अत्यावश्यक बनते. जरी शिकण्याची क्षमता ही विकासावर अवलंबून असली तरीही विकास हा शिक्षणाशी समानार्थी नाही. विकास म्हणजे शरीर व मनाची क्रमाक्रमाने होणारी व सातत्यपूर्ण प्रगती होय.

या विकासातून मुलाला पुढील घटक प्राप्त होतात :

१) त्याच्या आजूबाजूच्या परिसराचे ज्ञान.

२) त्याच्या व्यक्तिगत गरजांच्या परिपूर्ततेसाठी आवश्यक प्रेरक नियंत्रण.

३) संवाद साधण्यासाठी समर्थ करण्याकरिता भाषिक क्षमता.

४) वैयक्तिक व एकत्रित संबंधाचे काही ज्ञान.

या सर्व घटकांचा विकास हा घरीच सुरु होतो.

शिक्षकाचे कार्य म्हणजे प्रक्रिया चालू ठेवणे आणि तिला मूल शाळेत असताना उत्तेजन देणे. वस्तूत: विकासाची ही प्रक्रिया व्यक्तीच्या पूर्ण जीवन्भारात चालूच राहते. परिणामत: असे मानले आहे की सर्वसाधारणपणे शिक्षण हे माणसाच्या नैसर्गिक जीवनकालभर चालूच राहते. एक यशस्वी शिक्षण किंवा शिक्षणदाता हा स्वत:सुद्धा त्याच्या जीवनभर एक विद्यार्थीच राहतो. एका बाजूला तो काहीलोकांना विशिष्ट गोष्टी शिकवितो परंतु त्याच वेळेस तो त्याच्यापासून काहीतरी शिकत असतो. सर्वच यशस्वी शिक्षणकर्ते अनुभवतात की त्यांचे विचार, व्यक्तिमत्त्व आणि क्षमता अंतर्गत झालेला विकास हा अन्यथा अशक्य झाला असता. अगदी अशाच प्रकारे शिक्षणकर्ते (शिक्षक) व्यतिरिक्त इतर लोकही वेळेस अध्यापन व अध्ययन करतात.

## भारतातील शिक्षणाचा अर्थ :

भारतीय दृष्टिकोनाकडे वळता आध्यात्मिक पैलूंचा सुद्धा समावेश करणे आवश्यक बनते. कारण अध्यात्माला शिक्षणाने विकासाचा भाग म्हणून स्वीकारले आहे. वस्तूत: बारतीय विचारकर्त्यांनी यावर विशेष जोर दिला आहे. याज्ञवल्कंचे मत आहे की शिक्षण फक्त तेच असते जे व्यक्तीला अस्सल चारित्र्य देते व त्याला जगासाठी उपयुक्त बनवते. शंकराचार्यांनी म्हटले आहे की शिक्षण तेच जे मुक्तीकडे घेऊन जाते. अगदी अलीकडील शिक्षणतज्ञांनी सुद्धा आध्यात्मिक पैळूच्या महत्त्वावर जोर दिलेला आहे. ए.एस.अल्टेकर यांच्या शब्दात, "भारतात शिक्षणाला नेहमीच प्रकाश व शक्तीचा स्त्रोत म्हणून मानले गेले आहे जे आपल्या स्वभावाला आपल्या शारीरिक, मानसिक, बौध्दिक व आध्यात्मिक शक्ती व भागांच्या प्रगतीशील व सुसंवादी विकासाद्वारे रुपांतरीत करतात व उदात्त बनवितात." ही आध्यात्मिक परंपरा शिक्षणाच्या समकालीन भारतीय तत्त्ववेत्यांनुसार त्यांच्या संपूर्ण दृस्तीकोनात, आदर्शवाद व व्यावहारिकदृष्ट्या एकीकरणात, तार्किकता व मानवता एकतेतील विविधता आणि व्यक्ती व समाजातील समरसता यात चालूच ठेवली गेली आहे.

शिक्षणाच्या आध्यात्मिक अर्थावरील या जोरामुळेच विवेकांनद म्हणाले, "धर्म हा शिक्षणाचा सर्वात आंतरिक गाभा आहे." श्री अरविंद घोष यांच्या शब्दांत, "मुलाचे शिक्षण

हे जे सर्वोत्कृष्ट, सर्वात शक्तिशाली, सर्वात जिव्हाळ्याचे आहे, त्यातून लहरायला हवे आणि त्याच्या स्वरुपात जगतांना तो साचा ज्यात माणसाच्या कृती व विकास व्हायला हवे तो म्हणजे त्याच्या मूळ गुण व शक्तीचा हवा, त्याने नवीन गोष्टी संपादित करायलाच हव्यात, परंतु त्याने नवीन गोष्टी परिपूर्णतेने त्याचा स्वत:चा विकसित प्रकार व जन्मजात शक्ती च्या आधारावरच संपादित करावयास हव्या."

शिक्षणाची व्याख्या करताना महात्मा गांधींनी हीच कल्पना व्यक्त केली, ते म्हणाले, "माझ्या मते शिक्षण म्हणजे व मूल व माणसाच्या शरीर, मन व आत्मा यातून सर्वोत्कृष्ट हे सर्वांगिणपणे बाहेर काढणे. साक्षरता म्हणजे ना शिक्षणाचा अंत आहे ना सुरुवात आहे. पुरुष आणि स्त्रियांना ज्याद्वारे शिक्षित केले जाऊ शकते अशा साधनांपैकी ते एक आहे."

## शिक्षणाची आधुनिक संकल्पना :

शिक्षणाची आधुनिक संकल्पना समजण्यासाठी एखाद्याला पुरातन व आधुनिक संकल्पनांचा तुलनात्मक अभ्यास करायला हवा.
पुरातन व आधुनिक संकल्पनांमधील फरक पुढीलप्रमाणे :-

- **शिक्षणाचा अर्थ**

शिक्षण (education) हा शब्द लॅटिन शब्द 'Education' बनवला गेला आहे. ज्याचा अर्थ बाहेर काढणे, वाढीस चालना देणे आणि विकसित करणे असा होतो. म्हणून शिक्षणाचा आधुनिक संकल्पना ही सामाजिक वातावरणात मुलाच्या अनुवांशिक क्षमता विकसित करण्याच्या प्रयत्न करते. पुरातन संकल्पनेत शिक्षण म्हणजे अशी एक प्रक्रिया जी मुलाचे मन म्हणजे एक रिकामे भांडे असून त्यात ज्ञानाच्या निवडक तयार गोष्टी कोंबते, त्या पुरातन संकल्पनेचा मानसशास्त्रीय संशोधन आणि लोकाशी मूल्यांच्या दबावाखाली स्फोट झाला. मन म्हणजे एक गतिमान स्वजुळणी करणारे व स्वयंअध्ययन करणारे बाल असून त्याला परिपूर्ण वाढ व विकासासाठी सुयोग्य मार्गदर्शनाची गरज असते. आधुनिक शिक्षण हे मनाला त्याच्या स्वत:च्या अनुवांशिक क्षमतानुसार एका सामाजिक वातावरणात विकसित करण्याचा प्रयतन करते.

- **शिक्षणाचे उद्दिष्ट**

प्राचीन शिक्षण हे प्रगाढ ज्ञान आणि मानसिक विकासावर भर देते. ते व्यक्तिमत्वाच्या इतर पैलूंप्रती तटस्थ वृत्ती ठेवते. अधिकाधिक ज्ञान संपादन करणे हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट समजले जायचे. याउलट आधुनिक शिक्षणतज्ञ हे विकासाचे इतर पैलू जसे शारिरीक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक यावर सुद्धा तेवढाच जोर देतात. अशाप्रकारे आधुनिक शिक्षणाचा उद्देश म्हणजे व्यक्तिमत्वाचा परिपूर्ण विकास करणे आणि सामाजिक कार्यक्षमता व गतिशीलता प्राप्त करणे.

- **अभ्यासक्रम**

पुरातन अभ्यासक्रमात फक्त मानसिक विकासाला चालना देणारे विषय समाविष्ट केले गेले व त्यावरच जोर दिला गेला. अशा प्रकारे पुरातन अभ्यासक्रम हा कठोर व स्थरीकृत होता. तो फक्त बहुधा वर्गाकृती आणि अनुभवापर्यंतचा सिमित होता. आधुनिक अभ्यासक्रम हा या अर्थाने लवचिक, वैविध्यपूर्ण आणि प्रगतीशील आहे की तो

munotes.in

विकसनशील मुलाच्या गरजा तसेच सतत बदलत्या आधुनिक समाजाच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

- **अध्यापनाच्या पद्धती**

पुरातन पद्धती घोकंपट्टीवर जोर देणाऱ्या आणि पाठांतराला कंटाळवाणी व उदासप्रक्रिया होती. आधुनिक पद्धती या पाठांतराचा धिक्कार करतात आणि खेळातून शिक्षण, कृतीद्वारे अध्ययन, अनुभवाद्वारे अध्ययन इत्यादी प्रकारच्या जिवंत व परिणामकारक पद्धतींना प्रोत्साहन देतात व स्वीकारतात, या पद्धती प्रेरणा, आवड आणि अवधान यांना उत्तेजित करतात.

- **शिस्त**

शिस्तीच्या जुन्या संकल्पनेचे मुलांमध्ये आज्ञाधारकपणा व शिस्तीच्या अंमलबजावणीसाठी छडीचा वापर व शिक्षेवर जोर दिला. दडपशाहीद्वारा लादलेली शिस्तीची ही संकल्पना आता टाकून देण्यात आली आहे. आधुनिक संकल्पना ही स्वयंशिस्तीची असून ती नैसर्गिक आज्ञाधरकातेकडे घेऊन जाते.

- **परीक्षा**

निबंध स्वरूपाच्या परीक्षांच्या जुन्या पद्धतीने घोकंपट्टी व पाठांतराला उत्तेजन दिले. आधुनिक तंत्र हे मूल्यमापन तसेच परिक्षणकर्ते यामध्ये वस्तुनिष्ठ चाचण्या, प्रगती अहवाल, संचयी नोंदी, मुलाखती आणि प्रात्यक्षिक कामगिरी यांचा समावेश होतो.

- **शैक्षणिक संस्था**

जुन्या मतप्रवाहानुसार मुलांच्या शिक्षणासाठी शाळा ही एकमेव संस्था होती. नवीन दृष्टिकोनानुसार शिक्षणाच्या कार्यासाठी सर्व औपचारिक आणि अनौपचारिक संस्थांचा वापर केला जातो.

- **शिक्षक**

जुनी शिक्षण पद्धती शिक्षकाला शिक्षण प्रक्रियेचा सर्वोच्च स्थानी ठेवायची. आधुनिक काळात शिक्षकाला एक मित्र, तत्त्वज्ञानी सनी एक मार्गदर्शक म्हणून संबोधले जाते.

- **मुल**

जुन्या संकल्पनेनुसार मुल म्हणजे शिक्षक जे काय शिकवायचे त्याचा केवळ एक निष्क्रिय ग्रहणकर्ता होते. आधुनिक शिक्षण हे मुल केंद्रित. संपूर्ण शिक्षण प्रक्रिया ही त्याच्या गरजा पुरविते आणि त्याच्या स्वभावानुसार त्याचा विकास करते. त्याला परिणामक्षम अध्ययन प्राप्तीसाठी शिक्षण व त्याचे वर्गमित्र यांच्यासोबत सक्रीयपणे संवाद साधने जरुरी आहे. ज्याद्वारे त्याचा स्वत:चा विकास आणि तो ज्या समाजाचा अविभाज्य घटक आहे, त्या समाजाच्या विकासाला चालना मिळते.

- **शाळा**

जुन्या संकल्पनेनुसार शाळेने ज्ञानविक्रीचे दुकान म्हणून सेवा दिली. प्रत्येक गोष्ट आधीपासूनच पूर्वनियोजित होती. शिक्षक हे देण्यासंबंधी अधिक चिंतातूर होते आणि निष्पत्ती बाबत क्वचित चिंता करायचे. आधुनिक शाळेची संकल्पना ही शाळेला समाजाचे लघुरूप म्हणून समजते आणि देण्याच्या तुलनेत फलनिष्पत्तीवर अधिक जोर देते.

- **एक विद्याशाखा म्हणून शिक्षण**

प्राचीन काळी शिक्षण म्हणजे काही विशिष्ट ध्येयासाठी कशाचे तरी फक्त प्रशिक्षण देणे असे होते. आधुनिक शिक्षण हे सखोल अभ्यास, पूर्ण चौकशी आणि संशोशानाची एक स्वतंत्र शाखा आहे. मानवी विकासाची एक खूपच महत्वाची प्रक्रिया आहे. तिचे स्वत:चे विशिष्ट ठळक वैशिष्ट्ये व घटक आहेत. जे तिला महत्त्वपूर्ण निर्मितीस प्रक्रिया म्हणून चालना देतात.

**व्याख्या :**

- निरोगी शरिरात सुदृढ मनाची निर्मिती म्हणजे शिक्षण. ते मानवाची नैसर्गिक शक्ती, विशेषत: त्याचे मन विकसित करते. जेणेकरून ती व्यक्ती परसत्य, चांगुलपणा आणि सौंदर्याच्या चिंतनाचा आनंद लुटण्यास समर्थ बनू शकेल.

  -ॲरिस्टॉटल

- शिक्षण म्हणजे विकसित पावणाऱ्या आत्म्याला त्याच्या स्वत:मध्ये असलेले बाहेर काढण्यास मदत करणे.

  -अरबिंदो

- शिक्षण म्हणजे मुळात काय दडलेले आहे ते उलगडणे ही अशी प्रक्रिया आहे, ज्यात मूल हे आतल्याला बाहेरचे बनवते.

  -फ्रोईबेल

- शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या वर्तनाच्या सवयी किंवा विचार आणि प्रवृत्तीत कायमस्वरूपी बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने व्यक्तीच्या वातावरणातील प्रभाव होय.

  -जी.एच.थॉम्पसन

- शिक्षण म्हणजे चांगल्या नैतिक चारित्र्याचा विकास होय.

  -जे.एफ.हर्बट

- शिक्षण म्हणजे जीवनासाठीची तयारी नव्हे तर ते म्हणजे जगणे होय. शिक्षण ही अनुभवाच्या एक सातत्यपूर्ण पुनर्रचनेद्वारे जीवनाची प्रक्रिया आहे. ती म्हणजे व्यक्तीमधील त्यासर्व क्षमतांचा विकास होय. ज्या त्याला त्याच्या पर्यावरणावर नियंत्रण ठेवणे आणि त्याच्या शक्यता पूर्ण करणे शक्य करते.

  -जॉन देवे

- शिक्षण म्हणजे देशासाठी व राष्ट्रासाठी प्रशिक्षण होय.

  -कौटिल्य

- मानवी शिक्षण म्हणजे निसर्गापासून एखाद्याला मिळणारे प्रशिक्षण होय.

  पाणिनी

- शिक्षण म्हणजे भौतिक, बौद्धिक आणि नाटिक अशा मानवाच्या सर्व जन्मजात शक्ती आणि क्षमतांचा समांगी व प्रगतीशील विकास होय.

  पेस्टालोझी

munotes.in

- शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या शरीर व आत्म्यात ते मूल समर्थ असलेल्या सर्व सौंदर्य व सर्व परिपूर्णतेचा विकास करते.

  प्लेटो

- सर्वोच्च शिक्षण तेच आहे जे आपल्याला फक्त माहिती देत नाही तर आपले जीवन सर्व अस्तित्वासोबत समरस बनवते.

  रवींद्रनाथ टागोर

- भारतीय परंपरेनुसार शिस्खन म्हणजे फक्त जीवन चरितार्थाचे साधन नाही किंवा ती विचारांची एक रोपवाटीका नाही, किंवा नागरिकत्वाची एक शाळा नाही. ते म्हणजे सत्याच्या शोधात आणि मूल्यांच्या सरावात मानवी आत्म्याचे प्रशिक्षण आणि चैतन्याच्या जीवनातील सुरुवात आहे.

  राधाकृष्णन

- शिक्षण हे असे काही आहे जे माणसाला स्वावलंबी व निस्वार्थी बनवते.

  ऋग्वेद

- शिक्षण हे लोकांचे जीवन, गरजा आणि आकांक्षाशी संबंधित असायला अहावे, जेणेकरून ते सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक रुपांतरणाचे एक शक्तीशाली साधन असेल.

  -शिक्षण आयोग (१९६४-६६)

## १.५ शिक्षणाचे तत्त्वज्ञान

### १.५.१ स्वरूप

शिक्षणाचे तत्त्वज्ञान ही व्यावहारिक तत्त्वज्ञानाची शाखा असून ती शिक्षणाचे स्वरूप तसेच शैक्षणिक सिद्धांत व सरावातून उत्पन्न होऊ शकणाऱ्या तत्त्वज्ञानविषयक समस्यांची निगडीत आहे. शिक्षणाचे प्रमुख तत्त्वज्ञान हे तीन मुख्य प्रकारात विभागले जाऊ शकते : शिक्षककेंद्रित तत्त्वज्ञान, विद्यार्थी केंद्रित तत्त्वज्ञान आणि समाज केंद्रित तत्त्वज्ञान.

शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे शिक्षणाची ध्येये, प्रकार, पद्धती व अर्थ यांच्या परीक्षांचा संदर्भ देते, ही संज्ञा या विषयांच्या मुलभूत तत्त्वज्ञानविषयक विश्लेषणाच्या आणि व्यावहारिक शैक्षणिक दृष्टीकोनाच्या विश्लेषणाच्या वर्णनासाठी वापरली जाऊ शकते. यामध्ये मुलभूत तत्त्वज्ञान विषयक जसे शिक्षणाचे स्वरूप जे अध्ययन व अध्ययनाच्या योग्यातेचे आहे आणि शैक्षणिक न्यायाची स्थिती तसेच व्यावहारिक शैक्षणिक धोरणे आणि सरावाशी संबंधित समस्या जसे शालेय निधीची प्रमाणित चाचणी किंवा सामाजिक, आर्थिक आणि कायदेशीर परिणाम या दोघांचा समावेश होतो.

शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे शिक्षणाला दिशा प्रदान करण्यात तसेच शिक्षणावर काम करण्यासाठीच्या ज्ञानाची मीमांसा देण्यात एक महत्वाची भूमिका बजावते. शिक्षणाचे तत्त्वज्ञान ही निष्कर्षाच्या मुख्य भाग असण्यापेक्षा शिक्षणिक अनुभवला सामोरे जाण्याची एक मुलभूत पद्धती आहे. ही एक वैशिष्ट्यपूर्ण पद्धती आहे जी तिला तत्त्वज्ञानविषयक

बनवते आणि तत्त्वज्ञानविषयक पद्धती ही टीकात्मक, सर्वसमावेशक आणि संश्लेषणात्मक असते. म्हणून

- शिक्षणाचे तत्त्वज्ञान म्हणजे शिक्षणाच्या सर्वसाधारण सिद्धांताचे समीक्षण आहे.
- यामध्ये समीक्षात्मक मूल्यमापन आणि सर्वसाधारण सिद्धांतावरील पद्धतशीर चिंतन सामावते.
- ते म्हणजे शैक्षणिक वस्तुस्थितीचे शैक्षणिक मूल्यांशी असलेले संयोगीकरण आहे.

**आधिभौतिक शास्त्र आणि शिक्षण :**

ऐतिहासिक किंवा समकालीन समाजाच्या सरसकट अभ्याससुद्धा आधि भौतिकशास्त्राच्या वैश्विक, धर्मशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय व वास्तववादी पैलूंचा त्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि वैज्ञानिक श्रद्धा व सरावावरील परिणाम उघड करेल. सर्व ठिकाणाचे लोक हे अशा प्रश्नांच्या उत्तरांना घट्ट पकडून ठेवतात. आणि गृहितकांना अनुसरून त्यांचे दैनंदिन जीवन जगतात. आधिभौतिकशास्त्रीय निर्णयांपासून सुटका नाही. जरी एखाद्याने ठरविले की कशातही रस न घेता नुसतेच जगायचे तरीही हा पर्याय मानवतेचे स्वरूप व कार्याविषयीचा आधीभौतीक निर्णय ठरेल. इतर मानवी कृतीप्रमाणेच शिक्षणसुद्धा आधिभौतिकशास्त्राच्या क्षेत्राबाहेर कार्य करू शकत नाही. आधिभौतिकशास्त्र किंवा अंतिम वास्तवाच्या समस्या या शैक्षणिक संकल्पनेच्या केंद्रस्थानी आहे कारण शालेय (किंवा कौटुंबिक किंवा चर्चेचे) शैक्षणिक कार्यक्रम हे कल्पना, भपकेपणा, भुरी किंवा आभासापेक्ष वास्तव बाबी व वास्तविकता यावर आधारित असणे महत्त्वाचे आहे. बदलते आधिभौतिक वास्तव हे वेगवेगळ्या शैक्षणिक दृष्टिकोनाकडे आणि शिक्षणाच्या अलगसलग पद्धतीकडेसुद्धा घेऊन जातात. साहसी व इतर ख्रिस्तीधर्मी हे सार्वजनिक शिक्षण पद्धती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असताना दरवर्षी शिक्षणाच्या खाजगी लक्षावधी डॉलर्स का म्हणून खर्च करतात? याला कारण म्हणजे त्यांच्या अंतिम वात्स्वाचे स्वरूप, परमेश्वराचे अस्तित्व, मानवी प्रकरणात परमेश्वराची भूमिका मुले म्हणून मानवाचे स्वरूप व भूमिका संबंधित आधिभौतिकशास्त्रीय विश्वास होय. गहन पातळीवर पुरुष व स्त्रिया या आधिभौतिकशास्त्रीय विश्वासाने प्रेरित केल्या जातात. इतिहास दर्शवितो की लोक हे अशा समजांसाठी एकमेकांना मारायला तयार असतात आणि ते असे शैक्षणिक वातावरण निर्मित करण्यास उत्सुक असतात, ज्यात त्यांचे बहुतांश मुलभूत विश्वास हे त्यांच्या मुलांना शिकवले जातील. आधिभौतिकशास्त्राचा मानववंशशास्त्रीय पैलू हा शिक्षणकर्त्यांसाठी विशेष महत्वाचा आहे. काही झाले तरी ते आकार देण्याजोगा मानवांशी त्यांच्या जीवनाच्या एका अंतिम प्रभावशाली टप्प्यावर व्यवहार करत आहेत. विद्यार्थ्यांचे स्वरूप व क्षमता या विषयीचे दृष्टीकोन हे प्रत्येक शैक्षणिक प्रक्रियेचा पाया ठरते. सर्व तत्त्वज्ञानातील शिक्षणाचा नेमका उद्देश हा या दृष्टीकोनांशी घनिष्ठपणे निगडीत आहे.

अशा प्रकारे मानववंशशास्त्रीय विचार हे शिक्षणाच्या ध्येयाशी अतिशय जवळचे आहेत. तत्त्ववेत्ते डी.एल्टन ट्रब्लड हे समर्पकपणे व्यक्त करताना म्हणतात, "माणूस काय आहे हे

जोपर्यंत आपण स्पष्ट करीत नाहीत तोपर्यंत आपण इतर बऱ्याच बाबतीत स्पष्ट होऊ शकत नाहीत." एका मुलाला तुम्ही डेस्मंड मॉरीसच्या 'उघड्या माकडाप्रमाणे' किंवा परमेश्वराचे एक मूल म्हणून बघतात. यामुळे खूप फरक पडतो. त्याचप्रमाणे हे समाजाने महत्वाचे आहे की मूले ही जन्मजात राक्षसी (वाईट) असतात किंवा मूल:त चांगली असतात किंवा चांगली परंतु पापाच्या परिणामामुळे मुल:त फिरवली गेलेली असतात. मानववंशशास्त्रीय स्थानातील बदल हा शैक्षणिक प्रक्रियेच्या ठळकपणे वेगळ्या दृष्टीकोनाला निर्माण करेल. आधिभौतिकशास्त्र हे तात्त्विक आहे आणि ते कार्यकारणपरिणाम संबंधाच्या स्वरुपासारख्या समस्येवर प्रकाश टाकते. ते अध्यापनाशी शैक्षणिक उद्दिष्ट्ये, सुयोग्य सामग्रीची निवड या विषयीच्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वसाधारण स्वभावाप्रती शैक्षणिक ध्येये व वृत्ती या विषयीच्या विचारांसंदर्भात संबंधित आहे.

**ज्ञानशास्त्र व शिक्षण**

ज्ञानशास्त्र व शिक्षण हे शब्दात व्यक्त न होणारे (ध्वनित) साथीदार आहेत. कारण दोन्हीही प्रामुख्याने जाणण्याच्या कृती आहेत. ज्ञानशास्त्र हे एका अर्थाने शिक्षणाचे चलित्र आहे, कारण ते शैक्षणिक प्रक्रियेला गती देते. जे काम शैक्षणिक सिद्धांत व सराव एखादी व्यक्ती अंमलात आणते ते त्याच्या किंवा तिच्या ज्ञानशास्त्राच्या सिद्धांत व सरावाशी सुसंगत असतील. ज्ञानशास्त्राचा शिक्षणावर क्षणोक्षणी प्रत्यक्ष परिणाम आहे. उदा. ज्ञानाच्या विविध स्त्रोतांच्या महत्त्वाविषयीची गृहीतके ही नक्कीच अभ्यासक्रमातील भारत व अध्यापन कार्यपद्धतीत प्रतीत होतील. कारण ख्रिस्ती शिक्षक हे वैध ज्ञानाचा स्त्रोत म्हणून सकारात्मक विश्वास ठेवतात व त्यामुळे ते नि:संकोचपणे असा अभ्यासक्रम निवडतील. ज्यात बायबलची भूमिका असेल जी त्यात विश्वास न ठेवणाऱ्यांच्या अभ्यासक्रम निवडीपेक्षा खूपच वेगळी असेल. वस्तुतः त्यांच्या श्रद्धेच्या तत्त्वज्ञानविषयक जागतिक दृष्टीकोन हा ते शिकवीत असलेल्या प्रत्येक मुद्द्याच्यासादरीकरणाला आकार देईल. आणि अर्थातच ही गोष्ट प्रत्येक तात्त्विक मतप्रवाहाच्या शिक्षकासाठी सत्य आहे आणि अशा प्रकारे साहसी तरुणांना साहसी शाळेत शिक्षित करण्यासाठी महत्त्वाचा युक्तिवाद स्थापते.

**मुल्यशास्त्र व शिक्षण**

आपले सध्याचे युग हे अतिशय धावपळीचे व गडबड गोंधळाचे युग आहे. युद्धे व संघर्ष निर्विवादपणे चालू आहेत. आणि दहशतवाद, विनाश, जाळपोळ. अपहरण, खून, मादक पदार्थांचा गैरवापर, मद्यपान, लैंगिक अनैतिकता, कुटुंब तुटणे, अन्याय, भ्रष्टाचार, दडपशाही, कटकारस्थाने व निन्दानालास्ती अशा असंख्य चिंताजनक व दु:खदायक घटना जगभरात घडत आहेत. या होण्धालाच्या भोवऱ्यात मानवाचा सर्वात मौल्यवान ठेवा हा जवळजवळ नष्ट झाला आहे. याचा संदर्भ व्यक्तिगत मानवी प्रतिष्ठेचा नाश, वेळेचा सन्मान करण्याच्या परंपरेचा ऱ्हास, जीवनप्रतिष्ठेचा ऱ्हास, लोकांमधील परस्पर विश्वासाचा ऱ्हास, पालक व शिक्षकांच्या अधिकाराचा ऱ्हास यांच्याशी असून ही यादी वाढतच जाणारी आहे. या संदर्भात शिक्षण हे अभ्यासक्रमाद्वारे मुल्ये (जसे सत्य, सौन्दार्य्म चांगुलपणा, इ.) रुजविण्यात आणि ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत

munotes.in

नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. हे अगदी योग्यच कथन केले गेले आहे. की संस्कृती ही पूर्ण इतिहासभारत निर्मित झालेल्या मुल्यांची समग्रता आहे आणि शिक्षण हे संस्कृती सादर करण्याचे साधन आहे.

म्हणूनच मूल्यशास्त्राला महत्त्वाच्या शैक्षणिक आयामांची गरज आहे. या आयामांचे गतक कोणते? पहिले म्हणजे मुल्यशास्त्र हे एक मूल्यपद्धतीला प्रक्षेपित करून मुल्यशास्त्र विषयक उद्देश व आदर्शांच्या स्वरूपाअंतर्गत शैक्षणिक उद्देश सुचविते. दुसरे म्हणजे मुल्यशास्त्र हे एका निश्चित समाजास सर्वसाधारण मानवी किंवा वैश्विक मुल्ये आणि विशिष्ट मुल्ये या दोघांना स्मावते व त्याद्वारे त्याला व्यक्तिमत्त्व देते. शिक्षण हे मूल्यांचे जतन करते आणि त्यांना प्रसारित करते. जे मानवी समाजाच्या सांस्कृतिक ओळखीची हमी देते. तिसरे म्हणजे मूल्यांच्या कामगिरीला ज्ञान व अनुभवाची गरज असते. ज्याचा अर्थ शिक्षणाच्या या प्रक्रियेत याचा समावेश दोन परस्पर संबंधी पातळीवर आहे. आकलन विषयक आणि भावनिक शेवटी मुल्यशास्त्र हे मानवी सृजनशीलतेच्या प्रकटीकरणाचे क्षितिज असल्याने व्यक्तिगत आणि मानवी समाजाच्या सृजनशील शक्ती रुजवण्याचे कार्य हे शिक्षणाच्या पायाभूत कार्यापैकी आहे.दुसऱ्याप्रकारे व्यक्त करायचे म्हटल्यास व्यक्तिगत वहा जरी सर्व मुल्यांचा स्त्रीत असला तरी तो जन्माला येत नसतो तर शिक्षणाने विकसित होतो. म्हणूनच आजकाल आपण अंदाज करतो की शिक्षण हे भावी सामाजिक विकासासाठी एक पायाभूत स्त्रोत असला तरी तो जन्माला येत नसतो तर शिक्षणाने विकसित होतो. म्हणूनच आजकाल आपण अंदाज करतो की शिक्षण हे भावी सामाजिक विकासासाठी एक पायाभूत स्त्रोत आहे. मुल्यशास्त्राच्या शैक्षणिक आयामाच्या सामग्री बनवणाऱ्या घटकांच्या या संक्षिप्त सादरीकरणाद्वारे तेथे एक महत्वाचा निष्कर्ष परिणत होतो : शिक्षणाशिवाय मुल्याशास्त्र हे जिवंत बाळापासून वंचित राहील आणि मुल्यशास्त्राच्या प्रकाराशिवाय शिक्षण हे अंधारात चाचपडत राहील.

### १.५.२ व्याप्ती

शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाची व्याप्ती म्हणजे शाळेच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या अशा सर्व मुल्यांचा अभ्यास जे शालेय दृष्टीकोनातून महत्वाचे आहेत. अशा ते म्हणजे शिक्षणाच्या क्षेत्रातील तत्त्वज्ञान आहे.\

शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाची व्याप्ती ही शिक्षणाच्या समस्यांशी संबंधित आहे. या समस्येत मुख्यत्वेकरून पुढील बाबी सामावतात.

- मानवी स्वभाव, जग व विश्व आणि त्यांचे मानवाशी सामाबंध्यांचा अर्थ लावणे.
- शिक्षणाची उद्दिष्टये व आदर्श यांचा अर्थ लावणे.
- शिक्षणाच्या पद्धतीच्या विविध घटकांचा संबंध
- शिक्षण व राष्ट्रीय जीवनाची विविध क्षेत्र (अर्थव्यवस्था, राजकीय , सामाजिक प्रगती, सांस्कृतिक पुनर्मांडणी इ.यांचा संबंध)
- शैक्षणिक मुल्ये ,ज्ञानाचा सिद्धांत व त्याचा शिक्षणाशी संबंध

वर निर्देश केलेल्या समस्या शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाची व्याप्ती घडवितात व त्याचे स्वरूप स्पष्ट करतात अशा प्रकारे शिक्षांच्या तत्त्वज्ञानाची व्याप्ती पुढील गोष्टी सामावते :

### अ) शिक्षणाचे उद्देश व आदर्श –

शिक्षण कर्ते हे शिक्षणाचे वेगवेगळे उद्देश आणि आदर्श यांचे बारकाईने मूल्यमापन करतात. हे उद्देश व आदर्श वेगवेगळ्या काळात विविध तत्त्ववेत्यांद्वारा सुचवले गेले आहे. ते म्हणजे चारित्र्य बांधणी, खरीखुरी मानवनिर्मिती, समरस मानव विकास, प्रौढ जीवनासाठीची तयारी, नागरिकत्वाचा विकास रिकामा वेळेचा वापर, नागरी जीवनासाठीचे प्रशिक्षण आंतरराष्ट्रीय राहणीमानासाठीचे प्रशिक्षण, सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यप्राप्ती वैज्ञानिक व तंत्रज्ञानविषयक विकास सर्वांसाठी शिक्षण शिक्षांच्या समान संधी लोकशाही राजकीय व्यवस्थेचे सबलीकरण व मानवी स्त्रोत विकास. वेगवेगळ्या काळात शैक्षणिक विचारवंताद्वारा सादर केलेल्या वरील व शिक्षणाच्या इतर उद्देशांची छाननी व मूल्यमापन केले जाते. एखाद्या शिक्षण संबंधित परिस्थिती व समस्यांच्या ज्ञानाबाबत अभाव असेल तर तो/ ती शिक्षणाच्या उद्दिष्टांवर पोहचण्यास असहाय असते. अशा प्रकारे शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे निरनिराळे उद्देश व आदर्श यांच्या पर्यंत पोहचण्यासाठी त्यांचे बारकाईने मूल्यमापन करते.

### ब) मानवी स्वभावाचा अर्थ लावणे –

मानवी स्वभावाचे तत्त्वज्ञानविषयक चित्र म्हणजे सर्व मानवी शास्त्रातून उचललेल्या वस्तुस्थितीचे वेगवेगळ्या नमुनेदर शास्त्रातील मुल्यांसोबतच्या संयोगीकरणाचा परिणाम आहे. म्हणूनच जीवशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र व मानववंश शास्त्र आणि इतर मानवी शस्त्रे यांच्याद्वारा काढल्या गेलेल्या मानवाच्या चित्रांच्या तुलनेत तत्त्वज्ञान विषय चित्र हे अधिक विस्तृत आहे.

### क) शैक्षणिक मुल्ये –

जीवनमूल्ये ही वैशिष्ट्यपूर्णरित्या एक तत्त्वज्ञान विषयक विषय आहे. कारण तो अधिक अमूर्त, परिपूर्ण व सार्वत्रिक आहे. शिक्षांचे तत्त्वज्ञान हे मूल्यांचे फक्त समीक्षणात्मकरित्या मूल्यमापनाच करत नाही. तर त्यांना एका पदानुक्रमात व्यवस्थितरित्या ठेवते. शैक्षणिक मुल्ये ही तत्त्वज्ञानविषयक मुल्यांद्वारा ठरवली जातात. वेगवेगळ्या तत्त्ववेत्यांद्वारा सुचवली गेलेली शिक्षणिक मूल्य ही त्यांचे स्वत:चे जग, मत आणि मानवी जीवनाच्या हेतुवरील त्यांचा बघण्याचा दृष्टीकोन यापासून मिळवली गेली आहे. म्हणूनच जागतिक मते, दृष्टीकोन विश्वास यांची छाननी हे तत्त्वज्ञानाचे विशिष्ट कार्य आहे. आणि मूल्यांच्या तत्त्वज्ञानविषयक उपचारासाठी ते गरजेचे आहे.

### ड) ज्ञानाचा सिद्धांत

शिक्षण हे ज्ञानाशी संबंधित आहे. ते ज्ञानाचा स्त्रोत, मर्यादा, निकष आणि साधनांद्वारा ठरविले जाते. या सर्व गोष्टींची चर्चा ही तत्त्वज्ञानांची एक शाखा असलेल्या ज्ञानशास्त्राच्या अधिकार क्षेत्रात येते, म्हणून शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाच्या कार्याचे एक महत्वाचे क्षेत्र हे ज्ञानाच्या सिद्धांताशी संबंधित आहे.

**इ ) शिक्षण आणि राष्ट्रीय जीवनाची विविध क्षेत्रे आणि शिक्षण पद्धतीच्या विविध घटकांचा संबंध –**

शिक्षणाच्या कारणाशी शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाने दिलेले एक सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे राष्ट्र व शिक्षण, अर्थव्यवस्था व शिक्षण, अभ्यासक्रम, शालेय संघटना व व्यवस्थापन शिस्त, शिक्षक विद्यार्थी संबंध अध्यापनाच्या पद्धती पाठ्यपुस्तक इत्यादींचा संबंध ठरवण्यासाठीच्या निकषांची सोय होय. या समस्या शिक्षणाच्या वेगवेगळ्या तत्त्वज्ञानाच्या मुल्यमापनाकडे घेऊन गेले आह्व. सर्वच ठिकाणी निर्णयाचे निकष हे तत्त्वाज्ञाद्वारे ठरविले जातात म्हणून शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे या क्षेत्रातील समीक्षणात्मक मूल्यमापन व निर्णयासाठीचे निकष पुरवते.

**१.५.३ कार्ये**

शिक्षणाचे तत्त्वज्ञान विविध कार्ये पार पाडते. त्यांची चर्चा खालील प्रमाणे :

**अ) शिक्षणाचे पैलू ठरवणे :**

शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे शिक्षणाचे सर्व पैलू विशेषतः शैक्षणिक उद्देश, अध्यापनाची पद्धत, अभ्यासक्रम, शिक्षक, विद्यार्थी इत्यादींशी संबंधित मूळ कल्पना पुरवते. असे ही म्हंटले जाते की शैक्षणिक तत्त्वज्ञान हे विविध दृष्टीकोन देते. परंतु ही स्थिती अपायकारक नाही. उलट यामुळे समाजाच्या गरजेनुसार शिक्षण प्रदान करण्यात मदत होते. शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातील फरक हा मानवी मानवी जीवनाची बहुलता आणि विविधता प्रकट करतो. (उदा. निसर्गवाद अंतर्गत शिक्षणाचे ध्येय हे स्वअभिव्यक्ती हे आहे. तर आदर्शवादात हे स्वजाणीव आहे आणि व्यावहारिकतेमध्ये सामाजिक कार्यक्षमता आहे. शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे शिक्षणाच्या प्रक्रियेला जीवनाच्या विविधतेपासून सुयोग्य ध्येय सुचवून आणि त्यानुसार साधनाची निवड करून मार्गदर्शित करते.

**ब) शिक्षणाच्या क्षेत्रात जुन्या व नवीन परंपरांचा सुसंवाद साधणे :**

सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत जुन्या परंपरा ह्या लोकांसाठी कालबाहय ठरतात. त्यांची जागा नवीन परंपरा घेतात. परंतु बदलीची ही प्रक्रिया नेहमीच सुरळीत असत नाही. तिला समाजाच्या विशिष्ट रुढीप्रिय विभागाकडून विरोधाचा सामना करावा लागतो. त्याच वेळेस हे लक्षात घ्यावयास हवे की प्रत्येक 'जून' हे कालबाह्य नसते आणि प्रत्येक 'नवीन' हे परिपूर्ण नसते. म्हणून या दोगांमधील सुसंवाद टिकविण्यासाठी दोघांमध्ये समन्वय साधने गरजेचे आहे. हे कार्य शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाने पार पडले जाऊ शकते. (उदा.भारतीय संस्कृती – Indian NOTES 28 आणि ऑँग्लीफन यांच्यातला पेच प्रसंग म्हणजेच पूर्व व पश्चिम) हे आपल्याला देशाची सांस्कृतिक परंपरा कशी टिकवावी ते शिकवते.

**क)शैक्षणिक विकास साधण्यासाठी शैक्षणिक योजना करते, प्रशासक आणि शिक्षकांना प्रगतीशील दृष्टीकोन पुरवणे –**

स्पेंसर यांनी अगदी अचूक दर्शविले आहे, की एक खराखुरा तत्त्ववेत्ताच शिक्षणाला व्यावहारिक आकार देवू शकतो. शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे शैक्षणिक योजना करते, प्रशासक

आणि शिक्षकांना योग्य दूरदृष्टी पुरविते जी त्यांना शैक्षणिक ध्येये कार्यक्षमतेने प्राप्त करण्यास मार्गदर्शन करते. हे शैक्षणिक व्यावसायींसाठी त्यांच्या कार्यासाठी आणि जीवनाच्या सर्वसाधारण योजनेतील या कार्याच्या स्थानासाठी खूपच उपयोगी आहे. शिक्षणाचे तत्त्वज्ञान शिक्षक, प्रशासक किंवा विद्यार्थ्यांना संपादित सैद्धांतिक ज्ञानाशी त्यांच्या व्यावसायिक अनुभवाचा अर्थ लावण्यास व याउलट सुद्धा मदत करते. शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे कार्य म्हणजे व्यक्तीला योग्य गोष्ट योग्य ठिकाणीच सुव्यवस्थित बसवण्यास मदत करते. ते त्याला शैक्षणिक तत्त्व व सरावावरील संकल्पनात्मक चौकट आकलन करण्यास मदत करते, तसेच ते एखाद्याच्या अपेक्षित ध्येय गाठण्यास स्वत:ला बदलाविण्यात किंवा स्वत:च्या कृती रुपांतरीत करण्यास मदत करते.

**ड) आधुनिक काळाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तरुण पिढीला तयार करणे –**

समाज हा स्थिर नाही; तो वेळोवेळी मुल्ये, परंपरा, रूढी, संस्कृती इत्यादी बदलावितो. सामाजिक भाष्यकारांनी इतिहासाच्या सध्याच्या काळाला बरिच बिरुदे चिकटवली आहे. काहींसाठी हे माहिती युग आहे तर इतरांसाठी आधुनिकोत्तर, नंतरची आधुनिकता, उच्च आधुनिकता किंवा अस्थिरतेचे युग आहे. या यादीतील अधिकची भर म्हणजे भारतात १९९० मध्ये आर्थिक पटलावर आलेल्या घटनेनुसार 'सध्याचे युग' हे जागतिकीकरणाचे युग आहे. या परवलीच्या शब्दाचे देशाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक जाळ्यावर, ज्याचा शिक्षण हा एक भाग आहे. परिणाम झाले आहे. शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे एक मार्गदर्शक, दिशादर्शक आणि मुक्ततादर्शक बळ आहे जे तरुण पिढीला आणि मोठ्या प्रमाणावर समाजाला आधुनिक काळाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सडत करते. ते व्यक्तीला त्याचे ध्येय आणि दैनंदिन कामकाज यातील संबंध समजण्यास आणि वैविध्यपूर्ण समाजात जीवनप्रणाली समीक्षणात्मक प्रवृत्ती विकसित होण्यास मदत करते.

## १.६ तत्त्वज्ञान व शिक्षणातील संबंध

munotes.in

पुढील कारणास्तव शिक्षण हे तत्त्वज्ञानावर अवलंबून आहे.

**१) शिक्षणाने कोणत्या अंतिम लक्षाकडे जावे हे तत्त्वज्ञान ठरविते -**

शिक्षण ही एक जाणीवपूर्वक गतिमान प्रक्रिया आहे, जिला योग्य मार्गदर्शन व देखरेखीची गरज आहे. योग्य मार्गदर्शन व देखरेखीशिवाय ते त्याचे ध्येय प्राप्त करू शकत नाही. तत्त्वज्ञान हे जीवनाचे ध्येय ठरविते व तसेच ते ध्येय प्राप्त करण्यासाठी शिक्षणाला सुयोग्य व परीनाम्क्षम मार्गदर्शन व देखरेख पुरविते. तत्त्ववेत्याच्या मदतीशिवाय शिक्षण ही विकास व उपलब्धीची यशस्वी प्रक्रिया होऊ शकत नाही. स्पेंसर यांनी अगदी अचूक म्हटले आहे –"खरेखुरे शिक्षण हे खऱ्याखुऱ्या तत्त्वज्ञानाद्वारेच व्यवहार्य असते."

**२) तत्त्वज्ञान हे शिक्षणाचे विविध पैलू ठरविते –**

काही विद्वान मानतात की तत्त्वज्ञानाचा संबंध हा फक्त अमूर्त बाबी आणि संकल्पनांशी आहे आणि ज्यावेळेस शिक्षण हे व्यवहार्य, मूर्त गोष्टी आणि प्रक्रियांशी संबंधित आहे, म्हणून हे दोन्ही वेगवेगळे आहे आणि त्यांच्यामधले काही संबंध नाही. परंतु ही चुकीची धारणा आहे. तत्त्वज्ञान व शिक्षण हे दोन्ही घनिष्ठपणे व अविभाज्यपणे एकमेकांशी

जुळलेले आहे. कुठल्याही प्रकारे या दोघांना वेगळे केले जाऊ शकत नाही. आपल्याला हे माहित असायलाच हवे हे ते तत्त्वज्ञानाच आहे जे शिक्षणाच्या सर्व पैलूंवर अगदी सुरुवातीपासूनच प्रभाव टाकत आले आहे आणि येणाऱ्या सर्व काळात ते शिक्षणावर प्रभाव टाकत राहील. रॉस यांचे म्हणणे पुन्हा एकदा आठवणे अधिक चांगले राहील – "तत्त्वज्ञान व शिक्षण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणेच आहे. ज्या एकाच गोष्टीचे वेगवेगळे दृष्टीकोन सादर करतात आणि एकद्वारा दुसरी सुचवली जाते.

**३) थोर तत्त्ववेत्ते हे थोर शिक्षणतज्ञ सुद्धा होते –**

इतिहास याची साक्ष आहे की थोर तत्त्ववेत्ते हे त्याच्या काळात थोर शिक्षण तज्ञ म्हणून सुद्धा राहिलेले आहे. प्लेटो, सॉक्रेटिस, लोके, कोमेनिअस, रुसो, फ्रोम्बेल, देवे, गांधी, टागोर, अरविंद घोष आणि इतर जे त्यांच्या काळातील थोर तत्त्ववेत्ते होते. ते शिक्षणाविषयी ही बोललेले आहे. त्यांचे तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ जगभरातील मुलांसाठी शैक्षणिक योजना आखण्यासाठी व शैक्षणिक ध्येये ठरविण्यासाठी महत्त्वाची मार्गदर्शक पुस्तके राहिलेली आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे सर्व थोर तत्त्ववेत्त्यांनी लोकांना अनुसरण्यासाठी व स्वत: विकसित होण्यासाठी शिक्षणाला त्याच्या तत्त्वज्ञानविषयक कल्पना व्यवहारात उतरवण्यासाठीचे साधन म्हणून योजिलेले आहे.

**पुढील कारणास्तव तत्त्वज्ञान हे शिक्षणावर अवलंबून आहे :**

१) **शिक्षण ही तत्त्वज्ञानाची गतिमान बाजू आहे –** एखादे कार्य पूर्ण करण्यासाठी दोन गोष्टी आवश्यक असतात – अ) विचार किंवा योजना ब) उपयोजन किंवा व्यवहार्यता. तत्त्वज्ञान ही वैचारिक किंवा योजनेची बाजू आहे आणि शिक्षण ही उपाययोजना किंवा व्यवहार्यतेची बाजू आहे. तत्त्वज्ञान हे जीवनाचे ध्येय ठरविते. आणि निश्चित केलेल्या ध्येयांना प्राप्त करण्यासाठी अनुसरल्या जाणाऱ्या तत्त्वांना विश्लेषणाद्वारे मांडते. शिक्षण हे या तत्त्व व कल्पनांचे व्यवहारात रूपांतरण करते कारण शिक्षणाचा उद्देश म्हणजे मानवी वर्तनाला आकार देणे हा आहे. अशा प्रकारे ॲअस यांनी अचूक म्हटले आहे-"शिक्षण ही तत्त्वज्ञानाची गतिमान बाजू आहे."

२) **शिक्षण हे ध्येय संपादन करण्याचे साधन आहे-** वर सांगितल्याप्रमाणे तत्त्वज्ञान हे जीवनाचे ध्येय ठरविते. विश्लेषण व वर्गीकरणातून शिक्षणाच्या प्रक्रियेद्वारे प्राप्त केल्या जाणाऱ्या ध्येयांमध्ये ती विभागली जातात. हर्बर्ट याचं सुद्धा तेच मत आहे. – "सर्व तत्त्वज्ञान विषयक प्रश्नांचे पूर्णपणे निराकरणे होईपर्यंत शिक्षणाला सुट्टी घ्यायला वेळ नाही." काही वेळेस शिक्षण तत्त्व व शिक्षण हे तत्त्ववेत्त्यापुढे अशा समस्या ठेवतात, ज्यांना तोंड द्यावे लागते आणि ज्यांचे उपाय त्यांना आव्हान देतात. ह्या प्रकारे शिक्षण हे नवीन विचारसारणीत योगदान देते आणि या विचारसरणी व विश्लेषणातून नवीन तत्त्वज्ञान जन्माला येवू शकते. तत्त्वज्ञान व शिक्षण हे दोन्हीही इतक्या घनिष्ठपणे निगडीत आहेत की त्यांच्या संबंधाची चर्चा अधिक तपशिलवार पणे जसे तत्त्वज्ञान आणि शिक्षणाची ध्येये, तत्त्वज्ञान आणि अभ्यासक्रम, तत्त्वज्ञान आणि अध्यापनाच्या पद्धती, तत्त्वज्ञान आणि शिस्त, तत्त्वज्ञान आणि पाठ्यपुस्तके आणि असेच इतर करणे अधिक चांगले होईल.

**तत्त्वज्ञान आणि शिक्षणाची ध्येये :**

प्रत्येक शैक्षणिक प्रश्नांचे उत्तर हे अंतिमत: आपल्या जीवनाच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होते. जरी काही जन ते सूत्रबद्ध करीत असले तरीही शिक्षणाच्या व्यवस्थेला एखादे ध्येय असायलाच हवे व शिक्षणाचे ध्येय जीवनाच्या ध्येयाशी सापेक्ष असते. जीवनाचा शेवट असावा असे तत्त्वज्ञान जे मानते सूत्रबद्ध करते आणि हा शेवट कसा प्राप्त करावा हे शिक्षण आपल्याला सुचविते. तत्त्वद्गाय्न आपल्याला जीवनातील मूल्यांशी परिचित करते आणि ही मुल्ये कशी मिळवली हे शिक्षण आपल्याला सांगते. म्हणूनच शालेय अभ्यासाचे स्वरूप, शालेय शिस्तीची पद्धत, सूचनांची तंत्रे व शालेय संघटन यांचा विचार करताना जीवनातील मुल्यांवर खूप सारा जोर दिला गेला आहे. ही मुल्ये म्हणजे दुसरे तिसरे काही नसून शिक्षणाचे तत्त्वज्ञान आहे जे अंतिम विश्लेषणात जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. तत्त्वज्ञान हे सर्व शैक्षणिक प्रक्रियेत जे काय केले जाते त्याला एक अर्थ प्रदान करते. तत्त्वज्ञान हे महत्वाचे मार्गदर्शक आहे. ज्याकडे आपल्याला शैक्षणिक प्रयत्नातील विरोधाच्या मुद्द्यांकडे पहावे लागते. वेगवेगळ्या शैक्षणिक प्रयत्नांना दिशा देण्यासाठी आपल्याजवळ शिक्षांचे एखादे असायलाच हवे. शिक्षणाचे ध्येय हे जीवनाच्या ध्येयाशी संबंधित आहे आणि जीवनाचे ध्येय हे नेहमीच त्या व्यक्तीजवळ त्या विशिष्ट वेळी असलेल्या तत्त्वज्ञानावर अवलंबून असते. अशा प्रकारे आपण शिक्षणाच्या एका तत्त्वज्ञानविषयक पायाशिवाय राहू शकत नाही.

पुढील ओळीत इतिहासाद्वारा झालेल्या या घनिष्ठ संबंधावर प्रकाश टाकलेला आहे.

प्राचीन काळ –सर्वप्रथम आपण प्राचीन ग्रीसमधील स्पार्टा राज्याचे उदाहरण घेऊ या. हे लक्षात घ्या की स्पार्टा हे शत्रूच्या सततच्या हल्ल्यांनी बेजार होते. म्हणून त्या राज्याला त्याचे स्वातंत्र्य व ऐक्य टिकविण्यासाठी दृढ सेनापती व शूर सैनिकांची गरज होती. म्हणून शत्रूच्या विरोधात सतत लढणे हे प्राचीन स्पार्टाच्या तत्त्वज्ञानाचे ध्येय बनले. हे ध्येय प्राप्त करण्यासाठी शिक्षणपद्धतीने मुलांमध्ये देशभक्ती, धैर्य, निर्भीडपणा, शारीरिक ताकद, कठोर शिस्त आणि देशाच्या आवाहानाप्रती आत्मसमर्पणाची भावना हे गुण रुजवायचा प्रयत्न केला. शारीरिक कमजोरीची निर्भत्सना केली गेली. (दुर्गुण म्हणून) आणि देशसेवेसाठी बलिदानाला सर्वोच्च मूल्य मानले गेले. स्पार्टानंतर आपण रोमकडे वळूया. तसेच भारत व अथेन्सकडेही पाहू या. रोमन हे त्यांचे अधिकार व कर्तव्ये याबाबत खूपच जागरूक होते आणि म्हणून रोमन शिक्षणाने मानवी कृतींच्या सर्व क्षेत्रात मुलांच्या परिपूर्ण विकासाच्या गरजा पुरविल्या. अथेन्समध्ये जीवनाचे ध्येय हे शारीरिक सौंदर्य, चारित्र्याचे सौंदर्य असणे व सौंदर्यवान वस्तूप्रती कौतुकाची भावना असणे होते. म्हणून शिक्षणाचा उद्देश हा संपूर्ण चारित्र्याचा विकास करणे आणि असे गुण जे मुलांना त्यांचे जीवन आरामदायकरित्या जगू शकण्यास समर्थ करतील ते रुजविणे होते. अशा प्रकारे मुलांना शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या व भावनिकदृष्ट्या स्वत: विकसित होण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य आणि विपुल संधी दिल्या गेल्या. आपण येथे हे लक्षात घेऊ शकतो की अथेन्समधील शिक्षणाचे उद्दिष्ट हे जीवनाच्या तत्त्वज्ञानातील बदलणे रोम आणि स्पार्टापेक्षा खूपच वेगळे होते. प्राचीन भारतात धर्म हा अत्यावश्यक समाजाला जायचा. जीवनाचे ध्येय म्हणजे सर्व सांसारीक कर्तव्ये पार पडायची व तदनंतर

पुनर्जन्माच्या ऐहिक बंधापासून मुक्ती प्राप्त करायची. म्हणून त्या काळातील शिक्षण हे आनंद, कल्याण, परमानंद व शेवटी मुक्ती मिळविण्यासाठी संघटित केले गेले.

मध्ययुगीन काळ-जीवनाच्या तत्त्वज्ञानाने मध्ययुगीन काळात खूपच चढउतार पहिले. जीवनाची ध्येये ही वेळोवेळी बदलली आणि त्याचप्रमाणे शिक्षांची ध्येयेसुद्धा बदलली. या काळात इस्लाम व ख्रिश्चन धर्म हे धर्मांतराच्या कार्यात खूपच आक्रमकपणे गुंतलेले होते. म्हणून धर्म हे धर्मांतराच्या कार्यात खूपच आक्रमकपणे गुंतलेले होते. म्हणून धर्म हा शिक्षणाच्या हद्दीतसुद्धा प्रवेश करता झाला. भारतातील मुस्लीम शिक्षणाची प्रमुख ध्येये पुढीलप्रमाणे :

- इस्लामचा प्रसार,
- मुसलमानांमध्ये शिक्षणाचा प्रसार,
- इस्लामिक राज्यांचा विस्तार,
- नैतिकतेचा विकास,
- भौतिक कल्याणाची प्राप्ती,
- शरियतच्या प्रसार आणि
- चारित्र्याची बांधणी

युरोपमध्ये सुधारणा व नवजागरणाचे कॅथालिक अचूकतेवर टीका केली. लोकांनी सत्य स्वत: जाणून घेण्याचा हक्क प्रतीपादला आणि विधी व समारंभात आंधळेपणाने विश्वास ठेवणे थांबविले. अशा प्रकारे शिक्षणाचे ध्येय पुन्हा बदलले. शिक्षणाला सर्व विश्वास व कृतींद्वारे तार्किकता व समीक्षणात्मक अंतर्दृष्टी विकसित करायची होती, सर्व अंधविश्वास व यांत्रिक विधी नष्ट करणे शिक्षणाकडून अपेक्षित होते.

आधुनिक काळ – जीवनाचे तत्त्वज्ञान हे आधुनिक काळात पुन्हा बदलले. याचाच परिणाम म्हणून सुधारणावादी बदलांनी शिक्षणालासुद्धा रुपांतरीत करणे सुरु केले. लोकेचे तत्त्वज्ञान आपटले गेले आणि असे मत पुढे झाले की शिक्षणाने जन्मजात गुण, कौशल्ये व मुलांच्या क्षमता विकसित करायला हव्यात. मानसशास्त्रीय प्रवृत्तीने शिक्षणावर खूपच ताकदीने प्रभार टाकायला सुरुवात केली. शिक्षण हे मूल केंद्रित बनले आणि प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ पेस्टालोझी यांच्यानुसार शिक्षणाचे ध्येय हे मुलाचे व्यक्तिमत्व पूर्ण क्षमतेने विकास करणे असे जाहीर केले गेले . हर्बर्ट यांनी शिक्षणाचे ध्येय म्हणजे चारित्र्याची निर्मिती असे सुचविले. जसजसा वेळ गेला तसतसे जीवनाची ध्येये बदलली. म्हणून व्यावसायिक कार्यक्षमतेचा विकास हे शिक्षणाचे एक ध्येय म्हणून आघाडीवर आले.

सद्यस्थितीत जगातील सर्व देश हे त्यांच्या शिक्षणपद्धतींना त्यांच्या गरजा व विचारधारांनुसार संघटित करत आहेत. असे देश जेथे लोकशाहीची संवेदनशीलता मजबूत आहे तेथे शिक्षणाचे ध्येय हे लोकशाही मुल्ये रुजविणे आणि लोकशाही तत्त्वांची वाढ करणे हे आहे. याउलट असे देश जेथे साम्यवाद, राष्ट्रवाद किंवा हुकुमशाहीसारखा

इतर प्रकार राजकीय विचारधारा म्हणून प्रबळ आहे जेथे शिक्षण हे मूल्यांमध्ये पूर्ण पूर्ण आज्ञापालन, अंध विश्वास व कठोर शिस्त वाढवण्यासाठी संघटित केले जाते.

**तत्त्वज्ञान आणि अभ्यासक्रम :**

शिक्षणाचे तत्त्वज्ञानावरील अवलंबित्व हे अभ्यासक्रमाच्या प्रश्नाशिवाय इतर कोठेही अधिक स्पष्टपणे दिसत नाही. स्पेन्सर हे शिक्षणावरील त्यांच्या कार्याच्या पाहिल्या पाठात प्रतिपादन करतात की "अभ्यासक्रम ठरवितांना आपली पहिली पायरी म्हणजे मानवी जीवन बनविणाऱ्या अग्रगण्य प्रकारच्या कृतींचे त्यांच्या महत्त्वानुसार वर्गीकरण करणे हीच असावयास हवी." या तत्त्वाला फारच थोडी हरकत घेतली जाऊ शकते. परंतु जसे आपण त्यांच्या महत्त्वक्रमानुसार वर्गीकरण करण्यासाठी विषयांचे सापेक्ष मूल्य ठरवायला जातो. त्याचवेळी उद्देश व तत्त्वज्ञानातील फरक समोर येतो. व समस्येला गोंधळात टाकतो. स्मिथ, स्टॅन्ले आणि शॉर्स हे अभ्यासक्रम बांधणीचा एक प्रमुख मार्गदर्शक म्हणून नैतिक अधिकाराविषयी बोलतात. ते म्हणतात की 'नैतिक अधिकार हा चांगला आणि वाईटाच्या मुलभूत तत्त्वातून घेतलेला आहे. उघडपणे ही समस्या तत्त्वज्ञानविषयक आहे. स्पेन्सर यांच्यानुसार अभ्यासक्रमाची बांधणी ही मुख्य मानवी कृतीवर आधारित असायला हवी. ते विषयाचे सापेक्ष मुख्य हे त्यांच्या महत्त्वक्रमानुसार ठरवितात. उदा. स्वजतनाशी संबधित विषयाला ते प्रथम स्थान देतात.

निसर्गवाद्यांनुसार सध्याच्या अनुभव, आवड व कृती हे मार्गदर्शक घटक असायला हवेत. आदर्शवादी जनांसाठी मुळच्या आजच्या व भावी करती या अभ्यासक्रम रचनेत अजिबात महत्वाच्या नाहीत. विज्ञान व मानवतेतील प्रतीकात्मक असे मानव जातीच्या अनुभवांनी अभ्यासक्रम ठरवितांना प्राथमिक अभ्यास पुरवायला हवा. आदर्शवादी हे दुसऱ्या विषयाच्या तुलनेत एखाद्या विषयावर जोर देत नाहीत. वस्तुतः ते व्यक्तीच्या थोरविच्या युगांना अतिशय महत्त्व देतात जे काही विषयात मुबलक प्रमाणात आढळतात. आदर्शावादिंचा दृष्टीकोन हा केवळ वस्तुनिष्ठ मुद्यांच्या विरोधी व्यक्तीनिष्ठ असतो.

व्यवहारवादीजन हे अभ्यासक्रमाचे स्वरूप ठरविण्यासाठी मुख्य निकष म्हणून उपयोगितेच्या तत्त्वावर जोर देतात. लोडगे हे 'शिक्षणाचे तत्त्वज्ञान' मध्ये लिहितात : "अभ्यासक्रमावरील सर्व विषय हे पद्धतशीर सामग्रीच्या अचूक निर्मितीसाठी सक्षम असलेल्या स्मरणशक्तीला प्रशिक्षित करण्याऐवजी नवीन समस्या सोडविण्याच्या उद्देशाने तंत्रज्ञानावरील प्रभुत्व विकसित करण्यासाठी वापरले जायला हवेत." वास्तववादी विचार करतात की पुस्तकी, अमूर्त किंवा अत्याधुनिक अभ्यासक्रम हा निरुपयोगी आहे. त्यांना जीवनाच्या वास्तविकतेवर लक्ष केंद्रित करावेसे वाटते. नैसर्गिक विज्ञानाच्या पल्ल्यात येणाऱ्या विषयांच्या महत्त्वावर जोर देतात. अभ्यासक्रमाच्या समस्येतील अलीकडेच प्रकट झालेली आश्चर्यकारक आणि स्वागतार्ह आवड व कृती ही तत्त्वज्ञानविषयक निकषांच्या अभावामुळे थांबवली गेली आहे. बोडे हे 'आधुनिक शैक्षणिक सिद्धांत' यात नमूद करतात की जर आपल्याजवळ उद्देश ठरविण्यासाठी काही प्रकारचे मार्गदर्शक तत्त्वज्ञान नसेल तर आपण कोठेही पोहोचू शकत नाहीत. अभ्यासक्रम समस्येवर चर्चा करतांना ब्रिग्ज म्हणतात: "अगदी हाच तो टप्पा आहे जेथे शिक्षणाला खरोखरीच नेत्यांची

गरज असते – असे नेते ज्यांच्याजवळ एक ठोस सर्वसमावेशक तत्त्वज्ञान आहे जे ते दुसऱ्याला पटवून देवू शकतात आणि जे सुयोग्य अभ्यासक्रमाच्या सुसूत्रीकरणासाठी त्याचे सुसंगत उपयोजन दिग्दर्शित करू शकतात."

दुसऱ्या बाजूने बघता तत्त्वज्ञानी हे आदर्शवादी दृष्टीकोनातून जीवनाकडे बघताना मानतात की कार्याचे मानवीकरण केले हौ शकते व ते व्हायला हवे, तसेच मानवाच्या त्याच्या श्रमात समाधान मिळायला हवे, व "आपल्याला सर्वोच्च दर्जाच्या नसल्या तरीही नक्कीच एक असला अध्यात्मिक मूल्यांच्या प्राप्तीसाठी तेथे एक रंगमंच कसेही करून शोधावा लागेल." दुसऱ्या बाजूने बघता शिक्षणतज्ज्ञांनी 'भरवाई' चे तत्त्व गृहीत धरले आहे. हे महात्त्वाशिवाय नक्कीच नाही. शाळेतील प्रात्यक्षिक कामासाठी सतत केली जाणारी जवळजवळ सर्वोत्तम सबळ ही शैक्षणिक तत्त्ववेत्यांपैकी एक सर्वात आदर्शवादी असलेले फ्रोबेल यांच्याद्वारे लिहिली गेली आहे. वरील चर्चा दर्शविते की अभ्यासक्रम रचनेची समस्या ही लोकांच्या एका गटाद्वारा मानल्या गेलेल्या तत्त्वज्ञानविषयक विश्वासाच्या संदर्भात तत्त्वज्ञानविषयक आहे. हीच गोष्ट पाठ्यपुस्तकासाठी लागू होते.

**तत्त्वज्ञान आणि पाठ्यपुस्तके :**

सुयोग्य पाठ्यपुस्तकाचा स्वीकार हा अभ्यासक्रमाच्या प्रश्नाची घनिष्ठपणे निगडीत आहे. ब्रिग्ज यांनी 'अभ्यासक्रम समस्या (Curriculum Problems) मध्ये अलीकडेच जाणल्यानुसार यामध्ये सुद्धा तत्त्वज्ञानाचा समावेश होतो. ते म्हणतात: "पाठ्यपुस्तकांची निवड कशी केली जाते त्या प्रकारांशी परिचित असलेल्या प्रत्येकाने आदर्श आणि प्रमाणीकरणाच्या गरजांची खात्री पटवायलाच हवी, ते तयार केले गेलेले गेलेले नाहीत आणि सरावात स्वीकारले गेले नाहीत याचे कारण म्हणजे अभ्यासक्रम पुनरावृत्तीतील धीम्या प्रगतीसाठीचे जे आहे तेच आहे: शिक्षणाच्या संपूर्ण व सुसंगत तत्त्वज्ञानाने ते अधोरेखित व्हायलाच हवे."

सुयोग्य पाठ्यपुस्तकाची निवड तत्त्वज्ञानाला सामावते. आपल्याजवळ पाठ्यपुस्तकाच्या निवडीत आपल्या मार्गदर्शनासाठी काही आदर्शे व प्रमाणित गोष्टी असायलाच हव्यात. हे पाठ्यपुस्तकच असते ज्यातील सामग्री ही शिक्षणाच्या हेतूशी अनुरूप प्रदान केली जाते. निवडलेल्या अभ्यास्क्रमाचे कार्य हे पाठ्यपुस्तकावर अवलंबून असते. "पाठ्यपुस्तक हे मानके प्रतिबिंबित करतात व स्थापित करतात ते शिक्षकांना काय जाणून घ्यायचे आहे आणि विद्यार्थ्यांना काय शिकायचे आहे हे कदाचित खूपच वारंवारपणे दर्शवितात...... ते स्पष्टपणे पद्धतींवर परिणाम करतात व विद्वत्तेची वाढती मानके प्रतिबिंबित करतात." हे खरे आहे की काही आधुनिक शैक्षणिक विचारवंतांनी त्यांच्या प्रकल्प किंवा कार्याच्या ठोस गटाच्या स्वरुपात पाठ्यपुस्तकाच्या तथाकथित जुलुमाविरुद्ध बंडाळी केली आहे. परंतु पुस्तकापासून दूर जाने म्हणजे काही कमी मूर्खपणा नाही आणि त्याच्या वापराच्या विरोधात वाद चालू थावाने म्हणजे एक शैक्षणिक श्रम आहे. वस्तुतः पाठ्यपुस्तक म्हणजे एक संस्था आहे जी नष्ट केली जाऊ शकत नाही. ही संस्था निरामय व सेवायोग्य ठेवण्यासाठी त्याचे स्वरूप व सामग्री ठरविण्याच्या हेतूने एक तत्त्वज्ञान असायलाच हवे.

म्हणूनच शिक्षणाच्या तत्त्वज्ञानविषयक पायासाठीच्या गरजेवर जास्त जोर दिला जाऊ शकत नाही.

**तत्त्वज्ञान आणि अध्यापन अध्ययन प्रक्रिया :**

- **शिक्षक**

विचारसरणी व वर्तन या दोन्ही क्षेत्रात तत्त्वज्ञानाचा शिक्षकावर खूपच प्रभाव आहे. खरे सांगायचे म्हणजे एक शिक्षक म्हणजे फक्त एक शिक्षक नसतो. तो एक तत्त्वज्ञानीसुद्धा असतो. दुसऱ्या शब्दात म्हणजे एक शिक्षकाजवळ त्याचे स्वत:चे असे तत्त्वज्ञान असते आणि तो त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रभावित करत असतो. त्याचे तत्त्वज्ञान असे असावयास हवे की जे मुलांचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे बहरास आणेल. याकरिता शिक्षकाला मुलांच्या गरजा व समाजाच्या मागण्या चांगल्या प्रकारे ज्ञात हव्यात व त्यानंतर त्याच्या अध्यापनाच्या पद्धतींची योजना करावी. त्य्याने हे स्मरणात ठेवायला हवे की त्याचे स्वत:चे विश्वास आदर्श तत्त्वे व वागणुकीची तत्त्वे यांचा मुलांच्या विकासावर जबरदस्त प्रभाव असतो. म्हणून त्याच्याजवळ जीवनाच्या सर्व तत्त्वज्ञानांची एक चांगली जाण असायला हवी आणि त्याने त्याचे स्वत:चे तत्त्वज्ञान तयार करण्याकरिता त्यातून चांगले व परिपूर्ण घटक निवडायला हवेत. अजून म्हणजे तो म्हणजे उच्च आदर्श बिंबवलेला माणूस असायलाच हवा व त्याच्याजवळ नैतिक व अध्यात्मिक मुल्ये असायलाच हवीत जे त्याचे चारित्र्य बनवेल व त्याच्या वर्तनाला आकार देईल. तसेच तो सर्वच क्षेत्रातील राष्ट्रीय गरजांबाबत सुजन असायलाच हवा आणि त्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्याने अध्यापन कृतींची योजना करायला हवी. उच्च आदर्श, नैतिक व अध्यात्मिक मुल्ये बिंबवलेळे आणि राष्ट्रीय प्रगती सन्मानासाठी राष्ट्रीय जबाबदारीची भावना असलेले राष्ट्रीय जबाबदारीची भावना असलेले केवळ असेच शिक्षक हे राष्ट्रीय सेवा आणि आंतरराष्ट्रीय कल्याणाला समर्पित असे देशभक्त, सक्रीय, युक्तीबाज व उद्योगी नागरिक निर्माण करू शकतो.

- **अध्यापनाची पद्धत**

जसे अभ्यासक्रमासोबत तसेच पद्धतीसोबत सध्याच्या काळात शैक्षणिक पद्धतीतील विशेष समस्या म्हणजे शिक्षकाने शैक्षणिक प्रक्रियेत किती प्रमाणात हस्तक्षेप करावा आणि यामुळे तत्त्वज्ञानविषयक समस्या उद्भवते. दोन बऱ्याच वेगळया कारणांसाठी हस्तक्षेप न करण्याचे समर्थन केले जाते. एकतर विद्यार्थ्यांच्या देणगीच्या स्वरूपामुळे त्याच्या वातावरणामुळे रुसो, फिच्टे व फ्रोएवेझ हे सर्व मानतात की मुलाचा स्वभाव हा चांगला असतो आणि कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप हा परिणामत: अपायकारक असतो. म्हणूनच रुसोचे 'नकारात्मक' किंवा 'प्रतिबंधात्मक' शिक्षण आणि फ्रोएबेझचे 'निष्क्रिय' शिक्षण. मॉन्टेसरींनी पर्यावरणवादी दृष्टीकोन स्वीकारला आणि मानले की उपदेशात्मक साहित्याचा समावेश असलेले वातावरण जे त्यांनी मुलांसाठी तयार केले होते. ते मुलाचा फक्त योग्य प्रकारचा प्रतिसाद आणि चांगल्या आवेगाच्या निर्मितीसाठी आदर्श व अचूकपणे जुलावणारे आहे. शिक्षकाचा हस्तक्षेप अनावश्यक व असमर्थनीय आहे. अध्यापनाच्या पद्धतीची निवड ही तत्त्वज्ञानावर अवलंबून असते. किल पॅट्रीकनी वापरलेली संज्ञा 'पद्धतीचे तत्त्वज्ञान' दर्शविते की शैक्षणिक पद्धत व तत्त्वज्ञानात घनिष्ठ

संबंध आहे. पद्धत ही एक साधन आहे. ज्याद्वारे विद्यार्थी व विषय साहित्यादरम्यान संपर्क प्रस्थापित केला जातो. परंतु शिक्षणाच्या निश्चित उद्देशाच्या अभावी किंवा एका जीवनाच्या अपुऱ्या तत्त्वज्ञानाने शिक्षकाद्वारा योजिलेली अध्यापनाची पद्धत विद्यार्थ्यांना विषयापासून प्रतिकर्षित करू शकते. जे शिक्षक त्यांच्या अध्यापनाच्या पद्धतीला अपरिणामकारक बनवितात. कारण त्याद्वारे विद्यार्थी हे त्याचे जीवनआदर्श आणि ते जे काय वाचत आहे, त्या दरम्यान असणारा संबंध बघण्यास असमर्थ ठरतात. स्पष्ट सांगायचे म्हणजे तेथे शिक्षणाच्या तत्त्वज्ञान विषयक पायाची गरज आहे. जे शिक्षक समजतात की ते तत्त्वज्ञानाला दुर्लक्षून करू शकतात. त्यांना त्यांच्या बेपर्वाईची किंमत चुकवावी लागते. कारण समन्वय तत्वाच्या अभावी त्यांचे प्रयत्न अपरिणामक्षम बनवले जातात.

- **शिस्त**

एखादी व्यक्ती किंवा युगाचा तत्त्वज्ञानविषयक ओढा हा इतर कुठल्याही शालेय कार्याव्यातिरिक्त शिस्तीद्वारा अधिक प्रत्यक्षपणे प्रतिबिंबित होतो. आपण आधीच सुखवादी नैतिकता आणि निसर्गवादी अधिभौतिकता यावरील नैसर्गिक परिणामाने शिक्षेचे अवलंबित्वाचे उदाहरण दिले आहे. आणि शिक्षणावरील स्वातंत्र्य हे आदर्शवादी तत्त्वज्ञान दर्शविते. यातील सर्व साधारण संबंध हा स्पेन्सरद्वारा शिक्षणावरील पुढील परिच्छेदात चपखलपणे व्यक्त केला गेला आहे: “शिक्षणाच्या सलग पद्धती आणि सलग सामाजिक राज्ये ज्यासोबत ते सहअस्तित्वात होते. त्यामधील संबंध अयशस्वी होवू शकत नाही. नैसर्गिक मनात एक सामायिक आरंभ असल्याने प्रत्येक युगाच्या संस्था मग त्यांचे विशेष कार्य काहीही असो, त्यांच्यात कौटुंबिक समानता असायलाच हवी. आदेशात कठोर, दहशतीच्या जोरावर राज्य करणाऱ्या क्षुल्लक अपराधावरून देहदंड देणाऱ्या आणि अविश्वासूचा बदला घेण्यासाठी निर्दोशाला छळणाऱ्या राजकीय, हुकुमशाहीतच अपरिहार्यपणे तशीच कठोर एक शैक्षणिक शिस्त वाढली - गुणित आदेशाची आणि त्या आदेशांच्या प्रत्येक उल्लंघनासाठी वार करणारी शिस्त –छडी, पट्टीच्या सहाय्याने असिमीत निरंकुरता कायम ठेवली होती.

याउलट राजकीय स्वातंत्र्याची वाढ, वैयक्तिक कृतींना अटकाव करणाऱ्या कायद्याचे निर्मुलन आणि गुन्हेगारी सान्हीताची सुधारणा यांच्यासोबत विनाजबरदस्ती शिक्षणाप्रती समान प्रगती घडून आली: विद्यार्थ्याला फारच कमी प्रतीबंधाद्वारे अडथळा येतो. आणि त्याला शासन करण्यासाठी शिक्षेशिवाय इतर मार्गाचा वापर केला जातो. अशा प्रकारे तोंडी कट्टरता वाद, कठोर शिस्त, बहुविध, प्रतिबंध, कथित तपस्वी वाद यांमधील सारखेपणामुळे जुने शैक्षणिक शासन त्याकाळी असलेल्या सामाजिक पद्धतीच्या नात्याचे आणि या वैशिष्ट्यांच्या विपरीत आपल्या आधुनिक संस्कृतीची तऱ्हा ही आपल्या अधिक उदात्त, धार्मिक आणि राजकीय संस्थांशी साधर्म्य ठेवते.”

शिक्षणाच्या तत्त्वज्ञानविषयक पायाची गरज ही जेव्हा शिस्तीच्या समस्येकडे बघतो तेव्हा अधिक स्पष्ट होते. खरे पाहता शिस्तीचे स्वरूप हे नेहमीच एखाद्याजवळ असलेल्या तत्त्वज्ञानाद्वारे दिले जाते. निसर्गवाद हा मुलांसाठी विनाअडथळा स्वातंत्र्याच्या बाजूने

आहे. तो सामाजिक सहकार्याच्या विरोधी व्यक्तीच्या ठाम मतावर जोर देतो. वास्तववादाला मुलांना वस्तूनिष्ठेत शिस्त लावाविशी वाटते. शिक्षणाचे तत्त्वज्ञान philosophy of Education) मध्ये लोडगे लिहितात: “वस्तूनिष्ठतेचा पंथ हा त्याच्या स्वतःसाठी शिस्तीच्या मूलतत्त्वाशी समान आहे; आणि आपल्याजवळ जोपर्यंत वास्तववादी मनाचे शिक्षक आहे. तोपर्यंत तेथे कठोर गुणांच्या घटीची स्थिती करण्याची गरज नाही.” आदर्शवाद हा विद्यार्थ्यांच्या परीने व्यक्तीनिष्ठ ताकद रुजविण्याच्या हेतूसाठी शिस्त टिकविण्याकरिता बऱ्याच प्रमाणात शिक्षकाच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून असतो. अशा शिस्तीच्या मदतीने आदर्शवाद हा जे केवळ भौतिक वास्तविकतेच्या बाळापासून मुक्त आहे अशा अलौकिक सत्वाच्या विकासाची वकीली करतो. व्यावहारिकता ही शालेय कार्याच्या कामगिरीसाठीचे साधन म्हणून बाह्य शिष्तीच्या उपयोगात विश्वास ठेवत नाही. ती मुलाला पूर्ण स्वातंत्र्य देते आणि आवडीच्या शैक्षणिक मूल्यावर भर देते जे मुलांमध्ये अनुभवजन्य, जैविक आणि सामाजिक स्वरूपाचे आहे. अशा प्रकारे आपण बाग्घातो की शिस्तीची समस्या ही तत्त्वज्ञानाशी घनिष्ठपणे निगडीत आहे आणि शिक्षक व शैक्षणिक व्यवस्थेद्वारा योजल्या जाणाऱ्या शिस्तीच्या योजना या नेहमीच त्यांच्या विश्वास असणाऱ्या तत्त्वज्ञानाने प्रभावित राहतील.

- **तत्त्वज्ञान आणि मूल्यमापन**

परिणामक्षम मूल्यमापनासाठी शैक्षणिक ध्येयाचे स्पष्ट ज्ञान व निश्चित शैक्षणिक उद्दिष्ट्ये गरजेची आहेत. मूल्यमापन ही आधीच निश्चित केलेल्या शैक्षणिक ध्येयाच्या प्रकाशात शैक्षणिक कामगिरीच्या मापनाची सततची प्रक्रिया आहे आणि शैक्षणिक ही जीवनाच्या तत्त्वज्ञानाद्वारे ठरविली जातात.

मूल्यमापन हे तत्त्वज्ञानावर आधारित आहे. ज्यामध्ये शिकण्याची क्षमता ही सर्वसाधारण लोकसंख्येत यादृच्छिकपणे वितरीत केली जाते, याचाच अर्थ की एखाद्या वर्गाला काही अध्ययनाचे कार्य दिले जाते आणि त्यानंतर त्यांच्या कामगिरीच्या अभ्यासासाठी चाचणी घेतली जाते.

## १.७ सारांश

- तत्त्वज्ञान ही जगाच्या वास्तविकतेची तर्कशुद्ध चौकशी आहे , जे ज्ञानप्राप्तीसाठी सत्याचा शोध घेण्याचे ध्येय ठेवते.
- तत्त्वज्ञानाच्या तीन शाखा आहेत – आधिभौतिकशास्त्र, ज्ञानशास्त्र व मूल्यशास्त्र
- आधिभौतिकशास्त्र हे वास्तविकातेशी, ज्ञानशास्त्र हे ज्ञानाशी आणि मुल्यशास्त्र हे मूल्याशी संबंधित आहे.
- आधिभौतिकशास्त्रीय प्रश्न हे चार उप्संचात विभागले गेले आहेत: विश्वउत्पत्तीशास्त्रीय, धर्मशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय आणि वास्तववादविषयक पैलू.

- विश्वउत्पत्तीशास्त्र हे विश्वाशी संबंधित प्रश्न विचारते, धर्मशास्त्र हे धर्म किंवा परमेश्वराशी संबंधित प्रश्न विचारते, मानववंशशास्त्रीय प्रश्न हे मानववंशाशी संबंधित आहेत. आणि वास्तववाद हा अस्तित्वाच्या स्वरुपाविशायीचा अभ्यास आहे.
- ज्ञानशास्त्र हे मानवी ज्ञानाच्या स्त्रोतांशी संबंधित आहे जे चार श्रेणीत विभागले गेले आहे: अनुभवजन्य (संवेदानाद्वारे मिळविलेले ज्ञान व त्याचा पडताळा घेतला जाऊ शकतो), प्रकटीकरण (श्रद्धेवर आधारित) अधिकारिय (तज्ञांच्या मतावर आधारित किंवा परंपरा म्हणून काळाच्या ओघात पवित्र केले), तर्कशुद्ध (काही गोष्टी जाणण्यासाठी तर्क, विचार किंवा युक्तिवादाचा वापर) आणि तात्कालिक ज्ञान (निश्चिततेची तत्काळ जाण).
- मुल्यशास्त्राच्या दोन मुख्य शाखा आहेत: आचारशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र
- अचार्षास्त्र म्हणजे नैतिक मुल्ये व वर्तनाचा अभ्यास व सौदर्यशास्त्र हे सौंदर्य व कलेशी संबंधित आहे.
- शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे, ज्याद्वारे समाज हा हेतूपुरस्सरपामे त्याचे संचित ज्ञान, कौशल्ये व मुल्ये ही एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करतो.
- संकुचित अर्थाने शिक्षणात एखाद्या संस्थेत एखादा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर फक्त पदवी/ पदविका/ प्रमाणपत्र प्राप्त करणे सामावते परंतु विस्तृत अर्थाने ती एक जीवनभराची प्रक्रिया दर्शविते.
- विविध शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी शिक्षण क्षेत्रात तत्त्वज्ञान विषयक तत्त्वांचे उपयोजन करण्याला शैक्षणिक तत्त्वज्ञान समजले जाते. तत्त्वज्ञान आणि शिक्षण हे एकमेकांशी या अर्थाने पूरक आहेत. की दोन्हीही मानवाच्या स्वभावाशी संबंधित आहे. तत्त्वज्ञान हे शिक्षणाचे विविध पैलू ठरविते जसे ध्येये, अभ्यासक्रम, अध्यापनाच्या पद्धती, शिक्षकाची भूमिका, इ.
- तत्त्वज्ञान हे शिक्षणाला सैद्धांतिक मार्गदर्शन पुरविते तर शिक्षण हे त्याला सरावात उतरवते.

## १.८ विभागवार अभ्यास

१) तत्त्वज्ञान व शिक्षणाच्या अर्थाची चर्चा करा.
२) आधिभौतिकशास्त्र, ज्ञानशास्त्र व मुल्यशास्त्र यातील फरक सांगा.
३) एका शिक्षकाने शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास का करावयास हवा?
४) शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाची कार्ये यादिरुपात लिहा.
५) “शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाची व्याप्ती असीमित आहे” या विधानाचे समीक्षणात्मक मूल्यमापन करा.

## १.९ संदर्भ


- Chandra S.S. and Sharma, Rajendra k. ,(2002) "Philosophy of Education" (2002), Atlantic Publisher, New Delhi.
- Taneja, V.R., (2000) "Educational Thoughts and practices, "Sterling Publisher, New Delhi.
- K. Dinesh Kumar, "Philosophy of Education," pdf, https://www.cukashmir.ac.in/ departmentdocs_16/ PHILOSOPHY%20 AND %20 EDUCATION %20%20 Dinesh %20 kumar %20k. pdf
- Shri.Dash,Nikunja Ranjan, "Philosophical Foundational of Education,"
- https://ddceutkal.ac.in/ Syllabus? MA Education/ Paper 1. pdf


❖❖❖❖

munotes.in

# २ अ

## पौर्वात्य शिक्षणाचे तत्त्वज्ञान

**प्रकरणाची रचना:**

२ अ.० उद्दिष्ट्ये

२ अ.१ प्रस्तावना

२ अ.२ वेदांचे तत्त्वज्ञान

२ अ.३ वेद कालीन शिक्षण

२ अ.४ वेदांचे शैक्षणिक उपयोजन/महत्त्व

२ अ.५ तात्पर्य

२ अ.६ सरावासाठी प्रश्न

२ अ.७ योग तत्त्वज्ञान (परिचय)

२ अ.८ 'योग' संकल्पना

२ अ.९ योग शास्त्राचे शैक्षणिक उपयोजन

२ अ.१० सारांश

२ अ.११ प्रश्नावली

### २ अ.० उद्दिष्ट्ये

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास पुढील गोष्टीचा अभ्यास करण्यास मदत होईल.

- पौर्वात्य शिक्षण पद्धतीचे तत्त्वज्ञान संबंधीचे ज्ञान मिळेल.
- वेद व योग्य विद्या ह्याबाबत ज्ञान प्राप्त होण्यास मदत होईल.
- शिक्षण क्षेत्रावर वेद व योगशास्त्राचा प्रभाव अभ्यासण्यास मदत होईल.
- वेद व योग यांचा शिक्षणाशी असलेला संबंध जाणून घ्याल.

munotes.in


## २ अ.१ प्रस्तावना

भारतीय तत्त्वज्ञानाच्या शाखा दोन भागात विभागलेले आहेत :

१) आस्तिक

२) नास्तिक

आस्तिक गट वेदांना मानणारे आणि नास्तिक गट वेदांना न मानणारे आस्तिक प्रणालीमध्ये मीमांसा, वेदान्त, सांख्य, योग, न्याय आणि वैशेषिक शाखा आहेत आणि नास्तिक गटामध्ये चार्वाक, बुद्ध आणि जैना ह्या शाखा आहेत.




munotes.in

**सनातन पौर्वात्य शालेय शिक्षणाचे तत्त्वज्ञान :**

भारतीय शिक्षण प्रणाली कोणती असो, सनातनवादी (orthodox) किंवा नवमतवादी (Heterodox) या दोघींनी मानवीय जीवनात सातत्याने येणाऱ्या अडचणीवर व प्रसंगाला कसे तोंड द्यावे हे शिकविण्याचा प्रयत्न प्रामुख्याने दिसून येतो. म्हणून आपणास ठामपणे जाणवेल की भारतीय शिक्षण प्रणाली ही जीवनाला मार्गदर्शक व जीवन प्रकाशित करणारे तत्वज्ञान आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या बाबतची ठळक लक्षात येणाऱ्या बाबीचा विचार करु.

१) भारतीय तत्त्वज्ञानाच्या शाखांमध्ये जास्त संयुक्त दृष्टीकोन विकसित झालेला दिसून येतो. तत्त्वमीमांसा (सत्याची उपपत्ती) आणि मूल्यमीमांसा ह्या शाखांमध्ये स्वतंत्र

असा भेद दिसून येत नाही काही शाखा ज्ञानासाठी, अध्यात्मशास्त्रीय मुद्यांवर तर काही तर्कशास्त्रीय मार्गावर भर देतात.

२) भारतीय तत्त्वज्ञानात क्रमवार व व्यवस्थित अशी विचारांची मांडणी आहे.

३) बहुतेक तत्त्वज्ञानाच्या शाखा अध्यात्म पावित्र्य व नैतिकतेच्या बाबतीत एकसारख्या आहेत कदाचित चार्वाक तत्त्वज्ञान व भौतिक तत्त्वज्ञान यांचा अपवाद असू शकेल.

४) हे तत्त्वज्ञान आपल्याला आपले जीवन कशा प्रकारे व्यथित करावे. हे समजण्यास मदत करते. मानवीय जीवनाचे पुरुषार्थ म्हणजे धर्म, अर्थ, काम व मोक्ष आहे हे सगळे बुद्धीवादापेक्षा फार वेगळे आहेत.

५) भारतीय तत्त्वज्ञानाची सुरुवात नैराश्यवादी स्पष्टीकरणातून जरी होत असेल तरी त्यामधुन सफल व सकारात्मक दृष्टीकोण निर्माण होतो त्यामुळे व्यक्तिला अर्थपूर्ण जीवनमान जगण्याचे सामर्थ्य प्राप्त होते.

६) कर्म व कर्तव्याची तत्त्व प्रणाली विश्वासाच्या भक्कम पायावर आधारित आहे.

वैदिक धर्म, बौद्ध धर्म व जैनधर्म तत्त्व प्रणालीत जन्म व मृत्यू ह्याबाबत बरीचशी वैचारिक समानता दिसून येते.

७) 'परब्रम्ह' एक उच्च कोटीची व अलौकिक ज्ञानबोध होणारी उच्च श्रेणीची शक्ती प्राप्त करुन घेता येते. व्यक्तीगत अध्यात्मिक शक्तीकडे नेणारा मार्ग परब्रम्हातून जातो.

८) बंधन आणि मुक्ति ह्या शब्दांचे वर्णन केलेले दिसून येते. बंधन म्हणजेच जन्म व मरणाचे चक्र होय आणि मुक्ति म्हणजेच ह्या चक्रापासून सूटका मिळवणे.

९) चिंतन, मनन व योग विद्येच्या सतत अभ्यासाने एकाग्रता, स्वनियंत्रण व विचारावर नियंत्रण करुन अध्यात्मिक पवित्र शक्ती प्राप्त करुन घेणे आवश्यक असते.

१०) जीवनाचे उच्च ध्येय 'मोक्ष' किंवा 'निर्वाण' आहेत, ह्यांचा अर्थ सकारात्मक म्हणजेच मुक्ति मिळवून दिव्य स्थिती प्राप्त होणे व नकारात्मक म्हणजेच दु:ख व भोगांचा नाश करणे होय.

## २ अ.२ वेदांचे तत्त्वज्ञान

अतिप्राचीन काळी वेद निर्माण झाले. वेद संस्कृत भाषेत स्वरुपात चार प्रकारे लिहिलेली आहेत 'विद' म्हणजे ज्ञान.

गुरु, ऋषी, मूनी यांनी शिष्याच्या श्रेणीनुसार आकलन होण्यासाठी वेदांवर आधारित उपनिषदे तयार झालीत. पुढे जाऊन पूराण व महाकाव्ये तयार झालीत.

'विद' म्हणजे,

- ईश्वर, आत्मा, मन, सृष्टी (प्रकृती) जाणणे.
- ईश्वर तत्त्वात पोहचणे.
- मुक्ती व शांती मार्गाचा शोध घेणे.
- ईश्वर व मानव नात्याचा संबंधी विचार करणे.
- ईश्वर तत्त्वात विलीन होणे.
- ईश्वरीय वैभव व भव्यतेची जाणीव होणे.
- विश्वाच्या गुप्त रहस्यांचे मनन करणे.

**वेद खालील बाबींवर विश्वास ठेवतात -**

- जग व विश्व निर्मिती मागे एकच ईश्वर आहे.
- सर्वत्र ईश्वर एकच आहे तो सर्वस्व शक्तीमान असून सर्वव्यापी आहे.
- सर्व वेदाचा व्याप तीन गोष्टीत सामावलेला आहे.

  १) ईश्वर, २) आत्मा, ३) भौतिक वस्तू (चेतन व अचेतन)
- जीवन जगण्याचे सार्थक म्हणजे मोक्ष मिळविणे व ईश्वरीय तत्त्वात विलीन पावणे.
- वेदात कर्म हेच महत्त्वाचे आहे. कर्माला फळ हे असतेच. कर्मानुसार पुढील जीवनात सुख दु:खात परिवर्तन होते. 'कर्म सिध्दांत' ही वेदांची महत्त्वाची शिकवणूक होय.
- हे चराचर विश्व व अवकाश ही ईश्वरीय निर्मिती आहे.
- आत्मा अमर असून शरीर व चराचर वस्तू ह्या परिवर्तनीय आहेत. जन्म व मृत्यू ह्या मार्गातून जावे लागते. पुनर्जन्माचा सिध्दांत, जीवात्म्याची अवनीती यावर वेदांचा विश्वास आहे.
- सृष्टी व जग हे सत्य आहे. विश्वबंधुत्त्व निर्माण करण्याची आवश्यकता असते. ती वेद शिकवूणकीद्वारा प्राचीन काळापासून चालू आहे.
- सत्याची जाणीव होण्यासाठी परिश्रमाची आवश्यकता असते. सत्याचा शोध घेऊन सत्याचा बोध व्हावा लागतो. अशा वेळी भीती व संशय राहत नाही. (सत्त्याचे ज्ञान झाल्याने)
- सर्व जीवास (प्राणीमात्रास) न्याय हा केला जातो. आपण शांततेने व ऐक्य भाषाने जीवन जगले पाहिजे.

munotes.in

- प्रत्येक वेदाचे तीन भाग करुन गुरु - शिष्याच्या परंपरेत अभ्यासाचा मार्ग सुलभ होतो.

  १.मंत्र

  २.ब्रह्मणक्

  ३.अरण्यके

**१) मंत्र :- (ईश्वरीय स्तवन)**

निसर्ग निर्मित भव्यता नवलपूर्ण, घटना, चमत्कार व आनंदमय दृश्ये, सुर्य, चंद्र, पृथ्वी, सागर यांचा परिवर्तनीय कालमापनाचा अभ्यास नितीनियमाचे ज्ञान मंत्र स्वरुपात मांडण्यात आलेले आहेत. प्राचीन काली लेखन प्रकार अस्तित्त्वात नव्हता तेव्हा मंत्र रचना पठण करण्यास योग्य ठरवून मौखीक पद्धतीने गुरु - शिष्यात शिक्षणाचे कार्य होत असे.

**२) ब्राह्मणग्रंथ:- (स्त्रोत्रे, क्रियाकर्म प्रार्थना)**

**ब्राह्मणग्रंथ** हा क्रियावाचक शब्द आहे. 'ब्र' म्हणजे उच्चारण, श्रवण पद्धतीमध्ये (वदन) मुखाने उच्चारण करण्यासाठी ज्या ग्रंथाची उपयुक्तता असते. ते ब्रह्मणक ग्रंथ होय. गुरु परंपरेत उपयुक्त अनेक ग्रंथ आहेत.

**३) अरण्यके :-**

शुद्ध वेद चार प्रकारचे आहेत. गुरुनी शिष्यासाठी जटील वेद रचना समजण्यासाठी उपनिषदे लिहिली आहेत. उपनिषदे म्हणजे (अनाकलनीय किंवा रहस्यमयंता समजण्यासाठी) वेदातील रहस्यमयता उलगडण्यासाठी वेदाच्या जवळपास आशयानुसार समजण्यासाठी केलेली ग्रंथ रचना. उपनिषदाच्या स्वरुपात शिकवण्या योग्य करण्यात आली आहे. जटील वेद रचनेच्या जवळपास राहून रहस्ये उलगडून सांगणारे ग्रंथ या प्रकारात येतात. उपनिषद हा शब्द सद् या शब्दापासून तयार झाला सद् म्हणजे स्थानापन्न होणे, बंधनातून मुक्त होणे, अज्ञानाचा नाश करणे इ.

वैदिक ज्ञानाचा साठा किंवा भंडार स्मृती या ग्रंथात आढळून येतो. हे ग्रंथ अर्थशास्त्र राजशास्त्र, धर्मशास्त्र, नितीशास्त्र, न्यायशास्त्र या प्रकारात अनेक विधी विषयावर प्रकाश टाकतात. श्रुती - स्मृती, गुरु - शिष्य परंपरेतील उपयुक्त ग्रंथ भंडार आहे. ते पाठांतर पद्धतीने पुढील पिढीला ज्ञान देत आहेत.

वैदिक साहित्यात खालील प्रमुख गोष्टींचा समावेश होतो.

**१) चारवेद :-**

१) ऋग्वेद

२) अथर्ववेद

३) युजुर्वेद

४) सामवेद

**२) वेदांगे :- (सहा वेदांगे)**

मुख्य वेद समजण्यासाठी आवश्यक शब्द रचना, उच्चारण पद्धती व व्याकरण सारांश व तपशील गोषवारा इ. बाबतचे ग्रंथरचना म्हणजे वेदांग:-

१) शिक्षा (उच्चारशास्त्र)

२) छंद व मात्रा (वृत्त, अनुष्ठुभ छंद इ.)

३) व्याकरण

४) निरुक्त - गद्यरचना (उत्पत्तीशास्त्र)

५) खगोलशास्त्र (जोतिषशास्त्र)

६) कल्प (धार्मिक विधी - संस्कार) (यज्ञ, होम, पूजन)

**३) उपवेद :-**

या ठिकाणी चार प्रकारचे उपवेद आहेत. चार विषयाचा ते स्वतंत्रपणे अभ्यास करण्यासाठी आहेत ते याप्रमाणे :-

I. अयुर्वेद - आरोग्य शास्त्र (औषधीशास्त्र)

II. धनुर्वेद - लष्करी शास्त्र / सैनिकी शास्त्र

III. गंधर्ववेद - गायन, संगीतशास्त्र

IV. शिल्पवेद - स्थापत्य बांधकामशास्त्र (शिल्प व कलाशास्त्र)

**४) ब्रह्मणग्रंथ :-**

ब्रह्मणक् ग्रंथ रचना, संदर्भ व पूरक ग्रंथ म्हणून करण्यात आलेली आहे. त्यासाठी गद्य साध्या व सोप्या भाषेचा वापर केलेला आहे. विषयानुसार या ग्रंथाची रचना केलेली आहे. त्यातील काही पुढील नावाने ओळखले जातात.

१) शतपथ ब्रह्मण

२) गोपथ ब्रह्मण

३) साम ब्रह्मण

४) ऐतरेय ब्रह्मण

वरील ग्रंथाद्वारे धार्मिक क्रियाकर्म व्रत, वैकल्प, भूगोलिक ज्ञान, इतिहास दर्शन व तत्त्वज्ञान ईश्वर चिंतन, मनन ह्या विषयासंबंधी ग्रंथ रचना केलेली आहे.

**५) उपनिषदे :-**

भौतिक वस्तुचे एकमेकांशी संबंध आत्मा, व ईश्वर या संदर्भात एकूण १०८ उपनिषेधाची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यापैकी खालील जास्त महत्त्वाची मानलेली आहेत.

munotes.in

१. ईश उपनिषद्

२. केन् उपनिषद्

३. कठ उपनिषद्

४. मुंडक उपनिषद्

५. मांडुक्य उपनिषद्

६. छंदोग्य उपनिषद्

७. बृहद्अरक्यक उपनिषद्

**१. ईश-उपनिषद् :-** ह्या ग्रंथात आध्यात्मिक शुद्धता म्हणजे पवित्र याविषयी ज्ञान देणारा संदर्भग्रंथ.

**२. केन्-उपनिषद् :-** निसर्गशक्ती व गुढतेचा अभ्यास, वैश्विक उर्जा बाबत ग्रंथ रचना.

**३. कठ उपनिषद् :-** यम (गुरु) व नचिकेत (शिष्य) दोघातील प्रश्नोत्तर पद्धतीने जन्म व मरणाचे गूढ जाणून घेण्याचा प्रयत्न या ग्रंथात आहे.

**४. मुंडक उपनिषद् :-** ज्ञानाची वर्गवारी उच्च व निम्न स्तरीय ज्ञानाचे स्पष्टीकरण.

**५. मांडुक्य उपनिषद् :-** या ग्रंथात सत्य व मानावाच्या 'स्व' संबंधित ज्ञान.

**६. छंदोग्य उपनिषद् :-** व्यक्तीला अध्यात्मिक व पवित्र शक्तीचे महत्त्व शिकविणे संबंधीचे मार्गदर्शन, मानवाच्या आध्यात्मिक शिक्षणाचा लेखाजोखा.

**७. बृहद्अरक्यक उपनिषद् :-** भविष्याचा वेध, भावी ज्ञान तसेच माणसातील देवत्त्वाच्या स्वरूपाचे स्पष्टीकरण.

**६) सहा दर्शनशास्त्रे-**

I. **न्याय :-** (शास्त्रांचे शास्त्र, यात ज्ञानावर भर दिला आहे)

ज्ञान प्राप्त होण्याचे चार मार्ग :

(१) प्रत्यक्ष

(२) अनुमान

(३) उपमा

(४) शब्द (पुराव्याने सिद्ध विधाने)

II. **सांख्य -** महर्षी कपील मूनीचे पदार्थ विज्ञान व रसायनशास्त्र या अभ्यासावर आधारित ग्रंथ.

munotes.in

III. **वैशेषिक -**महर्षि कणाद मुनी यांनी अणूरचना व पदार्थाच्या सूक्ष्म कणांसंबधीचे भाकित यात सांगीतले आहे.

IV. **योग -**महर्षी पतंजली यांनी या ग्रंथात वैयक्तिक आत्मबल, निरामय जीवन व आत्मीक शक्ती मिळविण्यासाठी चे तत्त्वज्ञान यात मांडले आहे.योगाच्या माध्यमातून स्वनियंत्रण कसे करावे याबाबतची माहिती या ग्रथातून मिळते.

V. **पूर्व मीमांसा :-**मानव जीवन काळ दोन विभागात विचार करुन बालपण, सुव्यवस्था प्रयत्नाच्या काळात ज्ञान प्राप्तीचे ध्येय कसे साध्य केले जाते. या विषयीचे मार्गदर्शक ग्रंथ रचना जेमानी ऋषीनी तयार केलेली आहे. गुरु कुलात कुमार अवस्थेच्या शिष्याना विशिष्ट नियम व ज्ञान संपदा यावरील मिमांसा म्हणजे शंका निरसन करणारे ग्रंथ ते आजच्या शैक्षणिक पद्धतीत सुद्धा उपयुक्त ठरणारे आहेत.

VI. **उत्तर मीमांसा :-** मानवी जीवनाचा उत्तर काळ म्हणजे ग्रहस्थ काल, संसारिक जीवन अवस्थेचा टप्प्यावर साहचर्य जीवन व्यतीत करण्याबाबत मार्गदर्शक व खोलकर स्पष्टीकरण करुन ज्ञात प्रकाश टाकणारे ग्रंथ रचना महर्षी - ऋषी वात्सायन याची ग्रंथ रचना आजच्या प्रगत समाज व्यवस्थेला सुद्धा मार्गदर्शक ठरते.

VII. **श्रीमद्भगवद्गीता :-** भागवत गिता हा ग्रंथ ३००० वर्षापूर्वी श्री. व्यास मूनी रचीत प्राचीन ग्रंथकाव्य आहे श्रीकृष्ण व अर्जून यांच्या संवाद रुपात गितेचा ग्रंथ आजसूद्धा मार्गदर्शक आहे. सांसरिक नाते संबंध व राजकीय कर्तव्य याबाबत साशंक स्थितीत अर्जुनाचे मत परिवर्तन करुन कर्तव्याला महत्त्व आहे. व ते श्रेय शक्तीमान परमेश्वराकडे जाते.

**७) सूत्रे :-**

तीन प्रकारे सुत्राचा अभ्यास केला जातो.

I. **अष्ठाध्यायी :-** यामध्ये एकूण १४ सुत्रावर आधारित श्री पानीनी मूनी नी व्याकरणावर ग्रंथ रचना केलेली आहे.

II. **धर्मसूत्र :-** ज्ञान मिळणे व ज्ञान देणे हे गुरु व शिष्य परंपरेतील कर्तव्यासंबंधक्षत नियमांना धर्मसुत्र असे म्हणतात. शिकणे व शिकविणे यात वैशिष्ट्ये पूर्ण नियम आहेत. त्यांना संस्कृतमध्ये 'मर्म' असे म्हणतात. गुरु व शिष्य यांनी धारण केलेले मर्म यांना 'धर्म' म्हणजे विशिष्ठ नियमावली च्या बंधनात ज्ञान देणे व ज्ञान मिळविणे यांना धर्मसूत्रे म्हणतात. ते गुरु व शिष्याना बंधनकारक आहेत.

munotes.in

III. **गृहसूत्रे :-** गृहस्थी अवस्था म्हणजे घर संसार व समाज अवस्थेतील निती-नियमाचा विशेष अभ्यास हा नियमाच्या स्वरुपात बंधनकारक आहेत आनंदीमय जीवन जगण्याच्या कलेचा अभ्यास या सुत्राद्वारे मार्गदर्शक ठरतो.

**वेदांचे गुणविशेष तत्त्वे :-**

१. वेदामध्ये भारतीय समाज व संस्कृतीचे दर्शन घडते. (अनन्य सामाजिक अर्थ व्यवस्था व समान नागरी हक्क स्त्रि-पुरुष समानता)

२. वेद कालीन जीवनमान शुध्द विचार सारणीचे व साधेपण व्यतीत करणारे होते.

३. एकच देवता आहे, काही ज्ञानवान लोकांची बहु असे वर्णन केले आहे. निसर्गधर्मात मानवाला केंद्रस्थानी ठेवला आहे.

४. वैदीक विचार हे दुरदर्शी व आशावादी सकारात्मक होते.

५. जीवनाबद्दल वैदिक दृष्टीकोण स्पष्ट होतो.

६. वैदीक कालीन शिकवणूक व वागणूक यांच्यात आदर्श व नितीमत्ता होती. त्यात छळ व कपट यांना स्थान नव्हते.

७. वैदीक कालीन जनसामान्य हे धार्मिकवृत्तीचे, अध्यात्मिक सरळ व नितीमान जीवन जगणारे होते.

८. शिष्याच्या क्षमतेचा आवडीचा बौधीक प्रगल्भतेचा, वय व सामाजिक दर्जा व कला, आवड यांच्या सखोलपणे माहिती घेऊन 'गुरु' शिष्यांना शिक्षण देण्याचे कार्य गुरु कुळात करत होते हा प्रभाव आज प्रगत शैक्षणिक पद्धतीत सुद्धा दिसून येतो.

## २ अ.३ वेद कालीन शिक्षणपद्धती

वैदीक कालखंडात गुरु च्या सानिध्यात राहून ज्ञान प्राप्त केले जात असे. वैदीक ज्ञान हा व्यक्तीचा तिसरा डोळा होतो. त्यामुळे ज्ञान प्रकाशाचे उजळून जाई वैदीक काळात गुरु व शिष्य ह्याच्यासाठी खास नियम बंधनकारक होते. त्या बंधनात राहूनच गुरुकूल व आश्रम संस्थेचे कार्य चालत असे ते नियम कडक शिस्तीचे व न मोडता पालन करण्यावर कटाक्ष असे.

**वैदीक कालखंडातील शिक्षणाचे उद्देश :-**

**१) चित्त, वृत्ती, नियमन :-**

भौतिक व शारीरीक सुखांच्या पलीकडे जाऊन चित्त वृत्ती संयमीत करुन अर्थपूर्ण जीवन जगण्याचे शिक्षण देणे हे महत्त्वाचे होते. (व्यक्तीचे सवलीकरण)

**२) मनाने सुसंस्कृत करणे :-**

संस्कार व सुसंस्कृती च्या सोबत उत्पादकता व क्रियशीलता या गोष्टीचा पाठपुरावा वैदीक शिक्षणात प्रामुख्याने दिसून येतो.

**३) जीवन जगण्यास योग्य व लायक बनविणे :-**

वैदीक शिक्षणामुळे शिष्याची ज्ञानासोबत त्याची योग्यता उपयुक्तता या तत्त्वासंबंधीत बाबतीत परिपूर्णता येईल यांची क्षमता घेतली जाईल.

**४) तमसो मा ज्योतीर्गमय :-**

अज्ञान अंधकार शंकरेवोर मनप्रणाली दूर करण्याचे कार्य वैदीक शिक्षणाचा मूख्य भाग आहे.

अज्ञान अंधकारातून ज्ञानमय – तेजोमय प्रकाशाकडे नेणारा मार्गदर्शक म्हणून वैदीक ज्ञानाचे महत्त्व आहे.

**५) धर्माचे मध्यवर्ती स्थान व महत्त्व :-**

वैदीक काळात शिक्षण व धर्म हे एक दुसर्याशी बांधील होते. धर्म हा सर्व क्षेत्रात वरचढ होता. देश राजकारण समाज व शैक्षणिक स्थानके (गुरुकुल व आश्रम) हे धर्मनिष्ठ होते ते धर्माबाहेर जावू शकत नव्हते.

**६) व्यक्तिगत – केंद्रित :-**

वैदीक शिक्षण व्यक्तीचे सर्वांगीण प्रगतीकडे केंद्रित होते. शिक्षण प्रत्येक व्यक्ति साठी आहे ह्याची मुख्य काळजी घेत असत.

**७) निसर्ग - सानिध्य :-**

गजबलेल्या वसाहतीपासून व कोलाहल गजबज यापासून दूर निसर्ग रम्य ठिकाणी गुरुकुल व आश्रमाची व्यवस्था केली जात आहे. गुरुकुल व आश्रम स्वक्षमतेवर ज्ञानदानाचे कार्य करीत असे. त्यात भेदभाव नव्हता सर्व शिष्य एकाच पातळीवर राहून शिक्षण ग्रहण करीत नाहीत.

गुरु शिष्याच्या गरजा आश्रम व्यवस्थेतून पूर्णपणे भागविल्या जात कोणत्याही प्रकार जाचक बंधने नव्हती स्वनिर्णय आधारित व्यवस्था गुरु व शिष्य संप्रदाय ठरवित असत.

**शैक्षणिक पद्धत :-**

**प्राथमिक शिक्षण :-**

वयाच्या ५ वर्षापर्यंत माता व पित्याच्या छत्रछायेत घरीच प्राथमिक शिक्षण दिले जात होते.

munotes.in

घरी आई-वडील बालकास उच्चारण शास्त्र वैदिक मनोउच्चारण शब्दशंधीचे ज्ञान प्राथमिक व्याकरण व प्राथमिक गणित सुद्धा शिकत असत.

वयाच्या ७ ते ८ वर्षानंतर विद्यारंभ समारंभ किंवा व्रतबंधन समारंभ करुन पुढील शिक्षणासाठी त्याला गुरुकुलातील पाठवण्यात येत असे तेथे वयाच्या त्याला १४ ते १५ पर्यंत वेदाचा प्राथमिक अभ्यास झाल्यानंतर त्याच्या आधारित ऋषी-मूनीच्या आश्रमात उच्च पातळीचे वेदाचा अभ्यास व रितीरिवाज व कर्मकांड याचे शिक्षण दिले जाई.

**अभ्यासक्रम :-**

कथोउपनिशद आधारे सांगता येईल की विषयाचे दोन भागात विभागणी केली जात असे.

१. परा विद्या (अध्यात्मिक शिक्षण)

२. अपारा विद्या (भौतिक / संसारिक)

**१) परा विद्या :-**

या शिक्षणात चारवेद, व वेदागामधील उपनिषीधे, पूराण वितृलोक विद्या, वको वाक्य, तत्त्वज्ञान नितिशास्त्र, तर्कशास्त्र उच्चारण व सादरीकरण शास्त्र इ. विषयाचे सखोल ज्ञान देणाऱ्या ग्रंथाचे शिक्षण.

**२) अपारा विद्या :-**

ह्या प्रकारच्या शिक्षणात इतिहास, आरोग्यासाठी आयुर्वेद, अर्थशास्त्र, खगोलशास्त्र, भौतिक रसायन, प्राणीशास्त्र, राशी व अंकशास्त्र (गणित), भूत विद्या, जारण मारण विद्या, जादू वशीकरण विद्या इ. युद्धशास्त्र राजनिती इ.

**शिकविण्याच्या पद्धति :-**

वैदीक काळात शिकविण्याच्या दोन पद्धती होत्या.

१. मुखोद्गत करणे.

२. अध्यात्मिक चिंतन व मनन.

**१) मुखोद्गत पद्धत :-**

घरकुल म्हणजे माता-पिता कडून ५-६ वर्षापर्यंत पाठांतर पद्धतीने प्राथमिक उच्चारण रितीरिवाज याचे ज्ञान दिले जाईनंतर पूढील काळात गुरुकुलात याच पद्धतीने शिक्षण दिले जात असे. पुढे जाऊन श्रवण व मनन एकाग्रता या गोष्टीचे सरावाने ज्ञान मिळविणे ज्ञात असे.

आश्रमात निधीध्यास ध्यान आराधनात एकाग्रता चिंतन मनन ह्या मार्गाने संपादित केले जात असे. उच्च ज्ञान मिळण्यासाठी गुरु सानिध्यात राहून अनुभूती व अनुभवातून ज्ञान दिले जाई स्वाध्याय ही शिक्षणाची उच्चतम पायरी होय. ह्या द्वारे शिष्य पुढील काळात आपण स्वबळावर ज्ञान वाढविण्यास समर्थ होत असे.

**शिस्त :-**

- खालील नियम शिष्य व गुरु यांना दोघाना काटेकोर पणे पाळावे लागत होते.
- गुरु सन्मान शिष्यानी पाळलाच पाहिजे असा गुरुकुलात नियमावली असे.
- विद्यार्थी वर्गासाठी कडक शिस्त व नियमांचे पालन करावे लागते.
- विद्यार्थी किंवा शिष्य याच्यासाठी पोशाखाविषयी खास नियम पाळावे लागत असे.
- अध्ययन काळात अविवाहित राहण्याचा नियम बंधनकारक होता.

**गुरु :-**

वैदीक काळात शिष्य व समाज यांना उच्च ज्ञानाचा बहुमानाचा दर्जा देत असत. गुरु शिवाय आश्रम शिक्षण ही कल्पनाच करु शकत नाही गुरु नाही म्हणजे शिक्षण नाही. राजापेक्षा ही गुरुस्थान मानाचे होते. राजा सुद्धा गुरुला बहुमानाचे स्थान देत असत. वेळोवेळी सल्ला मसलत सुद्धा घेत असे. गुरुशब्द प्रमाण मानला जात असे.

## २ अ.४ वेदांचे शैक्षणिक उपयोजन/ महत्त्व

### १) सुसंस्कृती व संस्कृतीचा अभिमान :-

आज आपण स्वत:ला पुढालेले समजणार्या कालखंडात रहात आहोत. तरी आम्हाला प्राचीन संस्कृतीचा व पूर्वजांचा अभिमान वाटतो. आजसूद्धा आम्ही चरित्र व अध्यात्म तत्त्वज्ञानाला प्राधान्य देतो. पैसा, सत्ता, अत्याचार, व्यवहार चातुर्य ह्याना आम्ही आज सुद्धा गौण मानतो. त्याचे कारण आमच्या पूर्वजाननी वैदीक काळापासून अनुवंशीतने आलले, आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा वारसा आजच्या मॉडर्न शिक्षण पद्धतीवर वैचारिक प्रभाव ठेवून आहे.

### २) गुरु - शिष्य नातेसंबंध व शिस्त :-

वैदीक काळात गुरु व शिष्य यांच्यामध्ये सलोख्याचे व आदर युक्त शिस्तीचे सर्व जगाला माहित आहे.

### ३) अभ्यासाचे विषय :-

मानवतावादी, विश्वबंधुत्त्व जागतिक शांती हे वैदीक शिक्षणाच्या अभ्यासक्रम व साहित्यातील अविज्य भाग आहेत.

munotes.in

**४) अध्यापन पद्धती :-**

वैदीक कालीन शिकविण्याचे काही अध्यापन पद्धती आजच्या शैक्षणिक वर्गात सुद्धा फलदायी ठरतात.

**५) बालकाचा सर्वकण / सर्वांगिण विकास :-**

ग्रुप शिक्षणात बालकाचा विकास साधण्यासाठी आजचे शिक्षण फारसे फलदायी दिसून येत नाही वैदीक कालीन व्यक्तिगत शिक्षणाची आवश्यकता आज सुद्धा आवश्यक ठरत आहे.

**६) शिकण्यासाठी समान संधी :-**

त्याकाळी शिक्षण घेण्यासाठी गुरुजनांकडे भेदभाव केला जात नव्हता सर्व जाती संप्रदाय वर्ण व समुदाय यांना मुक्त व समान संधी मिळत असे. आजच्या आधुनिक काळात सुद्धा शैक्षणिक समानता वर आधारित शिक्षण देतात.

**७) शिक्षणाची वैयक्तिक उपयुक्तता :-**

बुद्धीमत्ता व ज्ञान या वित्तेरिक्त शिक्षणाची दुसरी बाजू कला कौशल्य व प्रात्यक्षिके याच्या विचारे प्रामुख्याने लक्षपूर्वक शिक्षण व्यवस्थेत आंतरभूत केलेला शिक्षण विद्यार्थ्यांना स्वत:च्या व्यक्तिगत उन्नमीस उपयुक्त ठरत आहे. व्यावसायिक शिक्षण शेती व कारखानेसाठी उपयुक्त अभ्यासक्रम सुरु करुन विद्यार्थ्यांना स्वत:च्या पायावर निर्भर होणे शक्य झाले आहे.

**८) व्यावसायिक शिक्षण व वैदीक अंकगणित (अंकशास्त्र) :-**

वैदिक काळातील मुख्य वैशिष्ट म्हणजे व्यापर शिक्षण आणि गणित शिक्षण व्यापार व व्यवस्थापन (मार्केटींग) वाणिज्य शिकण्याकडे कळ वाढीस लागल्याचे दिसून येतो. देशविदेश व भौगोलिक क्षेत्रातील विविध भाषा ज्ञान व वस्तू विनिमयासाठी अंकशास्त्रीय वैदीक गणिताच्या अभ्यासाकडे कल वाढीस लागल्याचे दिसून येतो.

सध्याच्या काळात वैदिक गणित प्रसिध्द होऊ लागले आहे अधिकाधिक पालकांना वैदिक गणिताविषयीच्या जाणीव जागृतीत वाढ झालेली आहे त्यामुळे ते आपल्या पाल्यांमध्ये वैदिक गणिताकडे अभिरूची निर्माण करू लागले आहेत तसेच त्यांना संधीही निर्माण होत आहे.

## २ अ.५ तात्पर्य

ज्ञान, जागृती विनयशीलता नम्रता शिष्यामध्ये निर्माण होणे हा प्रमुख वैशिष्ट्ये वैदिक शिक्षणाची आहे. शिक्षणामुळे व्यक्ती विकास होतो. वेद हा शब्द विद् या शब्दापासून निर्माण झाला आहे.

munotes.in

विद म्हणजे संस्कृतमध्ये ज्ञान ह्या अर्थी वापरलेला शब्द आहे. सायनाचार्याच्या मते, चार ही वेद १) ऋगवेद, २) अथर्ववेद,३) यर्जुवेद, ४) सामवेद याच्या अध्ययनामुळे ज्ञान संपन्नता येते. त्याच सोबत अभद्र विचार व पापबुद्धी हद्दपार होऊन मंगलमय व अध्यात्मिक बुद्धी निर्माण होते. स्मृती व श्रुती ह्याच्या अभ्यासात ग्रंथामुळे वैदीक काळात समाज व देश राष्ट्रे चारित्र संपन्न नितीमान व धार्मिक संस्काराचे बनत असे.

## २ अ.६ सरावासाठी प्रश्न

१) वैदीक शिक्षणाचे ठळक वैशिष्ट्याचे वर्णन करा.

२) आजच्या काळातील शिक्षणावर वैदीक कालीन शिक्षणाचा प्रभाव कसा दिसून येतो. थोडक्यात लिहा.

३) वैदीक शिक्षणाचे शैक्षणिक फलितार्थ लिहा.

४) योग्य उत्तरे शोधा.

१. वैदिक शिक्षणातील अध्यापन पध्दती .............. आहे.

१) श्रवण २) मनन ३) निधीध्यास ४) वरील सर्व प्रकार

२. वैदीक पद्धतीच्या शिक्षणाचा प्रमुख्य उद्देश्य

अ) चित्य वृत्ती निरोप

ब) तम सो मा ज्योतिर्गमय

क) मानसिक व अध्यात्मिक उन्नती

ड) याच्या ही पलीकडील अजून काही उद्दिष्टे

३) वैदीक शिक्षणाचे प्रमुख विषय

१) देव विद्या

२) ब्रह्मविद्या

३) राशीशास्त्र

४) हे सर्व विषय

उत्तरे १(ड) २(ड) ३(d).

## २ अ.७ योग तत्त्वज्ञान (परिचय)

प्राचीन काळी योग शास्त्र फारच थोड्या व्यक्तीं पर्यंत मर्यादित होते. नंतरच्या काळात सुज्ञ व परीपक्व व्यक्तींनी रीती रिवाजात बदल घडवून योगाला शास्त्राचा दर्जा प्राप्त करुन दिला.

munotes.in

सर्तकता व जागृकता निर्माण करणारे शास्त्र म्हणून जगाला ओळख झाली. आधुनिक जीवनातील खडतर समस्यांचा सामना करण्यासाठी समर्थवान बनविण्याची क्षमता असलेले शास्त्र सामान्यांपर्यंत पोहचले आहे.

आजच्या आधुनिक काळातील शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी योग शिक्षणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. म्हणून आधुनिक शिक्षणतज्ज्ञ शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी योग शिक्षणात रुचि घेत आहेत. ह्यावरुन गंभीरपणे वाटते की, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय बलाचे विकास आणि वैज्ञानिक स्वभाववैचित्र्य या शिवाय शिक्षणाचा ध्येय मन व आत्मांची मुक्ति सुद्धा झाली पाहिजे.

## २ अ.८ 'योग' संकल्पना :-

प्राचीन काळी असलेल्या सहा तत्त्वज्ञानांमध्ये न्याय, वैद्य, शिस्त, मिमांसा, वेदांत, सांख्य व योग यांचा अभ्यास केला जात असे.

शरीर व मन यांना एका विशिष्ट स्थितीच्या पातळीवर नेण्याचा अभ्यास म्हणजे योग विद्या होय. मानवाचे मानसिक व शारीरीक बल वाढून सर्वश्रेष्ठत्त्व प्राप्त करु शकतो मानवाला उपसर्ग मानव म्हणून बदल करण्याकरीता त्याच्या प्रत्येक स्तरामध्ये (शारिरीक, बौद्धिक व अध्यात्मिक) समतोल आणि स्वरसंवादात आणणे आवश्यक आहे.

**योगाचे प्रकार :-**

१. भक्ति योग
२. ज्ञान योग
३. कर्म योग
४. मंत्र योग
५. लय योग

शारिरीक नैतिक, मानसिक आणि अध्यात्मिक पूर्णत्व प्राप्त करण्यासाठी खालील आठ मार्ग योग साधनेसाठी सुचवले जातात. ज्यामुळे शारीरीक बल (शक्ती) व मानसिक सामर्थ्य प्राप्त होतो.

१. यम
२. नियम
३. आसन
४. प्राणायाम
५. प्रत्याहार
६. धारणा
७. ध्यान
८. समाधि

**१) यम :-** मनोविकार, वासना, पैसे मिळवण्याची लालसा सत्य नाकारणे या सर्वांपासून आत्मसंयमन करणे. स्वत:च्या भावना, इच्छांना आवर घालून दुसऱ्यांना दु:ख पोहचणार नाही. या प्रकारच्या शिस्तीला (वागण्याला) 'यम' असे म्हणतात.

**२) नियम :-** स्वत:ला समाधानी व सुखी होण्यासाठी आपण स्वत:साठी चांगल्या सवयी लागण्यासाठी कराव्या लागणाऱ्या गोष्टी म्हणजे 'नियम' होय.

**३) आसने :-** शरीराच्या विशिष्ट योगीक अवस्था प्राप्त करण्यासाठी शरीराला कष्ट किंवा ताण पडू न देता व श्वसनावर नियंत्रण करण्यास 'आसन' असे म्हणतात. त्यामुळे मनाची स्थिरता येवून उत्साह वाढतो. शरीराला व स्नायुंना आकार व बळकटी येते.

**४) प्राणायम :-** श्वास घेण्याची क्रिया नियमित करणे म्हणजे प्राणवायू आत घेणे, आत ठेवणे व बाहेर सोडून देणे यामुळे शारीरीक बल वाढीस लागून एकाग्रता व आत्मशक्ती वाढीस लागते.

**५) प्रत्याहार :-** आपणास लागणाऱ्या वस्तूचा त्याग करण्याचा व त्याशिवाय नगण्याचा विचार व स्थिती याला 'प्रत्याहार' म्हणतात.

**६) धारणा :-** एखादी वस्तू किंवा कार्य याकडे एकाग्रता व आत्मीकतेचा बाबत विश्वास निर्माण होण्याच्या स्थितीला 'धारणा' असे म्हणतात.

**७) ध्यान :-** आपल्या मनाची एकाग्रता यासाठी खोल विचार व चिंतन करुन आपण आपल्या स्वत:चा शोध घेण्याची क्रिया म्हणजे 'ध्यान' होय.

**८) समाधी :-** या अवस्थेत शरीराच्या व मनाच्या स्थितीची अलगता जाणवणे ते एकमेकांस अलिप्त होणे. त्यात फक्त स्वत: म्हणजे मी शिल्लक असतो. ती एक प्रकारची तल्लीनता असते.

जगातील मानवी जीवनाचा अंतिम टप्पा म्हणजे 'समाधी' अवस्था प्राप्त करणे हा होय.त्यासाठी वरील पाच टप्पे हे शारीरीक बाह्यात्कारी मार्गाने समाधि अवस्थेकडे जाण्यासाठी उपयोगी ठरतात. पुढील टप्पे आंतरबाह्य 'समाधी' अवस्थेपर्यंत नेतात.

वैदीक ग्रंथ कठोपनिशीधात योगाबद्दल स्पष्टपणे लिहिले आहे. 'योग शास्त्र' हे शुद्ध चरित्र व व्यक्ती विकासासाठी योग साधना ही अटळ आहे.

'भगवतगीता' ग्रंथ रचना करणारे महामुनी वेद-व्यास यांनी जीवनात प्रत्यक्ष योगाचे किती महत्त्व आहे, हे त्यांनी सुंदर पद्धतीने स्पष्ट करुन दाखविलेले आहे. आधुनिक काळातील शिक्षणात योग हा शास्त्र म्हणून स्वीकार करुन ते व्यक्ती विकास होण्यासोबत देहभान व सर्तकता या गुणांची जोपासना होते व त्यायोगे मानवीय जीवनास परिपूर्णत्त्व प्राप्त होते.

"शारीरीक, मानसिक, बौद्धिक तसेच अध्यात्मिक तत्त्वाची व ज्ञानाची वाढ होण्यासाठी इतकेच नव्हे तर व्यक्तीगत योग्यतेची कक्षा वाढविण्यास व अपूर्णत्वाची वाढ करण्यासाठी योग्य प्रयत्न योगाद्वारे करणे हा उत्तम मार्ग आहे."

munotes.in

योग व प्राकृतिक स्वास्थ्य यांचा फार जवळचा संबंध आहे. याबाबत आजचे शास्त्रज्ञ, डॉक्टर, मानसोपचार तरज्ञ, शिक्षण तरज्ञ, यांचे जागतिक पातळीवर एकमत झालेले आहे.

## २ अ.९ योग शास्त्राचे शैक्षणिक ध्वन्यर्थ / संबंध

योग शिक्षण ही संज्ञा साधारणपणे शिकणे व शिकविणे या समांतर होणाऱ्या क्रियेसाठी आहे योगीक साधनांमुळे शिकविण्याचे कार्य उत्तम पद्धतीने व सहजतेने पार पडते. ज्यायोगे शिस्त व सामाजिक योग साधनाद्वारे शिक्षण ही एक पायाभुत गरज आहे. या पद्धतीने सर्व शिक्षण क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. आधुनिक शिक्षण पद्धती सुद्धा योग द्वारे शिक्षण देण्याच्या पद्धतीवर भर देत आहे. शिक्षण कार्यात योगामुळे व्यक्ती – व्यक्तींमधील सामंजस्य वाढीस लागते. सर्व प्रकारे वर्तणूक सुधारते. आपापसात प्रेमभाव निर्माण होतो.

भारतीय शिक्षणाच्या दृष्टीक्षेपात नवीन आव्हानांना तोंड देणे आवश्यक आहे. शिक्षणाद्वारे मुख्यत्वे शारीरीक, मानसिक, बंधुभाव व सद्वर्तन या गोष्टी वाढीस लागणे आवश्यक आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीला हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे की शिक्षणामुळे सामाजिक व लोकतांत्रिक राज्यासाठी घटनात्मक अभ्यासाची ओळख व्हावी, याशिवाय व्यक्तीगत विचारसरणी वाढीस लागून राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे हा मुख्य उद्देश शिक्षणाचा असावा. मन व आत्मा यांना शिक्षणामुळे मुक्तता प्राप्त होऊन देशाचे चरित्र वाढीस लागून शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण होईल हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. आचार्य विनोबा भावे आणि महात्मा गांधी यांनी सांगितलेले आहे की, भारतीय जनतेला अशा शिक्षणाची आवश्यकता आहे की ज्यामुळे अध्यात्मिक शक्ती वाढीस लागेल. उद्योग निर्माण होऊ शकेल व सहयोगी जीवनाची प्रेरणा मिळेल.

गांधीजींनी शिक्षणाचे तीन मूळ टप्पे सांगितले आहेत.

१. योग - आदर्श प्रशिक्षण

२. उद्योग - व्यवसायिक प्रशिक्षण

३. सहयोग - सामाजिक प्रशिक्षण

**शैक्षणिक पद्धती मधील योगाचे कार्यक्षेत्र :-**

शिक्षण क्षेत्रात असे दिसून आलेले आहे की, ज्या ठिकाणी योगीक सराव असेल तर सकारात्म बदल होऊन शैक्षणिक कार्य पार पडेल.

शारीरीक अडचणींवर उपयोगी पडते. तसेच मानसिक स्वास्थ वाढीस लागून ताण तणावापासून मुक्ती मिळवण्यास मदत होते. भावनिक नियंत्रण येवून कार्यकुशलता वाढीस लागते.

munotes.in

**'योग' चा सकारात्मक दृष्टीक्षेप /बाजू :-**

१. इच्छा शक्तीची वाढ.

२. कार्यासाठी ध्येयमग्नता वाढीस लागणे.

३. शिक्षण व प्रशिक्षणाने आत्मशक्ती वाढवणे.

४. सुप्त शक्ती जागृत करणे.

५. कौशल्य व एकाग्रता वाढीस लागणे.

**शिक्षणाचे ध्येय :-**

- मानवी व्यक्तिमत्त्वाचा सर्वकष विकास.
- शारीरीक, मानसिक तसेच अलौकिक विपत्ती पासून विद्यार्थ्यांना मुक्त करणे.
- शारीरीक, मानसिक, बौद्धिक व अध्यात्मिक वाढ होणे.
- विद्यार्थ्यांना नैतिकतेसाठी तयार करणे.
- मानवी स्वभाव समजणे.
- वैज्ञानिक वृत्ती, तर्क व बौधिक शाखांचा विकास करणे.

**शिक्षक :-**

- शिक्षकाचे अत्यंत महत्त्वाचे स्थान असे.
- शिक्षकांनी फक्त शाब्दीक सादरीकरण न करता, प्रात्यक्षिक करुन दाखवावे.
- विद्यार्थ्यांसोबत योगीक प्रात्यक्षिके सादर करावी (शास्त्रीय पद्धतीने).
- शिक्षक हा ज्ञान शक्ती, इच्छा शक्ती व कार्यशक्तीने निपूण असे.
- शिक्षकाची आजच्या काळातली शास्त्रज्ञाची भूमिका असावी.

**विद्यार्थी :-**

- विद्यार्थ्याने विश्वासपुर्वक शिक्षकांकडे समर्पित हावे ज्यामुळे संपूर्ण उपाय मिळतील.
- शिक्षकाशिवाय विद्यार्थ्यांना काहीही ज्ञान प्राप्त होऊ शकत नाही.

**अभ्यासक्रम :-**

- ही प्रणाली मानवीय, बालकांकरिता मानसिक मनो – शारीरीक प्रशिक्षणासाठी आहे.
- विद्यार्थ्यांच्या नैतिक जीवनासाठी साहित्य पुरवते. ज्या कारणे विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण होते.

munotes.in

- वैदिकशास्त्र, चिकीत्सालय, मानसशास्त्र, सामाजिक विज्ञान अशा विशिष्ट विज्ञानांचा समावेश आहे.
- मानवी शरीर किंवा विज्ञान, वास्तव मानवीय स्वभाव आणि निसर्गातील रहस्यांशी संबंधित विषय स्वीकारले.
- परिपूर्ण.
- व्यक्ती आणि समाजाच्या उत्क्रांती वादासाठी सर्वात जास्त योग्य.

**शिक्षणाच्या पद्धती :-**

- चित्त वृत्ती निरोध – (चांगली व वाईट विचारसरणी ओळखण्याची वृत्ती, कल्पनाशक्ति, स्मरणशक्ती)
- चित्तैकाय सर्वात जास्त महत्त्वाची पद्धती.
- वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्याची पद्धती.
- योगा वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारते, पण क्रमाप्रमाणे देखील स्वीकारते.
- ही प्रणाली ज्ञान मिळविण्यासाठी पद्धती विश्वास असे.
- शिक्षणात संयोगाचे नियम, योग शास्त्रात महत्त्वाचे होते.

**शिस्त :-**

- शिक्षण व शिस्त हे दोन्ही एकरुप आहेत.
- योग शास्त्राचा मूळ उद्देशच शिस्त निर्माण करणे हा आहे.
- प्रत्येकाला शारीरीक, मानसिक, बौद्धिक शिस्त लागणे आवश्यक असते. तो शिक्षक असो या विद्यार्थी (शिकणारा असो वा शिकविणारा असो).
- शरीर व मनाला शिस्त लावणे उच्च शिक्षणाचा गाभा (केंद्रस्थान) आहे.

भारतातच नव्हे तर आधुनिक जागतिकीकरणाच्या काळात योग शास्त्राची मदत घेणे आवश्यक ठरत आहे. म्हणून आता गंभीरतेने लक्ष देवून अभ्यास क्रमांत योग शिक्षणाचा अंतर्भाव (समावेश) करुन, योग्य वेळ व योग्य दिशा ठरवून पुढील पिढी सशक्त तसेच ज्ञानी बनतील.

**'स्व' – शिक्षण :-**

'स्व' म्हणजे स्वत:ला स्वत:ची ओळख करुन देणारे शिक्षण म्हणजेच योग शिक्षण होय.

munotes.in

योग शिक्षणाद्वारे स्वत:ची जाणीव होऊन, सूज्ञ व समंजस्य वृत्ती ठेवण्यास शिकविले जाते. शिक्षण कार्यात ग्रांभीर्य येवून नेमस्तपणा व शिस्तशिरपणा अंगी येतो. सत्य घटनांचे ज्ञान होऊन गूण व अवगूणाची पारख करण्याचे ज्ञान प्राप्त होते.

**मानवीय मन (आत्मा) ची अलौकिक (श्रेष्ठ) दर्जा प्राप्त होण्यासाठी पाठ पुरावा :-**

योग शास्त्राचे सर्वोच्च ध्येय म्हणजे आत्मा व मनाला अलौकिक दर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी पाठ पुरावा करणे. प्राचीन योग शिक्षणात 'निर्धाध्यास' ही एक स्थिती आहे. याद्वारे श्वसन नियंत्रित करण्याचा सराव केला जातो व त्यातून पुढे 'समाधि' अवस्था प्राप्त करणे सुलभ होते. त्यापूर्वी चिंतामुक्ती होऊन आनंदमय वृत्ती व ज्ञानमयवृत्ती कायम स्वरुपी सुरक्षितपणे टिकून ठेवण्याचा अभ्यास करीत राहिल्याने 'समाधि' अवस्था सहज प्राप्त करता येते. 'समाधि' अवस्था प्राप्त करण्यासाठी सराव करणे आवश्यक असते. गूढ चिंतनामुळे ज्ञानमय अवस्था प्राप्त होऊन, विश्वातील चराचर सृष्टीला आकलन शक्तीचे ज्ञान प्राप्त होते.

आजच्या काळातील विद्यार्थ्यांच्या मन व बुद्धी साठी क्लासेस चालतात. त्यामध्ये उथळपणा दिसून येतो बहुसंख्य विद्यार्थ्यांमध्ये गुंतागुंत व मानसिक तणाव निर्माण झालेला दिसतो. बहुसंख्य विद्यार्थी तणावपूर्व परिस्थितीत वाहत आहेत. हल्लीच्या शिक्षण पद्धतीमध्ये शांतीपूर्वक जीवन कसे जगावे याबाबत उणीवा आहेत. गुंतागुंतीच्या जीवनाच्या शैलीमध्ये शिक्षण हे विद्यार्थ्यांमध्ये तणावपूर्व वाटणार नाही. याची दक्षता घेण्याची वेळ आली आहे.

**सामान्य जाणीव वाढीस लागणे :-**

शारीरीक, मानसिक व अध्यात्मिक ज्ञान प्रकट (उघड) करणे, म्हणजे व्यक्ती विकास घडणे, याही पलीकडे जावून मनात सामाजिकतेची जाणीव होऊन सभोवतालच्या जीव सृष्टीची जाण व भान मनामध्ये ठसविण्याचे कार्य योग शास्त्रामुळे व्यक्तीमध्ये केले जाते.

योग शास्त्र हे मनातील विचार व भावना यासाठी जास्त महत्त्व (विशेष जोर) देते. विचारातील भले बुरे पणाची जाणीव निर्माण होऊन योग्य विचारांच्या मध्ये दृष्टीकोन व एकाग्रता येणे.

**सर्वार्थाने जाणिवेची जोपासना वाढीस लागणे :-**

योगाभ्यासामुळे व्यक्तीची शारीरीक, मानसिक व अध्यात्मिक ज्ञानाची पातळी प्रकट होण्यासोबत त्याच्या मनात सभोवतालच्या जीवसृष्टीची व सामाजिक दृष्टीकोनाची जाणीव निर्माण करण्यावर जास्त महत्त्व देते. ज्यायोगे व्यक्तीच्या बाह्य वातावरणासोबत आंतरिक वातावरण खोलवर परिणाम कारक योग्य विचाराची दिशा दाखविण्यास सहाय्य करते. मनाची द्वीघा अवस्थेवर खोलवर तसेच आंतरबाह्य परिणाम होऊन मनास एकाग्रता व एकचित्तवृत्ती (संयमता) निर्माण होऊन सुलभता प्राप्त होते.

munotes.in

सामान्य व्यक्ती कोणत्याही विचारामध्ये गुंतून जाऊ शकतात ती एक प्रकारे चंचल वृत्तीचे असल्याने भौतिक सुखाकडे त्याचा कल असतो. त्यांना चांगल्या वाईट गोष्टी चटकन लक्षात येत नाहीत. त्याचा होणारा परिणाम चांगला किंवा वाईट हे ते ठरवू शकत नाहीत. योग्य जाणीव होण्यासाठी योग शास्त्र जाणून घेतल्यास हळूहळू अनुभवाअंती सुखाची जाणीव होऊन कालांतराने शांतता अनुभवणे बाह्यवातावरणाचा बदल मान्य होऊ लागतो. सृष्टीचे सत्य रुप कळल्यानंतर खोलवर दृढविश्वास निर्माण होणे हाच मूळ योग शास्त्राचा आत्मा आहे.

**इच्छा शक्तीची वाढ करणे व जतन करणे :-**

सर्व कार्याच्या सुरुवातीला 'इच्छा शक्तीची' आवश्यकता आहे. तसेच कार्याच्या शेवटापर्यंत इच्छाशक्ती टिकविणे फार आवश्यक आहे.

गुणात्मक कार्य व सिद्धी म्हणजे सफलता ती प्राप्त होण्यासाठी इच्छा शक्ती हिच महत्त्वाची ठरते.

मानसिक आरोग्य सुस्थितीत ठेवण्यासाठी अष्टांग योग सिद्धी तंत्राचा वापर कसा करावा हे 'पतंजली - योग' या ग्रंथात सविस्तर वर्णन केलेले आहे. चित्त, वृत्ती स्थिर करण्यासाठी 'यम' व 'नियम' ने सुरुवात करावी लागते. 'यम' अनावश्यक गोष्टींचा त्याग करणे, नियम म्हणजे सतत कराव्या लागणार्या योग्य सवयी आत्मसात करणे.

त्यानंतर शरीराच्या कुवतीनुसार आसनांचा अभ्यास करणे, त्यापूर्वी प्राणायम म्हणजे श्वसन क्रियेवर नियंत्रणाचे शास्त्र जाणून घेणे आवश्यक असते. आंतरमनावर व बाह्य मनावर नियंत्रण येणे हा प्राणायमाचा मुळ उद्देश आहे. आसनाच्या सरावाने शारीरीक बदल होऊन आतुन प्रतिकारशक्ती निर्माण झाल्याने शरीर तंदुरुस्त राहुन मानसिक बल वाढते.

वैचारिक स्थिरता प्राप्त होण्यासाठी आधुनिक डॉक्टर योग व प्राणायम या मार्गाने जाण्याचा सल्ला देतात.

उपनिषदाच्या नंतरच्या काळात योग शास्त्राचा उपयोग शरीरबांधा सुधारणे यासाठी व मानसिक, नैतिक स्वास्थ राखण्यासाठी केला जात असे. शारीरीक वेदना व इतर अडचणींवर उपाय म्हणून योग शास्त्राचा वापर होत असे.

**ताण तणाव व प्राकृतिक बिघाड यावर उपाय योजना :-**

योग चिकित्सेने ताण तणाव नियंत्रित करता येतात. योग साधनेमुळे स्वत: रोगमुक्ती मिळविली जाते. व आश्चर्यकारक रितीने चिंता, काळजी व अस्वस्थता व रक्तदाब यापासून मुक्ती मिळविता येते.

## २ अ.१० सारांश

शिक्षण औपचारिक असो वा अनौपचारिक असो ते काळाच्या ओघात अनुभवावर आधारित असते. ज्या शिक्षणाने शाश्वत सुख प्राप्त होते. ते दैवी किंवा अलौकिक श्रेष्ठ असेच असते. मानवीय शरीर व नैतिकता या आधाराने योग शिक्षण आमलात येणे शक्य होते. व्यक्तीचा सहभाग असल्याशिवाय योग शिक्षण शक्य होणार नाही.

योग शास्त्राच्या दृष्टीकोनातून सामाजिक गरजा महत्त्वाच्या ठरतात. योगशास्त्र 'यम', 'नियम', आसने आणि प्राणायम या चार गोष्टींवर भर देतात. यामुळे शिक्षणाचे सामाजिक महत्त्व ठरते. कारण सत्य, अहिंसा चोरी न करणे, संसारीक मोह टाळणे (लग्न न करणे) आवश्यक आहे. योग शिक्षणाच्या दृष्टीकोनातून शिक्षणाद्वारे व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व बहुव्याप्ती विस्तारित होऊन एकाग्रता वाढीस लावणे शैक्षणिक दृष्टीने बहुमोलाचे आहे.

शारीरीक व मानसिक शिस्त हा शिक्षणाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. त्याशिवाय शिक्षणाचे महत्त्व प्राप्त होऊ शकत नाही. आधुनिक काळात शिक्षक किंवा विद्यार्थी यांनी शिस्त व शिस्तीची अपरिहार्यता जाणणे आवश्यक आहे.

जर विद्यार्थी किंवा शिक्षक शिस्त जाणत नसतील किंवा एकाग्रता होत नसेल तर विषय समजणे व शिकवणे कठीण होते.

आजच्या शैक्षणिक पद्धतीमध्ये जो शिक्षक व विद्यार्थी आत्मविश्वासाने व आंतरीक अनुभूतीने विद्यार्थ्याला प्रत्येक विषयावर शिकवू शकेल. योग शास्त्रांशी संबंधित व शिकणे ह्या दोन्ही क्रिया एकाच वेळी दोघाच्या ठिकाणी परिणामकारी होणार मग शिक्षण झाले नाही असे होणे शक्यच नाही.

ही पद्धत एक आव्हान आहे, की जे शिक्षक शिकविण्यापेक्षा पुस्तकांतील सैधांतिक विषय मुलांना खडू व फळ्याच्या व नोट्सच्या माध्यमातून मुलांच्या वहीमध्ये परावर्तीत करतात.

## २ अ.११ प्रश्नावली

१. योग शास्त्राच्या आठ अंगांची नावे क्रमवार लिहा.

२. शिक्षणाचे उद्देश, अभ्यासक्रम व शिक्षकाची शिकविण्याची पद्धत व शिक्षकाचा सहभाग याबाबत योगशास्त्राच्या दृष्टीक्षेपातून चर्चा करा.

३. शिक्षण व योग शास्त्र यांच्या संबंधाबाबत सविस्तर चर्चा करा.

४. शिक्षणात योग शास्त्राची काय भूमिका आहे सविस्तर लिहा.

❖❖❖❖

# २ ब

# नास्तिक पूरोगामी विचारसरणीचे भारतीय तत्त्वज्ञान

**प्रकरणाची रचना:**

२ ब.० उद्दिष्ट्ये
२ ब.१ प्रस्तावना
२ ब.२ बौध्द तत्त्वज्ञान
२ ब.३ बौद्ध कालीन शैक्षणिक ध्वन्यर्थ / संबंध
२ ब.४ बुद्ध तत्त्वज्ञानाचे शैक्षणिक ध्वन्यर्थ / संबंध
२ ब.५ जैन तत्त्वज्ञान
२ ब.६ जैनकालीन शैक्षणिक फलितार्थ
२ ब.७ सारांश
२ ब.८ प्रश्नावली

## २ ब.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्ही खालील गोष्टी साध्य करु शकाल.

- भारतीय तत्त्वज्ञानातील नास्तिक म्हणजे वेद शास्त्र न मानणारे शाखांचे ज्ञान प्राप्त करणार.
- जैन व बुद्ध शैक्षणिक तत्त्वज्ञान समजणार.
- जैन व बुद्ध शैक्षणिक तत्त्वज्ञानातील वैशिष्ट्ये ओळखणार.
- शिक्षणक्षेत्रातील त्यांचे योगदान समजणार.

munotes.in

## २ ब.१ प्रस्तावना

भारतीय रितीरिवाजाच्या तत्त्वज्ञानाला एकाच अच्छादनाखाली आणणे, योग्य ठरणार नाही. वैदिक तत्त्वज्ञान भारतात अधिक अंशाने मानणारे आहे. हा मोठा विस्तीर्ण भाग सोडून देणे शक्य नाही.

ज्या शाळा वैदीक तत्त्वांना मानत नाही त्यांना नास्तिकवादी तत्त्वज्ञान या व्याख्येत ओळखले जाते. ह्या पुढील तत्त्वज्ञाने समाविष्ट आहेत :

**चार्वक तत्त्वज्ञान :-**

ह्याचे गुणविशेष म्हणजे भौतिक व वस्तुनिष्ठ, सौंदर्य, आनंदमयी वातावरण, विचाराचे जीवन सत्यत्वसिद्ध करणे.

**बौद्ध तत्त्वज्ञान :-**

गौतम बुद्धांच्या शिकवणूकीवर आधारलेले आहे. ईश्वर आहे किंवा नाही हा वाद बाजूला ठेवून जीवनातील आपत्ती, भोग, मुक्ती मिळवण्याचे मार्गदर्शन करणारे तत्त्वज्ञान.

**जैन तत्त्वज्ञान :-**

भगवान महावीर २४ वे तीर्थकार यांनी ७ दशके बी. सी. (ख्रिस्त पूर्व) जैनधर्म पूर्नस्थापित केला.

## २ ब.२ बौध्द तत्त्वज्ञान

भारतीय विचारधारेच्या विकासातील बौद्ध तत्त्वज्ञान लक्षात घेण्यासारखे आहे. वैदीक विचार धारेतून बाजूला जाऊन भारतीय तत्त्वज्ञानाची ही एक शाखा आहे. सनातन धर्माच्या काही आचरण पोहचविण्यासाठी बुद्ध तत्त्वज्ञान उदययास आले. बहुत अंशी हिंदूत्वाशी सांगड आहे तसे कर्म चांगल्या व वाईट कर्माचे परिणाम होत असतात. आता जे भोग आहेत ते केलेल्या कर्माचे आहेत व जे चांगले कर्म कराल याचा उपयोग चांगलाच राहील. तसेच जन्म मरणाची साखळी, दु:खापासून मुक्ती म्हणजे मोक्ष किंवा निर्वाण ह्याबाबत समानता दिसून येते.

२०० BC – २०० AC ह्या काळात गौतम बुद्धांनी जी शिकवण दिली. ती एक प्रकारे नितीशास्त्राची शिकवण दिली. इश्वरीय अस्तित्त्वाला महत्त्व न देता जीवनाशी संबंध असतो. तात्वीक बाबींच्या विचाराला प्राधान्य दिले. सामान्याचे जीवनातील भोग, यातना याबाबत सुटका कशी होईल याचे मार्गदर्शन त्यांनी केले. सामान्यांना बुद्धवादी, निरर्थक, चर्चेपासून लाभ होणार नव्हता. त्यांना त्यांच्या सतावणार्या संसारीक प्रश्नापासून मूक्तता होऊ शकते. हे सत्य त्यांनी दाखविले.

**चार आर्यसत्य -**

१. या ठिकाणी दु:ख आहे.
२. या दु:खाला कारणे आहे.
३. दु:खाला निरोध आहे.
४. दु:ख निवारण्याचे मार्गपण आहे.

जीवनातील दु:खापासून मुक्त होऊन निर्वाण मार्गाकडे जाण्यासाठी आठ पायर्यांनी जावे लागते.

**अष्टांग मार्ग -**

१) सम्यक दृष्टी
२) सम्यक संकल्प



munotes.in

३) सम्यक वाचा
४) सम्यक कर्मान्त
५) सम्यक आजीव
६) सम्यक व्यायाम
७) सम्यक स्मृती
८) सम्यक समाधी

## २ ब.३ बौद्ध - शैक्षणिक तत्त्वज्ञान

सर्वासाठी शिक्षण ह्या मुख्य मुद्यावर बुद्धांनी शैक्षणिक कोणताही भेदभाव न ठेवता सर्वासाठी शिक्षण हे ध्येय ठेवून शैक्षणिक संस्थानांची वाढ केली त्या काळात नालंदा, तक्षशीला, विक्रमशीला, बलूभी, औदंतापूरी, अमरावती, नागहल्ला, सारनाथ इ. शिक्षण देणारे विद्यापीठ भारतात प्रसिद्ध होते. देशविदेशातील विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी येतात. या ठिकाणी विहार व संघ विस्तारित प्रमाणात होते व सर्वांना शिक्षणासाठी प्रवेश दिला जात असे.

**शिक्षणाचा ध्येय :-**

बुद्धकालीन शिक्षणपद्धतीने ज्ञानाचा विस्तारावर विरोध भर दिलेला होता. सामाजिक सुधारणा व्यावसायिक शिक्षण धर्माचा प्रसार, चरिक्षवान व्यक्तिमत्त्वाची वाढ हे मूळ हेतू होते.

१. बुद्ध धर्माच्या तत्त्वाचे आचरण करणे.
२. सदवर्तन व अहिंसेचे पालन करणे.
३. शेवटी निर्वाण चे हेतू साध्य करणे.
४. बुद्ध धर्माचा प्रचार करणे.
५. वेदांचे कर्मकांड व रितीरिवाज बदलणे.
६. जातीभेद नष्ट करणे.
७. सर्व लोकांपर्यंत बौद्ध शिकवण पोहोचवणे.
८. ज्ञान मिळविण्यासाठी यज्ञ व बली प्रक्रिया सोडून देणे.
९. शिक्षण हे बहुजन व स्थानिक भाषेतून देणे.
१०. व्यक्तिगत प्रगतीपेक्षा सामाजिक प्रगती होण्याच्या दृष्टीकोनातून शिक्षण देणे.
११. बुद्धांने दिलेल्या नवीन प्रणाली प्रमाणे शिक्षण देणे.

**शिक्षणाची तत्त्वे :-**

१. 'अविद्या' म्हणजे अज्ञान हे सर्व दु:खाचे मूळ असते ते नष्ट व्हावे या कारणासाठी शिक्षण देणे आवश्यक आहे.
२. शिक्षण हे शांत वातावरणात दिले जावे. त्यासाठी गुरुकुल ऐवजी व शैक्षणिक संस्था स्थापन्यात याव्यात.



munotes.in

३. विद्यार्थ्यांना लोकतंत्र वातावरणात शिक्षण दिले जावे.
४. विद्यार्थ्यांना सर्व सुखसोईच्या गरजांपासून दूर ठेवावे.
५. साधवी/द्यरिका (नवीन प्रवेशार्थीचे शिक्षण) सुरु होण्यापूर्वी 'पबज्जा विधी' करणे आवश्यक असे. त्यासाठी दहा नियम पाळावे लागतात. १२ वर्षे पर्यंतच शिक्षण काळ होता.
६. वयाच्या २० वर्षानंतर 'उपसंपदा' ही विधी केली जात असे. यानंतर पुढील विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यास पात्र होत असे.

**शिक्षण प्रणाली :- (द्वि-विभागीय पद्धत)**
१. सर्वसामान्य प्राथमिक शिक्षण
२. उच्च शिक्षण

**प्राथमिक शिक्षण :-**
सर्वसामान्य प्राथमिक शिक्षण हे वयाच्या १२ वर्षे पर्यंत दिले जात असे. हे शिक्षण धार्मिक पद्धतीचे असे. या काळात वाचनाचे नियम, लिखाण व गणित सराव, धार्मिक ज्ञान यांचा समावेश असे.

१) हेतू विद्या, २) न्याय विद्या, ३) अध्यात्म विद्या व व्याकरण, शिल्प स्थान व तंत्रज्ञान हे विषय शिकवले जात.

**उच्च शिक्षण :-**
प्रात्यक्षिक व सैद्धांतिक पद्धतीने उच्च शिक्षण फक्त बौद्ध धर्म प्रचारक व रितीरिवाजाचे मार्गदर्शक म्हणून कार्य करणार्या भिक्खूंना शिक्षण देण्यात येई.

**उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम :-**
बुद्ध धर्म, हिंदूधर्म व जैन धर्म यांचा तौलनिक अभ्यास इश्वर शोध शास्त्र तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, संस्कृत पाली खगोलशास्त्र, ग्रहगोलशास्त्र, वैदकशास्त्र, कायदा, राज्यकारभारशास्त्र, तंत्रविज्ञानशास्त्र.

**शिक्षणाच्या पद्धती :-**
१. प्रामुख्याने मौखिक
२. प्रश्नोत्तर चर्चा वाद, संवाद
३. आग्र, शिष्य प्रणाली. (निरीक्षक प्रणाली)
४. निसर्ग अभ्यास व प्रवास
५. पुस्तकातून ज्ञान मिळविणे
६. सभा व वादविवाद
७. शिक्षणाची भाषा पाली वापरत असे. परंतू स्थानिक भाषेतून शिक्षण देण्याची प्रथा सुद्धा होती.

**शिक्षक, विद्यार्थी यांच्यातील संबंध :-**
१. प्रेमाचे, सलगीचे व शुद्ध स्वरुपाने नाते असे.



munotes.in

२. शिक्षक, नामांकित विद्वान तर असलेच पाहिजे त्याशिवाय स्वत:मध्ये प्रेरणात्मक श्रेष्ठता सुद्धा असावी.

३. विद्यार्थ्यासोबत शिक्षकांचे जीवनमान साधे, सतत अभ्यास करणारे, अविवाहित जीवन जगणारे, चरित्रवान असे शिक्षक विद्यार्थ्यानसोबत मठात रहात असत.

४. शिक्षक व विद्यार्थी हे दोघे मिळवून विचारशक्ति घेण्याचे आणि अनुभवाचे अधिकारी असणे गरजेचे होत.

५. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य विचारांचा उपयोग करणे आवश्यक होते व त्याकडे लक्ष दिले जात असे.

६. वर्तन व नितीमत्ता यांची शिस्त पाळणे बंधनकारक असे.

७. स्वत: आत्मसंयमी जीवन जगण्याची क्षमता मिळविणे आवश्यक होते.

## २ ब.४ बुद्ध तत्त्वज्ञानाचे शैक्षणिक ध्वन्यर्थ

१. **बहुजन हिताय :-** बुद्धकालीन शिक्षण व्यवस्थेमध्ये जात, धर्म, पंथ, वर्ण व देश ह्या गोष्टींना थारा जात नसे सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळत असे.

२. **संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास :-** बुद्धकालीन शिक्षण पद्धतीमध्ये नवशिकावू विद्यार्थ्याचे मानसिक, बौद्धिक व अध्यात्मिक विकासावर जोर, ह्या गोष्टीला महत्त्व दिले जात होते, आज सुद्धा शिक्षणाचे ध्येय व्यक्तिमत्त्वाचे एकात्मतेला जास्त महत्त्व आहे.

३. **शारीरीक शिक्षेला मनाई :-** बुद्धकालीन शिक्षणपद्धतीमध्ये कोणालाही शारीरीक शिक्षा करण्यास बंदी होते. आजच्या शिक्षणाच्या वातावरणात सुद्धा ही गोष्ट आढळते.

४. **सकारात्मक विचारांचा दृष्टीकोन :-** शास्त्रशुद्ध व तर्कशुद्ध विचारांची शिकवण होती.

५. **नितीशास्त्रीय :-** निर्वाणाकडे जाण्याचा अष्टांगमार्ग जगमान्य आव्हान आहे.

६. **शिक्षणात लोकतंत्र वातावरण :-** विद्यार्थ्यांना शिक्षण ग्रहण करताना चौकशी करण्यासाठी, स्वतंत्र वातावरण देत होते. लोकसत्तक व प्रजासत्तक प्रक्रिया लक्षात ठेवून शैक्षणिक संस्था चालत असे.

७. **सदवर्तनाचा विकास :-** बौद्ध शिकवणूक ही व्यक्तीच्या सर्वांगण गुणांची वाढ कशी होईल, ह्या तंत्रानुसार मार्गदर्शन देत ही गोष्ट आजच्या शिक्षणात सुद्धा महत्त्वाची आहे.

munotes.in

८. **नैतिक शिस्त :-** नैतिक शिस्तीसाठी बौद्ध भिक्खूंना प्रतिज्ञा घ्यावी लागत असे. निसकांचन अवस्थेत शिक्षण कार्य करावे लागत असे. चारित्र्य, नैतिक शिस्तीचा मूळ तत्त्व मानले जात.

९. **स्वावलंबनात्मक / स्वावलंबी जीवन :-** स्वावलंबी जीवन जगण्यासाठी हस्तकला, कौशल्य, विणकाम, सुतकाम, इ. विषय शिकविण्याला महत्त्व दिले जात असे.

१०. **व्यवहारिकता :-** कोणत्याही गोष्टीत बदल केला जात असे बदलणार्या परिस्थितीतील योग्य बदल करणे व जगातील बदलानुसार शिक्षण व व्यवहार केला जात असे जागतिक पातळीवर शिक्षण दिले जात असे. आजच्या जागतीकीकरण युगात सुद्धा व्यवहारवादी दृष्टीकोन असणे आवश्यक आहे.

११. **शिकविण्याची पद्धत :-** बौद्ध कालखंडात तोंडी अध्यापन पाठांतर या पद्धतीने प्रशिक्षण दिले जात असे. उच्चस्तरीय शिक्षणासाठी चर्चा, वादविवाद, संवाद, प्रश्नोत्तरे, विद्वान व्याख्याने, सभा, प्रवास, क्षेत्रभेटी आयोजित केल्या जात असे.

१२. **आंतरराष्ट्रीय प्रभाव :-** भारताबाहेरील देशात बौद्धकालीन शिक्षणाचा मोठा प्रभाव होता. पूर्वेकडील देशांमधून येऊन लोक येथील मठात व युनिर्व्हसीटीमध्ये अभ्यासाकरिता येत असत. त्यामुळे देशोदेशीच्या संस्कृतीचा देवाणघेवाण होण्यास सुरुवात झाली.

१३. **मूल्य शिक्षण आणि चारित्र्य विकास :-** चारित्रसंवर्धन व नैतिकता जपण्यासाठी गौतमबुद्धांनी अष्टांगमार्ग सांगितला त्यासाठी ध्यानधारणा व समाधी अशा भव्य भार्ग प्राप्त होते. त्यानुसारच व्यक्तिच्या चारित्र्याचा तसेच नैतिकतेचा विकास शिक्षणाच्या माध्यमातून करणे बौद्धकालीन शिक्षणाचे ध्येय होते.

१४. **अभ्यासक्रम :-** अभ्यासक्रमामध्ये प्रापंचिक आणि धार्मिक विषयांचा समावेश होता.

१५. **विद्यापीठाची रचना व संघटन :-** बौद्धकालीन निर्माण झालेले विद्यापीठे आज सुद्धा कार्यरत आहेत आणि मार्गदर्शक ठरणारे आहेत. नालंदा आणि वल्लभी विद्यापीठांची रचना खूप प्रगत होती. जे आजपर्यंत वेगवेगळ्या विद्यापीठांच्या रचना व संघटनासाठी परिणामकारक ठरत आहेत. उच्च शिक्षणासाठी मर्यादित वय, नियम आणि पूर्व प्रवेश चाचणी.

१६. **शिक्षण म्हणजे सामाजिक संस्था :-** शिक्षण हे सामाजिक संस्था हे अस्तित्त्व बौद्ध शिक्षण प्रणालीचा परिणाम आहे.

- आजसुद्धा ह्या बाबींसाठी सहाय्यभूत ठरत आहे.
- **प्रात्यक्षिक विषयांमध्ये शिक्षण प्रदान :-** बौद्ध शिक्षण कालातले महत्त्वाचे योगदान म्हणजेच प्रात्यक्षिक विषयांमध्ये शिक्षण प्रदान करणे ही प्रथा आज सुद्धा दिसून येते.

munotes.in

- **सामुदायिक अध्यापन पद्धती :-** एकही संस्थेत अनेक शिक्षकांची प्रस्तुती व सामुदायिक अध्यापन पद्धती ह्या काळापासूनच मांडली गेली आहे.

## २ ब.५ जैन तत्त्वज्ञान

जैन तत्त्वज्ञान हे स्वतंत्र विचारधारांवर आधारित व अनेक दृष्टीकोन असलेला बुद्धधर्मापेक्षा स्वतंत्र्य विचाराचा धर्म आहे. 'जी' म्हणजे जिंकणे. त्यांनी आपले मनोविकार वर ताबा मिळवलेला आहे, अशी व्यक्ति स्वत:ला नियंत्रित करीत असते.

जैन धर्माच्या इतिहासात एकूण २४ तीर्थंकार आहेत. शेवट २४ वा महावीर वर्धमान हे तिर्थकार मानले जातात. त्याचा काळ गौतम बुद्धाच्या समकालीन मानले जात. जैन धर्माचा प्रचार हा बाहेरील देशांत कमी आहे. पण भारतात हा धर्मप्रकार आहे.

जैन तत्त्वज्ञान आणि त्याचे संस्कृतीचे प्रभाव सांस्कृतिक, तात्विक आणि राजकीय क्षेत्रात अशिया खंडातल्या संस्कृतीच्या सुरुवात झाल्या पासून आहे. जैनाचे विश्वास देवताचे अस्तित्त्वातर नसून आत्माचे अनेकतेवर आहे, त्यांच्या तत्त्वात जेवळी प्राणीमात्रांची संख्या तेवढीच आत्मा असतात, प्राणी व झाडांमध्ये सुद्धा आत्माचे अस्तित्त्व आहे फक्त त्यांची सावध राहण्याची पात्रता भिन्न स्तरावर असते. प्रत्येक आत्माकडे अपार सावध होण्याची, शक्ति असण्याची व आनंदित राहण्याची क्षमता असते. अपार विश्वास, अपार शक्ति, अपार कृपाछाया म्हणजेच मुक्ति प्राप्त होण्याची अवस्था.

जैन तत्त्वज्ञानाच्या मते मुक्ति अवस्था तीन रत्नांमुळे होते. १) योग्य तत्त्व २) योग्य ज्ञान ३) योग्य सदाचार. योग्य सदाचारात खालील ५ बंधने असत.

१) खोटे बोलू नये, २) चोरी करु नये, ३) सुख, विलास व संपत्तिची लालसापासून अलिप्त रहावे, ४) निर्दयतेने वागू नये, ५) प्राणी-मनुष्य यांची, हत्या करु नय. जैन तत्त्वज्ञानाचा मुख्य तत्त्व 'अहिंसा' आणि 'सत्य' चे अनेक पैलू आहेत.

ज्ञानाच्या उप्पत्तीमध्ये जैन तत्त्वज्ञानामध्ये सत्य व साश्वत ज्ञान मिळवण्यासाठी तीन मार्ग स्वीकारले आहेत. १) ग्रहण, २) निर्णय, ३) साक्ष.

**जैन धर्माची व्यावहारिक शिकवणूक :-**

१. तीन रत्ने किंवा तीन हिरे म्हणजे मौल्यवान जीवनाचे हक्क सूत्रे आहेत.

२. पाचव्रते किंवा प्रतिज्ञा ह्या सर्वसामान्य जीवन जगण्यास करतात.

३. अहिंसा हे भारतीय शिकवणूकीमधील उच्च पातळीचे आहे. पण जैन धर्मामध्ये अहिंसेला स्पष्ट अर्थ आणि खोलात समजले गेले आहे. ते म्हणजे शब्द, विचार आणि प्रत्येक कार्यांमध्ये अहिंसा.

४. व्यक्तिगत स्वरुपावर जोर जैनाचे अंतिम ध्येय म्हणजेच व्यक्तिमत्त्वाचे विकास. जैन शिकवण सामाजिक आणि सहनशीलतेचा प्रतीक आहे. सर्वच सुखी ह्या मतावर विश्वास करणारे आहेत.

५. जैनमूनीसाठी व्रत कौकल्य अधिक कडक नियम व शिस्तीचे असतात. सामान्यासाठी नियम व शिस्त दुसऱ्या प्रकारची असतात.

६. मुक्ती:-आत्मकर्मामुळे बंदिस्त होतो. आत्माला कर्मापासून सोडवण्यासाठी प्रयत्न ह्याला मूक्त करण्याचा मार्ग जैनधर्माने जगाला दाखवला आहे.

७. मोक्ष :- म्हणजे आत्मा व भौतिक देह यांची भागिदरीतून सोडवणूक करणे व पुन्हा एका आदर्श जीवात्माच्या निर्मितीसाठी भागीदारी करणे.

८. ह्या जगाच्या कोण एक निर्माता आहे (देव) असे म्हणणे बरोबर नाही. जैन धर्माच्या मते, मानवी देहातील जीव आत्म्याचा विकास पूर्णत्वाकडे नेल्यास तोच स्वत:देवत्वरला जावून पोहचतो.

९. जैन मत अर्थात आणि अनेकतत्त्व आहेत कारण ते जीव आणि वस्तुनिष्ठ विषय दोन्ही गोष्टी कबूल करत.

१०. जैनाचे प्राथमिक ध्येय विश्वाचे विश्लेषण नसून आत्माचे प्राविण्यासिद्धी आहे, त्यामुळे अध्यात्मशास्त्राच्या समस्यांच्या अंतिम उत्तर शोधण्यात असफल ठरतात.

**जैन शिक्षणाची उद्दिष्टे :-**

१. सत्य हे सापेक्ष व बहुअर्थी ज्ञान मानले तर त्यातून अनेक अर्थ निघतात. कायमस्वरुपी काहीच नसते.

२. दिव्य ज्ञान व दिव्य दृष्टी यामुळे दोन्ही भोगही सुखापासून आत्माला अलिप्त करण्याचे शिक्षण जैन तत्त्व ज्ञानात आहे.

३. शिक्षणाद्वारे स्वं प्रकाश आले पाहिजे आणि 'जीवक' ची संपूर्ण शक्ति पुन:स्थापित झाली पाहिजे.

४. व्यक्तिगत - व्यक्तिविकास घडवणे या एका तत्त्वावर भर देण्यात येणे.

५. 'जीवा' ला सहाय्य करण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि तपश्चर्या अध्यापनाने दिले पाहिजे.

६. मानवीय देहातील आत्मा हा उन्नतीला जातो व परत दुसऱ्या जगात अस्तित्त्व प्राप्त करतो. त्याचा पूर्ण तयारीचा मार्ग दाखविणारे जैन शिकबाणू होय.

७. योग्य मानाची शिकवण व प्रायश्चित्तामुळे 'जीव आत्माला' मदत होते.

**अभ्यासक्रम :-**

- पाप-पुण्य यांच्या तात्वीक दोन बाजू आहेत. म्हणून शिक्षणाद्वारे त्यामधील भेद जाणून घेणे जैनधर्माचा शैक्षणिक उद्देश्य आहे.

- शिक्षणामध्ये तीन रत्नाचा समावेश प्रामुख्याने केला आहे. जीवनाचे ते मूळ तत्त्व आहेत. त्यामुळे सुख व वात्सल्य (प्रेम) याची सुरुवात त्वरीत होते.



munotes.in

- जैन शिकवणूकमध्ये अहिंसा ह्या सद्गुणाचा मनावर ठसा निर्माण करतो. ती फक्त इच्छा राहत नाही. तशी समाजास हवीशी वाटणारी शिकवणूक आहे.
- आत्म्याला भौतिक जोखंडातून सोडविण्यासाठी नऊ तत्त्वाच्या ९ वर्गातून शिकवले जात.

**अध्यापन पद्धती :-**

१. ज्ञानेंद्रियांमार्फत चिंतन व ध्यानधारणा करुन ज्ञान प्राप्ती करणे, अध्यापनाने हा भाग विकसित करावी.

२. सामाजिकता, सहनशीलता व सर्वांना आनंद देणारे अध्यापन झाले पाहिजे.

३. जीव या तत्त्वात कर्माने बांधील आहे. म्हणून शिक्षण हे प्रात्यक्षिकावर आधारित व ध्येयकेंद्रित असावे.

**शिस्त :-**

१. स्वयंम् शिस्त व मेहनत यांना अतिशय महत्त्व आहे.

२. व्यावहारिक व संसारी शिस्तीच्या बंधनातून मुक्तीचा मार्ग (घर संसारी व्यक्तिंना) शोधणे आवश्यक आहे.

३. माणूस नैतिक मध्यस्त राहून विचारपूर्वक व्यवहार केल्यास शाश्वत सूख व समृद्धी प्राप्त करु शकतो.

## २ ब.६ जैनकालीन शैक्षणिक ध्वन्यर्थ

**१. जैना योगदान :-** कालखंडाचे कला, स्थापत्य व साहित्यात मोठे योगदान आहे. जैन तत्त्वज्ञान आणि संस्कृतीचा सांस्कृतिक, तात्विक आणि राजकीय क्षेत्रात भव्य प्रभाव आशिया खंडाच्या सुरुवाती पासून दिसून येतो.

**२. अंहिसेवर विशेष जोर :-** जैन तत्त्वज्ञानाचे प्रामुख्याचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांचा अहिंसेवर, नैतिकेवर, सत्याचे अनेक पैलूंवर विशेष जोर.

**३. एकात्मिकता :-** जैन तत्त्वज्ञानाचे योगदान भारतीय तत्त्वज्ञानाच्या विकासात महत्त्वाचे स्थान आहे. जैन तत्त्वज्ञानाच्या काही संकल्पना उदाहरणार्थ अहिंसा, कर्म, मोक्ष, संसार इत्यादी. इतर भारतीय धर्म, तत्त्वज्ञान आणि शिक्षण ह्या पैलूंना वेगळे करणे अशक्य आहे.

**४. अनुकंपाची संकल्पना :-** बौद्ध व जैना तत्त्वज्ञानात सर्व प्राणिमात्रावर दयाची भावना असावी हे मत दोन्ही तत्त्वज्ञानात स्पष्ट दिसून येतो.

**५. शांतीवादातला योगदान :-** सर्व प्राणीमात्रावर नि:संशय आदर असावे त्याचप्रमाणे कुकर्मांचा अवरोध करण्यासाठी सर्वात उत्तम मार्ग अहिंसा आहे. ह्या गोष्टींवर जैना आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा अत्यंत जोर होता.

६. **कर्मांचे नियम (कारण व परिणाम) :-** सर्व विश्वाचे एकच नैतिक नियम आहे, ते वाईट व पाप कर्त्यांना सजा देतो व सत्धर्म व चांगल्या कार्यांना चांगले फळ देतो, असा विश्वास आहे की माणसाचे सत् कर्मच स्वर्ग निर्माण करते व वाईट कर्म नरक निर्माण करते, आपले चारित्र्य स्वर्ग किंवा नरक ठरवतो. सर्व तत्त्वज्ञानाचा शाखांमध्ये ही महत्त्वाची बाबी स्पष्ट दिसून येते.

७. **शिक्षणाचे ध्येये :-** भारतीय तत्त्वज्ञानाच्या शिक्षणात नमूद केलेले काही तात्विक व धार्मिक उद्दिष्टे ठेवून, शिक्षणातील ध्येये नेहमी त्याप्रमाणे तयार केली जात आहेत.

८. **ज्ञानाचा उच्च दर्जा :-** ज्ञानाचा सर्वात दर्जा म्हणजे अंतर्ज्ञान माणसाला विश्व एकात्मतेची जाणीव प्राप्त होते. जवळजवळ सर्वच भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोनाचा मूलतत्त्व ह्या मुद्यांवर आहे.

## २ ब.७ सारांश

शिक्षण हे अधिक व्यापक बनविले पाहिजे व जीवनाकरीता असणाऱ्या अनेक बाबी शैक्षणिक संस्थांनी व्यक्तीला दिले पाहिजे याची जाणीव या कालखंडात दिसून येते. व्यावहारिक विषयांमध्ये शिक्षण प्रदान करणे ह्या कालखंडाचे महत्त्वाचे योगदान आहे. सर्व सामाजिक स्तरापर्यंत शिक्षण उपयोगी झाले जसे आजचे सर्व शिक्षण अभियान जैना शिक्षण काळाचा खंडाच्या सारांशाने विचार केल्यास आपणास दिसून येईल की जैन तत्त्वज्ञान हे अहिंसा या तत्त्वावर अतिशय महत्त्व देत. तसेच सत्याचा अनेक पैलंूचा विचार करण्याचे शिकवते. नैतिकता व नितिशासन ही धार्मिक उद्दिष्ट्ये, हिंदूधर्म, बौद्ध, जैन धर्मात समाविष्ट असलेले आहेत.

## २ ब.८ प्रश्नावली

१. बौद्ध शिक्षणाची वैशिष्ट्ये लिहा.
२. खालील परंपरे - बाबत टीका करा.
    १. पब्बज्जा
    २. उपसंप्पदा
    ३. उच्च शिक्षण
३. बौद्ध शिक्षणात शिक्षणाची ध्येये, आणि शिक्षकाच्या भूमिकेची चर्चा करा.
४. बौद्ध शिक्षणात शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती आणि शिक्षकाची भूमिकेची चर्चा करा.
५. बौद्ध शिक्षणाचे शैक्षणिक फलितार्थांची सविस्तर चर्चा करा.
६. जैनाचा शिक्षणाच्या विविध घटकांवर होणारा प्रभाव स्पष्ट करा.
७. जैना शिक्षणाचे शैक्षणिक फलितार्थांची सविस्तर चर्चा करा.

❖❖❖❖

munotes.in

# २ क

## शैक्षणिक तत्त्वज्ञान

## इस्लामिक आणि ख्रिश्चन विचारधारा

**प्रकरणाची रचना :**


२ क.० उद्दिष्ट्ये

२ क.१ प्रस्तावना

२ क.२ इस्लामातील विश्व दृष्टीचे मूलभूत सिद्धांत

२ क.३ इस्लामची वैशिष्ट्ये

२ क.४ इस्लाम शिक्षण आणि शिक्षणाचे विविध घटक

२ क.५ इस्लाम विचारांचे शैक्षणिक फलितार्थ / ध्वन्यर्थ

२ क.६ सारांश

२ क.७ ख्रिश्चन शिक्षणाचा परिचय

२ क.८ ख्रिश्चन शिक्षणाचे तत्वज्ञान

२ क.९ अध्यापन अध्ययन प्रक्रीयेसाठीचा निहीतार्ह

२ क.१० ख्रिश्चन शिक्षणाच्या तत्त्वज्ञानातील व्यावहारिक अध्यापनाचे स्थान

२ क.११ सारांश

२ क.१२ प्रश्नावली


munotes.in

## २ क.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्ही खालील गोष्टी साध्य करु शकाल.

- इस्लामच्या मूलभूत सिद्धांताची व्याख्या देऊ शकाल.
- इस्लामचे मुख्य वैशिष्ट्ये ओळखाल.
- इस्लाम शिक्षणाच्या शिक्षण संबंधीचे घटक समजाल.
- इस्लाम विचारांचे शैक्षणिक फलितार्थ समजाल.
- **ख्रिश्चन** शिक्षणाचे तत्वज्ञान स्पष्ट कराल

- **ख्रिश्चन** शिक्षण तत्वज्ञानात शिक्षकाची भूमिका स्पष्ट कराल
- ख्रिश्चन तत्त्वज्ञानाच्या शिक्षणात अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया स्पष्ट कराल

## २ क.१ प्रस्तावना

इस्लाम धर्म सर्व मनुष्यजातीसाठी आहे. अध्यात्मिक आणि प्रापंजिक आयुष्याशी सुसंबंधित आहे. इस्लाम जात, पंथ, संपत्ती, भाषा, वंश भाग इत्यादी मध्ये असमानता ओळखत नाही. इस्लाम तत्त्वप्रमाणे आयुष्याच्या कार्यामध्ये आर्थिक यंत्रणा समतोल सामाजिक यंत्रणा, नागरी तत्त्वप्रणाली गुन्हेगारी कायदे आंतरराष्ट्रीय कायद्याची संहिता आणि तात्विक दृष्टिकोन समाविष्ट आहे.

इस्लाम प्रामुख्याने खोल, धार्मिक जीवनासाठी आहे. आणि तसेच मनुष्यजातीला चांगले जीवन जगण्याचा निश्चित अर्थ देतो.

## २ क.२ इस्लाम विश्वदृष्टी चे मूलभूत सिद्धांत

१. मनुष्य देवाची निर्मिती आहे जो आपले/ स्वत:चे धर्माचिकारदिक्षा चे अनुरुप ठरवितो.

२. मनुष्याला बुद्धिमत्ता, दृढ इच्छा व भाषणवाणी आहे पण मनुष्य दुर्बळ आणि विसराळू सुद्धा आहे. आविष्करणाच्या मार्गदर्शनाने, मनुष्य प्रयत्नांद्वारे आपले अपूर्णत्त्व जेरीस आणू शकतो.

३. देवाच्या इच्छेशी अनुरुपता असल्यावर मानवाचा या जीवनाची व पुढील जीवनाची नियती निश्चित होईल.

४. जिवंत राहण्याचा योग्य मार्ग देवाच्या इच्छेनुसारच असावा याची उघड भविष्यसूचकांनी केलेली आहे.

५. इस्लाममध्ये देव मनुष्यास काय सांगत आहे. मानव म्हणजे विश्वासाचा संच आहे.

६. इस्लाममध्ये प्रत्येक जीवनाच्या प्रातांचे कायदे नेमलेले आहेत.

७. इस्लामने एक हजार वर्षापेक्षा अधिक प्रचंड संस्कृतीसाठी सामाजिक रचनेचा पुरवठा केलेला आहे.

८. मुस्लिम जग हे एकच घटक आहे.

९. इस्लाम हे नूसते कळविणे नसून तर त्याची संरचना, संस्था आणि इतिहासाठी देखील काळजीपूर्वक परिचय करुन देणे आहेत तसेच दृढ विश्वासूना या गोष्टींचा अर्थ समजवून देणे आहे.

## २ क.३ इस्लामची वैशिष्ट्ये

१. **इस्लाम सार्वत्रिक आहे :-** इस्लाम प्रणाली ही अशी आहे जी सर्व माणसांचा एकच समाज बनवते. आणि भाषा, वंश, रंग, संस्कृती किंवा इतिहासात असमानता मानत नाही.

२. **इस्लाम बहुसमावेशक आहे :-** इस्लाम जगण्याचे पूर्ण आचारसंहितेची तरतूद करतो.

३. **इस्लाम हे सनातन आहे :-** विश्वाच्या सुरुवातीपासून इस्लामच एकमेव धर्म राहिला आहे. इस्लाम हा नूतन धर्म नाही ज्याचा प्रचार चार शतकापूर्वी अरेबियामध्ये प्रकिट महमदांनी केला होता. इस्लाम धर्माची ओळख देवा मार्फत झाली, जेव्हा मनुष्य पहिल्यांदा पृथ्वीत आला.

४. **इस्लाम शक्तिशाली आहे :-** इस्लाम धर्म अचल नाही त्याचे कोणतेही तत्त्व एका सविस्तर इतिहासातील कालांश किवा सविस्तर परिस्थितीतील जमाव नव्हे. इस्लामचे तत्त्व कधीही कालबाह्य होऊ शकत नाही. त्याच्यात आधूनिक काळाची मागणी पूर्ण करण्याची क्षमता आहे.

५. **इस्लाम तर्कनिष्ट आहे :-** पवित्र कुराणामध्ये बरेच उद्धत केलेले कडवे आणि भविष्यसूचकांची म्हणी, स्पष्टपणे मनुष्याला निरीक्षण विश्लेषण आणि परीक्षण करावयास सांगते. या सगळ्या गोष्टी बुद्धिनिष्ट कारणमीमांसा व तर्कनिष्ट ह्याचे चिन्ह आहेत.

६. **इस्लाम वास्तववादी आहे :-**

  १. इस्लाम हा असा धर्म आहे जो उपपत्ती आणि प्रत्यक्षामध्ये असमानता करत नाही. मात्र अशी क्रिया प्रतिबंध करतात जी अवघड असते. इस्लामला मनुष्य जातीच्या वैशिष्ट्ये आणि स्वरुपाची माहिती आहे.

  २. इस्लाम रंगामध्ये भेदभाव करत नाही. इस्लाम सर्व मनुष्यजातीला समान पायावर मानते आणि रंगामध्ये असमानता करीत नाही.

  ३. इस्लाम व्यक्ति आणि समाज, श्रद्धा व विज्ञान, द्रव्य व अध्यात्मिक ह्यांमध्ये सुसंवादित्मक प्रोत्साहित करतो.

७. **इस्लाम समजलेला नाही :-** विविध धर्मांना व त्याच्या भक्तांना इस्लाम धर्म समजलेला नाही. हे इस्लामचे दुर्भाग्य आहे. गैरसमजण्याचा कारण म्हणजे सिझिहादचे अयोग्य अर्थान्तरण. इस्लामचा विस्तार करताना तलवारीचा वापर झिजियाची सक्ती, बहुपतित्त्व, घटस्फोट इत्यादी जर मुस्लिम नसणार्यांनी जर कशाप्रकारे ह्या बाबी संबंधित आशंका निर्माण झाली हे समजण्यास प्रयत्न केला तर तेव्हाच इस्लाम बरोबर रीतीने समजेल.

## २ क.४ इस्लाम शिक्षण आणि शिक्षणाचे विविध घटक

शिक्षण प्रणाली प्रामुख्याने धार्मिक होती. मुस्लिम सत्ताधारी शिक्षणाला आधार देत होते. मुस्लिम शिक्षणाचे एकमेव ध्येय इस्लामाचा विस्तार, मुस्लिम संस्कृतीचा चिरस्थायीत्त्व आणि संरक्षण असे होते, मुस्लिम सत्ताधारांनी व हिताधिकारांनी 'मक्ताब' आणि 'मदरसाह' स्थापित केले जिथे पवित्र कुरानचा अभ्यास एक लक्षणीय वैशिष्ट्य होता.

### मुस्लिम शिक्षणाचा हेतू :-

लौकिकतेचा यश व सामाजिक उत्कृष्टतेची प्राप्ती हेच मुस्लिम शिक्षणाचा हेतू होता.

शिक्षणाचे मुख्य ध्येय म्हणजेच पवित्र कुराणामध्ये सांगितल्याप्रमाणे माणसाचे देवाशी असणारा संबंध समजून घेणे.

### ध्येये आणि उद्दिष्टे :-

१. शिक्षणाची पहिली पायरी म्हणजेच पवित्र कुराणच्या शिकवणीची तरतूद करणे.

२. इस्लामच्या मुलतत्त्वाआधारे अनुभवायची तरतूद करणे.

३. अनुभवाचे ज्ञान आणि कौशल्याच्या रुपात तरतूद करणे. समाजातील बदल विचारात घेऊन अनुभवात अपेक्षित बदल होतो हे स्पष्टपणे समजून देणे.

४. ज्ञान श्रद्धा व धर्माच्या पायाशिवाय शिक्षण अपूर्ण आहे. ही जाणीव निर्माण करणे.

५. धर्म व धर्मग्रंथामध्ये नमुद केलेले पायाभूत मुल्यांवर निष्ठा निर्माण करणे.

६. परमेश्वर निर्मितीच्या बाबत आपली जबाबदारीची जाणीव निर्माण करणे माणूस आपले जीवन एकनिष्ट नोकराप्रमाणे जगू शकेल हे समजहून देणे.

७. पिढी व्यवसाय आणि सामाजिक वर्ग यामध्ये असमानता न करता आंतरराष्ट्रीय बंधुत्त्व प्रोत्साहित करणे.

८. विश्वामध्ये ईश्वरीय उपस्थितीची महत्त्वाची जाणीव जोपासणे.

९. मनुष्याला जवळून देव समजण्यासाठी नेणे व आपले संबंध निर्माता बरोबर काय आहे हे जाणण्यासाठी जवळून देवाला समजणे.

१०. भक्तांमध्ये ईश्वरनिष्ठा आणि श्रद्धा निर्माण करणे अध्यात्मिक विकासात श्रद्धा आणि ज्ञान असेल असा मनुष्य घडविणे.

११. चांगल्या माणसाचे जे वैश्विक पातळीवर समाज जातीने स्विकृत केलेले व धर्मनिष्ठ श्रद्धा असणारे गुण निर्माण करणे.

munotes.in

**प्राथमिक व उच्च शिक्षणाचे स्वरुप :-**

**मक्ताब आणि प्राथमिक शिक्षण :-**

मक्ताब हा शब्द अरेबियामध्ये 'लिहिण्याचे स्थान' असे म्हणतात; म्हणून ज्या स्थानात शिष्य वाचन व लेखन शिकतात त्या स्थानास मुक्ताब असे म्हणतात.

इथे शिष्यांना अयात व कुरानचे कडवे शिकवत. ज्याप्रमाणे वेद शिक्षणामध्ये उपयायना आणि बौद्ध शिक्षणामध्ये पब्बाज्जा असे त्याचप्रमाणे इस्लाम शिक्षणांमध्ये बिसमिल्लाह विधि होत असे. तेव्हा बालक चार वर्ष व चार महिने आणि चार दिवसांचा होत असे तेव्हा बिसमिल्लाल विधि करत होते.

**अभ्यासक्रम :-**

उर्दु, प रशियन व अरेबिक भाषांचे अक्षर मालाचे अक्षर शिकवत असे.

कुराणचे धडे व सुत्राचे पठण, मुस्लिम फकीरांच्या गोष्टी आणि परशियन कवींची कविता सुद्धा शिकवत. चारित्र्य निर्माणासाठी शेकसाद्दीनी लिहलेली पुस्तके गुलिस्तान आणि बोस्टोन शिकवीत होते.

व्याकरण, साहित्य, इस्लाम कायद्याचा इतिहास, तर्क, व्याकरण, साहित्य, तर्क तत्त्वज्ञान, कायदाकानून, ज्योतिष, इतिहास, भूगोल, शेती, उनानी प्रणालीचे वैद्यशास्त्र इतर विषय समाविष्ट होते.

**अध्यापन पद्धती :-**

पठण, कलमाचे अध्ययन आणि समुह पुनरावृत्ती लेखन, वाचन आणि मौखिक पद्धती व वर्गनायक पद्धती.

**मदरशा आणि उच्च शिक्षण :-**

मदरशा शब्द हा अरेबियामधून 'दर' ('Dars') या शब्दातून मिळविलेला आहे. ज्याचे अर्थ व्याख्यान असा आहे. मदरशा म्हणजे व्याख्यान देण्याचे स्थान. जिथे विद्याचे शिक्षण देत असत व उच्च शिक्षणाचे अध्ययन होत असे.

मक्तबचे शिक्षण पूर्ण केल्यास विद्यार्थी मदरशामध्ये प्रवेश होत असे.

१. व्याख्यान पद्धती बरोबर चर्चा पद्धती सुद्धा जोडत असत.

२. मदरशा शिक्षणाची मुदत १० ते २० वर्ष पर्यंतच असे.

३. अभ्यासक्रमक दोन भागात प्रवर्ग केलेला होता.

**धार्मिक शिक्षण व धर्मनिरपेक्ष शिक्षण**

**धार्मिक शिक्षण :-** धार्मिक अभ्यासक्रमाचे घटकामध्ये कुराणचे बारकाईने व चिकित्सक विश्लेषण, इस्लाम कायद्याचा, सुफीवाद आणि मोहम्मद साहेबांच्या संस्कृतीचा वारसाचे बारकाईने अभ्यास.

**धर्मनिरपेक्ष शिक्षण :-**

धर्मनिरपेक्ष शिक्षणामध्ये भावा, अरेबिया व परशियातील साहित्य तर्क, इतिहास, भूगोल, खगोल शास्त्र, ज्योतिषशास्त्र, नीतितत्त्व, तत्त्वज्ञान ह्या विषयांचे अध्यापन होत असे.

**अध्यापन पद्धती :-**

व्याख्यान पद्धती स्व अभ्यास, संगीत आणि वास्तूविद्या, प्रत्यक्ष पद्धती.

**अनुशासन (शिस्त):-**

शिक्षण मानसशास्त्रीय आधारानुसार देत नव्हते. विद्यार्थ्यांना जबरदस्तीने कडकशिस्त राखवून त्यांना कठोर शारीरीक शिक्षा देत. उनाड आणि गुन्हेगाराना तळहातात कठोरपणे छडी मारुन शिक्षा करीत. चांगल्या व बुद्धिमान विद्यार्थ्यार्नी बक्षिस देतं असे.

**अध्यापक - शिष्य संबंध :-**

वेद आणि बौद्ध काळा सारखे मुस्लिम काळात सुद्धा शिक्षक आणि विद्यार्थ्याचे संबंध मैत्रीपूर्वक आणि हार्दिक होते. शिक्षक आणि विद्यार्थीयांच्यात घनिष्ट संबंध होते.

## २ क.५ इस्लाम शिक्षणाचे शैक्षणिक फलितार्थ

**प्रत्यक्ष आणि उपयोगी शिक्षण :-** इस्लाम शिक्षण प्रात्यक्षिक जीवनाच्या तयारीसाठी आहे. शिक्षणाची जास्त प्रमाणांत प्रत्यक्षता साधली.

**व्यक्तिगत संपर्क :-** शिक्षण वैयक्तिक प्रक्रिया मानली जात असे, शिक्षकांच्या राहण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांबरोबर हाती.

**मोफत शिक्षण :-** मक्ताब आणि मदरशाप्रमाणे शिक्षण सर्व मुस्लिम बालकांना प्राथमिक स्तर पर्यंत सक्तीचा होता. मदरशामध्ये निवासस्थाने आणि वस्तीगृहाची सोयसुद्धा मोफत होती.

**वर्गनायक प्रणाली :-** वर्गनायक प्रणालीचा वापर सर्वसाधारणपणे होत असे.

**शिक्षकाचे स्थान :-** शिक्षकाचे स्थान खूप उच्च होते. समाजात त्यांचा आदर केला जात असे. शिक्षकाचे नैतिक चरित्र उच्च पातळीवर होते.

munotes.in

शिक्षणाला राज्य स्तरांचा आश्रय लाभला होता. जवळजवळ सगËया मुस्लिम सत्ताधारानी मक्ताब आणि मदरशाची स्थापना केली. आणि आपल्या शिक्षणासंदर्भात पाठिंबा आणि प्रेम दाखविला.

विद्वान लोक, साहित्यिक लोक, कवी इत्यादीसुद्धा ह्यांना प्रोत्साहन आणि आश्रय राज्य व राजघराण्यातील कुटुंबाकडून मिळत असे.

**सांस्कृतिकच्या एकीचे प्रोत्साहन :-**

१) मक्ताब आणि मदरशामध्ये प्रवेश घेण्यासाठी जात आणि धर्माची अट नव्हती.

**साहित्य आणि इतिहासाचा विकास :-**

इतिहास आणि इतिहासातील लेखनामध्ये कलेच्या विकासावर खास काळजी घेतली जात असे. साधारणपणे पाहिजे, तर इतिहास लेखन परंपरेचा मूळ ह्या कालखंडात झाला होता.विविध प्रकारच्या साहित्याची विशेष सुद्धा वाढ झाली.

## २ क.६ सारांश

इस्लाम शिक्षणाचे प्रवाह भारतात जवळजवळ ५०० वर्षापर्यंत वाहत राहिला. शिक्षणाची प्रणाली कित्येक सत्ताधारांच्या हाताखाली पुढे गेली. ह्या प्रणालीने अटळपणे भारतीय जीवनास खोडून टाकण्यास अशक्य खूण सोडली.

या काळात लौकिकता किंवा जडवादी आणि धार्मिक शिक्षणाचे समन्वयाची सुरुवात झाली आणि त्यामुळे व्यावसायिक विकासाची प्रवृत्ती दिसू लागली. या काळात इतिहासाचा विकास लिहिण्याच्या कलामध्ये जास्त काळजी घेण्यात आली.

## २ क. ७ ख्रिश्चन शिक्षणाचा परिचय

ख्रिश्चन शिक्षण ही संज्ञा जरी बायबलमध्ये आढळत नसली तरी बायबलमध्ये सर्वसाधारणपणे आस्तिकाच्या आणि विशेषत: मुलांच्या नैतिक व अध्यात्मिक सूचना सांगितलेल्या आहे. ते परमेश्वराच्या आणि त्याच्या कार्याच्या अशा दोहोंच्या ज्ञानावर उच्च मूल्य ठेवते. ते या ज्ञानाच्या नैतिक व अध्यात्मिक फळाचे वर्णन करते. व त्याचा अंतिम हेतू पारिभाषिक करते.

सध्याची ख्रिस्ती शालेय चळवळ ही ख्रिस्ती शिक्षणाच्या एकूण प्रयत्नाचा केवळ एक भाग म्हणून समजली जाऊ शकते. खरोखरच आजच्या काळात एक अत्यंत महत्त्वाचा व आवश्यक भाग या चळवळीच्या पूर्ण आकलनासाठी ज्या आधारावर त्याचा शैक्षणिक सिद्धांत व सराव टिकतो. म्हणजेच त्याच्या शिक्षणाचे तत्त्वज्ञान- त्याची परीक्षा गरजेची आहे.

**ख्रिश्चन शिक्षणासाठी बायबल संबंधी पाया**

- परमेश्वराचे प्रकटीकरण हा सर्व सत्याचा पाया आहे.
- पालकांची जबाबदारी ही प्राधान्य नियंत्रण आहे.
- आधीच्या ख्रिश्चनांचे उदाहरण
- शिक्षकाच्या जीवनातील पवित्र आत्म्याचे महत्त्व
- ख्रिस्ती शिक्षण हे पूर्ण मानवासाठीचे शिक्षण आहे.
- परमेश्वराचे शिक्षण हे नेहमीच मानवाच्या शिक्षणाशी विरोधी आहे.
- बायबल संबंधी शिक्षणाला ख्रिस्ताच्या प्रभुत्वासाठी सर्व बुद्धी आणि इच्छेची शरणागती गरजेची आहे.

## २ क. ८ ख्रिश्चन **शिक्षणाचे तत्वज्ञान**

शिक्षणाच्या ख्रिश्चन तत्त्वज्ञानापासून विचार व कृती मिळवल्या जाऊ शकतात, अमलात आणल्या जाऊ शकतात आणि त्यांचा बचाव केला जाऊ शकतो. शिक्षणाच्या ख्रिस्ती तत्त्वज्ञानाच्या व विकासात लक्षात घेतल्या जाणाऱ्या घटकांचा पल्ला हा धर्मशास्त्रीय व सैद्धांतिक पासून सामाजिक व शैक्षणिक पर्यंत आहे. पहिली पायरी म्हणजे बायबल विषयक पायाचा विकास होय. येथे बायबल हा ढाचा बनतो. ज्यावर आपल्या तत्त्वज्ञानाचे व्यावहारिक उपयोजन योजले जाऊ शकते.

ख्रिस्ती शाळेचे शैक्षणिक तत्त्वज्ञान हे बायबल संबंधी पाया, शाळेच्या अध्यापन-अध्ययन प्रक्रियेसाठीचे परिणाम, शिक्षकाची भूमिका आणि शिकणाऱ्याची भूमिका हे असायला हवे.

शिक्षणाच्या ठोस बायबल संबंधी तत्त्वज्ञान असण्याच्या महत्त्वावर जास्त जोर दिला जाऊ शकत नाही. ठळकपणे एक ख्रिस्ती तत्त्वज्ञान विकसित करण्याच्या महत्त्वाच्या संदर्भात अधिक ख्रिस्ती शिक्षकांना जाणवायला सुरुवात झाली, की खरेखुरे ख्रिश्चन असण्यासाठी अभ्यासक्रमाच्या सिद्धांत व सुरुवात बायबलचा समावेश व्हावा. याद्वारे बायबल हे सैद्धांतिक मार्गदर्शन व सर्व सामान्यीकरण यापेक्षा अधिक प्रदान करेल. तो म्हणजे अभ्यासक्रमाच्या सामग्रीचा एक अत्यावश्यक भाग असायला हवा आणि सर्व विषय साहित्यासोबत त्याचे एकीकरण केले जावे, बायबल हे एकीकरण घटक व्हायला हवा ज्या भोवती इतर सर्व विषय साहित्य सहसाम्बंधित केले जावे व योजले जावे आणि त्याचे इतर सर्व विषय साहित्याला ज्याद्वारे न्याय दिला जाईल तो निकष पुरवायला हवा.

एक परमेश्वर केंद्रित शिक्षणाचा नमुना हा मागणी करतो की ख्रिश्चन शिक्षकाने अभ्यासक्रमाच्या संपूर्ण रचनेत समाविष्ट प्रक्रिया स्पष्टपणे लिहायला हव्यात. याचाच अर्थ सर्व क्रिया आणि प्रक्रिया या ज्ञानाच्या एका निश्चित सिद्धांतावर आधारित असायलाच हव्या. शिक्षणाच्या प्राथमिक संबंध ज्ञानाच्या संवादशी असल्याने सत्याच्या ज्ञानाची



munotes.in

व्याख्या करणे महत्त्वाचे बनते. सत्याचे आकलन किंवा एक पूर्ण जन अशी ज्ञानाची व्याख्या केली जाऊ शकते. ज्ञानाचा बायबल विषयक दृष्टीकोन हा सर्व ज्ञानाच्या स्त्रोतांना गृहीत धरतो. कारण ज्ञान हे सत्यावर अवलंबून आहे आणि सत्य हे परमेश्वरावर अवलंबून आहे. ज्ञानाचे सर्व मार्ग हे परमेश्वरापासून उद्भवतात. परमेश्वर स्वत: सत्य आहे आणि परमेश्वराने स्वत:ला प्रकट करण्यासाठी नैसर्गिक प्रकटीकरण आणि विशेष प्रकटीकरण निवडले आहे.

शिक्षणाच्या तत्त्वज्ञानासाठी पाया म्हणून ज्ञानाचा परमेश्वरकेंद्रित सिद्धांत असण्याचे परिणाम स्पष्ट आहे. परमेश्वर हा सर्व सत्याचा स्त्रोत असल्याने सर्व सत्य हे परमेश्वराचे सत्य आहे.

ख्रिश्चनांसाठी त्यानंतर मग सत्याची बैठक म्हणजे परमेश्वराचे प्रकटीकरण होय. जे प्राथमिकरित्या प्रेतीत वचनांमध्ये सामावलेले आहे. परंतू निर्मितीस सुद्धा प्रकट होतात आणि हे सत्य जरी श्रद्धेच्या अत्युल्प पातळीवर प्राप्त केले जात असले तरी पवित्र आत्म्याने प्रबुद्ध केलेल्या आपल्या कारणमीमांसेद्वारा सुद्धा ज्ञान केले जाऊ शकते. म्हणूनच ख्रिश्चन शिक्षणासाठी कुठल्याही पुरेशा पायाने निर्मितीतील परमेश्वराचे प्रकटीकरण तसेच परमेश्वराच्या लिखित वचनातील परमेश्वराचे प्रकटीकरण यांचा समावेश करावा. निसर्गाच्या पुस्तकाचे आपले मानवी आकलन याला दुसरे पुस्तक बायबलच्या स्विकाराचा नियम बनवायलाच नको. तथापि सदासर्वदा सत्याचा खराखुरा निकष हा प्रकटीकरण वाचनात, बायबलमध्ये आढळतो.

विश्वात परमेश्वर हा मध्यवर्ती असल्याने आणि सर्व सत्यांचा स्त्रोत असल्याने हे ओघानेच येते की सर्व विषय साहित्य हे परमेश्वराशी संबंधित आहे. अशाप्रकारे परमेश्वराचे प्रकटीकरण हे विषयसाहित्य अभ्यासक्रमाच्या मध्यवर्ती बनायलाच हवे.

स्वत: बायबल हे शालेय अभ्यासक्रमातील मध्यवर्ती विषय बनते. शाळेमध्ये जो काय सर्व विचार केला जातो व जे काय सर्व शिकविले जाते त्यात माणसासाठी परमेश्वराचे प्राथमिक प्रकटीकरण हा एकीकरण व सहसंबंधी घटक बनायलाच हवा. हाच तो पाया आहे. ज्याद्वारे ज्ञानाचे इतर मार्गाचे मूल्यमापन केले जाते आणि त्यांना वापरले जाते. बायबलद्वारे इतर सर्व विषय आणि सत्य यामधील अंतरसंबंध शक्य केला जातो.

म्हणून यावरून आपण अनुमान काढू शकतो की विषय साहित्य अभ्यासक्रमात बायबलचे कार्य हे द्विस्तरीय आहे. पहिले म्हणजे ते स्वत:ची अशी सामुग्री पुरविते. दुसरे म्हणजे ते इतर विषयांना सेवा कार्य पुरविते. बायबलसंबंधी सत्याची तत्त्वे ही इतर विषयांना आणि त्या सर्व विषयांमध्ये लागू करायला हवी. सत्याच्या दाव्याची परमेश्वराच्या वचनांच्या तत्त्वज्ञानविषयक व धर्म शासकीय सत्याद्वारा पडताळणी व मूल्यमापन केले जायला हवे.

परमेश्वराच्या ख्रिश्चन शाळा या आधारावर उभारल्या जातात की सर्व सत्य हे परमेश्वराचे सत्य आहे. आणि परमेश्वराचे वचन हे ज्ञानाच्या संवादातील मुख्य घटक असायला हवा. हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की कोणतेही आणि सर्व शिक्षण आपण स्विकारतो त्याचा पाया परमेश्वराचे वचन असायला हवा याचा अर्थ असा की बायबल कोणतीही गोष्ट प्रत्येक

गोष्टीवरील पाठ्यपुस्तक आहे; परंतु त्याऐवजी बायबल हा संदर्भाचा केंद्र असायला हवा. ज्यापासून आपण इतर सर्व क्षेत्रे आणि ज्ञानाच्या स्त्रोतांचे मूल्यमापन करू शकतो. एखादी व्यक्ती परमेश्वराच्या नैसर्गिक प्रकटीकरणातून जे काय शिकते ते परमेश्वराने त्याच्या वाचनात जे प्रकट केले आहे त्याच्याशी सुसंगत असायलाच हवे. परमेश्वर हा दोन्ही प्रकटीकरणांचा लेखक असल्याने हे तर्कसंगत आहे की ते दोन्ही एकमेकांच्या विरोधी नको.

## २ क. ९ अध्यापन अध्ययन प्रक्रीयेसाठीचा निहीतार्ह

शैक्षणिक प्रक्रियेसाठी ठोस बायबलविषयक पाया असण्याचे ध्वनितार्ह बरेच आहेत. शैक्षणिक प्रक्रिया ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे मुलभूत सत्याचा संवाद साधला जातो. दुसऱ्या शब्दात म्हणजे ही अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे शिक्षणाचे ख्रिश्चन तत्त्वज्ञान हे वर्गात अमलात आणले जाते.

एक ठोस बायबलविषयक पाया नसण्याचा एक स्पष्ट धोका हा काही ख्रिस्ती धर्मावर आधारलेला अध्यापनात जीवन, शक्ती आणि वास्तविकतेच्या अभावाने निर्देशित केला जातो. आपण परमेश्वराच्या पद्धतीऐवजी शिक्षणाच्या मानवनिर्मित पद्धती स्वीकारण्याबाबत समाधानी असतो. धर्मनिरपेक्ष शिक्षक हे परमेश्वराच्या वचनाच्या एकमेव प्रकटीकरणाला मध्यवर्ती स्थान देत नाही. आपले विशिष्ट समाधान हे विशिष्ट उपचाराला साद घालते. शाळेचा पाया हे परमेश्वराचे वचन हे खऱ्याखुऱ्या ख्रिश्चन शिक्षणाची वैशिष्ट्ये जसे हेतू, पद्धत आणि परिणाम उघड करतात. याचा हेतू म्हणजे आस्तिकाला परमेश्वर, माणूस; तो स्वत: आणि त्याचा परिसर यांच्याशी योग्य संबंधात ठेवणे ती पद्धत म्हणजे पवित्र आल्याच्या मदतीने आस्तिकाच्या जीवनाशी बायबलविषयक सत्याचा विनियोग होय. आणि परिणाम म्हणजे एक परिपक्व होणारा आस्तिक जो त्याचे जीवन परमेस्वराच्या वचनासोबत अनुरुपतेने जगण्यास समर्थ होईल. सार रुपात म्हणजे ख्रिश्चन शिक्षण हे मार्गदर्शित अध्ययनाची प्रक्रिया आहे जेथे शिक्षक आणि पवित्र आत्मा एकत्रितपणे शिकणार्याला अध्यात्मिक दृष्टीने वाढणे व परिपक्व होणे व ख्रिस्ताच्या प्रतिमेशी अधिकाधिक एकरूपता साधने करिता मदत करतात.

ख्रिश्चन शिक्षणाची व्याप्ती किंवा क्षेत्र हे जरी बायबल विषयक सत्याद्वारा मार्गदर्शित असले तरी ते बायबलविषयक सिमित नाही. एक ख्रिश्चन शाळा ही अध्ययनकर्त्याला एक जागतिक दृष्टीकोन विकसित करण्याचा प्रयत्न करते, एक असा दृष्टीकोन जो त्याला परमेश्वराने त्याला ज्या जगात ठेवले आहे, त्यात एक ख्रिस्ती जीवन समजण्यास त्याचे गुंग्रहण करण्यास व जगण्यास समर्थ करतो. शालेय शिक्षणाने आशादायकरित्या व्यक्तीला फक्त बायबल शिकवण तत्त्वप्रणालीतच नव्हे तर त्याच्या दैनंदिन जीवनातील वस्तुस्थिती आणि समस्यांमध्ये सुद्धा चुकांपासून सत्य वेगळे करण्याची क्षमता विकसित करायला मदत करायला हवी.

munotes.in

## शिक्षकाची भूमिका

एक ख्रिश्चन शिक्षणकर्ता किंवा शिक्षण हा अध्ययनाचा अवभूत अनुभवत एक मार्गदर्शक किंवा संसाधन व्यक्ती असायला हवा. तो अध्ययनाच्या सुविधा देणारा असावा. त्याच्या विद्यार्थ्यांना माहित असायला हवे की तो त्यांच्याविषयी काळजी करतो. तो शिक्षक जे काय शिकवण्याचा प्रयत्न करत आहे त्याची वास्तविकता त्याने अनुभवलेली असायला च हवी. अन्यथा तो म्हणजे आंधळ्या माणसांचे नेतृत्व करणारा आंधळा माणूस असेल.

"म्हणूनच ती शाळा किंवा कॉलेज जी एक ख्रिस्त केंद्रित आणि बायबल विषयक पाया असलेला कार्यक्रम विकसित करू इच्छिते. तिने त्या शाळेच्या डोलकाठीवर पुढील मानक फडकवायलाच हवे. (ब्रीदवाक्य) : 'ख्रिश्चन शिक्षकाशिवाय कुठल्याही ख्रिश्चन शिक्षणाने' कुठल्याही परिस्थितीत व कधीही त्याला अवकळा आणता कामा नये. या मुद्द्याशी तडजोड केल्यास त्या संस्थेची नेहमीच क्रमाक्रमाने अख्रिस्तीकरणात परिणती होते."

अध्ययन प्रक्रियेचे स्वरूप आपल्याला शिक्षकाच्या कार्याविषयी काही सूचक गोष्टी देते. एक शिक्षकाने ख्रिश्चन आणि शिक्षणकर्ता असे दोन्ही असायलाच हवे. एक ख्रिश्चन म्हणून त्याच्याजवळ परमेश्वराच्या सत्याच्या वास्तविकतेचा अनुभव असेल आणि त्याला व त्याच्या अध्यापनाला बळ देण्यासाठी त्याच्याजवळ परमेश्वराचा आत्मा असेल. एक शिक्षक म्हणून तो परमेश्वराजवळ अनुमतीनुसार पर्फामेश्वराच्या वाचनात सामावलेल्या शैक्षणिक तत्त्वांशी अनुरूप शिकवण्याचे कार्य करतो. शिक्षित करणे म्हणजेच एखाद्याचे वर्तन बदलवणे.

१ कोरिन्थीयंस या पुस्तकात पॉल जसे ख्रिस्ताचे अनुयायी आहे. तसे वाचकांनी त्याचे अनुयायी व्हावे असे आग्रहाने बजावतात. हे शिक्षकांसाठी सुद्धा लागू पडते. कारण नेतृत्व करणारे म्हणून ते जे काय शिकवत आहे ते त्यांनी सोदाहरण दाखवायलाच हवे. त्यांनी परमेश्वराची चैतन्य भरलेली माणसे असायलाच हवे.

**चैतन्य भरलेल्या शिक्षकाच्या सहा पात्रता पुढीलप्रमाणे :**

१) शिक्षक हा सत्याचा संवाद्कर्ता आहे, त्याने मुक्तपणे आणि निर्भिडपणे एक ख्रिश्चन असायलाच हवे.

२) प्रत्येक शिक्षकाला बायबल जाणणे आवश्यक आहे, कारण परमेश्वराचे वचन हे सर्व विषयांशी संबंधित आहे.

३) ख्रिश्चन शिक्षकाने त्याच्या जीवन व कार्याच्या प्रत्येक पैलूत, त्याच्या सर्वार्थाने सत्याशी वचनबद्ध असायलाच हवे.

४) शिक्षकाने उत्कृष्टता शोशायालाच हवी. बौद्धिक उत्कृष्ठतेनंतर हा परमेश्वराच्या वैभवाचा शोध आहे. आणि एक ख्रिश्चन शिक्षकाने या क्षेत्रातील सर्वोच्चतेपेक्षा कमीवर समाधानी असता कामा नये.

५) ख्रिश्चन शिक्षकाने त्याच्या विद्यार्थ्यावर खरोखरच प्रेम करायला हवे. आणि काही वेळेस मार्ग कठीण असले तरी त्यांच्या सर्वोच्च चांगुलपणाचा शोध घ्यायलाच हवा. त्याने विद्यार्थ्यावर फक्त प्रेमच करू नये तर त्याला ते मनापासून आवडायला हवेत आणि त्याने त्याला समजून घ्यायला हवे.

६) शेवटी प्रत्येक ख्रिश्चन शिक्षकाने एक थोर शिक्षकाप्रती पूर्ण समर्पण ठेवायलाच हवे. प्रत्येक शिक्षकाने त्याच्या धाद्यांसाठी परमेश्वर आणि पवित्र आत्म्याचे ऐकायलाच हवे. आणि त्याने असा विचार कधीही करू नये की त्याला परमेश्वराकडून गरज नाही.

**विद्यार्थी भूमिका**

शिकणारा (विद्यार्थी) ख्रिश्चन शैक्षणिक प्रक्रियेत आवाहन दर्शविणे प्रत्येक आस्तिक वर्गात गरजा, इच्छा आणि ध्येयांचा एक वैयक्तिक संच आणतो. प्रत्येकजण हा त्याच्या स्वत:च्या वैयक्तिक आणि अध्यात्मिक जीवनातील वाढ आणि परिपूर्णतेसाठी शोध घेत असतो. प्रत्येक विद्तार्थी हा त्याच्या स्वत:च्या मूलभूत गरजांसह सुरुवात करतो. म्हणून शिक्षकाने परमेश्वराच्या तरतुदी त्याच्या जीवनात शोधण्यासाठी व योजण्यासाठी विद्यार्थ्याला प्रोत्साहित करायलाच हवे. ख्रिश्चन शिक्षणात खरेखुरे अध्ययन तेव्हा घडते जेव्हा विद्यार्थी हास परमेश्वराच्या सत्याचा चमत्कार त्याच्या जीवनात लाभल्याचे अनुभवतो.

**अ) प्रवृत्ती, इच्छा, ज्ञान, कौशल्ये इत्यादींसह व्यक्तिमत्व**

- परमेश्वराच्या प्रतिमेत निर्माण केले.
- मानसिक, शारिरीक, अध्यात्मिक, सामाजिक आवडीनिवडीने सुशोभित केले.

**ब) शिकणारा, अनुयायी, शिष्य पुढील बाबींनी संपन्न असतो.**

१. समोर आलेल्या सत्याला शोधणे, समाजाने, जाणण्यासाठी मन

२. रसग्रहणासाठी हृदय, सत्य आकर्षक बनविले.

३. सत्य आणि संधीला प्रतिसाद देण्यासाठी इच्छाशक्ती

एक विद्यार्थ्याला एक व्यक्ती, एक मौल्यवान व्यक्ती, जसे परमेश्वर आपल्याला व्यक्ती म्हणून पाहतात तसे समजले जायला अध्ययन गटाचा एक जबाबदार सदस्य असून त्याला कशाचे तरी योगदान द्यायचे आहे व काहीतरी शिकायचे आहे. तो शिकलेला आहे हे सत्य सरतेशेवटी बाहेरून लादलेले नको. तर ते विद्यार्थ्याकडून शिक्षक व पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली शोधले जायला हवे.

## २क.१० ख्रिश्चन शिक्षणाच्या तत्त्वज्ञानातील व्यावहारिक अध्यापनाचे स्थान

हद्दपरीच्या काळानंतर आपले लक्षात आले की गणित, ज्योतिषशास्त्र यांच्या धर्मनिरपेक्ष अभ्यासासोबत तोराहाचाअभ्यास यामध्ये प्रत्यक्ष सामान्तारता होती. ते परस्परपूरक

होते. ते वेगळे नसून एकीकृत होते. यावरून एक नवीन शैक्षणिक तत्त्व उदयास येते. धर्मनिरपेक्ष सत्य हे परमेश्वराचे सत्य आहे आणि त्याचे एकीकरण केले जावे आणि त्याला एकसंध संपूर्ण म्हणून बघितले जावे. ख्रिश्चन धर्म तत्त्वावर निष्ठा असणाऱ्या व्यक्तींच्या गराड्यात सुद्धा बायबल आणि दैनंदिन जीवनामधील जी एक मोठी दारी बऱ्याचदा आढळते ती सुद्धा उघड आहे. एक विभाजन घडून आले. व बौद्धिक विस्मरणासह असा परिणाम झाला की उद्योग, सायन्स व राजकारण हे जवळजवळ पूर्णपणे धर्मग्रंथाशी असंबंधित बनले. स्वीफर ने अगदी नोंदविले आहे :-

"आज आपल्यात विषयांमधील नैसर्गिक सहसंबंध समजून घेण्याच्या अपयशातील आपल्या शैक्षणिक प्रक्रियेतील कमकुवतपणा आहे. आपण आपले सर्व विषय असंबंधित समांतर रेषेत अभ्यासायचा प्रयत्न करतो. ही बाब ख्रिश्चन व धर्मनिरपेक्ष शिक्षण या दोघांबाबत सत्य आहे. हे एक कारण आहे की आपल्या पिढीमध्ये जो जबरदस्त बदल घडून आला त्याचा ख्रिश्चन धर्मतात्त्वाव्र, निष्ठा असणाऱ्या ख्रिश्चनांना आश्चर्याचा धक्का का बसला."

हे एकीकरण पूर्ण करणे हे काही सोपे कार्य नाही. परंतु ख्रिश्चनांना हे समाजाने गरजेचे आहे की सर्व सत्य हे महत्त्वाचे आहे आणि ख्रिश्चन शिक्षणाने जीवनाचे एक एकत्रित तत्त्वज्ञान सादर करणे गरजेचे आहे.

**१अ) अध्यापनाच्या प्रक्रियेची पद्धत**

१. परिचय : तपासात रस निर्माण करतो.

२. व्याख्या : ज्ञाताकडून अज्ञाताकडे अशा चौकटीत परिभाषित करते.

३. परस्पर संवाद : सहभाग वाढवण्यास प्रोत्साहन देते.

४. एकीकरण : वाढलेल्या जीवनात नवीन सत्य आत्मसात करते.

**१ब) शिकवण्याची पद्धत अशी :**

१) सांगण्या किंवा दाखवण्यापेक्षा अधिक, सहभागात गुंतवणे.

२) बऱ्याच वेळेस प्रयत्न असजगपणे असतात तसेच सजगपणेपण

३. बहुविध कृती जसे प्रार्थना, शिबीर, खेळ इत्यादीत सहभाग

काही देऊन, समुपदेशाने, चर्चेने, जगण्याने प्रकट करणे.

**२) अनुभवाद्वारे**

**अ) शिक्षणात शिक्षक-विद्यार्थी-विषय संबंध सामावतो.**

१. शिक्षक परिचय करून देतात, आवड निर्माण करतात, स्पष्ट करतात, प्रोत्साहन देतात.

२. विद्यार्थी शोध घेतो, रसग्रहण करतो, आत्मसात करतो, कृती करतो.

३. विषय हे ते सत्य आहे, त्याच्याभोवती परस्पर संवाद फिरतो.

**ब) शिक्षण तेव्हाच घडून येते जेव्हा सत्य हे :**

१. केवळ मानसिक संमती किंवा पुनरावृत्ती नसून मनात समजले जाते.

अ. पूर्वीच्या अनुभवाशी निगडीत किंब्वा खंडीत

ब. जीवन परिस्थितीशी संबंधित किंवा अनैसर्गिक

२. हृदयात विश्वासाने घेतले जाते (सर्वार्थाने)

३. जीवनात वास्तविक उतरविले जाते (इच्छेद्वारा स्वीकारले गेले)

**३) सत्यासंबंधी**

अ) सर्व सत्य हे परमेश्वराचे सत्य आहे परंतु ते खंडात मिळते.

१) निसर्ग, दूरदर्शीपणा, धर्मग्रंथ, ख्रिस्त यामध्ये व्यक्त केलेले

२) अंतर्ज्ञान, अनुभव, अधिकार कारणभाव आणि श्रद्धा प्राप्त केलेलं.

ब) उत्कृष्ठ तर्कसंगत सत्य प्रदान करून पवित्र आत्मा प्रकाशित करते.

**४) जीवनात**

अ) कृपा व सत्याचा हेतू अनुरूप आहे.

ब) ख्रिस्त हे फक्त सत्य नसून जीवनच आहे.

क) सत्याची तरतूद पूर्ण आहे.

१) परिपक्वतेच्या मापनाचे मानक ख्रिस्त आहे.

२) धर्मग्रंथातील सूचना या पुरेशा आहेत.

३) येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीत ताकद प्रदान केली जाते.

ड) जेव्हा परमेश्वराला बहाल आणि त्याच्यासारखे बाणाल तेव्हाच पूर्ण होईल.

**अभ्यासक्रमाची सामग्री**

- तो सुधारित तत्त्वानुसार मूल्य आधारित असायला हवा.
- त्याने एक समग्र एकात्मिक परंतु समावेशक दृष्टीकोनसुद्धा प्रतिबिंबित करायला हवा.
- तो निष्पत्यआधारित तत्त्वानुसार लिहला जायला हवा जेथे प्रभावी निष्पत्ती ही ठळक असायला हवी.
- तो धर्मप्रचारक स्वरूपाचा असायला हवा आणि असहारा आफ्रिकनमधील संबंधित आणि अधिक विशेषता मोझांविक संदर्भातील असायला हवा.
- तो उच्च विचारसरणी कौशल्याच्या वाढ व विकासावरील विशेष जोरासः उच्च शैक्षणिक मानकाशी अनुरूप असायला हवा.

munotes.in

- जरी हा अभ्यासक्रम सुधारित ख्रिश्चन दृष्टीकोनांपासून विकसित केला गेला असला तरीही तेथेही पूर्व अट नाही की ते उमेदवार ख्रिश्चन असावे.

**<u>शिक्षणाच्या संस्था</u>**

### चर्च

चर्च हा त्या व्यक्तींचा गट आहे ज्यांची एक तारणहार म्हणून जिझस ख्राईस्ट मधील श्रद्धेद्वारे पवित्र आत्म्याकडून अध्यात्मिक उन्नती झाली आहे आणि त्यांची ही श्रद्धा उघडपणे काबुल केली आहे. अशा प्रकारे चर्चा ही काही एक इमारत नाही की एक संप्रदाय सुद्धा नाही. ते म्हणजे पेंटीकॉस्ट पासून (यहुदी लोकांचा एक सण) ते ख्रिस्ताच्या पुर्नआगमनापर्यंत लॉर्ड जिझस ख्राईस्टवरील प्रत्येक खऱ्याखुऱ्या विश्वासू लोकांनी बनविले. ख्रिस्ताचे मंडळ आहे. जरी खऱ्या आस्तिकांना धर्मग्रंथाने स्थानिक चर्चमध्ये एकत्र येण्याची आज्ञा केलेली असली तरीही खऱ्याखुऱ्या चर्चचा भाग असणे म्हणजे केवळ धार्मिक सभेचा भाग असणे नव्हे. ते फक्त धार्मिक असणे नाही किंवा धार्मिक गटाशी जुळलेले असणे नव्हे, ते म्हणजे आत्म्यास परमेश्वराचे जीवन बाळगणे होय. आस्थिकाला दैवी निसर्गाचा सहभाग घेणारा बनवले जाते.

### शिक्षण

मूल जन्माला आलेल्या क्षणापासून त्याच्या विकासावर परिणाम करणारे काही विशिष्ट बले असतात. जशा त्याच्या जन्मजात शक्ती आणि प्रवृत्ती या बाहेर येतात आणि त्याच्या आजूबाजूचे वातावरण आणि त्याच्या इच्छा त्याच्याशी संवाद साधतात. तसा तो त्याच्या प्रौढावस्थेची गुणवैशिष्ट्ये धारण करतो. तथापि मानवी वाढ ही शारिरीक परिपक्वतेसह संपत नाही. व्यक्तिमत्वाच्या काही कार्यक्षमता या वृद्धापकाळात प्रसरण पावण्यास आणि शुद्ध होण्यास समर्थ असतात. शिक्षण मग ते मुलाचे असो की वृद्धाचे, हे विकासाच्या या सर्व चालू असलेल्या प्रक्रियेचे विशिष्ट हेतूकडे दिग्दर्शन आहे.

### हेतू

ख्रिश्चन शिक्षणाचा हेतू म्हणजे मानवी विकासाच्या प्रक्रियेचे मानवाप्रती परमेश्वराचा हेतू : गुण व कृतीचे दैवीपण याकडे दिग्दर्शन होय. तो त्याचे प्रयत्न शेवटी वळवितो. की परमेश्वराचा माणूस हा सर्व चांगल्या कामांसाठी पूर्णपणे सुसज्ज असा परिपूर्ण असू शकतो.

दैवीपणाचे हे ध्येय आध्यात्मिक उन्नतीचा अनुभव पुर्व्रहित धरते. जसे शिक्षण हे सर्वसाधारणता शारीरिक जन्मापासून सुरु होते तसे ख्रिश्चन शिक्षण हे वस्तुत: अध्यात्मिक पुनर्जन्मासह, जेव्हा परमेश्वराचे जीवन हे आत्म्याशी संवाद साधते तेव्हा सुरु होते. ख्रिश्चन शिक्षण हे वस्तुत: नवीन जन्मासः सुरु होते. असे म्हणणे म्हणजे जे आध्यात्मिक उन्नतीच्या आधि अर्थहीन आहे असे नव्हे. विद्यार्थ्याला परमेश्वराची आवश्यक जन आणि परमेश्वराच्या वचनांचे प्रतीआड पुरविले जावू शकतात जेणे करून जेव्हा पवित्र आत्मा पापाची खात्री पटवेल तेव्हा तो ख्रिस्ताला त्याचा तारणहार म्हणून

सहजासहजी आणि पूर्ण आकलनाने स्वीकारेल. तिमोशीला बालपणापासून ज्ञात होते. पवित्र धर्मग्रंथ हे जिझस ख्राईस्ट मधील श्रद्धेद्वारे शहाण्याला मोक्षापर्यंत घेऊन जाण्यास समर्थ आहे. मुले आणि अध्यात्मिक उन्नती न केलेले प्रौढ सुद्धा यांना मोक्षापर्यंत शहाणे बनवते; हे आजच्या ख्रिश्चन शिक्षणाचे काही कमी कायदेशीर कार्य नाही.

**ख्रिश्चन शाळा**

ख्रिश्चनांना त्यांची घरे आणि त्यांच्या चर्चमध्ये शिक्षित करण्याची बायबलकडून अनुमती आहे. या संस्थांच्या शैक्षणिक मंत्रालयाच्या सबळीकरणासाठी किंवा या मंत्रालयांना धर्मनिरपेक्ष अडथाळ्यांपासून संरक्षण देण्यासाठी ख्रिस्ती पालक किंवा चर्चचे सदस्त हे व्यक्तीश: किंवा एकत्रितपणे कार्य करून एक ख्रिश्चन शाळा बनविण्याची निवड करू शकतात. असे करताना ते धार्मिक खात्रीने कृती करत असतात. त्यांना ख्रिश्चन शिक्षणाच्या बायबलविषयक अनुमती पार पाडाव्यात त्यांची साधनांची निवड नाकारणे म्हंजे त्यांना त्यांच्या धार्मिक खात्रीचा प्रयत्न नाकारणे ठरेल.

असे लक्षात येते की मुलांचे शिक्षण हे राज्याचा विशेषाधिकार नसून तो पालक किंवा चर्च सदस्यांचा विशेषाधिकार आहे. त्यामुळे राज्याला ख्रिश्चन शिक्षणाची मानके व प्रक्रिया यावर हुकुमतीची परवानगी देणे म्हणजे पालक किंवा चर्च सदस्यांची त्यांचा शैक्षणिक विशेषाधिकार चालविण्याची व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाप्रती त्यांची परमेश्वराप्रती जबाबदारी पार पडण्याची क्षमता धोक्यात घालणे होय. ख्रिश्चन शाळेची राज्याच्या नियंत्रणाखाली किंवा दुसऱ्या कुठल्याही धर्मनिरपेक्ष संस्थेशी असलेली अधीनता म्हणजे परिणामत: ख्रिस्ती घरे व चर्चाही धर्मनिरपेक्ष वर्चास्वाशी असलेली अधीनता होय. ही एक धार्मिक अधीनता आहे जिला एक दुर्गुण म्हणून समजले जाते. कारण धर्मनिरपेक्ष नियंत्रण (जरी ते सौम्य भासत असले तरी) हे अध्यात्मिक मंडळाच्या ध्येयाशी विसंगत आहे.

## २ क. ११ सारांश

समाजातील बदल घडवून आणण्याचे प्रयत्न हे तरुण मुलांवर केंद्रित असायला हवेत, कारण ते भविष्याचे नेते असतात. अब्राहम क्वीपर यांना ख्रिश्चन उच्च शिक्षणाचे जनक मानले जाते. त्यांची खात्री होती की प्रत्येक गोष्ट ही ख्रिस्ताची आहे. ख्रिश्चन शिक्षण विकसित व्हायला हवे आणि त्याने एक उत्तर-आधुनिक बहुसवादी समाजातील ख्रिश्चन व्यावसायिक बनव्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक अशा अभ्यासक्रमातील सर्व विषयांवर एक ख्रिश्चन दृष्टीकोन आणि एक एकीकृत असायला हवा.

ख्रिस्ती उच्च शिक्षणातून विद्यार्थ्यांचा विश्वास आणि शिक्षण हे अशा प्रकारे एकीकृत केले जावे की ते त्यांच्या व्यवसायात लायक बनतील. परंतु त्यांच्या खंडाच्या अध्यात्मिक व भौतिक परिस्थितीला सामोरे जाण्यास त्यांची लायकी वापरण्यास वचनबद्ध असतील. एकदाचे ते नैतिकदृष्ट्या रुपांतरीत झाले की ते ज्या समाजात राहतात. त्या समाजाच्या रुपन्तारानास विधायाक्रीत्या योगदान देण्यास त्यांना सुसज्ज केले जाते. या प्रक्रियेला अभ्यासक्रमात ख्रिस्ती नैतिकता, ख्रिस्ती मुल्ये व ख्रिस्ती जागतिक दृष्टीकोन यांचा समावेश करून गती दिली जाऊ शकते. याला अजून गती देण्यासाठी शैक्षणिक प्रयत्नात



munotes.in

योग्य कार्यपद्धती उपाययोजना हवी. तीन मोझम्बिक विद्यार्थ्यांच्या कथा या ख्रिश्चन उच्च शिक्षणाचा त्यांचे जीवन, त्यांची कुटुंबे, त्यांचे व्यावसायिक जीवन आणि ते ज्या ठिकाणी राहतात तो समाज यांच्यावरील प्रभावाची साक्ष देतात.

## २ क. १२ प्रश्नावली

१) इस्लामिक शिक्षणाच्या विविध ठळक वैशिष्ट्यांवर चर्चा करा.

२) इस्लामिक शिक्षणाच्या संघटनेवर चर्चा करा.

३) इस्लामिक शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम, अध्यापनाची पद्धत आणि शिक्षकाची भूमिका यांच्या विशेष संदर्भात इस्लामिक शिक्षणाची चर्चा करा.

४) ख्रिश्चन शिक्षणासाठी बायबलविषयक पायाची चर्चा करा.

५) ख्रिश्चन शिक्षणात शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा आणि शिक्षकाच्या गुणवैशिष्ट्यांची यादी करा.

६) शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाला अनुरूप ख्रिश्चन शिक्षणाची अभ्यासक्रम सामग्री कशी असायला हवी.

munotes.in

❖❖❖❖

# ३ अ

## आवश्यकतावाद आणि स्थायित्ववाद

**प्रकरणाची रचना:**


३ अ.० उद्दिष्टे

३ अ.१ प्रस्तावना

३ अ.२ पारंपारिक तत्त्वज्ञानातील धारणा (Beliefs)

३ अ.३ पुरोगामी तत्त्वज्ञानातील धारणा (Beliefs)

३ अ.४ आवश्यकतावाद

३ अ.५ आवश्यकतावादाची मूलभूत तत्त्वे

३ अ.६ आवश्यकतावादाची शैक्षणिक फलितार्थ

३ अ.७ सारांश

३ अ.८ प्रगती तपासा

३ अ.९ स्थायित्ववाद तत्त्वज्ञानाची संकल्पना

३ अ.१० स्थायित्ववादाचे शैक्षणिक परिणाम

३ अ.११ अ) स्थायित्ववादाची शक्तीस्थळे

३ अ.११ ब) स्थायित्ववादाच्या कमतरता आणि टिका

३ अ.१२ स्थायित्ववाद – सदाहरीत कल्पना

३ अ.१३ सारांश

३ अ.१४ प्रगती तपासा

३ अ.१५ संदर्भ


### ३ अ.० उद्दिष्टे

हा विभाग वाचल्यानंतर तुम्हाला पुढील गोष्ट शक्य होते:

१) पारंपारिक तत्त्वज्ञानाच्या श्रद्धा आणि प्रगतीशील तत्त्वज्ञानाच्या श्रद्धा यातील फरक सांगणे.

२) आवश्यकतावादाची तत्त्वज्ञान विषयक तत्त्वे स्पष्ट करणे.

३) आवश्यकतावादाच्या शैक्षणिक परिणामाची चर्चा करणे.

४) स्थायित्ववाद तत्त्वज्ञानाची संकल्पना वर्णन करणे.

munotes.in

५) स्थायित्ववादाचे शैक्षणिक परिणाम स्पष्ट करणे.

६) स्थायित्ववादाची शक्तीस्थळे आणि काम्जोरींची यादी करणे.

७) आवश्यकतावाद आणि स्थायित्ववादाच्या तत्त्वाज्ञानामधील फरक सांगणे

## ३ अ.१ प्रस्तावना

तत्त्वज्ञान आणि शिक्षण हे दोन्ही संस्कृतीच्या धाग्यात गुंफले गेले आहेत. तत्त्वज्ञानाद्वारे हे शक्य होते कारण प्रत्येक संस्कृती, शिक्षित वा शिक्षित असो, विशिष्ट अशा धारणांचे (Beliefs), समजुतींच्या स्वीकाराचे प्रतीक असते. शिक्षणातूनही हे घडते. कारण प्रत्येक संस्कृती ही त्या त्या संस्कृतीच्या लोकांना औपचारिक आणि अनौपचारिक चिन्हे बहाल करते ज्यायोगे त्या संस्कृतीचे तत्त्वज्ञान, त्या व्याक्तिंचा दृष्टीकोन, सवयी आणि कौशल्ये यामध्ये मिसळून जातो. जर तत्त्वज्ञान संस्कृतीचे विश्वास (Beliefs) अभिव्यक्त करते तर शिक्षणाद्वारे ते प्रत्यक्षात उतरते.

ह्या दोन संघर्षात्मक तत्त्वज्ञानांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यांना पारंपारिक आणि पुरोगामी तत्त्वज्ञान असे म्हणतात. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की पारंपारिक तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते म्हणजे पुराणमतवादी नव्हेत. पारंपारिक आणि पुरोगामी तत्त्वज्ञानाच्या धारणा (Beliefs) पुढीलप्रमाणे आहेत.

## ३ अ.२ पारंपारिक तत्त्वज्ञानातील धारणा (Beliefs)

१) शिक्षण हे तार्किकत: अधिकारयुक्त आणि श्रेणीबध्द आहे.

२) अभ्यासक्रम हा विषयकेंद्रीआहे.

३) आशय आणि प्रकियेवर भर असतो.

४) ज्ञान आणि अचूकता अत्यावश्यक ओहत.

५) बुध्दिनिष्ठता आणि परिस्थितीजन्य पुरावे महत्त्वपूर्ण असले पाहिजेत.

६) योग्य आणि अयोग्याची पारख.

७) उत्पादित निर्माण झाले पाहिजे.

८) उत्पादित किंवा आशयाच्या ज्ञानाची वस्तुनिष्ठ चाचणी किंवा मोजमाप झाले पाहिजे.

९) व्याक्तिर्गत क्षमतांचा पूर्ण विकास साधण्यासाठी विविध अभ्यास आणि/ किंवा विविध प्रकारच्या शाळांचे पर्याय उपलब्ध असले पाहिजेत.

## ३ अ.३ पुरोगामी तत्त्वज्ञानातील धारणा (Beliefs)

१) शिक्षण हेच समतावादी आहे.

२) ते बालकेंद्री आणि समर्पक आहे.

३) कौशल्यांवर भर द्यावा.



munotes.in

४) अनुभव, प्रयोग आणि आकलन महत्त्वाचे आहेत.

५) सर्जनशीलता आणि भावना ह्या यथार्थतेपेक्षा महत्त्वाच्या आहेत.

६) व्यक्तिनिष्ठ मूल्यांकनांसाठी कार्याधिष्ठित कौशल्ये किंवा निकष हे संरचना पुरवितात.

७) सहकार्य हे सर्वाधिक महत्त्वाचे.

८) सर्वांसाठी उपलब्धता असल्यामुळे निवड किंवा भेद यांना वाव राहात नाही. संधीच्या समानतेचा उपयोग विकासाची समानता निर्माण करण्यासाठी वापरता येतो.

पारंपारिक किंवा परंपरागत विचारमतवाद्यांचा मते शिक्षण म्हणजे (यथार्थ (Factual) आणि सांस्कृतिक दोन्ही) ज्ञानाचे भावी पिढ्यांकडे संक्रमण.

प्रगरशील विचारमतवाद्यांच्या मते शिक्षणाचे हेतू हे अभिवृत्ती आणि मूल्यांमध्ये बदल घडविणे, राजकीयदृष्ट्या योग्य, धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी समाजरचनेची निर्मिती करणे होय. प्रगतशील विचारमतवादी हे इंग्रजी, इतिहास, संशोधन यांकडे विशेष लक्ष देतात. कारण ह्या विषयांना प्रचंड सांस्कृतिक महत्त्व आहे.

## ३ अ.४ आवश्यकतावाद

शैक्षणिक आवश्यकतावाद ह्या उपपत्तीनुसार बालकांनी पारंपारिक मूलभूत विषयांचे व्यापक आणि सखोल अध्ययन केले पाहिजे.

आवश्यकतावादाच्या कार्यक्रम हा कमी क्लिष्ट कौशल्यांपासून क्लिष्ट कामांकडे जातो.

विल्यम बेगले (१८७४-१९४६) हा आवश्यकतावाद चळवळीचा पुरस्कर्ता होय.

आवश्यकतावाद ही संज्ञा शैक्षणिक तत्त्वज्ञानात अमेरिकन शैक्षणिक तत्त्ववेत्ते विल्यम बेगले यांनी लोकप्रिय केली.

बेगले यांनी त्यांची डॉक्टरेट १९०० साली पूर्ण करुन नंतरचे शैक्षणिक वर्ष किचनर्सच्या प्रयोगशाळेत सहाय्यक म्हणून व्यतीत केले. १९०८ मध्ये बेगले यांनी इलिनोइस विद्यापीठाची नोकरी स्वीकारली. इलिनोईस येथे त्यांनी शिक्षणक्षेत्रात उत्तम कामगिरी करुन शिक्षण विभागाला राष्ट्रीय किर्ती प्राप्त करुन दिली.

विल्यम बेगले यांनी १९३८ साली आवश्यकता वादाचा पाया घातला.

- विसाव्या शतकाच्या प्रारंभी आवµयकतावाद हा विद्यार्थ्यांना प्रौढ जीवन जगण्यासाठी तयार करु शकत नाही कारण त्यात लवचिकता नाही अशी टीका करण्यात आली.

- परंतु १९५७ साली स्पुटनिकमुळे आवश्यकतावादाचे पुनरुज्जीवन झाले.

- शिक्षणाचे प्रस्थापित, रुढ उपागम हे अपूरे आणि अशक्त आहेत हा बेगल यांच्या आवश्यकतावादाचा मूळ आधार होता.
- त्यांना ते रुढ उपागम हे सबळ किंवा सकारात्मक, सशक्त अशा उपागमांनी बदलून टाकायचे होते.
- बेगल टीका करत असलेल्या प्रचलित रुढ उपागमांना त्यांना पूर्णपणे उध्वस्त करायचे नव्हते.
- संपूर्ण आयुष्यभर त्यांनी शैक्षणिक शाखा आणि प्रगतशील तत्त्वज्ञानाची मूलभूत अंगे यांना महत्त्व दिले.

आवश्यकतावाद हे १९३०-४० दरम्यान उदयास आलेले पूर्णत: अमेरिकन असे तत्त्वज्ञान असून बालककेंद्री शिक्षणपध्दती आणि शाळांमधून बालकांना समर्पक ज्ञान मिळत नाही या दोन बाबींमुळे निर्माण झालेली ती एक प्रतिक्रिया आहे.

प्रगतीशील तत्त्वज्ञानाच्या आधी जरी आवश्यकतावाद परिपूर्ण झाला असला तरी प्रामुख्याने तो त्याच्या सध्याच्या रुपामुळे जास्त परिचित आहे.

तत्त्वज्ञानाचे बहुतेक सर्व अग्रगण्य पुरस्कर्ते हे दोन मुख्य तात्त्विक विचारधारा - आदर्शवाद आणि वास्तवतावादाचे पूरस्कर्ते आहेत. या विचारधारा पुनरुज्जीवनवादात (Renaissance) मिसळून गेल्या आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभीस परिपक्व होऊन त्यांना त्यांच्या मूळ रुपापासून अत्यंत भिन्न स्वरुप प्राप्त झाले. आवश्यकतावादात आदर्शवाद आणि वास्तवतावाद हे दोन्हीही प्रवाह सामील असून त्यातील अनेक घटक आवμयकतावादात समाविष्ट आहेत.

आदर्शवाद आणि वास्तववादी तत्त्वज्ञानात कितीही भिन्नता असली तरीही ते सत्य, ज्ञान आणि मूल्यांशी संबंधित आहे.

आवश्यकतावादी हा शिक्षित माणसात मूलभूत माहिती आणि कौशल्यांचे ज्ञान आवμयक आहे असे मानतो.

## ३ अ.५ आवश्यकतावादाची मूलभूत तत्त्वे

बेगले यांनी आवश्यकतावादी व्यासपीठाच्या माध्यमातून १९३८ च्या एप्रिलमध्ये शिक्षणाची अनेक तत्त्वे सांगितली.

- सर्वात प्रथम त्यांनी विद्यार्थ्यांचा, सुसंस्कृत, उच्चविद्याविभूषित आणि काUजी घेणार्या शिक्षकांचा हक्क मांडला.
- दुसरे, ह्यांनी प्रभावी लोकशाहीसाठी सुयोग्य लोकशाही सांस्कृतिक वातावरणाची आवश्यकता सांगितली. अशा वातावरणात शिक्षक सामाजिक आदर्शांचे पुढील पीढीला उत्तमरितीने संक्रमण करु शकतात.

- तिसरे, त्यांनी विद्यार्थ्यासाठी अशा अभ्यासक्रमाची मांडणी केली ज्यात पारंगतता, अचूकता, सातत्य आणि उत्तम कामगिरी अपेक्षित असेल.

**आवश्यकतावादाचे तात्त्विक आधार**

- आवश्यकतावादाचे मूळ हे पारंपारिक तत्त्वज्ञानात आहे की ज्याने अमेरिकन समाजाची सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संरचना स्वीकारली आहे.
- ते असे प्रतिपादन करतात की, शाळांनी समाजात आमुलाग्र बदल करुन पुनर्रचना करण्याचा प्रयत्न करु नये. त्याऐवजी, शाळांनी पारंपारिक नैतिक मूल्ये आणि बौध्दिक ज्ञान देऊन विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक बनवावे.
- आवश्यकतावाद्यांना विश्वास आहे की शाळांनी पारंपारिक आचरण उदा. सत्तेविषयी आदर, सहिष्णुता, कर्तव्यनिष्ठता, सहृदयता आणि व्यावहारिकता रुजविली पाहिजे.

आवश्यकतावाद हा पारंपारिक/ पुराणमतवादी अमेरिकन समाजातील घटकांशी संबंधित पारंपारिक तत्त्वज्ञान परावर्तित करतो.

**तत्त्वमीमांसा**

१) आवश्यकता, ही सर्वात महत्त्वाची.

२) वस्तूनिष्ठ तथ्ये आणि मापनावर तो अवलंबून नसून अनुभवसिध्द आकलनाची त्याला मर्यादा नाही.

३) इतर कोणतेही व्दैत किंवा स्वत:पलिकडे जाऊन तो एकसंघ स्त्रोत स्पष्ट करतो.

**ज्ञानमीमांसा**

१) अभिजात आणि आधुनिक विज्ञानात सत्य अस्तित्त्वात असते.

२) विद्यार्थ्यांनी प्रक्रिया आणि आशय हे दोन्हीही शिकले पाहिजे.

३) अनुभव आणि तार्किक विचारांतील देवाणघेवाणीतुन ज्ञानप्राप्ती होते.

**मूल्यमीमांसा**

१) ही वस्तूंच्या निसर्गक्रमानुसार ठरते.

२) संस्कृतीतील उत्तमत्त्वात मूल्ये अस्तित्त्वात असतात.

३) अवगामी आणि उद्गामी विचारांतून तार्किकतेचा विकास होतो.

## ३ अ.६ आवश्यकतावादाची शैक्षणिक फलितार्थ

- **शिक्षणाची ध्येये**

१) सामाजिक योगदान आणि उत्पादनशीलतेसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे.

२) आधुनिक जगात उत्तमरितीने जगण्यासाठी आवµयक गोष्टी शिकविणे.



munotes.in

- अभ्यासक्रम

आवश्यकतावाद हा सांस्कृतिक साक्षरता चळवळीशी संबंधित आहे, की ज्याअंतर्गंत संपूर्ण समाजाला समान असलेल्या मूलभूत संचाचा पूरस्कार करतात.

प्राथमिक शाळांमधून मूलभूत कौशल्यांवर भर दिला जाईल. माध्यमिक स्तरावर ज्ञान आणि शैक्षणिक संपादनावर भर असेल.

तंत्रज्ञानविषयक साक्षरतेवर भर देताना आवश्यकतावादी 'ए नेशन ॲट रिस्क' ह्या अहवालानुसार शालेय विद्यार्थ्यांनी किमान एका सेमिस्टरमध्ये संगणक शस्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण करावा असे सांगितले.

आवश्यकतावाद हा 'पारंपारिक' किंवा 'मूलभूत बाबींकडे परत' या तत्त्वाशी संबंधित आहे.

आवश्यकतावाद हा विद्यार्थ्यामध्ये अत्यंत आवश्यक असे मूलभूत शैक्षणिक ज्ञान, कौशल्ये आणि चारित्र्यसंवर्धनाची रुजवणूक करण्याचा प्रयत्न करतो.

या वादाला आवश्यकतावाद म्हणतात कारण ह्या वादाद्वारे 'आवश्यक' असे शैक्षणिक ज्ञान आणि चारित्र्यसंवर्धनाबाबत विद्यार्थी प्रयत्नशील राहातो. आवश्यकतावादी अभ्यासक्रमाची बैठक ही पारंपारिक अशा गणित, नैसर्गिक विज्ञान, इतिहास, परकीय भाषा आणि साहित्य अशा विषयांवर आधारित आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमावर आवश्यकतावाद टीका करतो. आवश्यकतावादी प्रणालीनुसार विद्यार्थ्यांना वरच्या श्रेणीमध्ये जाण्यापूर्वी विशिष्ट अशी माहिती आणि मूलभूत तंत्रे आत्मसात करणे आवश्यक असते.

यथावकाश आशय हा जास्त गुंतागुंतीची कौशल्ये आणि विस्तृत ज्ञानाकडे जातो.

- **अध्यापनपध्दती**

आवश्यकतावादी तत्त्वज्ञान हे कालसिध्द भक्कम अशा अध्यापन पध्दतींवर लक्ष केंद्रित करते.

विद्यार्थी हे बाकावर बसून निष्क्रियपणे शिक्षकाचे बोलणे ऐकतात. आवश्यकतावादी पध्दतीचे उदाहरण म्हणजे, विद्यापीठांतून व्याख्यान पध्दतीने घेतले जाणारे उद्बोधनवर्ग. शंभराच्यावर विद्यार्थी वर्गांत बसून नोट्स घेत असतात. आशयासी परिचय करुन घेण्यासाठी ते परिचयपर सत्रास येतात. एक अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते पुढील वर्गात प्रवेश घेऊन आधी शिकलेल्या बाबींचे उपयोजन करतात.

- प्राथमिकचे विद्यार्थी हे लेखन, वाचन, मापन आणि संगणकाचे शिक्षण घेतात.
- सर्जनशीलता, कला व संगीताशी संबंधित विषयांचे शिक्षणही दिले जाते.
- विद्यार्थ्यांनी सोप्याकडून कठिणाकडे जात कौशल्ये आणि सखोल ज्ञान यांवर प्रभूत्व प्राप्त करावयाचे असते.

munotes.in

- विशिष्ट इयत्तेतील अभ्यासक्रमावर प्रभुत्व प्राप्त केल्याशिवाय पुढील वर्गास प्रवेश मिळत नाही.

डयुईला जे शाळांमध्ये अपेक्षित आहे त्यापेक्षा आवश्यकतावाद वेगळे सांगतो. विद्यार्थी रागांमध्ये बसून एकत्रितरित्या अध्ययन करतील.

- **आवश्यकतावादानुसार वर्ग**

आवश्यकतावादी विद्यार्थ्यांना मूलभूत शैक्षणिक कौशल्ये आणि ज्ञान देण्याचे आवाहन करतात.

अमेरिकन समाजाला घडविणाऱ्या व्यक्ती, घटना, कल्पना आणि संस्थाभोवती आवश्यकतावादी वर्ग उभारलेला आहे. त्यांच्या मते, शाळा सोडतना विद्यार्थ्याकडे फक्त मूलभूत ज्ञान आणि कौशल्ये नसतील तर शाळेत शिकलेल्या बाबींचे प्रत्यक्ष जगात उपयोजन करण्यासाठी आवश्यक असलेली प्रयोगशील वृत्ती आणि शिस्त ह्या गोष्टीही त्याच्याकडे असतील.

आवश्यकतावादी वर्गात विद्यार्थ्यांना 'सांस्कृतिकदृष्ट्या साक्षर' केले जाते.

आवश्यकतावादी कार्यक्रम हे शैक्षणिकदृष्ट्या प्रगत आणि अप्रगत अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी काटेकोरपणे केलेले असतात.

- सर्वात पहिले म्हणजे, अवधान विचलन कमी असल्यास विद्यार्थी चांगल्याप्रकारे लक्ष केंद्रीत करु शकतात, गटकार्य करु शकतात.
- दुसरे असे की कमी विचलन असल्यास शिक्षकही चांगले अध्यापन करु शकतात.
- विद्यार्थ्याला त्याच्या चुकीची शिक्षा झाली पाहिजे.

- **शिक्षकाची भूमिका**

आवश्यकतावाद्यांचे असे म्हणणे आहे की बौध्दिक आणि नैतिक आदर्शाचे प्रमाण असणाऱ्या शिक्षकाला धार्जिणा असा वर्ग असला पाहिजे.

❖ शिक्षक किंवा प्रशासक हे विद्यार्थ्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचे काय आहे ते ठरवितात आणि विद्यार्थ्याचे अभिरुचीला विशेषकरुन त्या अभिरुची शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या आड येत असतील तर कमी महत्त्व देतात.

❖ प्रगतीचे मूल्यमापन हे परीक्षेतील संपादनानुसार आवश्यकतावादी शिक्षक करतात.

आवश्यकतावादी तत्त्वज्ञानानुसार शिक्षकांनी पारंपारिक नैतिक मूल्ये, सद्गुण - जसे सत्तेप्रती आदर, चिकाटी, कर्तव्यनिष्ठता, इतरांप्रती आस्था आणि बौध्दिक व कृतीजन्य ज्ञान ह्या आदर्श नागरिक बनण्यासाठी आवश्यक बाबी विद्यार्थ्यांमध्ये रुजाव्यात ह्यासाठी स्वत:मध्ये बाणविल्या पाहिजेत.



munotes.in

- **शिस्त**

- 'ए नेशन ॲट रिस्क' ह्या अहवालानुसार कडक शिस्तीवर भर आहे.
- जास्त गाभाघटक, जास्त कालावधीची शाळा, मोठे शैक्षणिक वर्ष आणि आव्हानात्मक पाठ्यपुस्तके त्यांना अपेक्षित आहे.

## ३ अ.७ सारांश

आधुनिक इतिहासाच्या प्राथमिक कालखंडात आवµयकतावाद गतिमान तत्त्व होते; त्यानंतर संस्कृतीचा जतनकर्ता म्हणुन पुढील स्थित्यंतराच्या काळात ते स्थिर झाले.

## ३ अ. ८ प्रगती तपासा

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) परंपरावादी आणि पुरोगामी तत्त्वज्ञानाच्या विश्वासातील (Beliefs) फरक स्पष्ट करा.

२) आवश्यकतावादी तत्त्वज्ञानाची तत्त्वे स्पष्ट करा.

३) आवश्यकतावादाच्या शैक्षणिक फलितार्थांची चर्चा करा.

## ३ अ. ९ स्थायित्ववाद तत्त्वज्ञानाची संकल्पना

स्थायित्व म्हणजे 'कायम टिकणारे' जसे 'एक बारमाही फूल वर्षानुवर्षे येतच राहते'. स्थायित्ववाद तत्त्वज्ञानाला निओ थॉमिझाम, परंपरावाद, तार्किक मानवतावाद इ. नावांनी संबोधले जाते. नाव काहीही असो, अंतिम परिणाम हा मुळत: तोच विकास असतो की काही सार्वत्रिक सत्ये किंवा कल्पना या सदासर्वकाळ अस्तित्वात असतात आणि अस्तित्वाची ती पातळी जी माणूस प्राप्त करतो ती या बाह्य तत्त्वांशी असलेल्या अवधानाने किंवा अवधानात ठरविली जाते.

स्थायित्ववादी त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या पायाचा भाग काढत प्लेटो व ॲरिस्टॉटलच्या कल्पनांच्या सुधारित आकलनाच्या ऑगस्टीन व थॉमस ॲक्विनासच्या स्पष्टीकरणासह प्लेटो व ॲरिस्टॉटलपर्यंत मागे जातात.

एक स्थायित्ववादी ही अशी 'एक व्यक्ती असते जी विश्वास ठेवते की शिक्षणातील व शिक्षणाविषयीची काही स्थायित्व सत्ये ही अगदी सुरुवातीपासून अस्तित्वात आहेत आणि त्यांचे अस्तित्व व वैधता हे पहिले तत्त्व म्हणून चालूच आहेत जे सर्व सुयोग्य विचारसरणीची माणसे स्विकारतील'. बहुवार्षिकवाद हा तत्त्वज्ञानविषयक व साहित्य सिद्धांत आहे जो सार्वत्रिक सत्याच्या अस्तित्वासाठी वाद घालतो. ही एक कलाकारांची चळवळसुद्धा आहे जी १९ व्या शतकात लोकप्रिय होती. या सिद्धांताची कल्पना अशी की जीवन विषयक काही सत्ये ही संपूर्ण इतिहासात वेगवेगळ्या संस्कृतीच्या अवलोकनाद्वारे सापडली जाऊ शकतात. स्थायित्ववाद कलेच्या तत्त्वज्ञानातील

munotes.in

विचारांची एक शाळा आहे. हा सिद्धांत सुचवितो की काही कार्यांची शैली काहीही असले तरीही त्यांची सार्वत्रिक व टिकाऊ (शाश्वत) मुल्ये असतात.

**शिक्षणाचे स्थायित्व**वाद **तत्त्वज्ञान**

शिक्षणाचे हे तत्त्वज्ञान जे अध्यापनावर केंद्रित आहे ते एक प्रकारे व्यक्तीच्या प्रगतीवर केंद्रित आहे. शिक्षणाचे हे तत्त्वज्ञान या विश्वासावर आधारित आहे की शिक्षकाचे कार्य म्हणजे गटावर केंद्रित न होता व्यक्तीवर केंद्रित होणे आहे.

विद्यार्थी हा गटामध्ये सामान्यपेक्षाही खाली असला तरी काही फरक पडत नाही: जोपर्यंत ते त्यांच्या ध्येयापर्यंत प्रगती करत आहेत तोपर्यंत ते उत्कृष्ट आहेत.

हे तत्त्वज्ञान मत मांडते की मुलांना काळाच्या ओघात यशस्वी होण्यासाठी गरजेचे ज्ञान व कौशल्ये प्रदान करण्यासाठी शिक्षित करायला हवे. **स्थायित्व**वाद_शिक्षण हे विद्यार्थ्यांना आज उपयोगी पडणारी व भविष्यातही उपयोगी पडणारी संबंधित कौशल्ये प्रदान करण्यासाठी रचित आहे.

**शैक्षणिक** स्थायित्ववाद **तत्त्वज्ञान**

शैक्षणिक स्थायित्ववाद हे असे तत्त्वज्ञान आहे जे 'शिक्षणाशिवाय अध्ययन' या कल्पनेवर उभे राहते. ते आजीवन अध्ययन आणि एक शिक्षण पद्धती जी सतत विकास पावत आहे. त्यांना चालना देते.

हे तत्त्वज्ञान १९७५ मध्ये डॉ. जेम्स बॅटसनद्वारे प्रथम परिचित केले गेले जे मानणारे होते की शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजेनुसार अनुरूप व्हायला हवे.

**स्थायित्व**वादी मानतात की विद्यार्थ्यांजवळ त्यांच्या जीवनभर शैक्षणिक संधीचे खूप सारे विविध मार्ग असायला हवेत.

## ३अ.१० स्थायित्ववादाचे शैक्षणिक परिणाम

- **शिक्षणाची उद्दिष्ट्ये**

स्थायित्ववाद ज्ञानाची जी किंमत करतो ती काळाच्या अतीत आहे. हे एक विषय केंद्रित तत्त्वज्ञान आहे. स्थायित्ववादी निर्देशकाचे ध्येय म्हणजे विद्यार्थ्यांना तार्कीकपणे विचार करणे आणि त्यांचे मन टीकात्मकरित्या विचार करू शकेल असे विकसित करणे.

एक स्थायित्ववादी वर्गाचा उद्देश म्हणजे एक लक्षपूर्वक आयोजित आणि शिस्तबद्ध वातावरण निर्मिती जी विद्यार्थ्यामध्ये सत्यासाठी एक आजीवन जिज्ञासा व शोध विकसित करते.

ते मानतात की शिक्षणाने या कल्पना विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी आणि थोर कार्याचे आकलन व रसास्वादाप्रती त्यांच्या विचार प्रक्रियांना मार्गदर्शन करण्यासाठी नियोजित प्रयत्नांचे वर्णन करायला हवे.



munotes.in

स्थायित्ववादी ही प्राथमिकरित्या सामाग्रीवरील प्रभुत्व आणि तार्किक कौशल्यांच्या विकास यांच्या महत्त्वाशी संबंधित आहेत.

१) विद्यार्थ्यांचे बौद्धिक व नैतिक गुणधर्म विकसित करण्याच्या उद्देशाने आहे.

२) ते जोर देतात की विद्यार्थ्याला अशी माहिती शिकविली जाऊ नये जी लवकरच कालबाहय होऊ शकते किंवा चुकीची आढळून येऊ शकते.

३) वर्ग हे शिक्षकावर केंद्रित असावे.

४) विद्यार्थी पाश्चात्य संस्कृतीच्या थोर कल्पनांविषयीची समाज प्राप्त करण्याची ते खात्री देते.

५) ते संकल्पना शिकविते आणि द्न्यान व ज्ञानाच्या अर्थावर लक्ष केंद्रित करते.

६) व्यक्तीचे स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि जबाबदाऱ्या या निसर्गाद्वारा सुरक्षित होतील , विद्यार्थ्यांचे विचार करण्याचे मार्ग शिकविण्याच्या उद्देशासह आहे.

**शिक्षक-केंद्रित का म्हटले जाते?**

१) ज्ञान, माहिती व कौशल्ये ही जुन्या पिढीपासून नवीन पिढीकडे हस्तांतरित करण्याच्या महत्त्वावर जोर देते.

२) विद्यार्थ्यांच्या आवडीविषयी शिक्षक चिंतीत नसतो.

३) अभ्यासक्रम व नैसर्गिक गरजावर अधिक लक्ष.

४) शिक्षक अभ्यासक्रमावर आधारित सर्वकाही व्यवस्थित मांडतात.

**शिक्षक केंद्रित तत्त्वज्ञान**

**१) अभ्यासक्रमावरील जोर**

- सार्वत्रिक व न बदलणारे सत्य
- व्यक्तिगत विकास आणि आंतरिक रूपांतरण यांना जोडीदार बनवणे.
- सार्वत्रिक व अपरिवर्तनीय सत्यावर आधारलेल्या विषयांचा शोध घेणे व त्यांचा प्रसार करणे.
- इतिहास, विज्ञान, भाषा, गणित, धर्म

**२) नमुना वर्गकृती (विज्ञान अनुभव)**

**३) शिक्षकांची भूमिका**

- अधिकार, चिकाटी, कर्तव्य, विचार आणि व्यवहार्यता यांच्यासाथीचा आदर मनावर बिंबवणे.
- बौद्धिक प्रतिसादकाचा निर्देशक व प्रशिक्षक म्हणून वागतो.



munotes.in

- स्पष्ट व्याख्याने द्यायलाच हवी.
- टिकात्मक विचारसरणी कौशल्यातील प्रशिक्षण

**४) विद्यार्थ्यांसाठी ध्येये**

- विद्यार्थ्यांची बौद्धिक आणि नैतिक विकासाला प्रशिक्षण देते.
- त्यांना स्वत:ला शिस्त लावण्यास सक्षम
- तार्किक शक्तीच्या पूर्ण पल्ल्यांचा विकास करण्याची क्षमता प्राप्त करेल.

**५) शैक्षणिक नेते**

१. रॉबर्ट मेनार्ड हटचीन्स

२. मॉर्टीमर जे. ॲडलर

३. जॅकीस मॉर्टेन

- **अभ्यासक्रम**

स्थायित्ववादी अभ्यासक्रम ही एक अध्यापन पद्धत आहे जी काळातील विषयाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करते. औपचारिक शिक्षणाचा हा एक सिद्धांत असून तो सुचवतो की सर्व पद्धतशीर ज्ञान चार प्रकारात विभागले जाऊ शकते.

१) कला

२) विज्ञान

३) तत्त्वज्ञान

४) गणित

स्थायित्ववादी विचारवंत सामान्यतः यावर विश्वास ठेवत्ता कारण ते विचार करतात की निसर्गाचे नियम हे वैश्विक आहेत. म्हणजेच जर तुम्ही एखाद्या प्रकारचे ज्ञान किंवा कौशल्य कुठल्याही एका संचापासून शिकले तर तुम्हाला इतर तीन प्रकार जाणणे गरजेचे असेल.

## ३ अ.११अ) स्थायित्ववादाची शक्तीस्थळे

१) स्थायित्ववाद हा एक इतिहास  सिद्धांत आहे. जो मानतो की सारखेच मुलभूत नमुने आणि संरचना या सर्व संस्कृतीत कार्य करत असतात.

२) वेगवेगळ्या संस्कृतीमधील समानता स्पष्ट करण्याची बारमाही वादाची क्षमता आणि प्रगतीसारख्या विशिष्य मूल्यांच्या महत्वावरील त्याह जोर या गोष्टी बारमाही वादाच्या ताकातीत सामावतात.

३) ते स्वयंपूर्णतेला चालना देते आणि एखाद्याच्या परावलंबित्वाला नाउमेद करते.

४) जग आणि जीवनाला समजून घेण्याचा हा एक समग्र दृष्टीकोन आहे.



munotes.in

## ३अ.११ब) स्थायित्ववादाच्या कमतरता आणि टिका

१) तो निर्धारवादी म्हणून बघितल जाऊ शकतो कारण तो काळाच्या ओघातील किंवा सांस्कृतिक फरकांना विचारात घेतात.

२) काही विद्वानांच्या मते तेथे सार्वत्रिक किंवा वैश्विक मूल्य असे काही नाही.

३) हा एक पर्यावरणीय निर्धारवादाचा प्रकार आहे. टीकाकार म्हणतात की तो मानवी वर्तन आणि सामाजिक बदलांच्या क्लीष्टतेला विचारात घेत नाही.

४) तो मानतो की मानव हे जन्मजात चांगले असतात परंतु टीकाकार या वावतीत असहमत आहेत.

५) हा काही एक अतिशय मजबूत सिद्धांत नाही तो प्रत्येक वेळी होणाऱ्या बदलांना विचारात घेत नाही.

६) हा एक इतिहास सिद्धांत आहे. जो मानतो की भूतकाळ वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ हे सर्व जोडलेले आहेत.

७) टीकाकार मतभेद व्यक्त करतांना म्हणतात की, हा सिद्धांत काळाच्या ओघात समाजातील बदलांची शक्यता विचारात घेत नाही. वेगवेगळ्या संस्कृतींना त्यांचा स्वत:च्या एकमेव द्व्तीतीय इतिहास आहे. हे ही तो दुर्लक्षित करतो.

## ३ अ. १२ स्थायित्ववाद– सदाहरीत कल्पना

स्थायित्ववाद कथन करतो की शाळेत शिकवल्या जाणाऱ्या कल्पना ह्या सदाहरीत आणि कायम टिकणाऱ्या असायला हव्या. **स्थायित्व**वादाच्या आधाराचा शोध घेणे, सदाहरीत कल्पनांचा प्रभाव शोधणे, थोर संभाषणांचे मुल्यांकन करणे आणि व्यावहारिक अध्यापन उदाहरणांचे पुनरावलोकन.

**उदाहरण**

ती एक शिक्षिका आहे आणि तिच्या प्राचार्यांनी तिला शाळेच्या पुढील वर्षांसाठी शाळेच्या अभ्यासक्रमाची योजना करायला नुकतेच सांगितले आहे. हा खरोखर एक सन्मान आहे; यावरून दिसते की तिच्या प्राचार्यांना विश्वास आहे की काय शिकवावे याची सीताला जन आहे. परंतु सिताने अभ्यासक्रमासाठी नेमके काय निवडावे? काही लोक मानतात की शाळेने अभिजात वाड्मय जसे शेक्सपिअरआणि डार्विन शिकवायला हवे.इतर विचार करतात की नवीन कमी अभिजात वाड्मय असलेल्या गोष्टींकडे पाहणे आणि त्याच्या कडून शिकणे महत्वाचे आहे.

शिक्षणातील स्थायित्ववाद ही कल्पना शाळेच्या अभ्यासक्रमाने काय कायमस्वरूपी आहे, त्यावर जोर देण्याची आहे. स्थायित्ववाद किंवा बहुबार्षिक वाद हा शब्द बारमाही किंवा बहुवार्षिक म्हणजे खूप वर्षासाठी टिकणारे यावरून तुम्ही लक्षात घेऊ शकतात.



munotes.in

अशा प्रकारे स्थायित्ववाद हा त्या गोष्टीवर प्रकाश टाकतो, ज्या कित्येक वर्षापासून टिकून राहिलेल्या आहे. स्थायित्ववादाचा एक पायाभरणीचा दगड म्हणजे सदाहरीत कल्पनांचा आशय किंवा जे तत्त्वज्ञान खूप पिढ्यांपर्यंत टिकते. जुन्या जाहिरातीच्या युगाचा विचार करा, प्रेम आणि युद्धात सर्व काही माफ असते. हे सत्य आहे की नाही हे तुम्ही  माना की नको माना परंतु ते दीर्घकाळ पासून आहे आणि बऱ्याच लोकांनी ते वेगवेगळ्या मार्गांनी शोधले आहे.

बहुवार्षिक अभ्यासक्रम  तयार करण्यासाठी सीताला सदाहरीत कल्पनांवर लक्ष केंद्रित करावेसे वाटेल आणि छंदिष्ट व इतर नवीन कल्पना टाळाव्या लागतील. दुसऱ्या शब्दात ज्याच्यावर प्रयत्न झाला आहे आणि जे सत्य आहे त्यावर तिला चिटकून रहावे लागेल. सदाहरीत गोष्ट ज्यामार्गाने पूर्ण वर्षभर (खूप खूप वर्षांसाठी) टिकते. त्याचप्रमाणे सदाहरीत कल्पना या दीर्घकाळ टिकतात आणि बऱ्याच पिढ्यांमधील खूप लोकांना त्या लागू पडतात.

उदा. सामाजिक अभ्यासात सीताला लोकशाहीच्या मोठ्या सदाहरीत कल्पनेवर लक्ष केंद्रित करावेसे वाटू शकते. लोकशाही म्हणजे मानवी हक्क मतदारांचे शिक्षण आणि अशाच काही गोष्टी मतदान यंत्रे आणि द्रोणस या नवीन समस्यांना मानव आज तोंड देऊ शकतो परंतु त्या त्याचे आदर्शावर पारखल्या गेल्या आहेत. त्यांना आपले आजोबा आणि पणजोबांनी तोंड दिलेले आहे. राष्ट्रीय सुरक्षा विरुद्ध गोपनीयता सारख्या गोष्टी किंवा सर्वांसाठी मतदान अधिकार अशा गोष्टी म्हणून सिताने सामाजिक अभ्यासात द्रोणविषयी बोलण्याऐवजी तिला संस्थापक जनकांनी मानवी अधिकारांचा राष्ट्रीय सुरक्षेसोबत कसा समतोल साधला याकडे शाळेने लक्ष द्यावेसे असे वाटेल.

स्थायित्ववाद हा सदाहरीत कल्पनांवर इतका केंद्रित असल्यामुळे सिताने तीचा बहुतांश अभ्यासक्रम हा सदाहरीत कल्पनांविषयी बनवावा, त्याप्रकारे विद्यार्थी हे त्यांचे आजी आजोबा काय शिकले ते शिकतील. या मागचा विश्वास म्हणजे ज्या कल्पना काळाच्या कसोटीस खऱ्या उतरलेल्या आहे, त्या खरोखर अभ्यास करण्याच्या योग्यतेच्या आहेत. नवीन तऱ्हेच्या कल्पना ह्या अभ्यासक्रमात काहीतरी नवीन भर चालू शकतात. परंतु त्या खरे कार्य करू शकणार नाही. सीताला माहित आहे, काय कार्य करते. फक्त त्याच्याशीच का चिटकून राहू नये कारण त्याने पूर्वीच्या पिढ्यांसाठी कार्य केलेले आहे.

## ३अ.१३ सारांश

स्थायित्ववादी मानतात की शिक्षणाचा प्रकाशझोत हा ज्या कल्पना शतकांपासून टिकून आहेत, त्यावर असायला हवा. ते मानातातकी या कल्पना जेव्हा ज्या लिहिल्या गेल्या तेवढ्याच आजसुद्धा सुसंगत व अर्थपूर्ण आहेत. ते सुचवितात की विद्यार्थ्यांनी इतिहासाच्या सर्वोत्कृष्ट विचारवंत व लेखकांच्या कार्याचे वचन करून व विश्लेषण करून शिकावे.

आवश्यकवादी मानतात की जेव्हा विद्यार्थी या कार्य व कल्पनांचा अभ्यास करतात तेव्हा ते शिकण्याचा आस्वाद घेतील. बारमाही वादाप्रमाणेच आवश्यकवादी हे विद्यार्थ्यांचे

बौद्धिक व नैतिक गुणधर्म विकास करण्याचा उद्देश ठेवते. बारमाहीवादी वर्ग हे सुद्धा या ध्येयांच्या पूर्ततेसाठी शिक्षकांवर केंद्रित आहेत. विद्यार्थ्याची आवड किंवा अनुभवाविषयी शिक्षक हे जास्त चिंतीत नसतात. ते वापरल्या गेलेल्या व खऱ्याखुऱ्या अध्यापन पद्धती व तंत्रे वापरतात ज्या विद्यार्थ्याच्या मनाला शिस्त लावण्यास सर्वात फायदेशीर मानले जाते. बहुवार्षिक अभ्यासक्रम हा सार्वत्रिक आहे आणि तो सर्व मानव हे सारखाच आवश्यक स्वभाव स्वभाव बाळगून असतात या मतावर आधारित आहे. स्थायित्ववादी विचार करतात की व्यक्तीने सखोलपणे, विश्लेषणाव्यतिरिक्त, लवचिकपणे व कल्पकपणे विचार करणे महत्वाचे आहे. ते जोर देतात की विद्यार्थ्याला अशी माहिती शिकविली जाऊ नये जी लवकरच कालबाहय होईल व चुकीची आढळेल. बारमाहीवादी अशा शिक्षकांना नापसंत करतात जे समजतात की विद्यार्थ्याने खूप सारी असंबंधित माहिती ग्रहण करणे जरुरीचे आहे. ते सुचवितात की शाळेने संकल्पना व त्या विद्यार्थ्यांसाठी अर्थपूर्ण आहे हे स्पष्ट करण्याविषयीच्या शिकविण्यावर वेळ खर्च करायला हवा.

स्थायित्ववादी मानतात की एखाद्याने अशा गोष्टी शिकवायला हव्यात, ज्या एखादा समजतो की त्या सर्व लोकांसाठी प्रत्येक ठिकाणी कायमस्वरूपी महत्त्वाच्या असतील. ते मानतात की सरावात महत्वाचे विषय हे व्यक्तीचा विकास करतात. तथापि वस्तुस्थितीचा तपशील सतत बदलत असल्याने त्या सर्वात महत्त्वाच्या असू शकत नाहीत. म्हणून एखाद्याने तत्त्वे शिकवावी, वस्तुस्थिती नव्हे. लोक मानव असल्याने एखाद्याने प्रथम मानवाविषयी शिकवावे, यंत्रे किंवा तंत्राविषयी नव्हे. लोक प्रथमत: लोक आहेत व असलेच तर कामकरी नंतर आहे , म्हणून एखाद्याने प्रथम मुक्त, उदारमतवादी विषय शिकवावे, व्यावसायिक नव्हे, प्रकाशझोत हा मुख्यत्वेकरून वस्तुस्थितीऐवजी तार्किकता व शहाणपण व्यावसायिक प्रशिक्षणाऐवजी उदारमतवादी असा शिकविण्यावर आहे.

## ३अ.१४ तुमची प्रगती तपासा

१) स्थायित्ववाद (बहुवार्षिकवाद) याची संकल्पना तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

२) स्थायित्ववाद तत्त्वज्ञान तत्त्वज्ञान हे शिक्षककेंद्रित का आहे?

३) स्थायित्ववादाची शक्तीस्थळे व कमकुवतपणांची यादी करा.

## ३अ.१५ संदर्भ


1) The philosophical concepts of perennialism retrieved from website :

http://www.ttgst.ac.kr/ upload/ttgst – resources 13/2023-176.pdf

2) University of Luzon Graduate school perennialism reporter kothleen Lat Encarnacion retrieved from website : slideshare.net


❖❖❖❖

# ३ ब

## व्यवहारवाद आणि निसर्गवाद

**प्रकरणाची रचना:**

३ब.० उद्देश

३ब.१ व्यवहारवाद - एक आधुनिक विचारधारेची शाळा

३ब.२ व्यवहारवादाची मुलभूत तत्त्वे

३ब.३ व्यवहारवादातील नेते

३ब.४ व्यवहारवादाचे प्रकार

३ब.५ व्यवहारिकातेची मुख्य पुष्टीकरणे

३ब.६ व्यवहारवादाचे मुलभूत नियम

३ब.७ व्यवहारवादाचे शैक्षणिक परुनाम

३ब.८ सारांश

३ब.९ तुमची प्रगती तपासा

३ब.१०निसर्गवादाचा परिचय

३ब.११ निसर्गवादाचे शैक्षणिक परिणाम

३ब.१२ सारांश

३ब.१३ तुमची प्रगती तपासा

३ब.१४ संदर्भ

## ३ब.० उद्दिष्टे

हा विभाग वाचल्यानंतर तुम्हाला पुढील गोष्टी शक्य होतील :

- व्यवहारवादाची मुख्य पुष्टीकरणे स्पष्ट करणे.
- निसर्गवाद तत्त्वज्ञानाच्या तुलनेत व्यवहारवादाच्या शैक्षणिक परिणामांची चर्चा करणे.
- निसर्गवादाच्या अर्थाचे वर्णन करा.
- व्यवहारवाद व निसर्गवादाच्या नेत्यांची यादी करा.

munotes.in

## ३ब.१ व्यवहारवाद - एक आधुनिक विचारधारेची शाळा

व्यवहारवाद ही चिंतनाची आधुनिक शाखा असून शिक्षण प्रणालीत महत्त्वाची भूमिका बजावते. व्यवहारवाद हे मानवतावादी तत्त्वज्ञान असून या विचारानुसार रॉस असे मानतात की मानव कार्य करीत असताना आपली स्वत:ची मुल्ये निर्माण करतो. तसेच वास्तव हे अजून प्रक्रियेच्या स्वरुपात असते व भविष्यात पूर्ण व्हायची वाट बघते असेही ते मानतात.

व्यवहारवाद ही मनाची अभिवृत्ति असून या अन्वयार्थाने वास्तव ही सतत बदलती परिस्थिती आहे. ती सतत चालत राहणारी प्रक्रिया असून या प्रक्रियेत घडणे व बिघडणे या क्रिया होत असतात. मानवाच्या अनुभवानुसार त्याच्या गरजा व मागण्या यानुसार कार्य बनतात आणि त्याच्या प्रगतिनुसार ही कार्ये आपले स्वरुप बदलत असतात. अशाप्रकारे वास्तव वर्तमान काळात घडण्याच्या प्रक्रियेत असते व ते भविष्य पूर्ण होण्याच्या अपेक्षेत असते.

अशाप्रकारे व्यवहारवाद ही सहचारी उपपत्तिंपासून बनलेली एक चUवU आहे.

## ३ब.२ व्यवहारवादाची मूलभूत तत्त्वे

व्यवहारवाद ह्या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द 'प्रॅग्मा' पासून झाली असून त्याचा अर्थ कृती किंवा कार्य असा होतो. यापासून सराव, आचार, प्रात्यक्षिक व्यवहार आदि शब्द प्रचारात आले. हे एक तत्त्वज्ञान या दृष्टीने २० व्या शतकात अमेरिकेत विकसित झाले. श्री चार्ल्स पिअरस यांनी याचा परिचय १८७८ साली करुन दिला. त्यावर्षीच्या जानेवारीच्या प्रसिद्ध विज्ञान या मासिकात त्यांनी 'हाऊ टु मेक अवर आयडियाज् क्लिअर' या लेखात असे प्रतिपादन केले की, आपल्या मान्यता या आपल्या कृतिचे नियम असतात. आपल्या विचारांना अर्थ लावतांना आपल्याला कोणत्या कृतिद्वारे ते विचार निर्माण झाले याची निश्चिती करायची असते. ही कृतिच यासाठी महत्त्वपूर्ण असते. या मागील सिद्धांत खालीलप्रमाणे दिल्या गेले आहेत :

- वास्तव जगात फक्त सत्यच काम करते.
- आपण ऐच्छिक साध्य मनात ठेवायला हवे.
- सामाजिक समस्या व इतर कल्पनांचा वापर समस्या समाधानासाठी करायला हवा.
- कल्पना हे हत्यार असून कृति वास्तव आहे.
- मानव कृतिशील प्राणी आहे.
- जीवनात कोणतीही मुल्ये निखालस किंवा निश्चित नसतात.
- विश्वास ही समस्या समाधानाची मानवी क्षमता आहे. वैज्ञानिक पद्धतींच्या तार्कीकतेद्वारे मानव या क्षमतेचा उपयोग करु शकतो.



munotes.in

## ३ब.३ व्यवहारवादाचे नेतृत्व

१) **चार्ल्स डार्विन (१८०९-१८८२) :-** त्यांच्या मते, वास्तव हे अस्तित्त्वापेक्षा बनण्याच्या प्रक्रियेत दिसून येते. वास्तवाला निश्चित अंत नसून ते सतत बनण्याच्या प्रक्रियेत असते.

२) **चार्ल्स सँडर्स पिअर्स (१८३९-१९१४) :-** हा अमेरिकन व्यवहारवादी असून याला व्यवहारवादाचे प्रणेता समजण्यात येते. त्यांचा 'हाऊ टु मेक अवर आयडियाज् क्लिअर' हा लेख व्यवहारवदाचा पाया मानण्यात येतो. त्यांनी असा सिध्दांत मांडला की कुठल्याही गोष्टीचे खरे ज्ञान हे आपल्या अनुभवातील कल्पनांच्या पडताËयावर अवलंबून असते.

३) **जॉन ड्युई (१८५९-१९५२) :-** यांचे व्यवहारवादाच्या तत्त्वज्ञानाच्या विकासात मोठे योगदान आहे. त्यांनी मांडलेले खालील सिद्धांत व्यवहारवादाच्या आवश्यक तत्त्वांमध्ये समाविष्ट आहेत.

वास्तव जीवनातील समस्या केन्द्रीभूत करायला हव्यात. या समस्यांचे व्यावहारिकच समाधान शोधायला हवे. चिंतनाच्या खालील पायऱ्या आहेत. (प्रक्रिया)

- जाणवलेली समस्या
- समस्येची व्याख्या
- स्वीकार्य उकलीची मांडणी
- स्वीकार्य उकलीची तपासणी आणि मुल्यमापन
- स्वीकार्य उकलीचा स्विकार किंवा अस्विकार

## ३ब. ४ व्यवहारवादाचे विभाग / प्रकार

**मानवतावादी व्यवहारवाद :-**

ह्या प्रकारचा व्यवहारवाद फक्त मानवजातीचा ज्यात विकास आहे अशाच मानवी गरजा, आवश्यकता, अपेक्षा आणि ध्येयांची पूर्ती करणाऱ्या गोष्टी किंवा तत्त्वांचाच विचार करतो.

**प्रायोगिक व्यवहारवाद :-** या तत्त्वज्ञानाच्या मान्यते अनुसार ज्या गोष्टी किंवा तत्त्वे प्रयोगाद्वारे सिद्ध करता येऊ शकतात त्याच खऱ्या असतात. त्यामुळे कोणत्याही प्रक्रियेचे फलीत हीच सिद्धता असते.

**जीवशास्त्रीय व्यवहारवाद :-** या प्रकाराच्या व्यवहारवादानुसार एखाद्याला समायोजन करण्यात, पर्यावरणाशी जुळवून घेण्यात, किंवा वातावरणात बदल घडवून आणण्यात ज्याचीही मदत होते ते महत्त्वपूर्ण व किंमती असते. त्यामुळे सत्य हे जीवशास्त्रीय दृष्टीने उपयोगी ठरते. या प्रकारच्या व्यवहारवादाला साधनवादही म्हणतात, कारण कल्पना ह्या साधन किंवा उपकरण समजण्यात येतात ज्याद्वारे व्यावहारीक ज्ञान प्राप्त केल्या जाते.

या मान्यतेप्रमाणे चिंतक हा धारक नसून फेरफार करणारा असतो व विचार किंवा कल्पना त्याची व्यावहारिक बाबींवर स्वत:ला तपासण्याची व्याप्ती वाढवतात.

## ३ब.५ व्यवहारवादाचे प्रमुख जाहीरनामे

१) **परंपरावाद आणि निरंकुशवादा विरुद्ध उठाव :-** व्यवहारवाद सततच्या बदलावर विश्वास करतो. मानवाच्या जडणघडणात वास्तव वसलेलं असतं म्हणून वास्तव सतत बदलत असते.

२) **चिंतन हे कृतिचा दुय्यम सहचर आहे :-** व्यवहारवाद विचारांपेक्षा प्रत्यक्ष कृतिला जास्त महत्त्व देतो. जरी कल्पना किंवा विचार कृतिचे साधन असले तरी ते सुप्तावस्थेत असतात.

३) **अंतिम मुल्यांचा अस्विकार :-** मुल्ये मानवनिर्मित असतात जी कृतितून व अनुभवातून निर्माण होतात. त्यामुळे ही मूल्ये सातत्याने कालानुरुप, परिस्थितीप्रमाणे व गरजेनुसार बदलत असतात. म्हणून व्यवहारवाद अंतिम मुल्यांवर विश्वास करीत नाही.

४) **व्यवहारवाद हा साधनवाद आहे :-** ड्युईच्या नुसार, "मानवी जीवाला पर्यावरणाशी जुळवून घेण्याच्या चिंतन कार्यात चाचणी दडलेली असते." त्यामुळे व्यवहारवाद पर्यावरणाशी सुसंवाद व समायोजन साध्य करण्यातील समस्यांच्या निराकरणासाठी मानवी चिंतनाला साधन मानतो.

५) **व्यवहारवाद हा प्रायोगिकरणवाद आहे :-** व्यवहारवाद प्रत्येक विधानाची चाचणी किंवा तपासणी त्याच्या व्यवहारातील फलितांसाठी करतो. जी गोष्ट तपासाच्या प्रक्रियेतून जाते ती योग्य असते असं हे तत्त्वज्ञान मानते.

६) **व्यवहारवाद हा मानवतावाद आहे :-** व्यवहारवाद मानवी शक्ती, क्षमता तसेच त्याच्या उपक्रमशीलतेवर पूर्ण विश्वास करतो व मानतो की, मानवात स्वत:च्या तसेच समाजाच्या फायद्यासाठी परिस्थितीला योग्य आकार देण्याची क्षमता असते. तो पर्यावरणाचा निर्माता असून त्याच्यात अनियंत्रित उपक्रमशीलता असते.

७) **लोकशाहीवरील विश्वास :-** लोकशाही द्वारेच व्यक्ति आपले व्यक्तिमत्त्व पूर्णपणे फुलवू शकतो. कारण लोकशाही व्यक्तिविकास तसेच सामाजिक विकासाला सारखेच महत्त्व देते. परिणामत: देशाचाही संपूर्ण विकास होतो असे व्यवहारवाद मानतो.

## ३ब. ६ व्यवहारवादाचे आधारभूत नियम

१) वास्तवाचे स्वरुप बदलते आहे. यशस्वी उपयोजन आणि सिद्धता यातच वास्तव असते.

२) सत्यासाठी समस्या प्रेरणारुप ठरते.



munotes.in

३) सामाजिक आंतरक्रियेत विश्वास महत्त्वाचा घटक आहे.

४) उपयोजन हे तत्त्व वास्तवाच्या अंतिम रुपाकडे नेतो.

५) मुल्य व कल्पना निश्चित नसतात.

६) मानवी उपक्रमशीलता पर्यावरणाशी समायोजन साधण्यास मदत करते.

७) कृति ही सत्य शोधनात प्रमुख केंद्री असते.

८) व्यवहारवाद हा नवीन विचार असणारा किंवा पुरोगामी आहे.

९) अनेकतावाद आणि लवचिकता व्यवहारवादाचे आवश्यक तत्त्व आहेत.

१०) सत्य किंवा वास्तव हे पूर्ण नसून कायम घडण्याच्या प्रक्रियेत असते.

## ३ब. ७ व्यवहारवादाचे शैक्षणिक फलितार्थ

व्यवहारवादाचे उपयोजन शिक्षण क्षेत्रात करतांना त्याची खालील आवश्यक तत्त्वे आधारभूत ठरतात.

१) बालक कृतिच्या मध्यकेंद्री असतो.

२) शिक्षण हे जीवन योग्य प्रकारे जगण्यासाठी तयार करते.

३) समस्या निराकरण महत्त्वपूर्ण आहे त्यामुळे वास्तव जीवनाची परिस्थितीचा यासाठी उपयोग करणे योग्य ठरते.

४) अध्यापन पद्धति लवचिक आणि विविध असाव्यात.

५) शिक्षण हे कृतिप्रधान हवे.

६) शिक्षणात विद्यार्थ्यांच्या गरजा व अभिरुची ध्यानात ठेवायला हव्यात.

७) अध्यापनात प्रकल्प अभिगम योग्य ठरतो.

८) अभ्यासक्रम वैविध्यपूर्ण असावा.

९) स्थूल अभ्यासक्रम अधिक योग्य आहे.

**शिक्षणाचे ध्येय :-**

व्यवहारवादी कोणतीही ध्येये किंवा मुल्ये आगाऊ निश्चित करण्यात मानत नाही. ही ध्येये किंवा मूल्ये अनुभवांच्या पुनर्बांधणीच्या प्रक्रियेत उदय पावतात. त्याचप्रमाणे, शिक्षण प्रदान करण्याचा कुठलाही मार्ग निश्चित असू शक्यता नाही असे हे व्यवहारवादी मानतात त्यामुळे शिक्षणाची ध्येये ही उदय पावलेली असातता व काळाप्रमाणे बदलत असतात.

munotes.in

**ध्येये :-**

१. सामाजिक कार्यक्षमतेचा विकास

२. जास्तीत जास्त शिक्षण आणि सातत्यपूर्ण वाढ

३. पर्यावरणाशी समायोजन

४. समतोल विकास

**अभ्यासक्रम :-**

**व्यवहारवादी तत्त्वज्ञानानुसार अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये :-**

- अनुभवाधिष्ठित अभ्यासक्रम, वर्गवार अभ्यासक्रम – (कृति अभ्यासक्रम)
- उपयुक्तवादी अभ्यासक्रम – कारकीर्द निश्चित करण्याच्या दृष्टीने उपयुक्तता प्रमुख चाल मानल्या जाते.
- बालकाच्या अभिरुचीला योग्य स्थान
- समस्या समाधान प्रधान कृति कार्यक्रम
- संकलीत विषय – विषयांचा आशय अचल न राहता काळानुसार, गरजेनुसार, लवचिक ज्यात सामाजिकरणाचा तसेच उद्दिष्टपूर्ण व निर्माणात्मक कृति कार्यक्रमांचा अंतर्भाव. (संकलीत अभ्यासक्रम)
- शारीरीक तालीम, स्वच्छता, समाज शास्त्र, गणित, विज्ञान या विषयांवर अभ्यासक्रमात भर.

अशाप्रकारे व्यवहारवादी कृतियुक्त, लवचिक, उपयोजनात्मक आणि अतिशय प्रेरणादायी अभ्यासक्रमावर भर देतात.

**अध्यापन पद्धति :-**

१. अध्ययन – अध्यापन प्रक्रियेत सृजनात्मक कृतिंना महत्त्व (स्वयंप्रेरित, उद्दिष्टपूर्ण व समाजशील कृति)

२. कार्याद्वारे अध्ययन :-

- प्रकल्प पद्धति :- ही पद्धति व्यवहारवादात प्रामुख्याने मान्यता पावली आहे ती त्याच्या खालील तत्त्वांच्या व वैशिष्ट्यांच्या आधारे :-
  - ही पद्धति जीवनाभिमुख आहे.
  - ही पद्धति समस्याप्रधान आहे ज्याचे निश्चित उद्दिष्ट असते.
  - प्रकल्प पद्धति ही कृतिप्रधान असून हस्तचलीत किंवा कार्यात्मक आहे.

**प्रकल्प पद्धतीचे प्रकार :-**

१. निर्माणात्मक

२. ग्राहकात्मक

३. समस्यात्मक

४. अभ्यासात्मक

**शिक्षकाची भूमिका :-**

- विद्यार्थ्यांना वास्तव जीवनाच्या परिस्थितीत ठेवून त्यातील समस्यांचे आकलन करुन त्यांचे निराकरण करण्यास प्रेरणा देणे.
- मार्गदर्शक, मदतगार
- अध्ययन सुलभीकरण कर्ता
- विद्यार्थ्यांना रचनात्मक वृत्ती विकसित करण्यास प्रोत्साहन देणे – विद्यार्थी स्वयंप्रेरित होऊन, स्वयंचिलतन स्वयंकृतिद्वारे अध्ययन प्राप्त करतील यासाठी परिस्थिती निर्माण करणे.
- समस्या – निराकरण वृत्तींचा विकास करण्यात विद्यार्थ्यांना मदत करणे.

## ३ब. ८ सारांश

व्यवहारवाद 'सामाजिक शिस्त' या संकल्पनेत विश्वास करतात. प्रकल्प पद्धति अशी शिस्त विद्यार्थ्यांत विकसित करण्यास मदत करते. खेळ व कार्याची योग्य सांगड मानसिक अभिवृत्ति विकसित करतात. उदा.शिस्त स्वयंशिस्त बाह्य दबावाद्वारे किंवा अधिकाराने जोपासता येत नाही. अशी शिस्त उद्देश्यपूर्ण तसेच सहयोग कृतिंमधून वाढीस लागते.

व्यवहारवाद हा मनाची अभिवृत्ति आणि जीवन मार्ग असून जो सुफलतेच्या शोधात परंपरावादाचा विरोध करतो. व्यवहारवाद हा नाविन्यपूर्ण, निसर्गवादी, प्रयोगशील आणि समस्या निराकरणाचा अभिगम जीवनात व शिक्षणात वापरतो. अशाप्रकारे हे तत्त्वज्ञान स्वत:चे जग स्वत: निर्माण करते.

## ३ब. ९ तुमची प्रगती तपासा

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा:

१) उदारमतवादी तत्त्वज्ञानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२) उदारमतवादी तत्त्वज्ञानाची मूलभूत वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) उदारमतवादाची मूलभूत वैशिष्ट्ये आणि प्रमुख जाहीरनामे स्पष्ट करा.

४) व्यवहारवादाच्या शैक्षणिक फलितार्थ्यांची चर्चा करा.



munotes.in

## ३ब. १० निसर्गवादाचा परिचय

निसर्गवाद हा 'नैसर्गिक स्व' किंवा 'वास्तविक स्व' शि संबंधित आहे. निसर्गवादी म्हणतात की भौतिक जग हे वास्तविक जग आहे. निसर्गवादी वस्तू अशा आहेत तशा बघतात. त्यांना "वास्तविकता ही त्याच्या स्वत:च्या स्वरुपात समजायला हवी आहे. वास्तविकतेद्वारा प्रभावित झालेल्या स्वत:चा त्यांना विकास करावा वाटतो. अध्यात्मिक मुल्ये किंवा निरपेक्ष सत्ये अशा काही गोष्टी आहेत यावर त्यांचा विश्वास नाही. माणसाच्या आध्यात्मिक स्वभावाच्या विरोधी निसर्गवादी अंत:प्रेरणा उत्क्रांती व सारांश रूपाने सिंहावलोकन अशा संकल्पनांचा आधार घेतात. ते म्हणतात की अंत:प्रेरणा या आपल्या सर्व कृती-जैविक, मानसिक किंवा सामाजिक यांच्यासाठी जबाबदार आहेत. ती एक प्रक्रिया आहे जी व्यक्तीचे स्वातंत्र्य वाढविण्यास मदत करते. माणसाला कल्पनेची देणगी लाभलेली असल्याने तो उत्क्रांतीतून जात आहे. सिंहावलोकनाचे तत्त्व हे मुलाचे शिक्षण हे ऐतिहासिकदृष्ट्या विचारात घेतलेल्या मानवजातीच्या शिक्षणाशी रीत व व्यवस्था या दोन्ही बाबतीत जुळते असायलाच हवे या कल्पनेला मदत करते.

सर्वच निसर्गवादी जसे रुसो, लोके, किच्टे व कान्ट मानतात की माणूस हा जन्मत: वाईट नसतो. माणसाच्या अंगभूत चांगुलपणाविषयी निसर्गवाद्यांनी अतिशय झळाळत्या शब्दात माणसाला मूर्तिमंत देव बनविले आहे. त्यातील काही पुढीलप्रमाणे :

"परमेश्वर सर्व गोष्टी चांगल्या बनवितो, माणूस त्यांच्यासोबत हस्तक्षेप करतो आणि ह्या वाईट बनतात."

"माणसाचा विवेक हा तार्किकतेचा आवाज आहे व निसर्गाचा आवाज आहे."

"माणसामध्ये मरणाधीनतेसाठी जन्मजात क्षमता आहे."

"माणूस हा जन्मत:च तर्कसंगत आहे."

निसर्गवादी म्हणतात की ते प्रस्थापित सत्ये आणि जीवनमूल्ये यामध्ये विश्वास ठेवत नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार जीवनाची मुल्ये ही जीवनाच्या गरजेनुसार निर्माण झाली आहे. माणूस जेव्हा पर्यावरणाला प्रतिसाद देतो किंवा पर्यावरणाशी संवाद साधतो तेव्हा तो त्यांना निर्माण करतो. त्याने पर्यावरणाशी स्वत:ला जुळवून घ्यायलाच हवे. त्यांना अशा ज्ञानाची बांधणी करायची आहे. जे भौतिक शास्त्राच्या अध्यापनाशी अनुकूल असेल त्यांना वस्तुनिष्ठ व्हावेसे वाटते, अपवाद फक्त मानसशास्त्राच्या अभ्यासाचा ज्याचा अभ्यास वर्तनविषयक दृष्टीकोनातून केला जातो. निसर्गवाद्यांनुसार निसर्गाजवळ स्वत:चे असे कः नियम असून तो स्वत:मध्ये परिपूर्ण आहे आणि म्हणूनच निसर्गाला जाणून घेण्यासाठी आपल्याजवळ अंतर्दृष्टी किंवा अंतर्ज्ञान असण्याची गरज नाही.

**निसर्गवाद्यांची ३ अभ्यासकेंद्रे**

शैक्षणिक दृष्टीकोनातून निसर्गवादी त्यांना स्वत:ला तीन गटात ठेवतात.

१) अंत:प्रेरानावादी आणि भौतिक निसर्गवादी

२) डार्विनवादी आणि जीवशास्त्रीय निसर्गवादी

३) प्रायोगिक निसर्गवादी

### १) अंत:प्रेरानावादी आणि भौतिक निसर्गवादी

विचारांच्या या अभ्यासकेंद्राला मुलांचा विकास हा हवा आहे. अंत:प्रेरणांना त्यांचे स्वत:चे मार्ग असतातच मुलाचा विकास हा आतून व्हायला हवा, बाहेरून नव्हे. मुलाला त्याला स्वत:ला निसर्गाच्या कुशीत शिकू द्या. जगातील सर्व पाठ्यपुस्तकांमध्ये निसर्गाचे पुस्तक हे सर्वोत्कृष्ट आहे. मुलांची अभिरुची आणि आवडीने शैक्षणिक कार्यक्रम ठरवायला हवे.

रूसोच्या इमाईलला समाजापासून दूर निसर्गनियमानुसार शिकवायला हवे होते. त्यांची इच्छा होती की मुलांना ज्ञान देण्यासाठी संवेदी अनुभवांचा पूर्ण वापर केला पाहिजे. प्रत्येक मुळच्या दोन मुलभूत उत्कट इच्छा असतात. अभिव्यक्ती आणि कृती दोघांमधील पूर्ण स्वातंत्र्य हे मुळच्या व्यक्तीमत्वाचा विकास करेल. शिक्षकाच्या वतीने होणारा हस्तक्षेप हा कमीत कमी करायला हवा त्यांच्या स्वत:च्या अनुभवांनी त्यांना शिकू द्या, चुका करू द्या आणि त्या चुकांपासून शिकू द्या.

### २) डार्विनवादी आणि जीवशास्त्रीय निसर्गवादी

निसर्ग्वाद्यांचे डार्विनवादी अभ्यासकेंद्र हे बुद्दीमत्तेवर खूप जोर देते. जी त्यांच्यानुसार जीवनातील अनुभवांशी व्यवहार करताना, त्यांचे नियंत्रण करतांना आणि त्यांना एक विशिष्ट दिशा देतांना खूप फायदेशीर आहे. बुध्दिमत्ता ही जीवनाच्या सर्व क्षेत्रात – नैतिक, सामाजिक, अर्थशास्त्र मध्ये खूप मदतगार आहे. ती जीवनाच्या समस्या सोडवण्यात आणि पर्यावरणाशी व्यक्तीला जुळवून घेण्यास मदत करते.

### ३) प्रयोगिक निसर्गवादी

हे अभ्यासकेंद्र मानते की मानवजातीच्या सर्व कृती आणि अनुभव हे वैयक्तिक अधीन केले पाहिजे व त्यानानातर सत्य स्थापित करायला हवे. ते पूर्ण जीवनासाठी संपूर्ण मानवाच्या एकूण शिक्षणात विश्वास ठेवतात.

## ३ब. ११ निसर्गवादाचे शैक्षणिक परिणाम

- **शिक्षणाचे उद्देश**

१) तत्त्वज्ञानाच्या निसर्गवादी शाळेअंतर्गत शिक्षणाचा उद्देश म्हणजे स्व अभिव्यक्ती होय.

२) असे निसर्गवादी जे मानवाला एक यंत्र समजतात ते म्हणतात की शिक्षणाचा उद्देश म्हणजे, "मानवी यंत्राला त्याच्या रचनेकडे जातीने लक्ष देऊन त्याला विस्तृत करून आणि त्याला अधिकाधिक गुंतागुंतीचे कार्य करण्यास सक्षम करून शक्य तितके चांगले यंत्र बनविणे.

३) काही निसर्गवाद्यांनुसार शिक्षणाचा उद्देश म्हणजे अंतप्रेरणांचा समन्वय अशा मार्गाने हवा की माणसाने ती ध्येये ज्यांना व्यक्तिगत आणि सामाजिक मुल्ये आहेत ती साध्य करायला हवी.

munotes.in

४) एकूणच म्हणजे निसर्गवादी मानतात की मुलाचे एका आनंदी तर्कसंगत, सुसंवादीपणे समतोल, उपयोगी आणि नैसर्गिक मुलांत विकास होण्याची प्रक्रिया आहे.

५) "जेव्हा निसर्गाच्या शक्ती आणि मुलाचा कास यांना कमीत कमी मार्गदर्शनात मुक्तपणे विकसित करण्याची परवानगी दिली जाते तेव्हा ते खरे शिक्षण असते." निसर्गवादी अशा व्यक्तित्वाच्या विकासाला सर्वोच्च शैक्षणिक ध्येय समजतात परंतु व्यक्तित्वाचा विकासाचा अर्थ असा नव्हे की त्या व्यक्तीने स्वप्रतिपादन, कोणत्याही अधिकाराला मान्य करायचे नाही किंवा स्वत:च्या व्यक्तीमत्त्वाचा बढाई मारायची आणि शेजाऱ्यांची पर्वा करायची नाही अशा प्रवृत्ती विकसित कराव्यात.

६) विद्यार्थ्याला शिकवायलाच हवे की "त्यांनी फक्त स्वत:चाच विचार करू नये तर इतर लोकांचासुद्धा विचार करावा. फक्त प्राणीच हे स्वत:साठी विचार करतात." अल्डोस हवस्ले यांच्या शब्दांत व्यक्तिमत्व म्हणजे निरपेक्ष स्वतंत्र अस्तित्व नव्हे; व्यक्ती ह्या एक मोठ्या साम्पुरणाचा परस्परावलंबी भाग आहेत.

- **अभ्यासक्रम**

१) निसर्गवादी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र इ. निसर्गाशी संबंधित असणाऱ्या विज्ञानाच्या अभ्यासावर जोर देतात. त्यांना गणित व भाषा तेवढीच हवी आहे, जेवढी ते विषय समजायला गरजेची आहेत.

२) पाठ्यपुस्तके, पद्धती वा शिक्षक ज्यांची संपूर्ण कल्पना ही विद्यार्थ्याने विज्ञानाऐवजी काव्य व साहित्यात झोकून देण्यासाठी त्याला तयार करणे आहे. ती निसर्गवाद्यांच्या नजरेत संपूर्ण शालेय पद्धतीची सर्वात मोठी चूक आहे. निसर्गवाद्यांना वाटते की पाठ्य विषय व अध्यापन हे पूर्णपणे विज्ञान व वैज्ञानिकांच्या दृष्टीकोनातून झुकलेली हवी व त्यासोबतच साधेपणा आणि वस्तुनिष्ठता हे निरीक्षणाचे शब्द असायला हवेत. आणि संबंधित तथ्यांचे ज्ञान हे एकमेव नियंत्रित ध्येय हवे,

३) ते वर्तमानाचा आरंभ स्पष्ट करतात आणि भविष्यात डोकावून बघण्यासाठी मदत करतात. त्यांना अभ्यासक्रमात इतिहासाचा समावेश करावासा वाटतो जेणेकरून विद्यार्थ्यांना इतिहासाची नैतिकता उपलब्ध होईल. ही नैतिकता त्यांना वर्तमानात नवीन सामाजिक सुव्यवस्था आणण्यास व तसेच भावी कृतींची योजना करण्यास मदत करू शकते.

४) अभ्यासक्रमात परमेश्वर व धर्माविषयी शिकविण्यासाठी काहीही स्थान नाही. ते मानतात की कोणत्याही मुलाला मुक्त असताना धर्म आचरावासा वाटत नाही आणि असेही काही आढळत नाही की मुलांमध्ये पुजा, आराधना ही एक नैसर्गिक गोष्ट आहे.

५) तार्किक शक्ती ही कमाल मर्यादेपर्यंत विकसित व्हायला हवी. निसर्गवाद्यांनुसार मुलांना शास्त्रीय संगीत किंवा शास्त्रीय चित्रकारी आवडत नाही. म्हणून हे विषय

मुलांना शास्त्रीय संगीत किंवा शास्त्रीय चित्रकारी आवडत नाही. म्हणून हे विषय शिकविले जाऊ नये.

६) स्पेन्सर यांच्यानुसार, 'विज्ञानाधीष्ठीतअभ्यासक्रम करण्याऱ्या कृतींना प्राधान्य देतात. अशा प्रकारे ते अभ्यासक्रमावर 'जीवनाचे नियम आणि शरीरविज्ञानाची तत्त्वे' यांची जागा ठेवतात.

- **अध्यापनाच्या पद्धती**

१) निसर्गवाद्यांचे शिक्षण हे मूल केंद्रित आहे. यात मुलाला एक मध्यवर्ती स्थान आहे. मुलाचा विकास का त्याच्यावरच सोपवायला हवा.

२) निसर्गवाद हा पारंपारिक शिक्षण पद्धतीच्या हिंसक निंदेसाठी जबाबदार ठरला आहे. त्याने सर्व प्रकारची नकारात्मक तंत्रे व घोकंपट्टीवरील जोर यांना विरोध केला.

३) अनुभवजन्य असल्याने त्याने मुलाला जे काय शिकायचे आहे ते सर्व त्याला वास्तविक अनुभवाद्वारे दिले जाऊन शिकविणे पसंत केले.

४) लोकांनी मानले की मुलांच्या शिक्षणात ज्ञानेद्रीयांचे प्रशिक्षण किंवा संवेदी प्रशिक्षण ही पहिली पायरी असायला हवी.

५) 'करा व शिका' हे तत्त्व त्यांनी मांडले.

६) प्रत्यक्ष अनुभवावर खूपच जोर दिला गेला आहे. तर्कावर सुद्धा जोर दिला आहे. जसे भूमिती ही दिलेल्या काल्पनिक समस्या अभ्यासण्यापेक्षा प्रत्यक्ष वस्तू व जागेच्या मोजमापाद्वारे अधिक चांगल्या प्रकारे समजली जाते तसेच विज्ञानाचे शिकविणे हे प्रयोगशाळेत प्रात्यक्षिकाद्वारे अधिक परिणामकारक होऊ शकते.

७) भूगोल हा नकाशे किंवा तक्त्यांपेक्षा भौगोलिक स्वास्थ्य असलेल्या ठिकाणांच्या सहलीद्वारे अधिक चांगल्या प्रकारे शिकविला जाऊ शकतो.

**निसर्गवादी विचारवंत शिक्षणाच्या पुढील पद्धती सुचवितात:**

१) सकारात्मक पद्धत – या पद्धतीत निर्देशक हा मुलाला विविध विषयांविषयी माहिती देण्याचा प्रयत्न करतो. ही पारंपारिक पद्धत आहे जिला निसर्गवाद्यांकडून एक जुन्या रीतीची व अपरिणामक्षम म्हणून नाकारले जाते.

२) नकारात्मक पद्धत – या पद्धतीत मुलाचे मन माहितीच्या तुकडे-तुकड्यांनी भरण्याऐवजी त्याला त्याचे संवेदी अवयव व प्रेरक अवयव यांचा वापर करण्याचे प्रशिक्षण देण्याचा समावेश होतो. त्याच्या ताब्यातील विविध शारीरिक शक्तींचा वापर करून ते मूल स्वत:साठी खूप सारे ज्ञान निर्माण करेल.

खेळण्याच्या मार्गाने शिकण्याची पद्धत ही निसर्गवाद्यांमध्ये खूपच लोकप्रिय आहे.

- **शिक्षक**

१) निसर्गवाद्यनाच्या अनुसार निर्देशक हा केवळ अटींवरच स्वीकारण्यायोग्य आहे. ते मानतात की निर्देशाकांच्या योग्य हस्तक्षेपामुळे मुलाचा गौरव फिका होतो. म्हणूनच हे अत्यावश्यक आहे की शिक्षकाने मुलाला समजून घ्यायलाच हवे आणि अनावश्यक हस्तक्षेप करू नये. काय करायचे नाही हे जाणण्याची प्रवृत्ती ही असयाला हवी आणि प्रेमाची सकारात्मक प्रवृत्ती आणि त्यांच्याप्रती पसंती ही त्यांच्या परीने प्रामाणिक पणाची खात्री देऊ शकते. मुलावर प्रेम करण्यासाठी आणि त्यांच्याप्रती पसंती दर्शविण्यासाठी त्यांना मोठे होण्याची बालपण मिळवण्याची शोकांतिका टाळून त्यांनी एक लहानमुलांसारखेच स्वत: रहायला हवे.

२) निर्देशाकाचा उद्देश म्हणजे विज्ञानाचा स्पष्ट, वेगळा, पद्धतशीर आणि पूर्णपणे व्यक्ती निरपेक्ष आवाज व्हायला हवा. त्याला सत्य आणि वस्तुस्थिती सर्वोच्च आदर असायला हवा. आणि त्याने त्याच्या विद्यार्थ्यांना सत्य आणि वस्तुस्थिती समजण्यासाठी फक्त सहकार्य करायला हवे. निर्देशाकाचे स्थान हे पडद्याच्या पाठीमागे आहे; तो मुलाचा माहिती, कल्पना, आदर्श आणि इच्छाशक्ती प्रदान करतात किंवा चारित्र्य घडविणारा असण्याऐवजी मुळच्या विकासाचा एक निरीक्षण कवी असतो.

३) शिक्षकाला फक्त मंचाची मांडणी करणे, साहित्य पुरविणे, संधी पुरविणे, एक आदर्श वातावरण पुरवणे आणि नैसर्गिक विकासासाठी पोषक परिस्थिती निर्माण करणे एवढेच करायचे आहे. शिक्षकाची अशी भूमिका ही अध्यापन प्रकल्प पद्धतीच्या सर्व आधुनिक पद्धतीत सुचवलेली आहे.

- **शिस्त**

१) अभ्यासक्रम व शैक्षणिक पद्धतीत असल्यामुळे निसर्गवादी तत्त्वज्ञानी हा शिस्तीच्या पारंपरिक संकल्पनेला दुसऱ्या कोणापेक्षाही अधिक विरोध करतो. ते शारीरिक शिक्षेच्या पद्धतीला विरोध करतात कारण ते मानतात की यामुळे मुलामध्ये अनिष्ट संघर्ष निर्माण होवो.

२) रुसोंनी लिहिलेले आहे, “मुलांनी कधीही शिक्षा स्वीकारू नये तर स्वातंत्र्य ही सर्वात चांगली बाब आहे.” जर मुलाने काही चूक केली तर त्याला खुद्द निसर्गाकडून परतावा मिळेल आणि अशाप्रकारे तो त्याच्या स्वत:च्या कृतींच्या परिणामातून बरोबर व चूक मधील फरक करायला शिकेल. या कारणास्तव मुलाला अगदी स्वातंत्र्य दिले जायला हवे.

३) निसर्गवाद्यांसाठी स्वातंत्र्याचा अर्थ दुसऱ्यांच्या कृतीमध्ये लुडबुड करण्याचे स्वातंत्र्य नव्हे. या दृष्टीने ते मूल कधीही स्वावलंबी बनू शकत नाही. कारण ते मूल बऱ्याच नियम व कायद्यांद्वारे नियंत्रित केले जाते. जे त्याच्या मनात काळात नकळत क्रिया करत असतात. फक्त बाह्य आणि सुस्पष्ट शिस्त दूर केली जायला हवी.

४) मुलांच्या मनामध्ये नैसर्गिक परिणामातून शिस्तीचा आदर स्थापित करायचा प्रयत्न केला जातो. बक्षीस व शिक्षेची पद्धत ही सर्व ठिकाणी परिणामकारक आढळून आली आहे. परंतु हे लक्षात ठेवायलाच हवे की निसर्गवाद्यांच्या संकल्पनेचे मूल्य यात दडलेले आहे की ते अतिरिक्त बाह्य शिस्तीच्या उणिवा सूचित करते. असे असले की सुद्धा त्यात शंकाच नाही की हा सिद्धांत नक्कीच एकांगी आहे.

## ३ब. १२ सारांश

शिक्षणात निसर्गवादाचे योगदान कुणीही न्यायपणे आकारू शकत नाही. कारण त्याने त्याच्या सर्व क्षेत्रात – शिक्षणाचा उद्देश, पद्धती, अभ्यासक्रम, शिस्त, शिक्षक इत्यादीत प्रभाव दाखविला आहे.

मुळच्या शिक्षणाला मुलाचे मानसशास्त्र व विकास मानसशास्त्र या तत्त्वाच्या मूल्यावर उभे करून त्याने शिक्षणाच्या पारंपारिक व कट्टर संकल्पनेला पूर्ण छेद दिला आहे.

प्रायोगिक अध्यापनावर दिलेला जोर हा जरी न्याय होता. तरी त्याने लवकरच उत्क्रांतीवादी प्रभावाचा मार्ग दिला आहे. निसर्गवादाने मानवी स्वभावाला एक जीवशास्त्रीय बाबीपेक्षा अधिक मोठे नाही असे समजून त्याच्या स्वरुपाची व्याख्या ही एका अतिशय संस्कृतीत क्षेत्रात सिमित केलेली आहे.

अगदी अलीकडील वर्षात एखाद्याला आढळते की निसर्गवादामधील रिकामी जागा ही जलद गतीने भरत आहे. आधुनिक निसर्गवाद हा अधिक सर्वसमावेशक आहे. कारण त्याने शुद्ध जीवशास्त्रीय स्पष्टीकरण लागलेले आहे आणि तो आदर्शवादी धारणेच्या जवळ येऊन ठेपलेला आहे.

## ३ब. १३ तुमची प्रगती तपासा

१) निसर्गवाद तत्त्वज्ञानाची संकल्पना स्पष्ट करा.

२) शिक्षणाचे उद्देश आणि निसर्गवाद्यांचे तीन अभ्यासकेंद्र यावर चर्चा करा.

३) टीपा लिहा.

- निसर्गवाद आणि अभ्यासक्रम
- निसर्गवाद आणि शिक्षक
- निसर्गवाद आणि शिकवण्याची पद्धत

## ३ब.१४ संदर्भ

1) Chandra S.S and Sharma Rajendra ; “Philosophy of Education”. Attantic Publisher and Distribution, 2002, New Delhi

2) Taneja, V.R. “Educational Thought and Practic” Sterling publishers, New Delhi.

❖❖❖❖

# ३ क

## मानवतावाद आणि अस्तित्ववाद

**विभाग रचना**

३क.० उद्देश

३क.१ मानवतावाद तत्त्वज्ञानाचा परिचय

३क.२ मानवतावादाचा अर्थ

३क.३ मानवतावादाचे शैक्षणिक परिणाम

३क.४ सारांश

३क.५ तुमची प्रगती तपासा

३क.६ अस्तित्ववादाचा परिचय

३क.७ मुलभूत संशोधन

३क.८ अस्तित्ववादाचे मुख्य प्रवर्तक

३क.९ अस्तित्ववादातील कथानके

३क.१० अस्तित्ववादाचे शैक्षणिक तत्त्वज्ञान

३क.११ टिकात्मक मूल्यमापन

३क.१२ सारांश

३क.१३ तुमची प्रगती तपासा

### ३क. ० उद्दिष्टे

ज्या घटकाच्या वाचनानंतर तुम्ही पुढील बाबी करु शकाल.

- अस्तित्ववादाच्या संकल्पनेचे आकलन.
- अस्तित्ववादाच्या वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण.
- अस्तित्ववादाच्या पुरस्कर्त्यांची ओळख व त्यांचे दृष्टिकोन.
- अस्तित्ववादाच्या काही विषयांवर विचार करणे.
- अस्तित्ववादाच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे वर्णन करणे.
- मानवतावादाचा अर्थ स्पष्ट करणे.
- मानवतावाद व अस्तित्ववाद यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे वर्णन करणे.

munotes.in

## ३क.१ मानवतावाद तत्त्वज्ञानाचा परिचय

१) मानवतावाद हे ते तत्त्वज्ञान आहे ज्याच्यानुसार माणूस हा वस्तूंच्या योजनेत केंद्रस्थानी आहे. माणूस हाच फक्त ज्ञानाची मौल्यवान वस्तू आहे. मानवी जीवनात उद्भवणारे विरोधाभास सोडविण्याचा निकष मानवतावाद आहे. मानवामध्ये तर्काचा उदय होण्यापासूनच विचारवंत लोक हे मानवी जीवनात उद्भवणाऱ्या विरोधाभासांना सोडविण्यासाठी वास्तविकतेच्या काही एक किंवा इतर निकषांचा शोध घेत राहिलेले आहेत. असे प्रयत्न सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्तॉटल व इतर प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्यांनी केलेले आहेत.

२) प्राचीन काळात सर्वच ठिकाणी तत्त्वज्ञानविषयक विचारसरणी ही धार्मिक विचारांपासून वेगळी नव्हती. परंतु हळूहळू तत्त्ववेत्यांनी त्यांना स्वत:ला धार्मिक कट्टर तत्त्वापासून बाहेर काढले आणि तत्त्वज्ञान विषयक विचारसरणीला स्वतंत्र आधारांवर स्थापित केले. असे हे बुद्धीवादी, अनुभववादी, वास्तविकवादी, आदर्शवादी व इतर आधुनिक तत्त्वज्ञानी होते.

३) तत्त्वज्ञानाचा समकालीन जगात, तत्त्वज्ञानविषयक विचार हे भौतिक व सामाजिक विज्ञानातील विकासाद्वारे खूपच प्रभावित होते. याचाच परिणाम म्हणून वास्तविकतेचे नवीन निकष हे तत्त्ववेत्यांद्वारे स्विकारले गेले. वाहतूक व दळणवळणाच्या साधनातील अभूतपूर्व प्रगतीने जगाला खूप लहान केले आहे. व मानवाला एकमेकांच्या खूप जवळ जाणले आहे. म्हणून सर्व गंभीर विचारसरणीत मानवी समस्या या केंद्रस्थानी बनल्या आहेत. याने मानवतावादाच्या उदयासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले आहे.

४) इतर विचारसरणीच्या कलाप्रमाणेच मानवतावादाच्या मुळाचा भाग हा जुने ग्रीक तत्त्वज्ञान आणि भारताच्या प्राचीन विचारात शोधला जाऊ शकतो. पश्चिमेत ग्रीसच्या नायकांनी घोषित केले की मनुष्य हा सर्व गोष्टींचे मोजमाप आहे. या नायकानंतर मानवतावादाची कल्पना ही वितंडवादी तत्त्वाज्ञानांचे विचार, प्लेटो व सॉक्रेटीसच्या कल्पनांमध्ये दिसून येऊ शकते. परंतु ह्या मानवतावादाच्या कला कमाल प्रोत्साहन हे निसर्गवादीभौतिक तत्त्वज्ञानाने दिले.

५) चार्ल्स डॉर्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताचे स्थापित केले की निसर्गात मनुष्य व प्राण्यामध्ये खोल दरी नाही. डार्विननंतर उत्क्रांतीची कल्पना ही मानवी विचारसरणीच्या जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात उपयोगात आणली गेली आणि खूप सारे सिद्धांत हे स्थापित केले गेले. आज हे सामन्यात: स्विकारले जाते की प्राणी व माणूस हे उत्क्रांतीच्या एकाच प्रक्रियेतील दोन वेगवेगळे टप्पे आहेत.

munotes.in

## ३क.२ मानवतावादाचा अर्थ

ह्युमॅनिझम (मानवतावाद) हा इंग्रजी शब्द लॅटिन संज्ञा 'होमो' पासून आलेला आहे. ज्याचा अर्थ मानव असा होतो. म्हणजेच शब्दशः मानवतावाद हे तत्त्वज्ञान आहे, ज्यात माणूस हा केंद्रस्थान ग्रहण करतो.

तथापि एखाद्या संज्ञेचा व्युत्पत्तीशास्त्रीय अर्थ म्हणजे पुरेसा अर्थ नाही; त्यात ऐतिहासिक वापर सुद्धा समाविष्ट आहे. ऐतिहासिक परंपरेत संज्ञेचा वापर हा त्याच्या अर्थाचे वेगवेगळे पैलू उघड करतो. अशा प्रकारे मानवतावाद या संज्ञेचा पूर्ण अर्थ समजण्यासाठी एखाद्याला त्याची ऐतिहासिक उत्क्रांतीसुद्धा विचारात घ्यायलाच हवी.

या ऐतिहासिक उत्क्रांतीसुद्धा मानव कल्याणासाठी जे काय उपयोगी म्हणून आढळून येते त्याला मानवतावादाच्या संकल्पनेशी जोडले जाते, जसे सामाजिक कल्याणाची कल्पना, वैज्ञानिक कल्पना, वैज्ञानिक वृत्ती, लोकशाही संस्थांची प्रगती, इ.

मानवतावादातील नेते

१) अब्राहम मॅस्लो

२) कार्ल रॉजर्स

३) माल्कोम नोल्स

मानवतावाद ही मानवाला विश्वात एक सुयोग्य ओळख प्राप्त होण्यासाठी आयोजिलेली एक चळवळ आहे. मानवतावादातील शैक्षणिक विचार हे गमावलेल्या मूल्यांच्या पुनर्स्थापनेशी संबंधित आहे. मानवतावादात एक माणूस हा अंतिम लक्ष आहे; एक साधन नव्हे. तो एक मुक्त प्रतिनिधी आहे.

**मानवतावाद दोन तत्त्वांवर कार्य करतो :**

१) राष्ट्राने राखलेली मुल्ये इतिहासावर परिणाम करतात. जेव्हा राष्ट्राची मुल्ये ही सर्वोच्च प्रतीची असतात तेव्हा चांगले घडून येते. आधुनिक माणसाने इतिहासापासून शिकायलाच हवे.

२) थोर साहित्य हे माणसाला तुकड्यांपेक्षा एकसंध होण्याच्या मूल्यावर जोर देते. मानवतावादात अध्ययन हे विद्यार्थी केंद्रित आहे व वैयक्तिककृत आहे आणि निर्देशकाची भूमिका ही एका सुविधा देणाऱ्याची आहे. भावनिक व संज्ञात्मक गरजा आणि ध्येय म्हणजे सहकार, आश्वासक वातावरणात स्वयं-वास्तविक लोक विकसित करणे हे आहे:

## ३क.३ मानवतावादाचे शैक्षणिक परिणाम

१) मानवतावादी शाळेच्या विचाराधारेनुसार शैक्षणिक कार्यक्रमांनी प्राचीन संस्कृतीप्रति प्रशंसा व प्रेम वाढवायला हवे. हे मानवी सभ्यतेच्या वाढीसाठी महत्वाचा स्त्रोत म्हणून कार्य करते.

२) तरुण पिढीने विद्वानांच्या शहाणपणाचा आदर शिकायला हवे कारण ते मानवी मूल्यांच्या क्षेत्राशी निगडीत आहे.

३) बुद्धीवादी लोक हे त्यांच्या प्रचंड ज्ञान व बौद्धिक क्षम्तेद्वारे समाजासाठी ध्येय स्थापित करण्यास अनुकूल स्थितीत असतात.

४) विद्यार्थ्यांमध्ये भाषेप्रती आदर रुजवायला हवा. शिक्षणाने शब्द संपदेच्या सुयोग्य व अचूक वापरावर आणि व्याकरणाचे नियम अनुसराण्यावर जोर द्यायलाच हवा.

**<u>मानवतावादाची तत्त्वे</u>**

**मानवतावादी शिक्षणाची तत्त्वे पुढीलप्रमाणे :**

१) विद्यार्थ्यांना 'जे काय शिकायचे आहे ते निवडण्यास ते सक्षम असायला हवे. मानवतावादी शिक्षक मानतात की जर विद्यार्थ्यांना काही गरज असेल किंवा त्यांना काही जाण्याची इच्छा असेल तर त्यांना विषय शिकण्यासाठी प्रेरित केले जावे.

२) शिक्षणाचे ध्येय म्हणजे शिकण्यासाठी विद्यार्थ्यांच्या इच्छेचे संगोपन करणे आणि ते कसे शिकावे हे त्यांना शिकवावे हे होय. विद्यार्थी त्यांच्या अभ्यासात स्वयंप्रेरित असायला हवे आणि शिकण्यासाठी त्यांची स्वत:ची इच्छा असायला हवी.

३) मानवतावादी निर्देशक मानतात की श्रेणी ह्या असंबंधित आहेत आणि फक्त स्व उत्क्रांती ही अर्थपूर्ण आहे. श्रेणी ही विद्यार्थ्याला व्यक्तिगत साधनाऐवजी श्रेणीसाठी कार्य करण्यास प्रोत्साहित करते.

४) मानवतावादी निर्देशक हे वस्तुनिष्ठ चाचणीच्या विरोधी आहे, कारण त्या विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीच्या क्षमतेची कसोटी करतात आणि शिक्षक व विद्यार्थ्यांना पुरेसा शैक्षणिक अभिप्राय प्रदान करत नाहीत.

५) मानवतावादी निर्देशक मानतात की भावना व ज्ञान हे दोन्ही अध्ययन प्रक्रियेसाठी महत्त्वाचे आहे. पारंपारिक निर्देशाकांच्या विपरीत मानवतावादी शिक्षक हे भावनिक व संज्ञानात्मक क्षेत्रे वेगळी करत नाहीत.

६) मानवतावादी निर्देशक जोर देतात की शाळेने विद्यार्थ्यांना एक सुरक्षित वातावरण प्रदान करण्याची गरज आहे. जेणेकरून त्यांना अध्ययनासाठी सुरक्षित वाटेल/ एकदा का विद्यार्थ्यांना सुरक्षिततेची जाणीव झाली की अधिक सोपे व अधिक अर्थपूर्ण बनते. ते प्रत्येकाच्या शिकण्याच्या नैसर्गिक इच्छेवर जोर देतात, जेणेकरून शिक्षक हे खूप साऱ्या अधिकाराचा त्याग करतात आणि एक सुविच देणारा म्हणून बनतात.

munotes.in

**सूचनांचे परिणाम**

१) सूचना ह्या बाह्य असण्यापेक्षा आंतरिक असायला हव्या (विद्यार्थी केंद्रित)

२) विद्यार्थ्यांनी स्वत:चा शोध व स्वाभिमान याचा भाग म्हणून त्यांच्या सांस्कृतिक वारशाविषयी शिकायला हवे.

३) अभ्यासक्रमाने प्रात्यक्षिक आणि शोध मुक्त क्रियाकलाप यांना चालना द्यायला हवी.

४) विद्यार्थ्यांना वैयक्तिक ज्ञान आणि अनुभव प्राप्त करण्यासाठी अभ्यासक्रमाची रचना असावी हे दाखविते की ते एका सुरक्षित व सहभागी शैक्षणिक वातावरणात बहुमोल योगदान आहे.

५) शिकलेले ज्ञान हे विद्यार्थ्यांच्या तत्काळ गरजा, ध्येये आणि मूल्य यांना उपयोगित आणि सुयोग्य असायला हवे.

६) विद्यार्थी हे त्यांच्या आत्मवास्तविकतेसाठी अध्ययनाचे मूल्य निश्चित करण्यातील उत्क्रांती प्रक्रियेचा भाग असायला हवे.

७) निर्देशात्मक आराखड्याने शोधद्वारा अध्ययन सुलभ करायला हवे. उद्दिष्टांची रचना अशी करायला हवी जेणेकरून विद्यार्थ्यांनी शिकलेल्या कल्पनांना किंमत द्यायला हवी.

८) बऱ्याच पर्यायी अध्ययन अनुभवाची रचना करून व्यक्तीगत अध्ययन शैली, गरज आणि आवडीला विचारात घ्यायला हवी.

९) अभ्यासक्रमातील बऱ्याच उपलब्ध पर्यायांपैकी सुयोग्य अध्ययन निवडण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य द्यायला हवे.

१०) सूचनांनी व्यक्तीगत वाढ सुलभ व्हायला हवी.

<u>**विद्यार्थ्यांची भूमिका**</u>

१) अध्ययनात पुढाकार घेऊन विद्यार्थ्याने जबाबदारी स्वीकारायलाच हवी. विद्यार्थ्यांनी अध्ययनाला मूल्य द्यायलाच हवे.

२) शिकणारे हे अध्ययनासाठीचा अनुभव सक्रियपणे निवडतात.

३) टिकात्मक आत्ममननाद्वारे स्वत:ची वास्तविकता आणि स्वआदर्श यामध्ये पोकळी शोधून काढा.

४) एखाद्याची स्वत:ची मुल्ये, प्रवृत्ती आणि भावना यांच्याबाबत प्रामाणिक रहा व त्यांचे मूल्य स्विकारा.

५) एखाद्याचे आंतरवैयक्तिक संवादकौशल्य सुधारा.

६) इतरांप्रती चिंता व इतरांच्या गरजा ह्याबद्दल सहानुभूती पूर्वक बना.

७) गटातील इतर सदस्यांच्या मतांची मग ते विरोधी असले तरी किंमत करावी.

८) एखाद्याची मुल्ये आणि विश्वास हे एका सामाजिक भूमिकेत चपखल कसे बसतील याचा शोध घ्या.

९) वेगवेगळ्या दृष्टीकोनांना मुक्तपणे सामोरे जा.

**<u>शिक्षकांची भूमिका</u>**

१) सुविधा दाता बना आणि गटाचा एक सहभागी सदस्य बना.

२) समाजाचा व्यवहार्य सदस्य म्हणून विद्यार्थ्यांना स्विकारा व त्यांची किंमत करा.

३) त्याची मुल्ये व विश्वास स्विकारा.

४) अध्ययनाला विद्यार्थी केंद्रित बनवा.

५) विद्यार्थ्यांना स्ववास्तविकता व आदर्श यामधील दरी शोधण्यास मार्गदर्शन करा.

६) ही दरी भरून काढण्यासाठी विद्यार्थ्याला सुविधा द्या.

७) वैयक्तिकृत सूचना काढण्यासाठी विद्यार्थ्याला सुविधा द्या.

८) स्वतंत्र अध्ययन सुलभ करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे स्वत:हून अध्ययन करण्याची संधी द्या. आणि मुक्तशिक्षण व शोषला चालना द्या.

९) सृजनशीलता किंवा आंतरदृष्टी पुढाकाराला चालना द्या.

## ३क.४ सारांश

तत्त्वज्ञानाच्या मानवतावादी संकल्पनेपासून आपण त्याचा आशय किंवा अर्थ याविषयी त्याच्या शैक्षणिक परिणामांसह शिकलो. मानवतावादाची तत्त्वे अभ्यासक्रम, शिक्षक व विद्यार्थ्याच्या भूमिका ह्या शैक्षणिक प्रक्रियेचा दृष्टीकोन अभ्यासताना महत्त्वाचा आशय प्रदान करतात. याचा उद्देश म्हणजे मानवाच्या व्यक्तीमत्त्वाचा पूर्ण विकास करणे होय. यामुळे मानवाला वैयक्तिक व सामाजिक समस्या सोडविणे शक्य होते. याचा हेतू म्हणजे मानवाची कार्यक्षमता व आनंद वाढवणे.

## ३क.५ तुमची प्रगती तपासा

१) मानवतावाद म्हणजे काय? तुमच्या शब्दांत त्याचे वर्णन करा.

२) टिपा लिहा.

    १. मानवतावादात शिक्षकाची भूमिका

    २. मानवतावादात विद्यार्थ्याची भूमिका

३) मानवतावादाचे तत्त्वज्ञान हे आजच्या शैक्षणिक पद्धतीवर कसा परिणाम करेल/ पद्धतीत कसे अमलात येईल? स्पष्ट करा.

munotes.in

## ३क.६ अस्तित्ववादाचा परिचय

अस्तित्ववाद हा तत्वज्ञानाचा असा मार्ग आहे, जो स्वीकारणाऱ्यास जग व मानवी जीवनविषयक वेगळा दृढ विश्वास देतो.

अस्तित्ववाद हे एक युरोपीय तत्वज्ञान आहे ज्याचा उगम विसाव्या शतकाच्या प्रारंभापूर्वी झाला, परंतु ते प्रसिध्द झाले जागतिक महायुध्द २ (१९३९-४५) नंतर.

अस्तित्ववादाची बीजे तत्वज्ञानाच्या इतिहासात अगदी सुरुवातीपासूनच दिसून येतात. अठराव्या शतकामध्ये तर्क आणि निसर्ग यांना बरेच महत्व दिले गेले, वस्तुनिष्ठतेवर भर होता, ज्याचा परिणाम औद्योगिक आणि तंत्रज्ञानात्मक विकासात झाला व विज्ञानास अत्याधिक महत्व दिले जाऊ लागले. शास्त्रीय दृष्टिकोनातून मानवाचा एक वस्तू म्हणून विचार केला जाऊ लागला. विकसनशील औद्योगिक समाजामध्ये मानव यंत्रांचा गुलाम बनला. ह्या परिस्थितीच्या विरोधात अस्तित्ववाद समाजा विरोधात प्रतिकार म्हणून उदयास आला आणि त्याने मानवाच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रतिपादन केले. अस्तित्ववादी तत्वज्ञानाचा कोणी एक निर्माता नाही. अस्तित्ववादी लिखाण अनेक तत्वज्ञानींच्या कार्यामध्ये विखुरलेले दिसते, ज्यापैकी महत्वपूर्ण असे म्हणजे; फ्रेडरीच निट्सच, सोरेन किर्केगार्ड, गॅब्रीएल मार्सेल, मार्टीन हिडेगर, जीन पॉल सार्टे, कार्ल यास्पर्स, अब्बागनॅमो, बार्डिएव, अल्बर्ट कॅमस इ.

अमेरिकन शिक्षणशास्त्रामध्ये मॅक्सिन ग्रीन, जॉर्ज क्लिनर, वॅन क्लेव मोरिस हे काही प्रसिध्द अस्तित्ववादी आहेत जे स्वतंत्र अस्तित्व आणि वैयक्तिक पूर्ती वर भर देतात.

### ३क. ७ अस्तित्ववादाची ठळक वैशिष्ट्ये

**१) अस्तित्व अग्रक्रमाने प्रधान लक्षण : -**

हे तत्वज्ञान मानवापासून सुरु होते.परंतु मानव एक विशिष्ट स्वरुप किंवा विचार कर्ता म्हणून नाही तर मानव एक अस्तित्व म्हणून. प्रथम मानव अस्तित्वात येतो, नंतर सिध्द करतो. मानव मूल्ये किंवा तत्व/ लक्षणांनी निश्चित होण्यापूर्वी अस्तित्व येते. कारण सुरुवातीला मानव काहीच नसतो, त्याची लक्षणे नसतात, जे तो स्वत:स बनविल ते तो बनतो. मानव स्वत:च्या व्यक्तिनिष्ठतेने स्वत:स सिध्द करतो आणि निवडीची संधी, स्वातंत्र्य आणि अस्तित्व यांत भरकटत राहतो. चिंता, भीती, मृत्यूची जाणीव स्वातंत्र्य यांच्याशी अस्तित्ववादाचे नेहमी साहचर्य आढळते.

२) **व्यक्तिनिष्ठतेचे महत्व: -**

डच तत्ववेत्ता एस. किर्केगार्डने म्हटले आहे की सत्य व्यक्तिनिष्ठ आहे, सत्य व्यक्तिनिष्ठता आहे: वस्तुनिष्ठता आणि अमूर्तता भ्रम आहेत. अस्तित्ववाद हे व्यक्तिनिष्ठतेच्या गाभ्यामध्ये चाचपून पाहिल तर त्याला स्वत:बद्दलचे सत्य कळेल आणि त्याची जीवनातील खरी भूमिका जाणवेल. ही एक सर्जनशील प्रक्रिया आहे जी नवीन मर्मदृष्टी देते.

**३) मानवाचे स्वातंत्र्य : -**

मानवी व्यक्तीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे त्याचे स्वातंत्र्य: बंधनरहित व अनियंत्रित. आदर्शवादी व इतर तत्ववेत्त्यांनी मानल्याप्रमाणे मानव हा समाज आणि सामाजिक संस्थासाठी नसून, त्या मानवासाठी आहेत. येथे 'सर्वसाधारण इच्छा' नाही ज्यावर 'व्यक्तिगत इच्छा" अवलंबून असेल.

**४) आदर्शवादाचे गुणावगुणविवेचन :-**

आदर्शवादा विरोधात एक प्रतिक्रिया म्हणून अस्तित्ववादाचा उगम आणि विकास झाला. अस्तित्ववादी तत्ववेत्ते आदर्शवाद व संकल्पनावादाप्रति अत्यंत चिकित्सक आहेत. वैश्विक तत्वे व सर्वांचे भले तर प्रत्येक मानवाचे भले या आदर्शवादींच्या मुद्द्याबाबत अस्तित्ववादी तत्ववेत्ते सटिक चिकित्सा करतात. त्यांच्यामते तत्वांचा / लक्षणांचा शोध एक चुकीचा मार्ग आहे व त्यांच्यानुसार तत्व / लक्षणे वास्तव नसून अस्तित्व वास्तव आहे.

**५) निसर्गवादाचे गुणावगुण विवेचन : -**

अस्तित्ववादी तत्ववेत्ते निसर्गवादी तत्वज्ञानाप्रति देखील चिकित्सक आहेत. निसर्गवादींच्या अनुसार जीवन हे भौतिक – जीव – रासायनिक नियमांवर आधारित आहे, जे नियम कारणाच्या वश्विक नियमावर अवलंबून आहेत. प्राण्यांप्रमाणेच मानवाच्या कृती देखील यांत्रिक आहेत. हा अस्तित्ववाद्यांसाठी शाप सदृश आहे आणि ते मानवाच्या स्वातंत्र्याचा प्रखर पुरस्कार करतात. जे. पी. सारट्रे नुसार, मानव इतका स्वतंत्र आहे की त्याला त्याच्या स्वातंत्र्याचीच भीती वाटते.

**६) वैज्ञानिक संस्कृतीचे गुणावगुण विवेचन: -**

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रचंड प्रगतीमुळे जलद औद्योगिकरण आणि शहरीकरण घडून आले आहे. ह्याचा परीणाम म्हणजे गर्दीने भरलेली गावे ज्यांत व्यक्ती हरवून गेली आहे. जे सर्व घडते ते मोठ्या प्रमाणात आणि सर्व वैयक्तिक मूल्ये, व्यक्तिगत आवडी व नावडी पूर्णपणे दृष्टीआड झाल्या आहेत. आज व्यक्ती त्याचा अंत निवडत नाही; तर सर्व निर्णय संगणक किंवा संख्याशास्त्रीय नियम व माहिती घेतात. म्हणजेच विज्ञानाने मानवाचे मोल नगण्य ठरविले आहे. म्हणूनच अस्तित्ववादी वैज्ञानिक तत्वज्ञान व संस्कृतीचा विरोध करतात.

**७) मानवी दौर्बल्य आणि सुरक्षा यांवर अवधान: -**

आजच्या विज्ञान युगात, मानव दडपण, चिंता, वैफल्य, निराशा, भय आणि अपराधी भावना यासह जीवन व्यतीत करीत आहे. त्याच्या स्वतंत्र अस्तित्वास सतत धोका निर्माण होतो आहे. म्हणूनच त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या सुरक्षेसाठी त्याला एक चिंतामुक्त, तणावमुक्त पर्यावरण मिळणे आवश्यक आहे.

म्हणजेच, अस्तित्ववाद ही एक तत्वज्ञानविषयक चळवळ आहे जी अस्तित्वाचा अर्थ आणि स्वतंत्र अस्तित्व असलेल्या व्यक्तींच्या मूल्याचा शोध घेणारा अभ्यास आहे. तत्वज्ञानाच्या इतर क्षेत्राप्रमाणे अस्तित्ववाद व्यक्तीस एक संकल्पना न मानता, व्यक्तीच्या व्यक्तिनिष्ठतेस वस्तुनिष्ठतेपेक्षा अधिक मुल्यवान समजतो. परिणामत:,कोणत्याही वैज्ञानिक किंवा तत्वज्ञान विषयक अभ्यासापेक्षा जीवनाच्या अर्थाशी निगडित प्रµन आणि व्यक्तिनिष्ठ अनुभव अधिक महत्वपूर्ण मानले जातात.

**तुमची प्रगती तपासा :**

१. अस्तित्ववाद म्हणजे काय?

२. औद्योगिक विकासाचे परिणाम काय होते?

३. आदर्शवाद आणि निसर्गवादाच्या विरोधातील अस्तित्ववादाची चिकित्सक बाजू मांडा.

४. व्यक्तिनिष्ठता आणि मानवी स्वातंत्र्य यांच्या महत्वाची अस्तित्ववादाच्या संदर्भात चर्चा करा.

५. अस्तित्व अग्रक्रमाने प्रधान लक्षण तुम्हालामान्य आहे का? तुमच्या उत्तराचे समर्थन करा.

## ३क. ८ अस्तित्ववादाचे प्रमुख पुरस्कर्ते

सोरेन किर्केगार्ड (१८१३-१८५५) यांस आधुनिक अस्तित्ववादाचा जनक मानले जाते. तो पहिला युरोपीयन तत्वज्ञानी आहे. ज्यास अस्तित्ववादी हे बिरूद चिकटले आहे. त्याच्या मते, व्यक्तिनिष्ठता आणि तीव्रता हे सत्य व खरेपणाचे निकष मानले पाहिजेत. अस्तित्वाच्या प्रखर क्षणांत, विशेषत: दु:खमय निर्णयांच्या प्रसंगी आपण वास्तवास स्पर्श करतो. ह्या क्षणांचे वैशिष्ट्य म्हणजे गाढी चिंता, आणि अशा क्षणांतच जीवनाचे खरे सार समजते आणि फक्त कल्पनांची एक प्रणाली म्हणून तिला आपण म्हणू शकत नाही.

फ्रेडरिच नित्झ्च (१९४४-१९००) अस्तित्ववादाच्या उदयात एक प्रमुख व्यक्ती. त्याच्या नुसार अतिशय बुध्दिमान मानवाचे तत्व, म्हणजेच अद्वितीय मानव, स्वीकारुन ख्रिस्ती धर्मांवर विजय मिळविणे.

मार्टिन हिडेगर (१८८९-१९७६) ने त्याच्या 'अस्तित्व आणि काळ' ह्या पुस्तकामध्ये मानवी अस्तित्वाचे प्रभावी विश्लेषण दिले आहे, त्यामध्ये काळजी, चिंता, अपराधी भावना व सर्वांत जास्त मृत्यू ह्या अस्तित्ववादाच्या प्रमुख व महत्त्वपूर्ण विषयांवर विवेचन केले आहे.

munotes.in

जीन पॉल सार्टे म्हणतो की मानवाच्या अस्तित्वास त्याच्या लक्षणांपेक्षा अग्रमान आहे. 'मानव दुसरे काही नसून त्याचे हेतू आहेत, तो जोपर्यंत स्वत:चे सत्यस्वरुप ओळखतो तोपर्यंत अस्तित्वात राहतो, म्हणून तो त्याच्या कृतींची गोळा बेरीज आहे, दूसरे तिसरे काही नसून मानव म्हणजे त्याचे जीवन."

## ३क. ९ अस्तित्ववादातील काही पुनरुद्भवी विषय

सर्व अस्तित्ववादी तत्ववेत्यांमध्ये स्वातंत्र्य, निर्णय आणि जबाबदारी हे प्रमुख विषय आहेत. हे सर्व वैयक्तिक अस्तित्वाचा गाभा आहेत. स्वातंत्र्याचा उपयोग आणि भविष्याला आकार देण्याची क्षमता मानवाला पृथ्वीवरील इतर सर्व प्राणीमात्रांपेक्षा वेगळा ठरविते. मुक्त आणि जबाबदार निर्णयांमुळे मानव स्वत:ची सत्यता सिध्द करतो. अस्तित्ववादी विषयांचा आणखी एक पुनरुद्भवी गट, अपराधी भावना, विरक्ती, निराळा, मन:स्थिती, बदलत्या भावना, भावनाजीवन व मृत्यू यांसारख्या विषयांचा समावेश करतो. यांवरील चर्चांचा पारंपारिक तत्वज्ञानामध्ये प्रामुख्याने उल्लेख नाही परंतु अस्तित्ववादामध्ये त्यांवर सविस्तर चर्चा घडते. अस्तित्ववादीसाठी मानव हा विश्वाच्या पसार्यातील निव्वळ एक अंश नसून दु:खद संघर्षाची शक्यता असलेल्या तणावपूर्ण संबंधाच्या वेळी त्यासाठी उभा राहणारा आहे.

**तुमची प्रगती तपासुन पहा: -**

१. काही अस्तित्वावादींची नावे लिहा.

२. सात्रे आणि निएट्झच ची मते स्पष्ट करा.

३. अस्तित्ववादाचे नेहमी पुनरावृत्ती होणारे विषय कोणते आहेत?

४. अस्तित्ववादी तत्वज्ञानाविषयी तुमच्या शब्दांत दहा वाक्ये लिहा.

## ३क. १० अस्तित्ववादाचे शैक्षणिक तत्वज्ञान

मानवाला सत्याचे ऐक्य प्रदान करणे हा शिक्षणाचा उद्देश आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये अस्तित्ववादाचे योगदान पुढील प्रमाणे आहे.

- **शिक्षणाचे ध्येय**

सर्वांत महत्वपूर्ण प्रकारचे ज्ञान म्हणजे मानवाच्या निवडीचे व परिस्थितीचे ज्ञान असे अस्तित्ववाद मानतो. शिक्षण म्हणजे निवडीच्या स्वातंत्र्याप्रति जागरुकता विकसित करण्याची प्रक्रिया, आणि स्वत:च्या निवडीची जबाबदारी याचा अर्थ.आणि म्हणून गट प्रमाणके, अधिकार आणि सामाजिक, राजकीय, तत्वज्ञानविषयक, धार्मिक अशा स्थापित व्यवस्थांची कल्पना धुडकावून लावते. अस्तित्ववादी मूलभूत सत्य किंवा परंपरांच्या काही रिवाजांची, प्रमाणाची जाण ठेवतो. या संदर्भात अस्तित्ववाद, आदर्शवाद व वास्तववादाच्या कल्पनांच्या विरोधात जातो.

munotes.in

**संपूर्ण विकास :-**

शिक्षणातून संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास हे अस्तित्ववादाचे ध्येय आहे. परिपूर्ण मानव हे शिक्षणाचे ध्येय असावे. चारित्र्य सवंर्धन आणि आत्म-प्रचिती यांच्या पूर्ततेसाठी शिक्षणाचे ध्येय असावे. अस्तित्ववादी वर्गामध्ये विषयवस्तूस दुय्यम स्थान असते. त्यांच्या विचारांची, भावनांची आणि कृतींची पूर्ण जबाबदारी घेणारी एकमेवाद्वितीय व्यक्ती अशी स्वत:ची ओळख समजून घेण्यास व स्वत:ची प्रशंसा करण्यास शिक्षण विद्यार्थ्यायाला सहाय्य करते. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये तर्का बरोबरच भावनांचाही समावेश असतो म्हणून अस्तित्ववाद फक्त बुध्दि नव्हे तर पूर्ण व्यक्तीच्या शिक्षणाची मागणी करतो.

**व्यक्तिनिष्ठ ज्ञान : -**

सद्य वैज्ञानिक युगाने वस्तुनिष्ठ ज्ञानाचे एवढे अवडंबर माजविले आहे की ही संज्ञा अत्यंत अवास्तव, अगम्य, आणि असंबंधित वाटू लागली आहे. अस्तित्ववादी दर्शवून देतात की वस्तुनिष्ठ ज्ञानापेक्षा व्यक्तिनिष्ठ ज्ञान अधिक महत्वाचे आहे. त्यांच्या मते सत्य म्हणजे व्यक्तिनिष्ठता हे मानवी मूल्य आहे आणि मानवी मूल्ये कधीही तथ्ये असू शकत नाहीत. मूल्यांची तथ्यांमध्ये झालेली अवनती मूल्यांवरील श्रध्देचा ऱ्हास करणारी ठरली आहे. म्हणूनच शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर विज्ञान व गणित शिकविण्याबरोबरच मानव्य विषय, कला, साहित्य यांनाही अभ्यासक्रमामध्ये योग्य स्थान दिले जावे. अति-वस्तुनिष्ठ वृत्तीमुळे आधुनिक माणसास अनेक समस्या येत आहेत. अस्तित्ववादी कल्पनांच्या प्रकाशात ह्यासाठी व्यक्तिनिष्ठ दुरुस्ती आवμयक आहे.

**पर्यावरणाचे महत्त्व : -**

सद्य औद्योगिक, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक पर्यावरण मूल्यहीन आहे. त्यामुळे ते संभ्रम, भ्रष्टाचार, तणाव आणि संघर्षास सहाय्य करते. आत्म-विकास आणि आत्म-जागरुकता यांस पोषक असे पर्यावरण प्रदान करण्याचा प्रयत्न अस्तित्ववाद करतो. शाळेतील ह्या पर्यावरणास मानव्य विषय, कला, साहित्य यांच्या योगदानाची गरज आहे. त्यामुळे अध्ययनार्थीच्या स्वतंत्र्य व्यक्तिमत्वाचा विकास होईल आणि तो सामाजिक चक्रातील दाता बनून राहणार नाही. त्याचा एका आत्म-जागरुक व संवेदनशील व्यक्तीमध्ये विकास होईल.

**बालक-केंद्रित शिक्षण : -**

अस्तित्ववादी शिक्षण बालक केंद्रित आहे. ते बालकास पूर्ण स्वातंत्र्य देते. स्वत:स ओळखण्यासाठी आणि स्वत:चे अस्तित्व जाणण्यासाठी शिक्षकाने बालकास सहाय्य करावयाचे आहे. नैसर्गिक विकासासाठी स्वातंत्र्याची आवश्यकता असते. शिक्षणाने अपूर्णावस्थेचे पूर्णावस्थेत रुपांतर करावयाचे आहे. व्यक्तीच्या गरजा व बालकाच्या क्षमता यांनुसार शिक्षण असावे. बालकाचा स्वयंशी असलेला संबंध दृढ करण्याचे काम शिक्षणाद्वारे झाले पाहिजे.

- **अभ्यासक्रम**

काय अभ्यासायचे याची निवड करण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यास अस्तित्ववाद देतो तसेच सत्य म्हणजे काय व सत्य ठरविण्याचा निकष निश्चित करण्याचेही स्वातंत्र्य देतो. पध्दतशीर ज्ञान व रचनात्मक शिस्त अभ्यासक्रम टाळतो व अनेक अध्ययन परिस्थितीतून निवड करण्यास विद्यार्थ्याला मुभा देतो. कोणते ज्ञान ग्रहण करावयाचे आहे हे अध्ययनार्थी ठरवितो. मानव्य विषयांना साधारणत: भरपूर महत्त्व दिले जाते. विद्यार्थ्याच्या सर्जनशीलतेस व आत्मअभिव्यक्तीस वाव देण्यासाठी एक मार्ग म्हणून अप्रत्यक्ष अनुभव प्रदान करण्यासाठी या विषयांचा भरपूर उपयोग केला जातो. उदा. ऐतिहासिक घटकांवर भर देण्यापेक्षा अस्तित्ववादी ऐतिहासिक व्यक्तींच्या कृतीवर प्रकाशझोत टाकतो, कारण या व्यक्ती विद्यार्थ्यांच्या वर्तनास वळण लावणारे आदर्श बनू शकतात.

शिक्षणाचा अस्तित्ववादी उपागम वास्तववादी उपागमाच्या बरोबर उलटा आहे. अभ्यासक्रमाच्या क्षेत्रात वास्तववादी विज्ञानावर विशेष भर देतात, तर अस्तित्ववादामते विज्ञान व वस्तुनिष्ठ शिक्षण आपले स्वत:शी असलेले संबंध तोडून टाकते. विज्ञान आंतरिक प्रचिती व शांती मिळविण्यास सहाय्य करीत नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की विज्ञानाचे शिक्षण दुर्लक्षित रहावे.  ह्याचा अर्थ असा की विज्ञानासह वाङ्मय विषय, नीतिशास्त्र आणि धर्मशास्त्र यांचाही समावेश असावा. या मताशी सहमत काही अभियांत्रिकी महाविद्यालयांनी तत्वज्ञान, नीतिशास्त्र आणि समाजशास्त्र यांचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे. ह्या संश्लेषणात्मक उपागमाशिवाय शिक्षणाची चारित्र्य संवर्धन व व्यक्तिमत्व विकास ही ध्येये साध्य होणार नाहीत.

- **अध्ययन अनुभव**

तत्वज्ञानविषयक संवाद आणि निवड करण्याच्या कृती उपलब्ध करुन देणारे अनुभव व विषय अस्तित्ववादी अभ्यासक्रमामध्ये असतात. वैयक्तिक व व्यक्तिनिष्ठ निवडीमुळे भावनिक, सौदर्यात्मक आणि तत्वज्ञानविषयक विषय योग्य ठरतात.  साहित्य, नाट्य, चित्रपटनिर्मिती, कला इ. महत्वाचे मानले जातात. कारण त्यातून मानवी परिस्थितीचे व निवड करण्याच्या परिस्थितीचे प्रतिबिंब दिसते.  स्वयं-अभिव्यक्ती, प्रयोग यांवर भर असतो.  भावना, मन:स्थिती व मर्मदृष्टि यांचा माध्यम म्हणून समावेश होतो.

स्वयं अभिव्यक्तीस वाव देणार्या साहित्याने संपन्न असे वर्ग आणि शाळा म्हणजे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या जीवनविषयक संवादास, चर्चेस वाव देणारे स्थान.

- **शिक्षक**

अस्तित्वावादानुसार, विद्यार्थी 'स्व' शी संपर्क साधू शकेल, त्याबद्दल जागरुक बनेल व आत्म-प्रचिती साध्य करील यासाठी शैक्षणिक परिस्थितींची निर्मिती शिक्षक करतो. यासाठी स्वत: शिक्षकामध्येही अस्तित्ववादी वृत्ती असणे आवश्यक आहे.  त्याला स्वत:ला आत्म-प्रचितीचा अनुभव असावा म्हणजे तो विद्यार्थ्यांना ह्या प्रक्रियेमध्ये

मार्गदर्शन करु शकेल. जीवनात अंगिकारायचे विविध मार्ग उघड करुन आणि ज्यामध्ये त्यांना त्यांचा मार्ग स्वतंत्रपणे निवडावयाचा आहे असे पर्यावरण निर्माण करुन विद्यार्थ्यांना स्वत:चे तत्व, लक्षण ठरविण्यास सहाय्य करणे, ही शिक्षकाची भूमिका असते.

अस्तित्ववादी पध्दती व्यक्तिवर केंद्रीत असतात. अध्ययन स्व-गतीने, स्वयं-निर्देशित असते आणि प्रत्येक विद्यार्थ्याशी मुक्त आणि प्रामाणिकपणे आंतरक्रिया साधणाऱ्या शिक्षकाशी व्यक्तीचा मोठ्या प्रमाणावर संपर्क असतो.

- **विद्यार्थी**

'स्व' ची प्रचिती येण्यासाठी विद्यार्थ्याला पूर्णपणे मुक्त वाटले पाहिजे. शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली, अंतराभिर्मुखतेद्वारे आत्म-प्रचिती साधण्याचा प्रयत्न विद्यार्थ्याने केला पाहिजे. शिक्षकाद्वारे नेमून दिलेली शिस्त विद्यार्थी पाळतो, तो बेजबाबदार बनत नाही. त्याच्या व्यक्तित्वाचा पूर्ण विकास घडवून आणणे हा त्याला दिलेल्या स्वातंत्र्याचा हेतू असतो.

- **धार्मिक व नैतिक शिक्षण**

अस्तित्ववादी विशेष करुन धार्मिक व नैतिक शिक्षणावर भर देतात. धर्म व्यक्तीला विकसित होण्याची मुभा देतो. विश्वातील त्याच्या अस्तित्वाचे आकलन व्यक्तीला धार्मिक शिक्षणामुळे होते. आत्म-प्रचितीचा धार्मिक मार्ग हे शिक्षण दाखविते. नैतिक शिक्षण हे धार्मिक शिक्षणाशी अत्यंत जवळून संबंधित आहे. निश्चितातून अनिश्चिताची प्रचिती येण्यासाठी धार्मिक व नैतिक शिक्षण अंतआत्म्याचा विकास करतात.

## ३क. ११ चिकित्सक मूल्यमापन

आपला समाज आणि बहुतेक आधुनिक समाजांमध्ये शिक्षण म्हणजे, संस्थीय अध्ययन व सामाजिकरण ज्यासाठी गट अध्यापन, व्यक्तिगत वर्तनावर बंधने आणि नोकरशाही संघटनांची आवµयकता असते. त्यामुळे काही समीक्षकांच्या (प्रामुख्याने परंपरावादी) मते अस्तित्ववादी तत्वज्ञानाचे शालेय उपयोजन मर्यादित आहे. अशी प्रक्रिया आहे जी विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्यास मर्यादा घालते. शाळेतील स्वातंत्र्य हे प्रौढ अधिकार आणि बहुसंख्यांकांचे प्रमाण किंवा विश्वास किंवा समान सांस्कृतिक पायावर आधारित असते. अस्तित्ववादी व्यक्ती जी स्वत:च्या इच्छेनुसार व निवडीनुसार वर्तन करण्याचा प्रयत्न करील तिला शाळेमध्ये व तत्सम इतर मोठ्या औपचारिक संघटनांमध्ये अडचणींना सामोरे जावे लागेल.

## ३क. १२ सारांश

तत्वज्ञान आणि शिक्षण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, म्हणजेच विविध तत्वज्ञाने शिक्षणाचे विविध पैलू मांडतात आणि शिक्षण मानवाचे व त्याच्या जीवनाचे



munotes.in

तत्वज्ञान बदलू शकते. एक तत्वज्ञान विषयक कल्पना म्हणून अस्तित्ववाद क्रांतीकारी, गतीमान व प्रखर होता, त्याने विचारप्रक्रियेत बदल घडवून आणला व व्यक्तीचा विचार पुढे आणला. त्याची शिक्षणावरील मते नाट्यमय वाटत असली तरी योग्य अर्थाने आणि माफक प्रमाणात स्वीकारली तर आजच्या भौतिकवादी समाजामध्ये आवश्यक आहेत.

ह्या घटकामध्ये आपण अस्तित्ववादी तत्वज्ञान अभ्यासले, तत्कालीन कट्टर प्रणालीवरील त्याची चिकित्सा पाहिली. अस्तित्ववादी तत्वज्ञानाने मानव, त्याचे अस्तित्व त्याच्या भावना व व्यक्तिनिष्ठतेस पुढे आणले, ते व्यक्तीवादाचे व मानवाच्या एकमेवाद्वितीयत्वाचे पुरस्कर्ते होते.

अस्तित्ववादाच्या विविध पुरस्कर्त्यांची मते आणि त्यांनी मांडलेले विषय त्यांचे तत्वज्ञान समजण्यास सहाय्य करतात.

अस्तित्ववादाचे शैक्षणिक तत्वज्ञान ध्येये, अभ्यासक्रम, शिक्षकाची भूमिका, अध्यापन पध्दती, अध्ययन अनुभव, धार्मिक व नैतिक शिक्षण यांवर भाष्य करते.

## ३क.१३ तुमची प्रगती तपासा

१. अस्तित्ववादा नुसार शिक्षक व विद्यार्थ्यांची भूमिका काय आहे?

२. अध्यापन-अध्ययन प्रक्रियेमध्ये अध्ययन अनुभवांचे महत्त्व मांडा.

३. अस्तित्व वादानुसार शिक्षणाचे ध्येय काय आहे?

४. अस्तित्ववादी कोणत्या प्रकारच्या अभ्यासक्रमाची शिफारस करतो?

५. आजच्या शिक्षण प्रणालीमध्ये अस्तित्ववादाचे महत्त्व मांडा. तुमचे उत्तर सोदाहरण स्पष्ट करा.

६. अस्तित्ववादाचा सामान्य व शैक्षणिक तत्वज्ञानाचे चिकित्सक मूल्यमापन करा.

❖❖❖❖

munotes.in

# ४ अ

## डॉ. झाकिर हुसैन

## (१८९७- १९६९)

**प्रकरणाची रचना :**

४ अ.० उद्दिष्ट्ये

४ अ.१ प्रस्तावना

४ अ.२ जीवनवृतांत

४ अ.३ डॉ. झाकिर हुसैन यांचे तत्त्वज्ञान

४ अ.४ डॉ. झाकिर हुसैन यांचे शिक्षणविषयक विचार

४ अ.५ चार अत्यावश्यक मूल्ये

४ अ.६ शैकक्षणिकदृष्टया उत्पादनशील कार्य

४ अ.७ स्वातंत्र्य, शिस्त आणि अधिकार

४ अ.८ शिक्षकाची भूमिका

४ अ.९ मूल्यांचा रक्षणकर्ता म्हणून शिक्षक

४ अ.१० शिक्षण आणि संस्कृती

४ अ.११ आदर्श शाळेची वैशिष्टये

४ अ.१२ डॉ. झाकिर हुसैन यांचे शैक्षणिक योगदान

४ अ.१३ सारांश

४ अ.१४ प्रश्नावली

munotes.in

### ४ अ.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्ही खालील गोष्टी साध्य करु शकाल.

- डॉ. झाकिर हुसैन यांच्या सर्वसाधारण तत्त्वज्ञानाचे विविध पैलू स्पष्ट करता येतील.
- त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान समजेल
- उत्तम शाळेकडून असलेल्या त्यांच्या अपेक्षा स्पष्ट करता येतील.
- त्यांच्या शैक्षणिक योगदानाला दाद देता येईल.

## ४ अ.१ प्रस्तावना

धर्मनिरपेक्ष, स्वतंत्र आणि सुसंस्कृत भारताचे डॉ. हुसैन हे अत्यंत संवेदनशील, चैतन्यदायी, प्रयोगशील असे शिक्षणतज्ज्ञ व सुविद्य असे प्रतिनिधी होत. त्यांची शिक्षणाप्रती निष्ठा आणि त्याग सर्वश्रूत असून मुलोद्योगी शिक्षणाचे ते मुख्य पुरस्कर्ते होत. भारतीय जनतेचे हे महद्भाग्य होय की त्यांना दोन महत्त्वाचे शिक्षणतज्ज्ञ; डॉ. राधाकृष्णन आणि डॉ. झाकिर हुसैन हे राष्ट्रपती म्हणून लाभले. त्यांनी राष्ट्रपती पद भूषविल्यामुळे शिक्षकी व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त झाली तसेच राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व आणि शैक्षणिक प्रथांना वेगळी दिशा मिळाली.

## ४ अ.२ जीवनवृतांत

डॉ. झाकिर हुसैन यांचा जन्म हैद्राबाद येथे ८ फेब्रुवारी १८९७ रोजी झाला. ते अवघे ८ वर्षांचे असताना त्यांच्या वडीलांचा मृत्यु झाला आणि ते उत्तर प्रदेश येथील कैमगंज या गावी वडीलोपार्जित घरी राहावयास आले. इटावा येथे त्यांचे शिक्षण झाल्यानंतर अलीगढ येथील मोहम्मदन अँग्लो इंडियन महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. एम.ए. चा अभ्यास करत असताना त्यांनी गांधीजींनी ब्रिटिशांविरुध्द असहकार चळवळीसाठी केलेले कळकळीचे आवाहन ऐकले आणि महाविद्यालय सोडून असहकार चळवळीस वाहून घेतले. त्यांनी जामिया मिलिया इस्लामिया (राष्ट्रीय मुस्लिम विद्यापीठ) या विद्यापीठाची १९२० साली अलिगढ येथे स्थापना केली. स्वतःची उच्च शिक्षणाची भूक भागविण्यासाठी ते बर्लिन विद्यापीठात दाखल झाले आणि अर्थशास्त्रातील पी.एच.डी. प्राप्त केली. १९२६ मध्ये भारतात परत आल्यानंतर जामिया मिलिया इस्लामिया, दिल्ली या विद्यापीठाचे ते कुलगुरु म्हणून वयाच्या २९ व्या वर्षी अधिभार स्वीकारला. १९४८ साली अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचे प्र-कुलगुरु म्हणून त्यांची निवड करण्यात आली. १९५२ साली त्यांना राज्यसभेचे सभासदत्व बहाल करण्यात आले. १९५७ साली ते बिहारचे राज्यपाल झाले. १९६२ साली भारताच्या उपराष्ट्रपदी त्यांची निवड झाली तर १९६७ साली भारताच्या राष्ट्रपतीपदासाठी त्यांची निवड होऊन १९६९ साली त्यांच्या मृत्युपर्यंत त्यांनी ते पद भूषविले. राष्ट्रपती म्हणून पदोन्नती झाल्यानंतर ते म्हणाले, "हया पदासाठी माझी निवड होण्यामागे कारण म्हणजे माझा जनतेच्या शिक्षणाशी असलेला संबंध होय. ४७ वर्षे एका शिक्षकाने त्याच्या आयुष्यातील सर्वोत्तम वर्षे राष्ट्रीय शिक्षणाशी संबंधित असण्याचा हा राष्ट्राने केलेला बहुमान आहे".

## ४ अ.३ डॉ. झाकिर हुसैन यांचे तत्त्वज्ञान

डॉ. हुसैन हे आदशर्वादी होते. त्यांनी प्लेटोच्या 'रिपब्लिक' चा अत्यंत उत्साहाने उर्दुत केलेला अनुवाद हा त्याचा सबळ पुरावा होय. ते म्हणतात, "कमकुवत विश्वासाची जागा निरोगी सवयींनी, अयोग्य संस्थांची जागा प्रगतशील संस्थांनी घेतली पाहिजे. आपणांस मिळणारे मार्गदर्शन हे बुध्दिच्या संधीप्रकाशातून न येता विश्वासाच्या स्वच्छ

munotes.in

सूर्यप्रकाशाकडून मिळाले पाहिजे.

ते हाडाचे धर्मनिरपेक्ष, मानवतावादी आणि दूरदशीर् होते. त्यांनी इस्लामी तत्वे आणि त्यांचे राष्ट्रीयत्व यांना क्षुद्र चाकोरीत जाऊ दिले नाही तर पूर्व आणि पश्चिम, मुस्लिम आणि मुस्लिमेतर, प्राचीन आणि आधुनिकतेला आनंददायी प्रत्यय प्राप्त करून दिला.

मोराइस यांच्या शब्दात "त्यांचे भारतावर प्रेम होते. त्यांचे जगावर प्रेम होते ते सत्य, न्याय आणि मानवतेवर प्रेम करणारे होते. त्यांनी त्यांच्या जीवनाच्या सुरुवातीच्या काळापासून मानवतावादी शिक्षणाचा पुरस्कार केला.

वास्तवतेबाबत ते म्हणतात, की जग हे वास्तव आहे. भौतिक आणि आध्यात्मिक अशी दोन जगे अस्तित्वात असून भौतिक जग हे इंद्रियजन्य आहे. त्याचा संबंध जगातील वस्तूंशी येतो. आध्यात्मिक जगाचा संबंध आत्मा आणि आत्मनाशी येतो; म्हणून जगातील आनंद हा दुय्यम समजला समजला जातो. आध्यात्मिक जग हे मानसिक पातळीवर कल्पनांच्या द्वारे प्रप्त करुन घ्यावयाचे असते.

त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानात ते मानवाला सर्वोच्च स्थान देतात, आणि मानवाच्या क्षमतांचा सर्वाधिक विकास करण्यास पुढे सरसावतात. त्यांची मानवावर श्रध्दा होती आणि ती त्यांच्या तत्त्वज्ञानातून आणि शैक्षणिक विचारांतून स्पष्टपणे दिसून येते.

## ४ अ.४ डॉ. हुसैन यांचे शैक्षणिक विचार

डॉ. हुसैन यांच्या मते हया देशातील शिक्षण हे दुर्दैवाने अपंग झाले आहे. त्यांच्या मते शिक्षण हे सुसंस्कृत समाजासाठी जीवनावश्यक असा रस आहे. शिक्षण हे सद्यस्थितीला पोहोचण्यास पुढील गोष्टी कारणीभूत आहेत :

१) एखाद्या वर्गात तासनतास निष्क्रीय होऊन बसून राहणे; की जे बालकांच्या मूलभूत वृत्तीशी न जुळणारे आहे. अशा व्यवस्थेमध्ये बालकाकडे एकेकाळी असलेली नैसर्गिक उत्कटता नष्ट करुन बालकाला निरुत्साही, नीरस बनविले जाते.

२) चांगल्या शिक्षकांचा तुटवडा प्रचलित व्यवस्थेतील उपलब्ध शिक्षक हे क्रूर निष्ठूर आणि लष्करी खाक्याचे आहेत.

३) बोजड आणि अर्थहिन अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांना अविवेकी श्रम करण्यास भाग पडतो.

४) शिक्षण म्हणजे अध्ययनकर्त्याला नियोजित पध्दतीने तयार शैक्षणिक आदर्श आणि विहित आशयानुसार घडविणे हया चुकीच्या समजूतीला प्रचलित शिक्षणव्यवस्था आणि लोकशाही मूल्यांवर श्रध्दा असलेला अध्यापक रददबादल ठरवितो. ह्या अध्यापकांचा विश्वास आहे की शिक्षण ही विद्यार्थी घडविण्याची प्रक्रिया नसून अध्ययनकर्त्यातील एकमेवाद्वितीय आणि विशिष्ट अशा व्यक्तित्वाला मोकळीक देऊन स्वतंत्रपणे वाढ देण्याची प्रक्रिया आहे. भारतीय शिक्षणाचे यश लोकशाही

जीवनपध्दती वाढीस लावण्यासाठी स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा विकास करण्यास कितपत मदत करु शकते, तसेच हया स्वतंत्र सुसंवादी व्यक्तित्वाचा सामाजिक गरजा भागविण्यासाठी कितपत उपयोग करुन घेते आणि निःस्वार्थीपणा कशाप्रकारे जोपासते हयावर अवलंबून आहे.

डॉ. झाकिर हुसैन यांच्या मते लोकशाहीतील शिक्षणाचे प्रमुख तत्त्व हे बालकातील व्यक्तित्वाचा आदर करणे हे होय; असे बालक की जे बुध्दिद्वारे स्वेच्छेने शैक्षणिक प्रक्रियेत सहभागी होऊन चांगला नागरीक बनेल. कारण लोकशाही म्हणजे प्रत्येक नागरीकाने स्वतःप्रती आणि समाजप्रती असलेल्या कर्तव्याचे पालन करणे होय. जेव्हा शिक्षणाद्वारे क्षमतांचा शोध घेऊन विकास केला जाईल तेव्हाच हे शक्य होईल.

शिक्षणप्रक्रियेची तुलना ते मानवी शरीराच्या विकासाशी करतात. ज्याप्रमाणे पिंडापासून पूर्ण विकसित माणूस हा योग्य खाण्याजोगे अन्न, हालचाल आणि व्यायाम याद्वारे शारीरिक आणि रासायनिक नियमांचे पालन केल्यामुळे तयार होतो, त्याचप्रमाणे मन हे सुरुवातीच्या अवस्थेपासून मानसिक खाद्य आणि व्यायाम यांद्वारे पूर्ण उत्क्रांतीत होते. व्यक्तिच्या मनाचा विकास हा शैशवावस्थेपासून झाला पाहिजे. त्यांच्यामते शिक्षणाची प्रक्रिया ही सातत्यपूर्ण असून, मूक्कामापेक्षा प्रवासाला जास्त महत्त्व आहे.

बर्यादचा साधन हीच साध्य बनतात याबाबतही डॉ. हुसैन खंत व्यक्त करतात. त्यांच्या मते शाळा ही सैतानी मनाची निर्मिती आहे, नाही तर आता शाळा जे करत आहे ते त्या करत नसत्या. ते म्हणतात, "शाळेत जाणे म्हणजे तीन” बाबत शिकणे नसून जीवनाची प्ररंभिक तयारी आहे. त्यांना शाळा हया समाजाभिमुख, कुटुंब आणि व्यक्तिभिमुख हव्या होत्या.

कृतीयुक्त ज्ञान मिळवून त्याचेच संवर्धन केले पाहिजे हया विधानाचे समर्थन ते इंग्लिश तत्त्वतेच्या शब्दात करतात, "समाजात ज्ञान हे विशिष्ट गटाच्या खाजगी ताब्यात असेल तर ते ज्ञान निष्क्रिय असते. त्यांच्या मते बदलत्या जगात शिक्षणाने प्रभावी नेतृत्व दिले पाहिजे. डॉ. हुसैन यांच्यामते, (शिक्षणाचे) प्राथमिक उद्दिष्ट हे समुदायाला नेतृत्व देणे हे असून शैक्षणिक बाबींचा तो जीवनाधार आहे.

विद्यापीठीय शिक्षणाबाबत त्यांची मते अत्यंत सुस्पष्ट आहेत. शिक्षणाचे मूलभूत आयुध श्रम हे आहे. शिक्षण हे निरंतर असले पाहिजे असे त्यांना वाटते. व्यक्ती ज्या समाजात राहाते त्या समाजाला प्रभावी नेतृत्व देण्याची क्षमता आणि समर्पकताही शिक्षणात हवी. जेव्हा श्रमाला प्रितष्ठा प्रप्त होईल तेव्हाच विद्यापीठ सामाजिक ऋण फेडू शकतील. हया संदर्भात रामस्वामी अय्यर म्हणतात की विद्यापीठीय शिक्षणाचा प्रमुख हेतू हा व्यक्तीला देशाच्या विभिन्न अशा वैज्ञानिक आणि तांत्रिक गरजांची पूर्तता करण्यासाठी पात्र बनविणे हा होय.

munotes.in

समस्या सोडविण्याऐवजी टाळाटाळ करण्याची भारतीय वृत्ती त्यांना आवडत नाही. कोणतीही समस्या न टाळता तिचा सामना केला पाहिजे, असे ते म्हणतात. दारिद्रय, घाण, रोगराई, अकार्यक्षमता यांबाबत सहनशील असलेल्या लोकांचा त्यांना राग येई ते म्हणतात, "सहनशीलतेची कष्टाळूपणाशी सांगड न घालणे हा गुन्हा आहे. जर विद्यापीठाने आपली कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडली तर डॉ. हुसैन यांनी उत्कटतेने आणि मनःपूर्वक नवीन जगाची पाहिलेली स्वप्ने प्रत्यक्षात न येण्याचे कोणतेही कारण नाही.

'विज्ञान आणि 'मानव्य यांबाबत दीर्घकाळ सुरु असणाऱ्या विवादाबददलही डॉ. हुसैन यांची स्पष्ट मते होती. त्यांचा विश्वास होता की अलीकडच्या काळात आधुनिक जगाने केलेली प्रगती ही केवळ मानवापुढील सामाजिक आणि राजकीय समस्यांसाठी केलेल्या वैज्ञानिक ज्ञानाच्या वापरामुळे आहे. तंत्रज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात विशेष क्षेत्रे (Specialization) इतकी वाढली आहेत की त्या त्या विशिष्ट क्षेत्रातील भाषा इतर क्षेत्रातील तंत्रज्ञांना समजणे कठीण झाले आहे. सी.पी.स्नो यांनी हया घटनेचे वर्णन अत्यंत समर्पकरीत्या पुढील शब्दात केले आहे. ते म्हणतात, "एका शाखेचे ज्ञान दुसऱ्या शाखेपासून इतके विभिन्न कधीच नव्हते आणि एका शाखेचा विकास हा दुसऱ्या शाखेची किंमत मोजून आजच्या इतका कधीच केला जात नव्हता. डॉ. हुसैन म्हणतात की मानव्य आणि विज्ञान हया परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत. प्रत्येकाने हे लक्षात घेतले पाहिजे की विज्ञान हे मूल्यरहित विशेषतः नैतिक आणि नीतिविषयक मूल्यांशिवाय असूच शकत नाही. ते दाखवून देतात की विज्ञान हे नीतिरहित तत्त्वज्ञानाची एक प्रणाली आहे. नीतिरहित विज्ञान हे लगेचच सर्वांशी मैत्री करते; चांगल्या व वाईटशींदेखील; आणि जगाचे रुपांतर एका वास्तविक नरकात करण्यास सहाय्यीभूत होते.

भारताचे राष्ट्रपती झाल्यानंतर शपथविधीनंतरच्या भाषणात ते शिक्षणाचे महत्त्व सांगतात, शिक्षण हे राष्ट्रीय हेतूंच्या पूर्ततेचे प्रमुख साधन असून राष्ट्राचा दर्जा हा त्याच्या शैक्षणिक दर्जावर अवलंबून असतो.

डॉ. हुसैन यांनी शिक्षणाच्या पुढील ध्येयांवर भर दिला-

१) शिक्षणातून एकसमान राष्ट्रीय संस्कृतीचा विकास झाला पाहिजे.

२) शिक्षणाने उच्चतम जीवनविषयक मूल्ये विकसित केली पाहिजेत.

३) शिक्षणाद्वारे नागरिकत्वासाठी आवश्यक अशा गुणांचा विकास घडला पाहिजे.

४) शिक्षणाने पारंपरिक ज्ञान आणि प्रत्यक्ष कामातून स्फूर्ती घेतली पाहिजे.

५) शिक्षणातून सकारात्मक दृष्टिकोन घडला पाहिजे.

६) शिक्षणाने सामाजिक जाबाबदारीची भावना विकसित केली पाहिजे.

७) व्यावसायिक कार्यक्षमतेचा विकास शिक्षणातून घडला पाहिजे.

munotes.in

शिक्षण हे मालक आणि राजकारण त्याचा नोकर आहे असे शिक्षण व राजकारणाबाबत त्यांचे मत होते. शिक्षण आणि नैतिकतेबाबत ते म्हणतात की सत्ता ही नैतिकता आणि विज्ञान व तंत्रज्ञानाशी साधली गेली पाहिजे. शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाबाबत त्यांची मते अगदी सुस्पष्ट आहेत. वैज्ञानिकांनी आणि तंत्रज्ञांनी समाजहित डोळ्यासमोर ठेवले पाहिजे. शिक्षणाने बालकाचा संपूर्ण विकास केला पाहिजे. भारतीय शिक्षणातील पुढील त्रुटींबाबत ते खेद व्यक्त करतात. (१) भारतीय शिक्षण हे काही काळापासून साचलेल्या पाण्यासारखे झाले आहे. (२) भारतीय शिक्षण हे नवीन कल्पना आणि शिक्षणविषयक नाविन्यपूर्ण विचारांकडे दूर्लक्ष करते.

**आपली प्रगती तपासून पहा.**

१) डॉ. झाकिर हुसैन यांचे समजुतींबाबत (Belief) काय मत होते?

२) डॉ. झाकिर हुसैन यांना मानवतावादी का समजले जाते?

३) वास्तवतेबाबत त्यांचे काय मत आहे?

४) त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानात ते कशास सर्वाधिक महत्त्व देतात?

५) भारतीय शिक्षण हे पंगू आहे असे ते का म्हणतात?

६) शिक्षण आणि समाजातील परस्परसंबंधात त्यांचे काय मत आहे?

## ४ अ.५ चार अत्यावश्यक (महत्त्वाची) मूल्ये

पदवीदान सोहळ्यातील भाषणात त्यांनी तरुणांसाठी अत्यंत स्वाभाविक अशी चार मूल्ये दिली. ती म्हणजे आरोग्य, ताकद, सौंदर्य आणि स्वच्छता. हया अत्यंत साध्या गोष्टी समजावून घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची व्यापकता लक्षात येते. जेव्हा एखादा व्यक्ती आरोग्याचा पाठपूरावा करतो, तेव्हा तो निरोगी मन, निरोगी शरीर आणि चारित्र्यसंपन्नेची जोपासना करतो. ताकदवान शरीर हे प्रत्येकाला बलवान, जागरुक, शिस्तबध्द मन आणि उत्तम चारित्र्य देते. अशी व्यक्ती ठाम, कार्यकुशल, सात्यत्यपूर्ण असे व्यक्तिमत्व धारण करते. सौदर्य हे आंतरिक आणि बाहय सौदर्याशी तसेच आजूबाजूच्या जगातील सौदर्याशी संबंधित आहे. स्वच्छ शरीरात निरोगी मन वास करते आणि त्यामुळे जीवनही स्वस्थ होते.

## ४ अ.६ शैक्षणिकदृष्टया उत्पादनशील कार्य

डॉ. हुसैन यांनी अत्यंत समर्पक शब्दांत शिक्षणातील उत्पादन कार्याचा अर्थ सांगितला आहे. कार्याला त्यांनी प्रितष्ठा आणि पूजेच्या पातळीवर नेऊन ठेवले आहे. कार्याविषयीची त्यांची कल्पना ही पुस्तकी ज्ञानातून न येता समर्पितता आणि अनुभवातून आली आहे. ते म्हणतात, "या विषयावरील माझ्या वर्षानुवर्षाच्या चिंतनातून माझी धारणा झाली आहे की, कार्य हेच शिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे. कधीतरी ते हातांनी करावयाचे कार्य असते तर कधी बुध्दीने. जरी कार्यामध्ये शिक्षण देण्याची क्षमता असली तरी मी निरीक्षण आणि अनुभवाद्वारे अशाही मताला पोहोचलो आहे की सर्वच प्रकारचे काम व्यक्तिला शिक्षित

munotes.in

करत नाही. फक्त मूल्याधिष्ठित कामातच शिक्षित करण्याची पात्रता आहे. अशाप्रकारच्या कामाला ते 'शैक्षणिकदृष्टया उत्पादन कार्य'; ‘मनाला सुसंस्कृत करणारे कार्य’ असे म्हणतात.

त्यांची शिक्षणाबाबत इतर मते अशी आहेत :

१) उत्पादन कार्याचा मानसिक कार्याशी संबंध जोडला गेला पाहिजे.

२) कार्यानुभव शिक्षणाचा क्रम हा 'विचार आणि कृती, आणि 'कृती आणि विचार असा असला पाहिजे. शाळेचे खरे काम हे बालकांना कोणताही उपक्रम घेण्यापूर्वी विचार करण्याचे प्रशिक्षण देणे हे आहे. कार्य करण्यापूर्वी नियोजन केले पाहिजे यावर ते भर देतात. त्याबाबत 'काय? आणि 'कसे? यांचा सारासार विचार केला पाहिजे. कार्य हिच पूजा यावर त्यांची नितांत श्रध्दा होती.

## ४ अ.७ स्वातंत्र्य, शिस्त आणि अधिकार

स्वातंत्र्य आणि अधिकार हे परस्परविरोधी नाहीत. याचा ते पूनरुच्चार करतात. आंतरिक स्वातंत्र्याशिवाय शिक्षणात अधिकारवाणी नाही. सर्जनशील कामाशिवाय आणि सूरचित वातावरणाशिवाय स्वातंत्र्य असू शकत नाही. शाळा बालकाला काही टप्पे पार करण्यास मदत करते. सुरुवातीला शिक्षकांचा अधिकार हा अनुभव आणि परिपक्वतेतून आलेला असतो. अंतिमतः मात्र बालकात विकसित झालेल्या मूल्यांवर तो आधारित असतो. जबाबदारी, स्वातंत्र्य आणि शिस्त हया हातात हात घालून चालतात आणि शिक्षणाने विद्यार्थ्यात यातील प्रत्येकाचा विकास केला पाहिजे.

## ४ अ.८ शिक्षकाची भूमिका

शिक्षकाने विद्यार्थ्यांना जीवनविषयक उच्च मूल्यांच्या प्रप्तीसाठी संपूर्ण मदत केली पाहिजे. हे त्याने वैयक्तिक वागणूक आणि चारित्र्यातून केले पाहिजे. शिक्षक हा हुकूम देण्यासाठी किंवा वर्चस्व गाजविण्यासाठी नसून विद्यार्थ्यांची सेवा करण्यासाठी, त्यांना मदत करण्यासाठी आहे. विद्यार्थ्यांना स्वतःचे व्यक्तिमत्व असते आणि त्या व्यक्तिमत्वाची निगराणी आणि जोपासना आपण केली पाहिजे हे शिक्षकाला समजले पाहिजे. बालकाशी वागताना शिक्षक हा प्रेम आणि सहनशीलतेचे मूर्तीमंत रूप असला पाहिजे.

## ४ अ.९ मूल्यांचा रक्षणकर्ता म्हणून शिक्षक

कोणत्या प्रकारचा माणूस हा आदर्श शिक्षक बनू शकतो? डॉ. हुसैन यांच्याकडे याबाबत स्पष्ट दृष्टी आहे. त्यासाठी त्यांनी काही विशिष्ट तत्त्वांच्या आधारे मानवाचे वर्गीकरण केले आहे. केवळ सैध्दांतिक किंवा तात्त्विक माणसाचे मुख्य तत्व हे सत्य असते, माणसाचे कल्पक सौदर्य, माणसाची आर्थिक मिळकत, माणसाची धार्मिक मुक्ती, माणसाची राजकीय सत्ता आणि माणसाचे सामाजिक प्रेम. व्यक्तिंचा एकदम टोकाचा; शुध्द प्रकार सापडणे कठीण असते परंतु प्रत्येकात एखादे प्रभावी तत्त्व असते. डॉ. हुसैन यांच्या मते

सामाजिक प्रकारातील माणूस हा उत्कृष्ट शिक्षक बनू शकतो. सामाजिक प्रकारातील शिक्षकाकडे इतरांप्रती प्रेम, एकतेची भावना आणि बांधवताख् मदत करण्याची वृत्ती असते आणि त्यांना इतरांसाठी त्याग केल्यामुळे आनंद मिळतो. शिक्षक हा विद्यार्थ्यांवर हुकूम किंवा वर्चस्व गाजविण्यासाठी नसून त्यांना मदत व त्यांची सेवा करण्यासाठी असून विश्वास आणि प्रेमाने त्यांना घडविण्यासाठी आहे. समाजाने जतन केलेल्या सर्वोच्च मूल्यांचा शिक्षक हा राखणदार आहे. स्वतःच्या मनोहारी व्यक्त्मित्वाद्वारे हया मूल्यांचे संक्रमण करणे हे त्याचे भाविक कर्तव्य आहे.

## ४ अ.१० शिक्षण आणि संस्कृती

इतिहासात आपल्या भूतकाळाच्या नोंदी तसेच वारश्याची मूळे असतात. त्याची खोली आणि व्याप्ती ही खूपच व्यापक आहे. आपले वर्तमान हे भूतकाळातील अनुभवांच्या पायावर सद्यस्थितीचा विचार करुन उज्वल भविष्यासाठी असले पाहिजे. आपला इतिहास हा विविध संस्कृती आणि सभ्यतांनी, जागतिक धर्मांनी आणि श्रेष्ठ तत्त्वज्ञांनी समृध्द आहे. शिक्षणाने हया समृध्द वारशाची नीट छाननी करुन भावी पिढयांच्या नैतिक आणि आध्यात्मिक वृध्दीसाठी तो उपलब्ध करुन दिला पाहिजे. डॉ. हुसैन म्हणतात, शिक्षणाला उपयोगी आणि निरुपयोगी वारसा तसेच दुबळे करणार्या आणि बळकटी आणणाऱ्या परंपरामध्ये फरक करता आला पाहिजे.

## ४ अ.**११ आदर्श शाळेची वैशिष्टये**

मॉर्डन स्कूल, न्य दिल्ली येथे शाळा स्थापनेच्या समारंभात भाषण करताना त्यांनी चांगल्या शाळेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगितली.

१) **बालकातील व्यक्तित्वाचे ज्ञान :-** प्रत्येक बालकाच्या व्यक्तित्वाचे योग्य ते आकलन होणे ही शाळा आणि शिक्षकाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची काळजी असली पाहिजे. बालक हे विविध सामाजिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमीतून येत असते, त्यांच्याकडे विभिन्न क्षमता आणि रुची, भिन्न आवडीनिवडी आणि भिन्न व्यक्तिमत्व असते. शाळा आणि शिक्षकाने हे समजून घेण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करुन शालेय उपक्रमातून विद्यार्थ्याचा पूरेपूर लाभ करुन दिला पाहिजे.

२) **विकासाचे टप्पे समजून घेणे :-** शाळेची दुसरी काळजी म्हणजे विद्यार्थ्यांच्या विकासाशी सुसंगत अशा शालेय कार्यक्रमांची आखणी करणे.

३) **सर्वांगीण विकास :-** चांगल्या शाळेचे एक वैशिष्टय म्हणजे विद्यार्थ्यांतील तीन 'प् च्या विकासासाठी वाहून घेणे.

४) **सहेतूक उपक्रम :-** शिक्षण ही सहेतूक कृती आहे आणि शालेय कार्यक्रम हे शैक्षणिकदृष्टया उत्पादनशील कार्याकडे नेणारे असावेत.

५) **सामाजिक आणि व्यक्तिगत विकास :-** व्यक्तिगत विकासाबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव हे शाळेचे ध्येय असले पाहिजे.

६) **स्वयंशिक्षण :-** विद्यार्थ्यांचे स्वअध्ययन उंचावण्यासाठी शाळेने पुढाकार घेतला पाहिजे. किंबहूना शिकवण्याचा सर्वात चांगला मार्ग म्हणजे कसे शिकायचे हे विद्यार्थ्यांना शिकविणे.

## ४ अ.**१२ डॉ. झाकिर हुसैन यांचे शैक्षणिक योगदान**

डॉ. हुसैन यांचे शिक्षणातील योगदान हे दखल घेण्यासारखे आहे. त्यापैकी काही बाबी खाली दिल्या आहेत :

१. जामिया मिलीया इस्लामियाची स्थापना

२. वर्धा योजना किंवा मूलोद्योगी शिक्षणयोजनेची आखणी.

१९३७ साली गांधीजींनी साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे असे मत व्यक्त केले. बालकांना हस्तोद्योग शिकवून उत्पादनशील करुन शिक्षण द्यावे असे त्यांना वाटत होते.

गांधीजींच्या अध्यक्षतेखाली त्याच वर्षी राष्ट्रीय कार्यकर्त्यांची वर्धा येथे एक परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेत विस्तृत अभ्यासक्रम तयार करण्यासाठी डॉ. हुसैन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. हया समितीचा अहवाल हा पुढे 'वर्धा शिक्षण योजना' म्हणून प्रसिध्द झाला. डॉ. हुसैन यांनी हा अहवाल तयार करण्यात अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावली. समितीने सूचविलेली मूलोद्योगी शिक्षणाची वैशिष्टये :

१. अभ्यासक्रमाचा कालावधी हा सात वर्षाचा असावा.

२. दिलेल्या पर्यायातून विद्यार्थ्याला त्याच्या आवडीची एक हस्तकला निवडयाचे स्वातंत्र्य राहील.

- कताई आणि विणकाम.
- सुतारकाम
- शेती
- बागकाम (फळे आणि भाज्या)
- विशिष्ट भौगोलिक परिस्थितीनुसार शक्य असलेली कोणतीही हस्तकला. उदा. बांबूकाम, काथा वळणे, हस्तकाम इ.

३. अभ्यासवर्गातील इतर विषय :- (१) सामाजिक अभ्यास, (२) सामान्य विज्ञान (३) चित्रकला (४) संगीत (५) हिंदुस्तानी

४. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा राहिल.

५. अभ्यासक्रमाचा कालावधी दर दिवशी पाच तास तीस मिनटे असेल.

६. दरवर्षी कामाचे एकूण दिवस २२८ असतील

७. शाळा ही निवासी असली पाहिजे.

**आपली प्रगती तपासा**

योग्य पर्याय निवडून रिक्त स्थानकांची पूर्ताr करा.

१. डॉ. हुसैन यांच्या मते शैक्षणिकदृष्टया उत्पादन कार्य म्हणजे -

a) जे ज्ञानाची जोपसना करण्यास मदत करते ते.

b) ज्यात समर्पितता आणि अनुभव आहे.

c) जे सन्मान आणि पूजेच्या पातळीवर आहे.

d) जे समाजाची सेवा करते, ते.

२) शिक्षकाने विद्यार्थ्यांना____________आणि ___________शिक्षण दिले पाहिजे.

a) जबाबदारी आणि अधिकार

b) स्वातंत्र्य आणि शिस्त

c) शिस्त आणि सर्जनशीलता

d) अधिकार आणि परिपक्वता

३) झाकिर हुसैन यांच्या मते चांगला शिक्षक घडवणरे महत्वाचे तत्त्व म्हणजे -

a) सैध्दांतिक मानवाचे सत्य

b) सामाजिक मानवातील प्रेम

c) कल्पनारम्य मानवातील सौदर्य

d) आर्थिक मानवातील मिळकत.

## ४ अ.१३ सारांश

शिक्षणाने अर्थतज्ञ, व्यवसायाने शिक्षणतज्ञ, वृत्तीने मानवतावादी; डॉ. हुसैन हे भारतमातेचे अत्यंत सर्जनशील आणि प्रख्यात सुपुत्र होत. शिक्षणाची उद्दिष्ट्ये आणि आशय वृध्दिंगत करुन पध्दती आणि तंत्राबाबत प्रयोगशील राहून शिक्षणाचे फक्त समाजाशीच नाही तर मानवाच्या वारµयाशी असलेले खरे नाते प्रस्थापित करण्यातील ते एक महत्वाचा दूवा होते. एका बाजूला त्यांनी त्यांच्या (शिक्षणाच्या) सामाजिक आणि मानसिक पायाबदद्ल संवेदनशीलता दाखविली तर दुसऱ्या बाजूला त्याच्या नैतिक आणि आध्यात्मिक गर्भितार्थात ते रंगून गेले. त्यांचे कार्य आणि शिक्षणाबाबतचे विचार

munotes.in

स्फटिकाइतके स्पष्ट आहेत. त्यांचे शैक्षणिक योगदान कोणत्याही मोजपट्टीने मोजल्यास इतर शिक्षणतज्ञांपेक्षा कणंभरही उणे पडणार नाही.

## ४ अ.१४ प्रश्नावली

१) डॉ. हुसैन यांचे तात्त्विक विचार आणि शिक्षणाची ध्येये स्पष्ट करा.

पुढील प्रश्नांवर थोडक्यात लिहा.

१) डॉ. झाकिर हुसैन यांचे विद्यापीठ शिक्षणाबाबत विचार.

२) तरुण पीढीसाठी चार अत्यावश्यक मूल्ये.

३) डॉ. हुसैन यांची कार्याची संकल्पना.

४) स्वातंत्र्य, शिस्त आणि अधिकार यांतील परस्पर संबंध.

५) डॉ. हुसैन यांच्यामते शिक्षकाची भूमिका.

६) शिक्षण आणि संस्कृतीचा परस्परसंबंध.

७) मूलोद्योगी शिक्षणाची सर्वसाधारण वैशिष्टये.

८) चांगल्या शाळेची वैशिष्टये.

९) डॉ. हुसैन यांचे महत्वाचे शैक्षणिक योगदान.

❖❖❖❖

munotes.in

# ४ ब

## श्री. अरविंद घोष

## (१८७२-१९५०)

**प्रकरणाची रचना:**

४ ब.० उद्दिष्ट्ये

४ ब.१ संक्षिप्त जीवनवृतांत

४ ब.२ श्री. अरविंद; एक तत्त्ववेत्ते

४ ब.३ दोन अभाव

४ ब.४ अरविंदांचे वास्तवतेबाबत विचार

४ ब.५ 'मन/मानस' यावर अरविंद

४ ब.६ शिक्षणाची कार्ये

४ ब.७ एकात्म शिक्षण

 ४ ब. ७.१ शिक्षणाची ध्येये

 ४ ब. ७.२ एकात्म अभ्यासक्रम

 ४ ब. ७.३ अध्ययन पध्दती

 ४ ब. ७.४ अध्ययन-अध्यापनाची तत्त्वे

 ४ ब. ७.५ शिक्षक

४ ब. ८ राष्ट्रीय शिक्षण पध्दती

४ ब. ९ सारांश

४ ब. १० प्रश्नावली

### ४ ब.० उद्दिष्ट्ये

हा घटक वाचल्यानंतर

- भौतिक आणि सनातनी विचारांतील मतभेदांबाबत श्री. अरविंदांच्या विचारांचे आकलन होईल.
- श्री अरविंदानी तात्विक दष्टिकोनातून वास्तवाचा लावलेला अर्थ समजावून घेऊ शकाल.
- मनाचे विविध स्तर आणि त्याची कार्ये समजून घेऊ शकाल.



munotes.in

- एकात्म शिक्षणाची संकल्पना समजून घेऊ शकाल.
- शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम, शिक्षणाची भूमिका आणि शिक्षणाच्या पध्दती समजून घेऊ शकाल.

## ४ ब.१ जीवनवृतांत

श्री. अरविंदांचा जन्म एका मध्यमवगीय कुटुंबात १५ ऑगस्ट १८७२ रोजी कलकत्ता येथे झाला. वयाच्या सातव्या वर्षी ते इंग्लंडला गेले आणि १४ वर्षे तिथेच वास्तव्य केले. केंब्रिज विद्यापीठात त्यांचे शिक्षण झाल्यानंतर वयाच्या १८ व्या वर्षी भारतीय सिव्हील सर्विस ची प्रवेश परीक्षा ते पास झाले. इंग्रजी भाषेव्यतिरिक्त लॅटिन आणि ग्रीकवर त्यांनी प्रभुत्व प्राप्त केले आणि फ्रेंच, जर्मन आणि स्पॅनिशही आत्मसात केले.

१८९३ साली इंग्लंडहून परत आल्यावर ते गुजरातमधील बडोदा या ठिकाणी इंग्रजीचे प्रध्यापक म्हणून रुजू झाले. इथे असताना सांस्कृतिक आणि वाङ्मयीन कार्यक्रम करण्याबरोबरच त्यांनी बंगाली, गुजराथी, मराठी आणि संस्कृतवर प्रभुत्व प्राप्त केले.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सभासदत्व घेऊन ते स्वातंत्र्य सेनानी म्हणून सक्रीय झाले. ते क्रांतिकारी मनाचे होते आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील मवाळांवर नाराज होते. क्रांतिकारी विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी बंगालीमधून 'युगांतर' आणि इंग्रजीतून 'वंदे मातरम्' ही दैनिके सुरु केली. ब्रिटिश सरकारच्या मते ते अत्यंत धोकादायक असे नेते होते. क्रांतिकारी स्वातंत्र्य सेनानीपासून ते एक तत्त्वज्ञ व द्रष्टे व्यक्ती बनले. १९०८ मध्ये अलीपूर बॉबहल्याप्रकरणी त्यांना कारागृहात ठेवण्यात आले. हया कालावधीत ते योग, ध्यानधारणा आणि धार्मिक, तात्त्विक आणि अध्यात्मिक साहित्याच्या वाचनाकडे वळले. या वाचनामुळे त्यांच्यात खूपच बदल घडून आले. त्यानंतर पाँडिचेरीला जाऊन ४० वर्षे त्यांनी तिथेच आश्रमात व्यतीत केली. त्यांनी स्वतःला बदलले आणि विविध शैक्षणिक आणि सामाजिक कार्यक्रमात गुंतवून घेतले. भारतीय गरजांची पूर्तता करु शकतील अशा शैक्षणिक उपपत्ती त्यांनी मांडल्या. तसेच शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांसाठी आंतरराष्ट्रीय केंद्र, आंतरराष्ट्रीय आश्रम इ. ची स्थापना केली. मानवी एकतेसाठीचे शहर -'ऑरोविल' हा अभिनव प्रयोगही त्यांनी सुरु केला.

### ४ ब.२ श्री अरविंद : एक तत्त्ववेत्ते :

श्री अरविंदांनी त्यांच्या ब्रिटिश शिक्षणातून आणि नंतरच्या वाचनातून जरी पाश्चिमात्य तात्त्विक आत्मसात केल्या असल्या तरी त्यांना पाश्चिमात्य तत्त्ववेत्ते म्हणता येणार नाही. भारतीय परंपरेनुसार त्यांना 'संत' देखिल म्हणणे चूक आहे कारण अवघा भारत त्यांना 'सिध्दयोगी' न मानता नवीन युगातील अवतार मानतात. आपल्याला त्यांच्यात तात्त्विक-धार्मिक बाबींचे एकात्मीकरण दिसत नाही तर एक वेगळ्या तर्हेचा विचारवंत, ज्याच्या पध्दती हया भारतीय परंपरेतून जन्मलेल्या आध्यात्मिक चौकसबुध्दीवर आधारित असून आधुनिक विज्ञानाला नवीन बौध्दिक संदर्भ चौकट व धर्म आणि भौतिकता यातील वाद हे परंपरा आणि आधुनिकता यांच्यापलीकडे नेले. त्यांना 'हिंदू विचारवंत' समजणे

देखिल चूक आहे कारण हिंदुत्वाने फक्त अनादि नियम सनातन धर्माची कास धरली जी भारतीयांची मक्तेदारी नाही.

त्यांचा आध्यात्मिक शोध हा आध्यात्मिक तृष्णा आणि कार्यकारी इहवाद यांतील तत्कालीन विचारसरणीतील दोष निवारणासाठी होता. त्यांनी मानवाचा त्याच्या नैसर्गिक पर्यावरणाशी असलेला संबंध आणि अस्तित्त्वाचे भौतिक पैलू यातील परस्परसंबंधाकडे पाहण्याची नवीन दृष्टी दिली. महात्मा गांधी आणि टागोरांपेक्षा ते निर्विवादपणे सुसंरचित विचार करत असत.

जे कृष्णमूर्तींप्रमाणेच, आपण जे धार्मिक म्हणतो ते सिध्दांत किंवा प्रमाणवचनांची बाब नसून अनुभवायची गोष्ट आहे असे श्री अरविंद मानत असत. धार्मिक अंतःप्रेरणांना त्यांची आध्यात्मिक अधिप्रमाणता सिध्द् करते असे ते म्हणतात. तसेच हया अंतःप्रेरणा कुणाचा दृष्टिकोन किंवा पिढयान्पिढया चालत आलेल्या विचारांचा ठेवा नसून प्रत्येकाचा वैयक्तिक अनुभव आहे. वैयक्तिक धार्मिक अनुभवांनी आधुनिक जगातील धार्मिक विμलेषणयुक्त तर्कशुध्दतेशी जोडणारे साधन शोधणे शक्य आहे का, असा प्रश्न अरविंदांना पडत असे.

**आपली प्रगती तपासा**

रिक्त स्थानकांची योग्य पर्यायासह पूर्ती करा.

१. अरविंदांनी एका _________नावाच्या  नव्या प्रयोगाचा प्रारंभ केला.

अ) वंदे मातरम्  ब) ऑरोविल  क) योग  ड) भौतिकवाद

२. अरविंदांना ________म्हणून  संबोधता येईल्.

अ) हिंदू विचारवंत  ब) पाश्चिमात्य विचारवंत

क) भारतीय संन्यासी  ड) वेगळ्या तर्हेचा विचारवंत

३.अरविंदांचा आध्यात्मिक शोध हा _______मधील वाद सोडविण्यासाठी होता.

अ)  धार्मिक अधिप्रमाणतेचा अनुभव

ब)  आध्यात्मिक तृष्णा आणि कार्यरत भौतिकवाद

क)  हिंदू विचार आणि इस्लामचे विचार

ड)  सनातन धर्म आणि अक्षय नियम

## ४ ब.३ दोन अभाव

अरविंदांच्या जीवनाविषयक दृष्टीकोनातील एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची 'दोन अभावांची' संकल्पना. ते म्हणतात की बौध्द धर्माच्या प्रसारानंतर आदर्श संन्यस्ताचा प्रसार होण्याचे कारण म्हणजे जगापासून दूर जाण्याच्या भावनेचे प्रबल्य; यालाच ते पदार्थाविरुध्द आत्म्याने केलेले बंड म्हणतात. हयामुळे नैसर्गिक जगापलिकडील वास्तवावर अवास्तव भर दिला जाऊन प्रत्यक्ष जगाला हीन लेखले गेले. हीच भावना पुढे



munotes.in

नवव्या शतकात शंकर संप्रदायाने बळकट केली. त्यांनी असे मांडले की वास्तव हे आध्यात्मिक असते आणि भौतिक जग हे केवळ वास्तवाचे स्वरुप असते. हिंदू धर्मातील प्रबळ अशा हया भ्रमामुळे भौतिक प्रगतीबाबत सामाजिक उदासीनता निर्माण होऊन आध्यात्मिक आणि भौतिक बाबींतील समतोल ढळला. त्यामुळे हा उपखंड पाश्चात्य जगाच्या तुलनेने भौतिक प्रगतीत मागे राहिला.

दुसरी अभावात्मक बाब म्हणजे भौतिकतावाद. भौतिकवाद हा आत्म्याचे अस्तित्व नाकारुन तो एक भ्रम किंवा वैयक्तिक कल्पनेची भरारी असल्याचे सांगतो. हे दोन्ही अभाव हे संपूर्ण सत्य नसून त्याच्या अंशाचा विपर्यास आहे. त्यांच्या 'लाईफ डिव्हाईन' या पुस्तकात अरविंद लिहितात, दोन्ही अभाव हे एकाच चूकीचे दोन विरुध्द ध्रूव आहेत.

## ४ ब.४ अरविंदांचे वास्तवतेबाबत विचार

भारतातील भौतिकवादाचा अभाव आणि युरोपमधून संन्यसत्वाला मिळालेला नकार हया बाबी अंतिम सत्य असल्याने जीवनाविषयक संकल्पनांवर हुकूमत गाजवू लागले. भारतात हयामुळे 'आत्म्याची' संकल्पना वृध्दिगंत झाली तर युरोपात नेमके हयाच्या विरुध्द होऊन संपत्तीचे आणि अधिकाराचे संचयन होऊन आत्माविषयक बाबींचे दिवाळे निघाले.

आपण चूकीकडून सत्याकडे प्रवास करत नसून कमी सत्याकडून पूर्ण सत्याकडे जात असतो असे अरविंद म्हणतात तेव्हा ते विवेकानंदांशी पूर्णतः सहमत असतात. अरविंदांच्या वैचारिक पध्दतीचे हे वैशिष्टय आहे की ते सर्वसाधारण विरुध्द बाबीतील साधर्म्य टाळतात परंतु जे विसंगत वाटते ते प्रत्यक्षात योग्य असून त्याच गुंतागुंतीच्या सूक्ष्म वास्तवाचा दुसरा पैलू असल्याचा पूरेसा आधार देतात. आत्मा आणि पदार्थांना विज्ञानाच्या विश्लेषणात्मक चाचण्या देणे किंवा धर्माने आत्म्याचे आकलन करुन घेणे हे लोकांचे समाधान करु शकत नाही. धर्म किंवा विश्लेषणात्मक वैज्ञानिक चाचण्यांद्वारे आत्मा व पदार्थाचे आकलन न झाल्यामुळे लोकांचे समाधान झालेले नाही. त्यांच्यामते, भौतिक जग आणि आध्यात्मिक जग एकाच पातळीवर आणून ठेवले पाहिजे.

अरविंद म्हणतात की जगाने धर्माचे लक्ष वेधून घेतले पाहिजे कारण आत्म्याद्वारे बदल होऊ शकणाऱ्या विश्वाचा जग हे एक भाग आहे. व्यक्तिने दूष्टत्वाचा त्याग करुन, चांगल्या वागणूकीचे बक्षीस म्हणून आत्म्याचा उद्धार होतो हे मत ते पूर्णपणे नाकारतात. त्यांच्या विरोध हा वरील गोष्टी आध्यात्मिक दृष्टया चूकीच्या आहेत म्हणून नव्हता तर सत्य हे अंशतः असते म्हणून होता. चूकी ही पूर्णतः चूक नसते तर सत्याच्या अनेक अंशांनी मिळून बनलेल्या गोष्टीला अंतिम सत्य समजल्याचा तो परिणाम आहे. ते लिहितात, 'मानवाची स्वर्गप्रप्ती ही काही गुरुकिल्ली नव्हे, गुरुकिल्ली म्हणजे खरे तर माणसाची आत्मोन्नती आणि आत्म्याने भूतलावरील दैनंदिन मानवी जीवनात सामावून जाण्यात आहे.

अरविंदांच्या विचारांचा दूसरा विशेष म्हणजे आपणांस मानवी जगाच्या पलीकडे वगैरे जाऊन काही साध्य करावयाचे नसून ते हयाच जगात साध्य करायचे आहे. ते ठामपणे

सांगतात की ज्याप्रमाणे मानवाची उत्क्रांती एकपेशीय जीवनापासून गुंतागुंतीच्या जीवापर्यंत झाली त्याचप्रकारे मानवाला सातत्याने आध्यात्मिक उन्नती करता येणे शक्य आहे. जड जीव इथे आहे आणि आत्मा तिथे आहे; मृत्युची सीमारेषा पार केल्यावर उच्च दर्जाचे अस्तित्व प्रप्त होते, या तत्कालीन समजाला ते अजिबात पुष्टी देत नसत. त्यांच्यामते, स्वार्थांधपणा दूर सारुन तसेच उच्च दर्जाचे आत्मभान प्रप्त केल्यावर हयाच जगात दोन्ही गोष्टी साध्य करणे शक्य आहे.

अरविंदांच्या विचारांचे मूलतत्त्व हे, मानव किंवा देवाबाबत एकाच दृष्टीकोनातून विचार केल्यास अर्ध्यसत्य मिळते, हे होय. म्हणून त्यांचे लेखन मानवी चैतन्याच्या तरल आणि गुंतागुंतीच्या विविध पातळ्यांतील फरक आणि ब्रह्मन्चे विविधि पैलू यांनी भरुन गेले आहे. सभोवतालचे जग हे सर्वसमावेशक विरुध्दापेक्षा वेगळे नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

दिव्यत्व जर सगळीकडे आहे तर ते नक्कीचे मानवातही आहे. कदाचित काही अंशी अभ्यासाने आत्म्यावरील अहंकाराचे आवरण दूर करता येते. अरविंदांच्या विचारातील नाविन्य असे की मानवाच्या आध्यात्मिक उन्नतीचा नवीन टप्पा गाठण्यासाठी नवीन आध्यात्मिक मार्गाची गरज आहे असे ते सांगतात. मानावतील दिव्यत्वाची प्रप्ती ही 'योग' आध्यात्कि मार्गाने शक्य आहे असे ते सांगतात. मात्र त्याचा शोध घेणे, विकास करणे आणि उपयोग करणे आवश्यक आहे. योगविषयक त्यांची संकल्पना ही जीवन परागमुख संन्याशाची नाही. योग ही आध्यात्मिक ज्ञानशाखा आहे. त्यात मानसिक अंतर्ज्ञान ही आविष्काराची केवळ पहिली पायरी समजली जाते. ते अनूभवसिध्द होऊन प्रमाणित झाले पाहिजे. हया आध्यात्मिक ज्ञानशाखेतील अडथळा म्हणजेच सभोवतालच्या जगाच्या ऐहिक मर्यादा नसून उच्च चैतन्यस्वरूप असलेल्या आपल्या आंतरिक 'स्व' ला शोधण्यातील असमर्थता होय. अरविंद लिहितात, "मानव हा त्याच्या बाहयात्कारी मनात गुंतून पडल्यामुळे तो स्वतःत राहण्यास न शिकल्यामुळे त्याला हया 'स्व' चे अस्तित्व कळत नाही. योग हा सामान्य माणसांसाठी असून दैनंदिन व्यवहार चालू असताना त्याचे पालन करावयाचे आहे. एखादा व्यापारी योगमार्गाचा अवलंब करु इच्छितो तर तो त्याच्या कामाला दिव्य समजतो; तो पैसा मिळवण्यासाठी अनैतिक मार्गाचा अवलंब करत नाही. विद्यार्थ्याला जर उच्च मूल्ये हवी असतील, तर त्याने ब्रह्मचर्याचे पालन केले पाहिजे.

### आपली प्रगती तपासा

१) आत्म्याने पदार्थाविरुध्द बंड केल्याचा कोणता परिणाम झाला?

२) भौतिक प्रगतीमध्ये पाश्चात्य जगाच्या तुलनेने भारत मागे का पडला?

३) अरविंदांच्या मते, योग या आध्यात्मिक ज्ञानशाखेच्या मार्गात कोणता अडथळा आहे?

४) अरविंदांच्या संदेशातील मूलभूत बाब कोणती ?

## ४ ब.५ अरविंदांचे मानस (Mind) बाबत विचार

मानस किंवा मनाबदद्लची त्यांची संकल्पना इतरांपेक्षा भिन्न होती. त्यांच्या मते मानवातील आविष्काराचे मानस हे एक प्रथमिक साधन आहे. मानस ही वस्तू नाही. तिची बरोबरी बुध्दिशी करु नये. ते एक कार्य किंवा प्रक्रिया आहे. मानस हे भावना, अवधान, स्मरण इ. उच्च मानसिक प्रक्रियाद्वारा स्वतःचे कार्य करते. त्यांच्या लेखनात ते 'मानस'च्या विविध पातळ्या सांगतात. त्या अशा - (१) मन किंवा मानस (२) श्रेष्ठ मन (३) उद्भासित मन (४) साक्षीभूत मन (५) अधिमानस (६) अतिमानस. मन हे तीन भागात विभागले आहे - विचार करणारे मन, गतिशील मन आणि बाहयात्कारी मन. पहिले हे ज्ञान आणि कल्पनांशी निगडीत, दुसरे त्या कल्पनांना साकार करण्याशी आणि तिसरे जीवनाविष्काराशी संबंधित असते. अरविंद हे वैचारिक मन आणि चैतन्य ही मनाची कार्ये आहेत असेही लिहितात. वैचारिक मनाचे कार्य हे संशय घेणे, प्रश्न उपस्थित करणे, वाद घालणे, अयोग्य असल्यास एवादी गोष्ट नाकारणे आणि हया प्रक्रिया वारंवार करत असते.

एकात्मिक सत्याची प्रप्ती करण्यासाठी माणसाचे मन हे दोषयुक्त साधन आहे. अरविंदांच्या मते मनाने केलेल्या चूका अतिमानसाद्वारे दूर केल्या गेल्या पाहिजेत. अतिमानस हे सच्चिदानंद आणि विश्व ज्ञान आणि अज्ञान यातील दूवा आहे.

अतिमानस हे दिव्य ज्ञानी असते. ते जगाची निर्मिती करते, जगाचे पालन करते, जग चालविते आणि रक्षणही करते. ते सर्वशक्तीमान सर्वज्ञानी व सर्वव्यापी आहे. ते आतली शक्ती आहे. त्यात ज्ञानी किंवा अज्ञानी असा भेद नाही.

**आपली प्रगती तपासा**

१) मनाचे कार्य कोणते ?

२) मनाचे विविध स्तर कोणते ?

३) अरविंदाच्या मते अतिमानस प्रप्त केल्यानंतर काय केले पाहिजे?

४) सर्वसाधारण मन हे अतिमानस कशाप्रकारे बनू शकते?

## ४ ब.६ शिक्षणाची कार्ये

शिक्षणाची कार्ये पुढीलप्रमाणे सारभूत करता येतील.

१) प्रत्येकातील मनुष्यत्वाला बाहेर आणणे/वाव देणे.

२) मानवी मन आणि आत्म्याची शक्ती संवर्धित करणे म्हणजे ज्ञान, चारित्र्य, संस्कृती इ. जागृत करणे.

३) व्यक्तिला भूत, वर्तमान आणि भविष्यातील प्रवाहित्व पाहण्यास समर्थ करणे.

४) व्यक्तिला स्वतःबरोबर आणि बाहयजगाशी सुयोग्य संबंध प्रस्थापित करण्यासाठी समर्थ बनविणे.

## ४ ब.७ एकात्म शिक्षण



श्री अरविंदांच्या मते खरे शिक्षण हे फक्त आध्यात्मिक नसून तर्कशुध्द, चैतन्यमय आणि शारीरिकही असते. यालाच दूसरे नाव एकात्म शिक्षण आहे. श्री अरविंदांची सर्वात जवळची अनुयायी 'मदर' यांनी एकात्म शिक्षणाची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. "शिक्षण पूर्णत्वास जाण्यासाठी मानवाच्या पाच प्रमुख कृतींशी त्याचा मेळ घातला गेला पाहिजे. त्याबाबी अशा - शारीरिक, चैतन्यमय, मानसिक, मानसशास्त्रीय आणि अध्यात्मिक होत. अशाप्रकारे दिलेले शिक्षण हे पूर्ण असून, परस्परपूरक आणि आजीवन असेल. अरविंदांची शिक्षण योजना दोन अर्थांनी एकात्म आहे. पहिल्या अर्थाने व्यक्तित पाचही पैलूंची रुजवणूक असते. दुसरे फक्त उत्क्रांतीच्या अर्थाने त्याचे एकात्म शिक्षण नसते, तर राष्ट्र आणि एकंदरीत मानवजातीची ती उत्क्रांती असते. शिक्षणाचे अंतिम ध्येय हे संपूर्ण मानव्याची उत्क्रांती हे आहे. हया उत्क्रांतीच्या रचनेत वाढीचे तत्त्व म्हणजे अनेकतेतील एकता हे आहे. ही एकता पुन्हा वैविध्यपूर्ण एकता राखण्यासाठी मदत करते.

**एकात्म शाळा -** शिक्षणाचे अंतिम ध्येय मनुष्य घडविणे हे आहे. अध्ययनकर्त्यास ते प्रथमतः माणूस बनण्यास मदत करते, त्यानंतर राष्ट्राचा नागरीक आणि शेवटी व्यक्ती म्हणून घडविते. नैतिक जबाबदाऱ्या आणि निष्ठा हया मोठयाकडून छोटया चक्राकडे आणि उलट अशा फिरत असतात. मानवाला सर्वप्रथम माणूस, नंतर नागरीक आणि त्यानंतर व्यक्ती म्हणून विकास करावयाचा असतो. सध्या आजूबाजूला असलेला सार्वत्रिक गोंधळ हा वरील क्रम उलटा झाल्यामुळे आहे.

जे शिक्षण नैसर्गिकरित्या, सहज, प्रभावी आणि ताणरहित असते त्यास एकात्म शिक्षण म्हणतात- एकात्म शिक्षण हे पूर्ण शिक्षण आहे.

एकात्म शिक्षणाचे महत्वाचे पैलू पुढीलप्रमाणे :-

१) मानसिक आणि शारीरिक पैलूंचे संवर्धन

२) पाच मुख्य पैलूंचे संपादन - शारीरिक, चैतन्य, मानसिक, मनोशास्त्रीय आणि आध्यात्मिक. हया पाचही पैलूंचा एकत्रित विकास केला पाहिजे.

३) सत्याच्या पुढील चार पैलूंचा विकास-प्रेम, ज्ञान, अधिकार आणि सौंदर्य.

४) सत्य वहनासाठी पुढील मार्गांचा विकास-प्रेमासाठी मानसिक, ज्ञानासाठी मानस, अधिकारासाठी चैतन्य, शारीरिक सौंदर्याच्या अविष्कारासाठी शरीर.

श्री अरविंदांचा व्यक्तित्व, सामान्यत्व आणि आवµयकता या अंतिम तत्वांवर विश्वास आहे. दुसऱ्या शब्दात हेच अध्ययनकर्ता, समाज आणि मानवता होय. त्यांच्यामते एकात्म शिक्षणात या तिन्हींच्या उत्क्रांतीचा समावेश केला पाहिजे. त्यांचा एकत्रित विकास झाला पाहिजे. शाळेचा हाच हेतू आहे. बडोदा येथील त्यांच्या व्याख्यानांतूनही त्यांनी सूचित केले की महाविद्यालये आणि विद्यापीठे यांनी त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यक्रमातून शिक्षण दिले पाहिजे. शाळा ही समाजापासून अलिप्त राहू शकत नाही. अलिप्त राहून संपूर्ण शिक्षण देता येणार नाही. शाळेतील शिकवण शाळाबाहेरील समाजात

munotes.in

वापरता आली पाहिजे. एकात्म शाळेत विविध उपक्रमांसाठी चार प्रकारच्या खोल्या असल्या पाहिजेत.

१) मौन कक्ष २) देवाणघेवाणीसाठी कक्ष

३) सल्लामसलतीसाठी कक्ष ४) व्याख्यान कक्ष

शाळा हया चार उपक्रमांची मौन, देवघेव, सल्ला, व्याख्यान आखणी करेल. त्यात खेळ, कृती, शोध, नवोपक्रम असून अध्ययन कर्त्याचे शरीर, मन आणि आत्म्याचा विकास साधला जाईल. थोडक्यात, एकात्म शिक्षणाद्वारे एकात्मिक विकासाच्या संधी दिल्या जातील. किंबहूना एकात्म शिक्षणातील हया संकल्पनांवरच ध्येये, अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती आधारित असतील.

**आपली प्रगती तपासा**

खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा. चूकीची विधाने दुरूस्त करा.

१) श्री अरविंदांच्या मते, शिक्षणाचे एक महत्वाचे कार्य म्हणजे भूत, वर्तमान आणि भविष्याशी योग्य परस्परसंबंध साधणे.

२) मदर च्या मते मानवाच्या पाच मुख्य उपक्रमांशी निगडीत असलेल्या पाच पैलूंचा समावेश पूर्ण शिक्षणात असला पाहिजे.

३) एकात्म शिक्षण हे फक्त व्यक्तीसाठी आहे.

४) शाळेचा हेतू हा अध्ययनकर्ता समाज आणि मानवतेचा एकाच वेळी विकास करणे हा आहे.

## ४ ब. ७.१ एकात्म शिक्षणाच्या दृष्टीने शिक्षणाची ध्येये

**१) आत्म्याचे पूर्णत्व -** शिक्षणाचा प्रमुख हेतू हा आत्म्यातील उत्तमत्त्वाचा विकास करुन उदात्त कारणांसाठी त्याला परिपूर्ण करणे हा आहे.

**२) आत्मविष्कार -** शिक्षणाने प्रत्येकाला विश्वात्म्याचा भाग असलेल्या आत्म्याचा अनुभव आला पाहिजे. फक्त स्वतःशी संबंधित न राहाता देशबांधव तसेच जागतिक समाजाशी त्याला योग्य संबंध जोडता आले पाहिजेत.

**३) शारीरिक विकास -** बालकाचा शारीरिक विकास हे एक शिक्षणाचे महत्वाचे ध्येय आहे. ज्यांच्या शारीरिक विकास उत्तम झालेला असतो ते मानसिक दृष्टया दुर्बल असतात असे म्हणणे दिशाभूल करणारे होईल. शारीरिक विकासाशिवाय दुसरा कोणताच विकास संभवत नाही.

**४) नैतिकतेचा विकास -** भौतिक आणि भावनिक विकासाशिवाय झालेला मानसिक विकास हा व्यक्तिच्या प्रगतीस बाधक ठरतो. बालकाच्या नैतिक विकासासाठी आवश्यक असलेले तीन घटक म्हणजे भावना, मनःपटलावरील ठसे किंवा सवयी

आणि स्वभावधर्म. म्हणून शिक्षकाचे आदर्श हे इतके उंच/प्रगल्भ असले पाहिजेत की केवळ अनुकरणाने बालक अत्युच्च टप्पे गाठू शकेल.

५) **इंद्रियांचा विकास -** शिक्षणाने इंद्रियांना वळण लावले पाहिजे. त्यांच्यामते मानस, चित्त आणि नसा (हीन) हे जेव्हा शुध्द असतात तेव्हाच इंद्रियांना वळण लावता येते.

६) **सावधानतेचा (Consciousness) विकास -** सावधानतेचा विकास हे शिक्षणाचे आणखी एक महत्वाचे ध्येय आहे. त्यांच्या मते त्याच्या चार पातळ्या आहेत. (१) चित्त, (२) मानस, (३) बुध्दि, (४) ज्ञान. शिक्षकाने या चारही पातळ्यांचा सुसंवादीपणे विकास केला पाहिजे. यामुळे सावधानतेचे संवर्धन होईल.

७) **व्यक्ति आणि समुहातील सुसंवाद -** बहुतेक सामाजिक-राजकीय विचारवंतांनी व्यक्ती किंवा समाजावर भर दिलेला आहे. परंतु अरविंद मात्र व्यक्ती-व्यक्ती आणि राष्ट्रांमधील सुसंवादावर लक्ष केंद्रित करतात. म्हणून त्यांची शिक्षणाची सरंचना ही खऱ्या अर्थाने वैश्विक आहे. अरविंदांच्या या रचनेबदद्ल बोलताना मदर म्हणतात, "सर्व जागतिक संघटना हया वास्तवपूर्ण असण्यासाठी आणि जिवंत राहण्यासाठी परस्परांप्रती आदर आणि राष्ट्रा-राष्ट्रातील व व्यक्ती-व्यक्तिंमधील सामंजस्यावर आधारित असल्या पाहिजेत. सामुदायिक शिस्त आणि संघटन; परस्परांबदद्ल चांगूलपणा यांतील सहभागावर मानव आता ज्या त्रासदायक गर्तेत पडला आहे, त्यातून त्याचे उत्थान होऊ शकेल. हयाच ध्येयाने आणि हयाच मनोवृत्तीने मानवी समस्यांचा अभ्यास विद्यापीठातील केंद्रात होईल आणि त्याचे समाधान अरविंदांच्या अति-मानस ज्ञानाद्वारे केले जाईल.

८) **मूल्यांची रुजवणूक -** सध्याच्या मानवी जीवनातील संघर्षाचे मूळ मूल्यांच्या गोंधळामुळे आहे. जुन्या मूल्यांना नवीन मूल्ये नीट रुजण्यापूर्वी आव्हान देण्यात येते. चारित्र्यसंवर्धन हे मूल्याधिष्ठित असते. श्री अरविंदांच्या मते सुसंवाद हे सर्वोच्च मूल्य आहे. इतर महत्त्वाची मूल्ये म्हणजे आध्यात्मिकता, दिव्यत्व, उत्क्रांती, उन्नती, बदल इ. होत. प्रगतीसाठी सर्वात महत्त्वाचे मूल्य म्हणजे प्रमाणिकपणा, सच्चेपणा होय. त्याचा विकास झाल्यास इतर सर्व आपोआपच होते.

## ४ ब. ७.२ एकात्म अभ्यासक्रम

बालकाच्या अंतर्गत शक्तींचा पूर्ण विकास करण्यासाठी मोकळे व पोषक वातावरण असावे आणि बालकांच्या आवडीच्या विषयांचा उपक्रमांचा अभ्यासक्रमात समावेश करावा असे श्री. अरविंदांनी सांगितले.

१) संपूर्ण जीवन हेच शिक्षण होय. म्हणून अभ्यासक्रम हा काही पाठयपुस्तके किंवा पाठयक्रमापुरता मर्यादित नाही.

२) त्यात मानसिक आणि आध्यात्मिक विकासास पोषक अशा सर्व विषयांचा समावेश असावा.

munotes.in

३) ते एक साध्यापर्यंत पोहोचण्याचे साधन आहे. अंतिम साध्य नव्हे. अंतिम लक्ष्य हे एकात्म व्यक्तिमत्वाचा विकास हे होय.

४) फुरसदीच्या वेळेच्या उपयोगाबाबत त्यात मार्गदर्शन असावे.

५) प्रत्येक व्यक्तीच्या गरजांची पूर्तता त्यातून करता यावी.

६) अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या विषयातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी.

७) अभ्यासक्रमात जीवनसदृश्य सर्जनशीलता आणि विधायक अशा उपक्रमांचा समावेश असावा.

८) अभ्यासक्रम हा रंजक असावा.

वरील तत्त्वांवर आधारित असे पुढील विषय अरविंदांनी अभ्यासक्रमात सूचविले.

१) **प्राथमिक स्तर :** मातृभाषा, इंग्रजी, राष्ट्राचा इतिहास, कला, रसायनशास्त्र, भौतिक, वनस्पतीशास्त्र, सामाजिक शास्त्रे, शरीर विज्ञान, आरोग्य शिक्षण.

२) **माध्यमिक स्तर :** मातृभाषा, इंग्रजी, फेंच, अंकगणित, कला, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, सामाजिक शास्त्रे, शरीरविज्ञान, आरोग्य शिक्षण.

३) **विद्यापीठ स्तर :** भारतीय आणि पाश्चिमात्य तत्वज्ञान, सभ्यतेचा इतिहास, इंग्रजी, साहित्य, फ्रेंच, समाजशास्त्र, मानसशास्त्र, विज्ञानाचा इतिहास, रसायन शास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध आणि एकात्मता.

४) **व्यावसायिक शिक्षण :** कला, चित्रकला, छायाचित्रण, शिवण, शिल्प, चित्र, टंकलेखन, शॉर्टहॅन्ड, कोलाज उदयोगधंदे, सुतारकाम, नर्सिंग, मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग, भारतीय आणि युरोपियन संगीत आणि नाटयीकरण.

### आपली प्रगती तपासून पहा

थोडक्यात सोडवा / लिहा.

१) एकात्म शिक्षणाच्या ध्येयांची यादी करा.

२) शिक्षणाने वैश्विक भान कशाप्रकारे येते?

३) अरविंदांच्या मते, संवेदनांद्रियांना पूर्णतः प्रशिक्षित केव्हा करता येईल?

४) सध्याच्या गोंधळसदृश्य स्थितीतून माणसाला बाहेर काढण्यासाठी अरविंद कोणती सूचना करतात?

५) अरविंदांच्या मते सावधानेच्या (Conciousness) विविध पातळ्या कोणत्या ?

६) अरविंदांच्या विचारांनुसार सर्वोच्च मूल्य कोणते?

७) अभ्यासक्रम हा पाठयक्रमापूरता मर्यादित का नसावा?

८) अभ्यासक्रम हे अंतिम साध्य नाही असे अरविंद का म्हणतात?

९) अरविंदांनी अभ्यासक्रमात कला, चित्रकला, संगीत, इ.चा समावेश करण्यामागील भूमिका काय आहे?

## ४ ब. ७.३ अध्ययन पध्दती

श्री अरविंदांनी अध्ययनपध्द्तींच्या खालील तत्त्वांचा पूरस्कार केला.

१. बालकासाठी प्रेम आणि सहानभूती

२. मातृभाषेतून शिक्षण

३. बालकाच्या आवडीनुसार शिक्षण

४. स्वानुभवातून शिक्षण

५. 'करा आणि शिका' वर भर.

६. शिक्षक आणि विद्यार्थ्यातील सहकार्यावर आधारित शैक्षणिक प्रकिया.

७. बालकाच्या वृत्तीप्रमाणे शिक्षण-इथे बालकातील दिव्यत्व आणि उपजत मानसिक आणि आत्मिक बाबींचा विचार केला जाईल.

८. बालकाचे स्वातंत्र्य-स्वप्रयत्नाने ज्ञानसंवर्धनासाठी मुक्त वातावरण.

## ४ ब. ७.४ अध्ययन-अध्यापनाची तत्त्वे

१) सर्वात पहिले तत्त्व म्हणजे, "कोणतीही गोष्ट शिकवली जाऊ शकत नाही, परंतु सर्व काही शिकता येते." शिक्षक हा अनुदेशक किंवा काम करुन घेणारा मुकादम नसून मदतनीस, मार्गदर्शक आहे. तो ज्ञान देत नाही तर विद्यार्थ्यांत आधीच अस्तित्वात असलेले ज्ञान मिळविण्याचे मार्ग दाखवितो.

२) दुसरे तत्त्व असे की, मनाचा विकास करताना मनाशी सल्लामसलत केली गेली पाहिजे. पालक किंवा शिक्षकांच्या आवडीनुसार बालकाला घडविणे चूक असून बालकातील दिव्यत्वास ते नष्ट करते. बालाकाचा स्वधर्मच नष्ट झाल्यास त्याला कायमस्वरुपी इजा होते असे अरविंद म्हणतात.

३) अध्यापनाचे तिसरे तत्त्व म्हणजे, अध्यापन हे ज्ञातापासून अज्ञाताकडे, समीपतेपासून दूर असलेल्याकडे नेणारे असावे. अध्यापन हे बालकाच्या प्रवृत्तींप्रमाणे असावे. त्यांच्यामते मानवी वर्तन हे आत्म्याचा भूतकाळ, त्याचा अनुवंश आणि पर्यावरणानुसार घडत असते. भूतकाळ हा पाया असून वर्तमान हे साधन आहे आणि भविष्य हे ध्येय/ लक्ष्य आहे. यातील प्रत्येकाला राष्ट्रीय शिक्षण प्रणालीमध्ये आपली जागा सापडली पाहिजे.

munotes.in

## ४ ब. ७.५ शिक्षक

श्री अरविंद यांनी शिक्षकाला खूप महत्वाचे स्थान दिले. मात्र पारंपारिक भारतीय शिक्षण व्यवस्थेप्रमाणे त्यांनी त्याला केंद्रस्थानी ठेवले नाही. शिक्षक हा तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक आहे. गुरुला अंतिम अधिकार नाहीत. त्याने अनुयायाची नजर स्वतःतील देवत्वाकडे वळवायची आहे. किंबहूना अध्ययनकर्त्यातच खरा शिक्षक आहे. तोच परमेश्वर आहे. तोच अंतिम मार्गदर्शवाही आहे आणि तरीही अध्ययनकर्त्याला स्वतःतील देवत्व ओळखण्यासाठी शिक्षक महत्वपूर्ण भूमिका पार पडतात. त्याने स्वतःची मते विद्यार्थ्यांवर लादू नयेत किंवा विद्यार्थ्यांकडून निष्क्रिय शरणागतीची अपेक्षा ठेऊ नये. श्री अरविंदांनी शिक्षकाची तुलना माळ्याशी केली आहे. अध्ययनकर्ता आणि अध्यापकातील आंतरिक परस्परसंबंधावर त्यांनी भर दिला आहे. शिक्षकाचे वर्णन करताना मदरनी पुढील पात्रता सांगितल्या आहेत.

- उत्तम शिक्षक होण्यासाठी व्यक्ती ही संतत्वाला पोहोचलेली आणि पूजनीय असली पाहिजे.
- चांगला शिक्षक हा चांगला योगी असला पाहिजे.
- तो अंत्यत शिस्तबध्द आणि एकात्मिक व्यक्तिमत्वाचा असला पाहिजे.
- ज्याच्याकडे असीम शांतता नाही, सहनशक्ती नाही, आणि जो आत्मवंचना करतो असा शिक्षक कुठेच पोहोचू शकत नाही.
- स्वतःच्या अहंकाराच्या त्याग करुन आपल्या मनावर प्रभुत्व प्राप्त करुन त्याला मानवी वर्तणूकीसंबंधी ममदृष्टी विकसित करता आली पाहिजे.
- विद्यार्थ्यांबरोबर त्याचा स्वतःचाही विकास झाला पाहिजे.
- मदर म्हणतात, "शिक्षकाचा जर सन्मान व्हायचा असेल तर तो सन्मानपात्र असला पाहिजे."

## ४ ब. ८ शिक्षणाची राष्ट्रीय प्रणाली

अरविंदांनी राष्ट्रीय शिक्षणप्रणालीसाठी जोरदार प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी पुढील बाबी मांडल्या.

१) शिक्षणव्यवस्थेला 'राष्ट्रीय' शब्द जोडल्यामुळे शिक्षण राष्ट्रीय होत नाही.

२) शिक्षणाने त्याग, प्रगती आणि ज्ञान वृध्दीगंत करण्याकडे पुरेसे लक्ष दिले पाहिजे.

३) केवळ विज्ञानाच्या ज्ञानाने आपण खऱ्या अर्थाने शिक्षित होत नाही तर मानवी मन आणि आत्म्याच्या शक्तींशी ते जोडले गेले पाहिजे.

munotes.in

४) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संबंधाचे वैश्विक संबंधाबाबत संतुलित आकलन असले पाहिजे.

### आपली प्रगती तपासून पहा

खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा. चकीची विधाने दुरुस्त करा.

१) श्री अरविंद अनुभवाद्वारे शिक्षण सूचवितात.

२) मुक्त वातावरणात बालक स्वप्रयत्नाने ज्ञानप्राप्ती करु शकते.

३) बालकाच्या विकासात शिक्षकाची कोणतीही भूमिका नसते.

४) संत हा चांगला शिक्षक असतो.

५) शिक्षकाकडे मानवी वर्तणूकीबाबत मर्मदृष्टी असलीच पाहिजे.

६) 'राष्ट्रीय' शब्द शिक्षणप्रणालीला जोडून शिक्षण राष्ट्रीय होत नाही.

७) ज्ञान-विज्ञान हे जर मनःशक्ती आणि आत्म्याशी जोडले गेले तरच ते खर्या अर्थाने शिक्षण होय.

८) शिक्षकातील सर्वात महत्वाची बाब म्हणजे अभिवृत्ती होय.

९) शिक्षणाने ज्ञानाकडे लक्ष न देता त्याग आणि प्रगतीकडे पूरेसे लक्ष दिले पाहिजे.

## ४ ब. ९ सारांश

अरविंदांच्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानाचे एका वाक्यात सार पुढीलप्रमाणे सांगता येईल. "उदात्त सत्याची प्रचिती जी जीवनाविषयक समग्र दृष्टितून जी, श्रेष्ठ मानव आणि ज्ञानी मानव, दिव्य शक्तीचे आरोहण, अंतर्ज्ञान, योग आणि अतिमानस याद्वारे होते. अरविंदांनी तर्कसंगत विचारापेक्षा अंतर्ज्ञानावर भर दिला, आणि 'अंर्ताज्ञान आणि अंतर्ज्ञान आणि अधिकाधिक निर्दोष अंतर्ज्ञानाची शिकवण दिली. त्यांची योगविषयक कल्पना ही मानवातील दिव्यत्व पूर्णत्वास नेण्याशी संबंधित होती आणि यासाठी त्यांनी मनाच्या शिक्षणाचा उपदेश केला.

अरविंदांच्या मते खरे शिक्षण ते की जे व्यक्तिला स्वतःतील सूप्त शक्तींचा विकास करण्यास मदत करेल आणि त्याला मन, देशजीवन, मानवता आणि एकंदरीत जीवनाशी योग्य संबंध प्रस्थापित करण्यास सबळ करेल. माहिती ही बुद्धीचा पाया असू शकत नाही; परंतु ज्ञानधारणेसाठी ती मदत करु शकते, तसेच नवीन ज्ञानाची निर्मिती आणि शोधाचा आरंभबिंदू असू शकते. जे शिक्षण फक्त ज्ञानदानाशी संबंधित आहे ते खरे शिक्षण नव्हे. शिक्षण हे बालमानसशास्त्रावर आधारित असले पाहिजे. पालक आणि शिक्षकांनी बालकाला आत्मशिक्षणासाठी, तसेच स्वतःच्या प्रयोगशील, बौद्धिक, नैतिक आणि सौंदर्यात्मक क्षमतांचा विकास साधून एक सजीव म्हणून स्वतःचा विकास साधण्यास शिकवले पाहिजे.

munotes.in

## ४ ब. १० प्रश्नावली

१) एक तत्त्ववेत्ता म्हणून श्री अरविंदाबाबत कोणकोणती भिन्न मते आहेत? आपले मत काय आहे?

२) दोन अभाव स्पष्ट करा. आपण कशाशी सहमत आहात?

३) अरविंदांच्या विचारांनुसार भौतिकतावाद आणि आध्यात्मिकतावाद यात काय वाद आहे? त्यावरील उपाय कोणता?

४) अरविंदांच्या मते शिक्षणाची प्रमुख कार्ये कोणती?

५) एकात्म शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करुन श्री अरविंदांनी सांगितलेली त्याची ध्येये लिहा.

६) खालील प्रश्नांवर थोडक्यात लिहा.

   १. एकात्म शिक्षणाचा अभ्यासक्रम

   २. अरविंदांच्या मते अध्यापनपध्द्ती

   ३. अध्ययन-अध्यापनाची तत्त्वे

   ४. एकात्म शिक्षणातील शिक्षणाची भूमिका

   ५. श्री अरविंदांचे राष्ट्रीय शिक्षणप्रणालीवरील भाष्य

❖❖❖❖

munotes.in

# ४ क

## जिड्डू कृष्णमूर्ती
## (१८९५ – १९८६)

**प्रकरणाची रचना**

४ क.० उद्दिष्टे

४ क.१ थोडक्यात जीवन इतिहास

४ क.२ कृष्णमूर्तींचे जीवनविषयक तत्वज्ञान

४ क.३ श्रवण आणि अध्ययन यांतील फरक

४ क.४ "स्व " ची संकल्पना

४ क.५ कृष्णमूर्तींचा धार्मिक दृष्टिकोन

४ क.६. १ शिक्षणाची ध्येये

४ क. ६. २ प्रचलित शिक्षण प्रणालीच्या मर्यादा

४ क. ६. ३ संपूर्ण अध्ययनाची वैशिष्ट्ये

४ क. ६. ४ कृष्णमूर्तींअनुसार अध्यापनाच्या पध्दती

४ क. ६. ५ शिक्षकाची भूमिका

४ क. ६. ६ खरा शिक्षक

४ क. ७ जिड्डू कृष्णमूर्तींची आदर्श विद्यालयाची संकल्पना

४ क. ८ कृष्णमूर्तींचे शिक्षणामध्ये योगदान

४ क. ९ सारांश

४ क. १० प्रश्नावली

## ४ क.० उद्दिष्टे

ह्या घटकाच्या वाचनानंतर तुम्ही

- कृष्णमूर्तींच्या जीवनविषयक तत्वज्ञानाची चर्चा करु शकाल.
- त्यांचे धार्मिक दृष्टिकोन स्पष्ट करु शकाल.
- जे कृष्णमूर्ती अनुसार प्रचलित शिक्षण प्रणालीच्या मर्यादा लिहू शकाल.

munotes.in

- 'संपूर्ण अध्ययनाची' वैशिष्ट्ये स्पष्ट करु शकाल.
- कृष्णमूर्तींच्या शिक्षण योजना व आदर्श शाळा संकल्पने अनुसार शिक्षकाची भूमिका स्पष्ट करु शकाल.

## ४ क.१ थोडक्यात जीवन इतिहास

जिड्डू कृष्णमूर्तीचे कुटुंब तेलगु देसम् मधून स्थलांतरित होऊन तामिळनाडूतील मदनपल्ली येथे स्थायिक झाले. त्यांचे सततचे आजारपण आणि वडिलांची सतत होणारी बदली यामुळे त्यांच्या शालेय शिक्षणात व्यत्यय आला. रविंद्रनाथ टागोरांप्रमाणेच त्यांनाही पुस्तकी अध्ययन आणि शालेय वातावरणाचा तिटकारा होता. मात्र ते तीक्ष्ण निरीक्षक होते. त्यांच्या आठवणींमध्ये ते लिहितात, 'मी शाळेत फारसा खुश नव्हतो कारण शिक्षक फारसे दयाळू नव्हते आणि मला खुपच अवघड अभ्यास देत असत." मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण होण्याचे त्यांनी तीन असफल प्रयत्न केले.

१९११ मध्ये, वयाच्या १५ व्या वर्षी कृष्णमूर्ती कु. अँनी बेझेंट यांच्यासह इग्लंडला गेले. त्यांच्या वडिलांप्रमाणे ते ही ब्रम्हविद्या समाज चे सदस्य बनले. १९१२ मध्ये त्यांनी 'शिक्षण एक सेवा' हे पुस्तक लिहिले, ज्यांत त्यांनी एका आदर्श शाळेचे वर्णन केले जेथे प्रेमाचे राज्य आहे, जेथे प्रेम प्रेरणा देते, जेथे व्यवसायाप्रति महान श्रध्दा असलेल्या शिक्षकांच्या निगराणी खाली विद्यार्थी उमदे कुमार बनतात.

## ४ क.२ कृष्णमूर्तीचे जीवन विषयक तत्वज्ञान

कृष्णमूर्तींनी कोणताही अधिकार किंवा धर्मवीर हक्क सांगितला नाही. त्यांनी कोणत्याही नवीन धर्म -श्रध्देची किंवा समाज सुधारणेची सुरुवात केली नाही. जगातील संघर्ष आणि दु:ख यांवर उपाय म्हणून व्यक्तीचे संपूर्ण परिवर्तन या व्यतिरिक्त त्यांनी दुसरे काहीही सुचविले नाही. भूत आणि भविष्यातील ओझी झुगारुन देऊन मनाला भयमुक्त करण्यासाठी तीव्र भावना निर्माण व्हाव्या यासाठी स्वत: विचार करा असे ते त्यांच्या श्रोत्यांना सुचवित. समस्त मानवजातीसाठी त्यांचा संदेश होता, 'सर्वप्रथम आपल्या अस्तित्वाचा, आपल्या जीवनाचा हेतू समजून घ्या, आपण कशासाठी विकसित होत आहोत ते समजून घ्या. नंतर मजबूत बनण्यासाठी त्याचा उपयोग करा."

तुम्हाला नक्की काय करावयास आवडते हे शोधून काढणे अत्यंत अवघड आहे. तो शिक्षणाचा भाग आहे. (कृष्णमूर्ती १९७४) (भाग १, प्रकरण ८).

'असणे' आणि 'करणे' यांतील संबंधाचे वर्णन कृष्णमूर्तींनी वेळोवेळी केले आहे. 'करणे म्हणजे असणे' नाही तर 'असणे म्हणजे करणे.' जिड्डू कृष्णमूर्तीसाठी 'असणे' तून 'करणे' ची व्युत्पत्ती होते 'करणे' तून 'असणे' ची नाही – जे पारंपारिक विचाराच्या विरुध्द आहे. 'असणे' आणि 'करणे' यांची भूमिका बदलण्याचा परिणामांबद्दल अजून बरेच काही बोलणे आवश्यक आहे. 'तू कोण आहेस?' ('असणे' बद्दलचा प्रश्न) ह्या रुढ प्रश्नांचे निरीक्षण करा. त्याचे उत्तर 'मी वकील आहे,' मी इंजिनियर आहे. (करणे बद्दल विधान)

असे दिले जाते. ह्याचा परीणाम म्हणजे उच्च विकसित 'करणे' (जो साध्य करणे सुलभ आहे) व अविकसित 'असणे.' ह्या असंतुलनाची निष्पत्ती म्हणजे अकार्यक्षमता, असे कृष्णमूर्तींचे मत आहे.

**स्वातंत्र्य –**

स्वातंत्र्य आरंभी असते, ते अंतिम साध्य नव्हे. (कृष्णमूर्ती १९५३म्) (प्रकरण ६). जबरदस्ती अंती स्वातंत्र्य नसते; सक्तीची निष्पत्ती सक्तीच असते. (कृष्णमूर्ती १९५३c). कितीही आदर्श आराखड्यामध्ये बालकाला बसविण्याची सक्ती केली किंवा त्याच्यावर सत्ता गाजविली तर तो अंती स्वतंत्र असेल का? आपल्याला शिक्षणामध्ये खरीच क्रांती घडवून आणायची असेल तर आरंभापासूनच स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे, त्यासाठी पालकांनी व शिक्षकांनी बालकाला काय बनायचे यासाठी सहाय्य न करता त्याच्या स्वातंत्र्याची जाण ठेवली पाहिजे. (कृष्णमूर्ती १९५३b).

**मनाची जाण ठेवा –**

जीवनातील मुद्दयांपासून पळून जाण्यापेक्षा त्यांचा पूर्णांशाने सामना करण्यासाठी चांगले मन विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दयावे असे त्यांचे म्हणणे होते. त्यासाठी प्रत्येकाला आपली स्थिती, प्रेरक आणि जीवनाचा हेतू यांची जाणीव असली पाहिजे. म्हणजे ज्ञान फक्त मनाच्या वृध्दिसाठी आवश्यक आहे आणि ते एक साध्य नाही.

जेस्टाल्ट मानसशास्त्रज्ञांप्रमाणे कृष्णमूर्ती अवबोधाच्या संपूर्णतेमध्ये विश्वास ठेवतात. सामान्यत: आपण सर्व गोष्टी तुटकपणे पहातो, आपण राष्ट्राचे नागरिक, एक व्यक्ती, एक कॅथॉलिक, हिंदू, मुसलमान, जर्मन, रशियन, फ्रेंच इ. म्हणून कार्यरत असतो. आपण सर्व गोष्टी तुटकपणे पहातो त्यामुळे आपण मानवास एक पूर्ण म्हणून पहाण्यास अपयशी ठरतो.

ह्या तुटकपणातून मनाची मुक्ती होणे आवश्यक आहे. जेव्हा तुटकपणा येतो तेव्हा मनाची ऊर्जा खर्ची पडते. जेव्हा आपण एखादा सिध्दांत स्वीकारतो किंवा अनुसरतो तेव्हा आपण तुटकपणाच्या अधिकारामध्ये अडकतो. सत्य त्या पलिकडे आहे. आणि पूर्णत्वामध्ये आहे. मन तुकड्यामध्ये, अपूर्णामध्ये गोंधळलेले असते. गोधंळलेले मन गोंधळलेलेच राहिल आणि संकट स्थिती आणील आणि पुढे जाऊन निष्क्रीयता आणील.

आपण स्वत: आपले मित्र, आपली पत्नी यांच्या प्रतिमा आपल्या मनात इतक्या तीव्र असतात की ह्या प्रतिमांशीच संबंध असतात, प्रत्यक्ष संबंध मात्र नसतो. प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्यासाठी मनाला ह्या प्रतिमांपासून मुक्त केले पाहिजे.

सुखाप्रति नापसंती दर्शवू नये. त्याची चांगली समज आली पाहिजे. सुख आणि वेदना समजल्याशिवाय कोणीही भयापासून मुक्त होऊ शकत नाही. भयमुक्त नसलेले मन संघर्ष आणि गोंधळलेल्या स्थितीत रहाते. सुखप्राप्तीसाठी आणि भयमुक्त होण्यासाठी व्यक्तीला स्व ची जाणीव असली पाहिजे, त्याने स्वत:स आहे तसे स्वीकारले पाहिजे. वास्तवासह आपण जगले पाहिजे. जेथे भय आहे तेथे प्रेम नाही, आपण जरी शारीरिकदृष्ट्या सुरक्षित असलो तरी मानसशास्त्रीयदृष्ट्या असुरक्षित असण्याची शक्यता असते. व्यक्तीच्या



munotes.in

अज्ञानातच अपरिपक्वता वसते. येथे कृष्णमूर्ती आपल्या विचारप्रक्रियेमध्ये क्रांती घडवून आणू पहातात.

खरा मुद्दा आपल्या मनाची गुणवत्ता आहे; मनाचे ज्ञान नाही तर मनाची खोली जी ज्ञानास मिळते. मन अमर्याद आहे. ते विश्वाप्रमाणे आहे. त्याला त्याची स्वत:ची प्रचंड ऊर्जा आहे. ते चिरकाल मुक्त आहे. मेंदू हा ज्ञानाचा गुलाम आहे आणि म्हणून तो मर्यादित, अपूर्ण आहे. जेव्हा मेंदू स्वत:ला ह्या परिस्थितीतून मूक्त करील तेव्हा तो अमर्याद बनेल व मेंदू आणि मन यांत कोणतीही सीमा असणार नाही. शिक्षण तेव्हा ह्या सर्व स्थितींतून मुक्त असेल. विद्यालयीन शाखांचे आपल्या जीवनातील योग्य स्थान त्यामुळे अस्वीकार होत नाही. (कृष्णमूर्ती १९८५)

पारंपारिक शिक्षणामधील दृष्टिकोनापेक्षा, कृष्णमूर्तींना वाटते की प्रत्येक व्यक्तीने स्वत:चा शोध घ्यावा, स्व ला स्वत: उघड करावे. हा काही नवीन दृष्टिकोन नाही व रुसो, पेस्टॉलॉजी, फ्रोबेल आणि माँटेसरी यांच्या शैक्षणिक उपपत्त्यांशी मिळता-जुळता आहे. दररोज आपण आपल्या मन ह्रदय आणि कृतींवर चिंतन केले पाहिजे. शाळांत किंवा व्यवस्थित असण्यासाठी आपल्याकडे उद्या नाही. आपण तसे या क्षणी असणे आवµयक आहे.

### कृत्य: भूत, वर्तमान आणि भविष्य

कृत्य म्हणजे आपली वर्तमान कृती असा बोध होत असला तरी प्रत्यक्षात मात्र ते गत ज्ञान आणि अनुभव यांची निष्पत्ती असते. भूतकालीन कल्पना आणि सूत्रे आपण फक्त कृतीमध्ये उतरवितो. जेव्हा आपण आपल्या स्मृती अनुसार कृत्य करतो, नि:शंक आपण वर्तमानात कृती करुन भविष्य निर्मिल्याचा दावा करतो परंतु वस्तुत: असा कृतीशील वर्तमान असतच नाही. येथे कृत्य मृत गोष्टीवर आधारित आहे (गत कल्पना व अनुभव). फक्त स्मृतीप्रमाणे कृत्य म्हणजे कृत्य नाही. मृत गोष्टींवर आधारित कृत्य भविष्यासही मृत बनविते.

भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील युध्दांना आपणच जबाबदार आहोत. शांतीयुक्त जीवन म्हणजे दररोज शांतीने जगणे. दररोज शांतीपूर्ण जीवन जगायचे तर आपल्याला इतर राष्ट्रे, धर्म, अधिकारी ह्यांच्या प्रति घृणा विकसित करुन चालणार नाही. शांती म्हणजे प्रेम करणे, दया करणे.

## ४ क.३ श्रवण आणि अध्ययन यांतील फरक

संप्रेषणाचा अर्थ जाणून घेण्यावर जिड्डू कृष्णमूर्ती भर देतात. ह्याचा अर्थ, जे सांगितले जात आहे त्याचे मौखिक भाषण समजणे. पण तथ्य हे आहे की आकलन फक्त बौध्दिक स्तरावरच होते. कृष्णमूर्ती अनुसार ही संकल्पना श्रवण आणि अध्ययन दोहोंचा समावेश करते. ह्या दोहोंतील भेद समजून घेणे शिक्षकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

श्रवणामध्ये सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'कसे' ऐकले? किंवा श्रवणाचा मार्ग वा पध्दती. साधारणत:, जेव्हा आपण ऐकतो तेव्हा आपल्या स्वत:च्या भूतकाळाचे, मतांचे, कल्पनांचे आणि पूर्वग्रहांचे प्रक्षेपण त्यामध्ये करतो. जेव्हा आपण ऐकतो तेव्हा आपल्या प्रतिमा आणि पार्श्वभूमी नुसार ऐकतो. म्हणजे, आपण अजिबात ऐकत नसतो किंवा श्रवण करीत नसतो.

श्रवण घडते जेव्हा शांतता/ स्तब्धता असते. ह्या थोर शिक्षकाने स्तब्धतेचे/ शांततेचे महत्व दर्शवून दिले आहे. शांततेमध्ये मन एकाग्र होते. खरोखर संप्रेषण घडून येते शांततेमध्ये. अध्ययन म्हणजे कल्पनांचा संग्रह नव्हे. जेव्हा संपूर्ण मन आणि ह्रदय संप्रेषण प्रक्रियमध्ये सहभागी असते अशा संप्रेषणातून अध्ययन घडते. कोणत्याही प्रकारची पूर्व प्रतिमा किंवा हेतू न ठेवता श्रवण घडले तरच अध्ययन घडते. काय सत्य आणि काय असत्य किंवा चुकीचे ह्याची श्रवणकर्त्यास आणि अध्ययनकर्त्यास समज होते. जर सत्य तर तात्काळ कृत्य घडते आणि चुकीचे असेल तर कृत्य घडत नाही.

### तुमची प्रगती तपासा

पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहा. चुकीची विधाने बरोबर करुन लिहा.

१. व्यक्तीला खरोखर काय करण्यास आवडते हे शिक्षणाच्या कक्षेमध्ये येत नाही.

२. आपण काय करतो आहोत याचे ज्ञान असेल तर आपल्या स्वत्वाची संकल्पना समजता येईल.

३. प्रारंभापासून स्वातंत्र्य असेल तरच शिक्षणामध्ये क्रांती घडू शकेल.

४. पूर्ण आणि अंश दोहोंमध्ये एकाचवेळी सत्याचा शोध घेतला पाहिजे.

५. विश्वाच्या स्वरुपामध्ये मन अमर्याद आहे आणि चिरकाल मुक्त आहे.

६. कृष्णमूर्ती अनुसार शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे दुसर्यांद्वारे बालकाला आकार देणे.

७. भूतकाळातील प्रतिमा आणि आपली पार्श्वभूमी यांसह आपण ऐकतो तेव्हाच खरे श्रवण घडते.

## ४ क.४ “स्व” ची संकल्पना

अनेक बचावात्मक आणि व्यापक प्रतिक्रियांच्या मालिकांनी स्व बनलेला असतो. आनंददायी ओळख आणि त्याची स्वत:ची प्रक्षेपणे यांत त्याची परिपूर्णता असते. मी, माझे, स्वत: अशा अहंच्या रुपात स्व ने अनुभव रुपांतरित केला नाही आणि त्याच्या प्रतिक्रियांपासून स्व ला दूर ठेवले तर कोणताही अनुभव संघर्षमुक्त, गोंधळमुक्त आणि वेदनामुक्त असेल. जेव्हा व्यक्ती स्व चे मार्ग समजते तेव्हाच मुक्तता येते. जेव्हा स्व त्याच्याकडे असलेल्या अनुभवांच्या संग्रहाने प्रतिक्रियांना प्रभावित करीत नाही तेव्हा अनुभवांना वेगळाच अर्थ प्राप्त होतो आणि नवनिर्मिती होते.

munotes.in

संपूर्णतया परिपूर्ण जगणे मानवासाठी आवश्यक आहे. आपल्या संपूर्ण स्वरुपाच्या कोणत्याही एका अंशावर अवाजवी भर जीवनाचे अपूर्ण आणि विकृत दृµय दर्शवितो. ही विरुपताच आपल्या अनेक समस्यांचे मूळ आहे. आपल्या शरीराच्या कोणत्याही एखाद्या भागाची अनैसर्गिक वाढ नक्कीच सततची अस्वस्थता आणि चिंता निर्माण करील. तसेच बौध्दिक विकास जो आपल्या स्वरुपाचे फक्त एक अंग आहे त्याच्या बाबतीतही घडेल. त्याचप्रमाणे आपल्या स्वभावाचा अंशत: विकासही आपल्या स्वत:साठी आणि समाजासाठी घातकच ठरेल. म्हणून आपण आपल्या समस्यांचा समग्र संपूर्ण दृष्टिकोनातून सामना करणे महत्त्वाचे ठरते.

एक संपूर्ण मानव बनण्यासाठी व्यक्तीला त्याच्या स्वत:च्या जागृतावस्थेची पूर्ण समज असली पाहिजे. बौध्दिक पैलूस अवाजवी महत्त्व दिल्यास ते शक्य नाही. बौध्दिकतेतच जगणे म्हणजे पृथक जगणे, अपूर्णता.

जिड्डू कृष्णमूर्तीचे बहुतांश जीवन, त्यांच्या भाष्यांमुळे व लिखाणांमुळे रोचक आणि वादग्रस्त होते. त्यांची धर्मावरील, राष्ट्रवादावरील, रुढी परंपरांवरील, संघटनांवरील आणि संबंधांवरील निरीक्षणे नेहमीच तत्कालीन संकेतांच्या विरोधात असत. ते नेहमीच काळाच्या पुढे होते. परंतु त्यांचे शिक्षणावरील विचार अजूनही सुधारणावादी आहेत आणि बऱ्याचवेळेला गैरसमज होऊन अव्यवहारी म्हणून ते नापसंत केले जातात. ह्याचे कारण म्हणजे कृष्णमूर्ती शिक्षण एक धार्मिक कृत्य समजतात तर बहुतेक लोक शिक्षण म्हणजे धर्मनिरपेक्ष जगामध्ये यशस्वी होण्यासाठीची तयारी मानतात.

युगानुयुगे ऋषीमुनींनी आपल्याला सुचित केले आहे की आपण जे पहातो ते सत्य नव्हे, जरी ते तसे वाटले तरीही आपल्याला जसे शिकविले आहे किंवा आपण जसे पहावे किंवा ऐकावे अशी अपेक्षा आहे त्याप्रमाणे आपण गोष्टीकडे पहातो. सत्य किंवा पवित्र यांपेक्षा आपल्याला परिचित व अधिक आवडीच्या गोष्टी निवडण्याकडे आपला कल असतो. उदा. ज्यू समाजाच्या प्रस्थापित परंपरांपेक्षा ख्रिास्तांचे विचार आणि शिकवण वेगळी असल्यामुळे बायबलमध्ये ज्यू लोकांनी ख्रिस्ताऐवजी गुन्हेगार व खुनी बाराब्बसची निवड केली. हेच शिक्षणाच्या बाबत देखिल खरे आहे.

जीवनातील मूलभूत आव्हानांचा सामना करण्यासाठी लोकांची तयारी करणे किंवा जगाच्या समस्या सोडविणे यांसाठी आधुनिक शिक्षण अपयशी ठरते. समाजाच्या आकांक्षा पुऱ्या करण्यातही ते कमी पडते. कृष्णमूर्ती म्हणतात, 'ह्या समस्यांवर मात करण्यासाठी आपल्याला शैक्षणिक मर्मदृष्टीची आवश्यकता आहे जी पावित्र्य आणि धर्मनिरपेक्षता यांच्याशी युती साधेल." कृष्णमूर्तीचे विचार सुधारणावादी आहेत. खोल स्तरावर जीवन जगण्याची आव्हाने पूर्ण करण्यास ते सहाय्य करतात.

## ४ क.५ धर्मासंबंधी कृष्णमूर्तींचे विचार

कृष्णमूर्तीचा धार्मिकतेचा उपागम धर्ममुक्त आहे. जे पवित्र आणि खरोखर धार्मिक आहे ते सशर्त, संस्कृति-बध्द किंवा कालबध्द असू शकत नाही, असा कृष्णमूर्तींचा गाढ विµवास होता. ते म्हणत, जे धार्मिक आहे ते कोणत्याही तत्व, रुढी, रितीरिवाज, विµवास किंवा

अधिकारांनी बंधित होऊ शकत नाही. पवित्राचा तत्व, अधिकार किंवा चिन्ह यांच्याशी संबंध जोडला नाही तर मानव पावित्र्याशी संपर्क कसा साधेल? असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. ते स्पष्टीकरण देतात, धर्मनिरपेक्षतेकडून पावित्र्याकडे जाणारा पूल म्हणजे विशिष्ट जागृतावस्था, अशी जागृतावस्था जी अहं किंवा स्व च्या पलिकडे जाते; अशी जागृतावस्था जी करुणा व निस्वार्थी प्रेम जाणते; अशी जागृतावस्था जी शांतता जाणते, सौंदर्य पहाते आणि आनंद जगते; अशी जागृतावस्था जी विचारांच्या कक्षांतून युक्त आहे.

कृष्णमूर्तीच्या मते पावित्र्य सर्व गोष्टींच्या मुळाशी आहे, सर्व गोष्टींचे उगमस्थान आहे आणि म्हणून आणखी मूलभूत घटकांमध्ये त्याचे विभाजन करणे शक्य नाही. ते म्हणतात सर्व गोष्टी एका संपूर्णाचा भाग आहेत आणि हे ऐक्य पावित्र्य आहे.

**तुमची प्रगती तपासा -**

योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा: -

अ) एक संपूर्ण मानव असण्यासाठी, व्यक्तीला स्वत:च्या _______ ची पूर्ण प्रक्रिया समजली पाहिजे.

१) शरीराची वाढ २) बुध्दि ३) जागृतावस्था ४) गोंधळ स्थिती

ब) आधुनिक शिक्षण जगाच्या समस्या सोडविण्यात अपयशी ठरते कारण _________.

१) रुढींपासून विचलन २) पावित्र्य आणि धर्मनिरपेक्ष यांसंबंधी मर्मदृष्टीचा अभाव

३) मूलसुधारणावादी मर्मदृष्टि ४) समाजाच्या आकांक्षा.

क) जे खरोखर पवित्र किंवा धार्मिक आहे ते ——असू शकत नाही.

१) दुराग्रही २) धर्ममुक्त ३) बिनाशर्त ४) निस्वार्थी प्रेम.

## ४ क.६.१ शिक्षणाची ध्येये

कृष्णमूर्तीसाठी शिक्षण म्हणजे -

पूर्ण व्यक्तीला शिक्षित करणे.

व्यक्तीला एक पूर्ण म्हणून शिक्षित करणे (वेगवेगळे भाग म्हणून नाही).

एका पूर्णामध्ये व्यक्तीला शिक्षित करणे (समाज, मानवता, निसर्ग इ. यांचा भाग म्हणून)

त्यांच्या मते, संपूर्ण जीवनासाठी तयारी म्हणजे शिक्षण, फक्त जीवनाच्या काही अंगासाठी (कार्य) तयारी नाही.

munotes.in

त्यांचे भाष्य प्रत्यक्षात साकारण्यासाठी जिड्डू कृष्णमूर्तींनी देखिल रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद आणि इतरांप्रमाणे स्वत:च्या शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. त्यांच्या धार्मिकते विषयक मतप्रणाली प्रमाणे बालकांना धार्मिक मानव बनविण्यासाठी त्यांच्या संस्थांमध्ये योग्य शिक्षण देण्याचा त्यांचा आग्रह असे. अचूक कृत्याची समज, संबंधाची खोली आणि धार्मिक जीवनाचे पावित्र्य यांवर आधारित जीवनाचे मार्ग शिकण्याची केंद्रे त्यांच्या संस्था असाव्या असे त्यांना वाटे. हया संस्था/ ठिकाणे फक्त सुसंस्कृतासाठी असली पाहिजेत. स्वयं अभिव्यक्तीचे समाधान मिळविण्यासाठी शिक्षण नाही तर त्यामध्ये स्व जागृती करण्याची क्षमता असली पाहिजे. योग्य शिक्षण कोणत्याही पायाभूत सिध्दांताशी संबंधित नाही जरी ते कितीही भविष्यकालीन सुखस्थान प्रदान करीत असले तरीही. ते कोणत्याही प्रणालीवर आधारित नाही, तसेच व्यक्तीला विशिष्ट प्रकारे अभिसंधित करण्याचा तो मार्गही नाही.

व्यक्तीला परिपक्व व मुक्त बनण्यास प्रेम आणि चांगुलपणामध्ये फुलण्यास सहाय्य करणे म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षण. आपल्याला ह्या शिक्षणात रुचि असली पाहिजे, एखाद्या आदर्शवादी आराखड्यानुसार बालकाला आकार देण्यामध्ये नाही. ह्या महान शिक्षका अनुसार शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे बालकाला अशा प्रकारे मानसिकदृष्टया विकसित करणे की तो स्वत:स ओळखू शकेल. व्यक्तीला मनाने मुक्त होण्यास व भयमुक्त होण्यास शिक्षणाने सहाय्य करावे. कृष्णमूर्तीसाठी, आंतरिक परिवर्तन आणि मुक्तता हे शिक्षणाचे मुख्य हेतू असावे आणि त्याद्वारे समाज परिवर्तन व्हावे. लोकांना खऱ्या अर्थाने धार्मिक बनण्यासाठी सहाय्य करणे शिक्षणाचा हेतू आहे. हे हेतू फक्त सुखद आदर्श नसावे. हे धार्मिक हेतू एखाद्या अंतिम ध्येयासाठी नसून शैक्षणिक केंद्रातील क्षणोक्षणीच्या जीवनासाठी आहे. बालपणापासूनच दुसऱ्याचे अनुकरण न करता स्व ची जाणीव ठेवण्यास सहाय्य करणे शिक्षणाचे कार्य आहे. आपण कोण आहोत हे समजण्यामध्ये मुक्तता आहे. आपले शिक्षण आपल्याला काहीतरी बनण्यास प्रेरित करते.

स्वत:स ओळखणे म्हणजेच जीवनाची समज, तोच शिक्षणाचा प्रारंभ आणि अंत. कृष्णमूर्तींना वाटे की, व्यक्तीच्या स्वरुपाचे आणि गहन पैलूंचे अनावरण करणे एवढेच पुरेसे नाही, तर प्रत्येक व्यक्ती मधील एकमेवाद्वितीय योग्यता शोधणे आवश्यक आहे, व्यक्तीला काय करण्यास आवडते ते शोधून त्याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. फक्त यशासाठी किंवा इतर कोणत्याही सांस्कृतिक आकांक्षेसाठी यासर्वांपासून व्यक्तीला वंचित ठेवणे म्हणजे सर्वांत हीन दर्जाची वंचना. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक योग्यतेचा शोध आणि विद्यार्थ्याची त्याच्या आवडी बद्दलची समज पालकांच्या किंवा समाजाच्या योजनेमध्ये बसलेच असे नाही, परंतु हा स्वत:स समजण्याचा महत्त्वाचा भाग आहे आणि म्हणूनच शिक्षणाचा देखिल.

आधुनिक शिक्षण आपल्याला विचारहीन अस्तित्वात रुपांतरीत करीत आहे, ते आपल्याला वैयक्तिक योग्यतेचा शोध घेण्यास अगदीच कमी सहाय्य करते. (कृष्णमूर्ती १९६४) (प्रकरण ३). आपल्याला काम करणे खरोखरच आवडते हे शोधून काढणे फारच अवघड असते. हा शिक्षणाचा भाग आहे. (कृष्णमूर्ती १९७४) (भाग १, प्रकरण ८). तुम्हाला मनापासून काम करण्यास आवडते हे शोधून काढण्यास सहाय्य करते ते

खरे शिक्षण. काय करण्यास आवडते हे महत्त्वाचे नाही, स्वैपाक की बागकाम! पण असे काही ज्यात तुमचे मन आहे (कृष्णमूर्ती १९७४) (भाग १, प्रकरण ८).

## ४ क. ६.२ प्रचलित शिक्षण प्रणालीच्या मर्यादा

भारतीय शिक्षणाच्या पुढील मर्यादा कृष्णमूर्तींना जाणवल्या. परंपरागत शिक्षण -

१. स्वतंत्र विचार अत्यंत अवघड बनविते.

२. उत्स्फुर्ततेचा गळा घोटते.

३. फिकट व निस्तेज मन घडविते.

४. प्रस्थापित प्रमाणाकांपासून विचलित होण्यास मनात भीती निर्माण करते.

५. जीवनाचे उच्च व व्यापक महत्त्व व्यक्तीस समजावण्यास अपयशी ठरते.

६. विचार आणि भावनांची पूर्णता एकीकरण साधण्यास अपयशी ठरते.

७. एककल्ली असून व्यक्तीच्या सर्वांगीण वाढीसाठी उपयुक्त नाही.

८. वैयक्तिक लाभ आणि सुरक्षा मिळविण्यासाठी आणि स्वत:साठी लढण्याचे प्रशिक्षण देते.

९. परीक्षा आणि पदव्या हा बुध्दिमत्तेचा निकष आहे असे मानते.

१०. मनास धूर्त बनण्याचे व आवµयक मानवी मुद्द्यांवर विचार करण्याचे प्रशिक्षण देते.

११. व्यक्तीला दुसऱ्याच्या तंत्राने वागणारा यांत्रिक आणि विचारहीन बनविण्यास सहाय्य करते.

१२. बौध्दिकदृष्ट्या जागृत बनवित असले तरी अकार्यक्षम व असर्जनशीलच ठेवते.

## ४ क. ६.३ संपूर्ण अध्ययनाची वैशिष्ट्ये

**संपूर्ण अध्ययन अध्ययनार्थीस पुढीलसाठी सज्ज करते:**

**१. आव्हानांचा सामना करण्यासाठी क्षमतांचा विकास -**

जीवनातील समस्यांना, गुंतागुंतीना, रहस्यांना आणि अचानक आलेल्या अपेक्षांना नेटाने टक्कर देण्यासाठी विचारांच्या विशिष्ट उपपत्ती आणि नमुन्यांपासून व्यक्ती मुक्त असली पाहिजे.

**२. स्वयं ज्ञानाचा विकास -**

व्यक्तीला नि:पक्षपाती संशोधनातून येणाऱ्या खऱ्या मूल्यांचा शोध घेण्यासाठी आणि आक्रमक व महत्त्वाकांक्षी संघर्षासह ठाम मतप्रतिपादनाची स्वयं अभिव्यक्ती करण्यास शिक्षणाने सहाय्य केले पाहिजे. कृष्णमूर्तींसाठी व्यक्ती प्रथम महत्त्वाची आहे. प्रणाली नाही; आणि जोपर्यंत व्यक्ती स्वत:ची पूर्ण प्रक्रिया जाणत नाही तोपर्यंत

munotes.in

जगामध्ये कोणतीही प्रणाली व्यवस्था आणि शांती आणू शकत नाही. व्यक्तीच्या पूर्ण मानसशास्त्रीय प्रक्रियेची जाण म्हणजे स्वयंज्ञानातून आलेली समज. शिक्षण म्हणजे स्वत:ची समज कारण आपणा प्रत्येकामध्ये संपूर्ण अस्तित्व एकत्र आलेले आहे.

**३. संकलित अनुभव -**

कृष्णमूर्ती म्हणतात, 'अत्यंत महत्त्वाची अशी संपूर्ण जीवनाची प्रक्रिया अनुभवण्यासाठी मानवाला सहाय्य करणारे तंत्र विकसित करण्यासाठी प्रेरित करणे म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षण हे अनुभव क्षमता आणि तंत्र यांना त्यांचे योग्य स्थान देतील.

**४. तयार / आयत्या कल्पनांपासून मुक्तता -**

कृष्णमूर्ती अनुसार कल्पनांना शिक्षणामध्ये स्थान नाही कारण त्या वर्तमानाचे आकलन टाळतात. भविष्यामध्ये पलायन व्यक्तीला पुढे काय ह्याची जाण देऊ शकत नाही. कल्पना मनाची सुस्ती आणि वर्तमान टाळण्याची इच्छा दर्शवितात.

आयत्या आदर्श सुखस्थानाचा शोध म्हणजे व्यक्तीच्या स्वातंत्र्यास व संपूर्णतेस नकार आहे. आपल्याला गरज आहे बुध्दिमान व स्वतंत्र मानवाची, आदर्शवादी अस्तित्वाची किंवा यांत्रिक मनांची नाही.

**५. मुक्त आणि परिपक्व मानवाचा विकास –**

जिड्डू कृष्णमूर्तींसाठी, खरे शिक्षण पायाभूत सिध्दांत आणि सशर्ततेपासून मुक्त आहे. व्यक्तीला प्रेम आणि चांगूलपणामध्ये विकसित होण्यासाठी, स्वतंत्र व परिपक्व बनण्यासाठी सहाय्य करते ते खरे शिक्षण. विशिष्ट राजकीय किंवा धार्मिक कल्पनांमध्ये बालकाच्या मनास अभिसंधित करण्यामुळे मानवा मानवामध्ये द्वेष निर्माण होतो आणि समाजात परिवर्तन व बंधुभाव आणण्यास ही परिस्थिती सहाय्य करीत नाही. भारतीय परिस्थिती बंधुभाव आणि सामंजस्याच्या अभावाचे बोलके उदाहरण आहे.

**६. पुनर्शिक्षण -**

आपल्या स्वत:तील परिवर्तनाने खरे शिक्षण घडते. आपण दयाळू, समाधानी असले पाहिजे आणि उच्चतमा साठी पोहोचले पाहिजे, तरच मानवजातीची खरी मुक्ती असेल.

**७. पर्यावरणाप्रति योग्य आकलनाचा विकास -**

आपण पर्यावरणाने बंधित नाही, आपणच पर्यावरण आहोत याची जाणीव झाली पाहिजे. आपण कधीच पहात नाही की आपणच संपूर्ण पर्यावरण आहोत कारण आपल्यामध्ये अनेक अस्तित्वे स्थित आहेत, जी सर्व 'मी' भोवती फिरतात. स्व ह्या अनेक अस्तित्वांचा बनलेला आहे, जी प्रत्यक्षात इच्छांची विविध रुपे आहेत. ह्या सर्व इच्छांच्या

एकीकरणातून एक केंद्रीय आकृती उगवते, एक विचारवंत, 'मी' व 'माझे' ची दृढ इच्छा. अशाप्रकारे स्व व स्व व्यतिरिक्त, मी आणि पर्यावरण म्हणजे समाज यात विभाजन होते. अंतर्गत व बाह्य संघर्षाची ही सुरुवात असते.

## ८. शहाणपण आणि ज्ञानार्जन करणे ह्यांचा विकास -

अधिकाधिक ज्ञानार्जन करण्याच्या नादात आपण प्रेम, सौंदर्याभिरुचि आणि कौर्याप्रति संवेदनशीलता गमावून बसलो आहोत. जेव्हा आपण अधिकाधिक तज्ञ बनतो तेव्हा संपूर्णता कमी-कमी होऊ लागते. शहाणपणाची जागा ज्ञान घेऊ शकत नाही आणि अनेक तथ्यांचा / माहितीचा संग्रह मानवाची दु:खे कमी करु शकत नाही. आपले शिक्षण आपल्याला अधिकाधिक उथळ बनविते आहे आणि आपल्या अस्तित्वाचा गहन अर्थ समजण्यास सहाय्य करीत नाही. आपले जीवन अर्थहीन, असमतोल व रिक्त बनू लागले आहे.

तथ्यांचे ज्ञान जरी नित्य वृध्दिंगत होत असले तरी ते त्याच्या स्वरुपामुळे मर्यादितच आहे, शहाणपण मात्र अमर्याद आहे.  कारण त्यामध्ये ज्ञान आणि कृत्याचा मार्ग दोहोंचा समावेश आहे. साधारणत:आपण संपूर्ण वृक्ष समजून एखादी शाखा पकडतो. भूतकाळाच्या ज्ञानातून आपल्याला कधीही संपूर्णाचा आनंद मिळणार नाही. हत्तीच्या विविध अवयवांना स्पर्श करुन हत्तीचे वर्णन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अंध माणसांप्रमाणे आपण आहोत. बुध्दि कधीही पूर्ण दृष्टी देऊ शकत नाही कारण ती पूर्णाचा एक अंश आहे.

## ९. इतरांप्रति प्रेम भावनेचा विकास –

फक्त खरे प्रेम आणि योग्य विचार व्यक्तीमध्ये क्रांती घडवून आणतील. पण ते काल्पनिक किंवा मन:कल्पित प्रेमाचा शोध घेऊन साध्य होणार नाही. स्वत:ला द्वेष, हाव, शोषण, असूया आणि अहं यांपासून दूर ठेवले तरच ते शक्य आहे.

## १०. योग्य संबंधाचा विकास -

व्यक्ती व समाजामध्ये योग्य संबंध संवर्धित करण्यासाठी शिक्षणाने व्यक्तीला सहाय्य केले पाहिजे आणि ते तेव्हाच शक्य होईल जेव्हा व्यक्ती स्वत:ची मानसशास्त्रीय प्रक्रिया समजेल. स्वत:स समजणे, स्वत:च्या पलिकडे जाणे यांतच खरी बुध्दिमत्ता आहे.

## ११. स्वातंत्र्य आणि संपूर्णतेचा विकास -

बालकाला शिक्षित करणे म्हणजे त्याला स्वातंत्र्य आणि संपूर्णतेचे आकलन होण्यास सहाय्य करणे.  स्वातंत्र्य असण्यासाठी व्यवस्था हवी आणि फक्त सद्गुणांतूनच व्यवस्था शक्य आहे.  साधेपणातून संपूर्णता साध्य होते - आपले आंतरिक जीवन आणि बाह्य गरजा यांतील साधेपणा.

munotes.in

**१२. सर्जनशील बुध्दिमत्तेचा विकास -**

सातत्यपूर्ण पृच्छा आणि सद्य प्रणालीतील अस्वस्थता सर्जनशील बुध्दिमत्तेस वाव देते. ही वृत्ती जागृत ठेवणे अत्यंत कठीण काम आहे. बऱ्याच लोकांना मुलांमध्ये अशा प्रकारची बुध्दिमता नकोशी वाटते कारण प्रस्थापित मूल्यांवर उठविलेल्या प्रश्नांनी निर्माण होणाऱ्या अस्वस्थेचा त्यांना करावा लागणारा सामना.

**१३. आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा विकास -**

जोपर्यंत आपल्या समाजामध्ये श्रीमंत आणि गरीब, शोषण करणारा आणि शोषित, प्रबळ आणि दुर्बळ अशी स्पष्ट विषमता असेल व राष्ट्रीयत्व, धर्म, जात, वंश अशा विभाजक निष्ठा प्रचलित आहेत; मानवा-मानवामध्ये बंधुभाव प्रस्थापित करणे शक्य नाही.

जर आपल्याला वर्तमान मानवी संबंधामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणायचा असेल तर स्वयं-ज्ञानातून स्वत:स बदलावे हे आपले तात्काळ व एकमेव कार्य असले पाहिजे. म्हणजे आपण पुन्हा केंद्रीय मुद्द्याकडे येतो, तो म्हणजे 'स्वत:' साधारणत: आपण ह्या मुद्दयाकडे दुर्लक्ष करतो आणि स्वत: जबाबदारी स्वीकारण्या ऐवजी सरकार, धार्मिकता आणि पायाभूत कल्पनांना दोषी ठरवितो. सरकार म्हणजे आपणच, धार्मिकता आणि पायाभूत कल्पना आपलेच प्रक्षेपण आहे. जोपर्यंत आपण स्वत:स मूलभूतरित्या बदलत नाही तोपर्यंत योग्य शिक्षणही नसेल आणि शांतीपूर्ण जगही नसेल.

**१४. पायाभूत सिध्दांतांपासून मुक्तता -**

जिड्डू कृष्णमूर्ती म्हणतात, एखाद्या विशिष्ट राजकीय किंवा धार्मिक पायाभूत कल्पनेमध्ये बालकाचे मन अभिसंधित केल्यामुळे मानवांमध्ये शत्रुत्व भावना जन्म घेते. स्पर्धात्मक समाजामध्ये बंधुभाव असणे शक्य नसते.

**१५. स्वातंत्र्य आणि शिस्त -**

प्रेम आणि चांगुलपणाचा विकास वैयक्तिक स्वातंत्र्यामध्येच होऊ शकतो. फक्त योग्य प्रकारचे शिक्षणच स्वातंत्र्य देऊ शकते. स्वातंत्र्याचा एक धोका म्हणजे ही प्रणाली मानवापेक्षा महत्त्वाची बनू शकते. येथे शिस्त प्रेमाची जागा घेते. आपली ह्रदये रिक्त असतात म्हणून आपण शिस्तीस कवटाळतो. शिस्तीतून स्वातंत्र्य, मुक्तता कधीही साध्य होऊ शकणार नाही. स्वातंत्र्य हा काही साध्य करावयाचा अंत किंवा ध्येय नाही. स्वातंत्र्य हा प्रारंभ आहे अंत नाही. प्रामाणिक शिक्षक बालकांचे संरक्षण करुन त्यांना योग्य प्रकारच्या स्वातंत्र्याकडे जाण्यास सहाय्य करील. यासाठी तो स्वत: पायाभूत कल्पना आणि ठाम मतांपासून मुक्त असला पाहिजे.

munotes.in

**१६. बक्षीसे आणि शिक्षा -**

अनिवार्यतेतून कधीही संवेदनशीलतेची जागृती होत नाही. अनिवार्यतेमुळे विरोध आणि भयाचा जन्म होतो. कोणत्याही स्वरुपातील बक्षीसे आणि शिक्षा मनाला दुसर्याच्या तंत्राने वागणारे व निस्तेज बनवितात. शिस्त हा बालकाला नियंत्रणात ठेवण्याचा मार्ग असेलही पण तो त्याला जीवनातील समस्यांची समज देत नाही. बालक जर अव्यवस्थित किंवा अवाजवी मस्तीखोर असेल तर शिक्षकाने त्याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. चुकीचा आहार, विश्रांतीचा अभाव, कौटुंबिक कुरबुरी किंवा काही गुप्त भीती अशा वर्तनांची कारणे असू शकतात.

१७. **आध्यात्मिक प्रशिक्षण, धार्मिक शिक्षण नाही -**

कृष्णमूर्तीसाठी ठाम मते, रहस्ये आणि कर्मकांड आध्यात्मिक जीवनासाठी पोषक नाहीत. खऱ्या अर्थाने धार्मिक शिक्षण म्हणजे बालकाला त्याचा लोकांशी वस्तूंशी व निसर्गाशी असलेला संबंध समजण्यासाठी प्रेरित करणे. संबंधाशिवाय अस्तित्व नाही. हे बालकाला स्पष्ट करणे तसे अशक्यच आहे. परंतु शिक्षक आणि पालक ह्याचे महत्त्व समजून आणि आध्यात्मिकतेचा अर्थ समजून घेऊन त्यांच्या वृत्तीतून, वर्तनातून आणि भाषणातून बालकापर्यंत तो पोहचवू शकतील. जर युवा पिढीमध्ये पृच्छेची आणि सत्य शोधनाची वृत्ती असेल तरच अधिक चांगल्या जगाची आशा आहे.

## ४ क. ६.४ कृष्णमूर्तींअनुसार अध्यापनाच्या पध्दती

- आपण विद्यार्थ्याला 'काय विचार करावयाचा' आणि 'कसा विचार करावयाचा' हे शिकवू नये. त्याला स्वत:चा विचार स्वत: करु देत.
- बालकाचा तपशीलवार अभ्यास करुन त्याच्यासाठी पोषक पध्दतींचा अवलंब करा.
- विद्यार्थ्याला समान भागीदारासारखे वागविले पाहिजे.
- समस्या निराकरण आणि शोधन पध्दतींना प्रोत्साहन द्यावे.
- पुनरावृत्ती बालकाच्या मनास निस्तेज बनविते.

## ४ क. ६.५ शिक्षकाची भूमिका

**१) बालकाला समजणे -**

कृष्णमूर्तीनुसार तो काय असावा असा आदर्शवत विचार त्याच्यावर थोपण्यापेक्षा तो बालक काय आहे हे समजून घेणे ह्यातच योग्य शिक्षण आहे. आपण बालकाला जाणण्यामध्ये व बालकाने स्वत:ला जाणण्यामध्ये आदर्श हे खरोखरीचे अडथळे असतात.



munotes.in

खरा शिक्षक एखाद्या विशिष्ट पध्दतीवर अवलंबून राहत नाही. तो प्रत्येक बालकाचे जवळून निरीक्षण करतो. विद्यार्थी हे ठसा उमटण्याजोगे अस्थिर, संवेदनशील, प्रेमळ व बऱ्याचदा भित्रे सजीव अस्तित्व असतात ह्याची त्याला पूर्ण जाणीव असते. त्याला माहित असते की अशा विद्यार्थ्याशी संबंध साधताना खूप सहनशीलता व प्रेम आवµयक असते. ह्या गुणांचा अभाव शिक्षकाला त्याच्या वृत्तीमध्ये यांत्रिक बनवितो आणि व्यवसायाच्या मागणी प्रति टाळाटाळ करवितो.

### २) तीक्ष्ण निरीक्षक -

बालकाला समजण्याचा उत्तम मार्ग म्हणजे शिक्षकाने त्याचे खेळताना, काम करताना व विविध मन:स्थितींमध्ये निरीक्षण करणे, स्वत:चे पूर्वग्रह, आशा व भय विद्यार्थ्यावर प्रक्षेपित करण्याचा प्रयत्न शिक्षकाने करु नये. स्वत:ला समाधान देणाऱ्या वैयक्तिक स्वभाव, पूर्वग्रह व कल्पना प्रमाणे विद्यार्थ्याला आकार देण्याचा प्रयत्न आदर्श शिक्षक कधीही करणार नाही.

### ३) परिपूर्ण शिक्षक -

स्वत: जळल्याशिवाय दिवा दुसर्या दिव्यांना प्रज्वलित करु शकत नाही. जर शिक्षकाचे व्यक्तिमत्व परिपूर्ण नसेल तर तो विद्यार्थ्यांना परिपूर्ण व्यक्तिमत्व विकसित करण्यास सहाय्य करु शकणार नाही.

## ४ क. ६.६ खरा शिक्षक

कृष्णमूर्तींच्या अनुसार, खरा शिक्षक फक्त माहिती देयक नसतो तर शहाणपण व सत्य यांचा मार्ग दर्शविणारा असतो. स्वत: शिक्षकापेक्षा सत्य अधिक महत्त्वाचे असते. सत्याचा शोध म्हणजे धर्म. सत्य कोणत्याही एका राष्ट्रास किंवा वंशास मर्यादित नसते. ते एखाद्या मंदिरात, चर्चमध्ये किंवा मशिदीमध्ये सापडत नसते. सत्याचा शोधा विना समाजाची अवनती होईल. नवीन समाजाच्या निर्मितीसाठी आपण प्रत्येकाने एक खरा शिक्षक बनले पाहिजे. म्हणजेच आपण विद्यार्थी आणि शिक्षक दोन्ही बनले पाहिजे.

जर नवीन समाज व्यवस्था प्रस्थापित करावयाची असेल तर आपल्याला असे शिक्षक हवे जे फक्त मानधनासाठी काम करीत नाही. शिक्षण कार्य हे उपजिविकेचे साधन समजणे म्हणजे विद्यार्थ्यांचे स्वत:च्या स्वार्थासाठी शोषण केल्यासारखे असेल. खरा शिक्षक राजकारणी लोकांच्या हुकूमाप्रमाणे चालणारा नसतो, तो आदर्शांनी जखडलेला नसतो आणि अधिकाराचा भुकेला नसतो. त्याच्याकडे आंतरिक श्रीमंती असते आणि तो समाजाच्या अनिवार्यते पलिकडे असतो.

शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी ह्यांच्यामध्ये खर्या अर्थाने कोणतीही श्रेणी रचना असू शकत नाही. अनुभव आणि जबाबदार्या संदर्भात नक्कीच भेद असेल, पण शिक्षणासाठी महत्त्वाचे म्हणजे शिक्षकवर्ग व विद्यार्थी एकाच बोटीत असतील, शिक्षकवर्गास शालेय विषय, बागकाम, प्रशासन याबद्दल अधिक माहिती असू शकते म्हणून त्यांना ह्या क्षेत्रामध्ये अधिकार असेल, परंतु हे काही शिक्षणाचे केंद्रीय विषय नाहीत. आंतरिक मुक्ती

हा जो शिक्षणाचा केंद्रीय विषय आहे त्यांत विद्यार्थी व शिक्षक दोघेही अध्ययनार्थी आहेत आणि म्हणून समान आहेत. यावर कार्यात्मक अधिकाराचा अंमल नाही.

ज्ञानासंबंधी अधिकाराचे एक स्थान आहे, परंतु कोणत्याही परिस्थितीत आध्यात्मिक अधिकार असू शकत नाही. म्हणजेच, अधिकार स्वातंत्र्याचा नाश करते परंतु डॉक्टर, गणित शिक्षकाचा अधिकार किंवा तो कसा शिकवितो यांमुळे स्वातंत्र्याचा नाश होत नाही. (कृष्णमूर्ती १९७५)

म्हणजेच विद्यार्थ्याला स्वातंत्र्याकडे घेऊन जाताना शिक्षक स्वत:च्या मूल्यांमध्ये देखिल बदल करतो, तोही 'मी' आणि 'माझे' सोडून प्रेम आणि चांगुलपणामध्ये बहरतो. ही अन्योन्य शिक्षण प्रक्रिया शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये पूर्णत: वेगळ्या संबंधाची निर्मिती करते.

चांगल्या शिक्षकाकडे चांगला आचार असला पाहिजे. चांगल्या आचाराचे सहा मुद्दे पुढील प्रमाणे दिले आहेत -

१. मनासाठी आत्मनियंत्रण

२. कृत्यामध्ये आत्मनियंत्रण

३. सहिष्णुता

४. आनंदीवृत्ती

५. एक मार्गीपणा

६. आत्मविश्वास.

**१)** मनासाठी आत्मनियंत्रण -

ह्याचा अर्थ क्रोधावर नियंत्रण, म्हणजे आपल्याला मनामध्ये राग किंवा उतावीळपणाची भावना येणार नाही, विचार नेहमी शांत व अक्षुब्ध असतील. शांत मन म्हणजे धैर्य आणि स्थैर्य, ज्यामुळे आपल्याला मार्गातील अडथळे आणि अडचणींचा भयमुक्त सामना करता येईल. त्यामुळे आपल्याला जीवनातील अडचणी हलक्या वाटतील आणि सततच्या चिंतेतून मुक्ती मिळेल. आपला स्वामी शिकवितो की मानवाला बाह्य बाबी जसे की दु:ख, त्रास, आजार, हानी याबद्दल चिंता वाटू नये, त्याने त्याच्या मनाची शांती त्यासाठी ढळू देऊ नये. हे सर्व भूतकालीन कृत्याचे परिणाम असतात म्हणून जेव्हा ते येतील तेव्हा त्यांचा आनंदीवृत्तीने सामना केला पाहिजे, लक्षात ठेवले पाहिजे की सर्व वाईट हे क्षणिक असते. आपली जबाबदारी आहे नित्य आनंदी व शांत राहणे. 'भूत किंवा भविष्यापेक्षा तुम्ही आता काय करीत आहात त्याचा विचार करा.' स्वत:स दु:खी किंवा उदासीन बनू देऊ नका. खिन्नता, उदासीनता चुकीची भावना आहे कारण त्यामुळे दुसऱ्यांवर परिणाम होतो, व त्यांचे जीवन कष्टमय बनते. म्हणून कधीही खिन्नता आली तरी त्यावर नियंत्रण ठेवून आपण आपल्या विचारांना भरकटू देऊ नये.

आढ्यता अज्ञानामुळे येते म्हणून तिला मागे खेचले पाहिजे. जो अज्ञानी आहे, स्वत:स महान समजतो; ज्ञानी माणूस जाणतो की देव महान आहे आणि ही सर्व चांगली कार्ये त्यांच्याद्वारे केली जातात.

**२) कृत्यांमध्ये आत्मसंयम -**

जर तुमचे विचार योग्य असतील तर तुम्हाला कृत्यामध्येही फार कमी अडचणी येतील. मात्र लक्षात ठेवा, मानवजातीसाठी उपयोगी पडायचे असेल तर विचारांचे रुपांतर कृत्यामध्ये झाले पाहिजे. आळस नको, चांगल्या कामाची सातत्यपूर्ण कृती हवी. प्रत्येक व्यक्तीला तिच्या मार्गाने काम करण्याची मुभा द्या, गरज असेल तर सहाय्य करण्याची तयारी दर्शवा, परंतु दुसर्याच्या कामात कधीही ढवळाढवळ करु नका. बऱ्याच लोकांना ढवळाढवळ न करता स्वस्थ बसणे फार अवघड जाते, पण तेच आपण करणे आवश्यक आहे. जेव्हा आपण उच्चस्तरीय काम स्वीकारतो तेव्हा आपल्या सामान्य जबाबदाऱ्या विसरता कामा नये, कारण त्या पूर्ण झाल्याशिवाय आपण दुसऱ्या सेवा देण्यासाठी मुक्त नाही.

**३) सहिष्णुता किंवा सहनशीलता -**

स्वत:च्या धर्माप्रमाणेच इतर धर्मांप्रति सहिष्णुता वाटणे व त्यांच्या विμवासांमध्ये मनापासून रुचि वाटणे आवश्यक आहे. अशाप्रकारची पूर्ण सहिष्णुता येण्यासाठी व्यक्तीस हटवादीपणा व अंधविश्वास यांपासून मुक्त व्हावे लागेल. आपण समजून घेतले पाहिजे की रितीरिवाज आवश्यक नाही. पण म्हणून जे रितीरिवाजांना धरुन आहेत त्यांचा द्वेष करु नका. त्यांना ते करु दे फक्त आपण ज्यावर मात केली आहे अशा गोष्टी त्यांनी आपल्यावर थोपवू नये. सर्वांसाठी मान्यता दर्शवा; सर्वाप्रति करुणा दर्शवा. आता आपले डाळे उघडले आहेत तर आपले विश्वास, रीतीरिवाज आपल्याला हास्यास्पद वाटतील, ते खरोखरच तसे असू शकतात. तरीही ज्यांच्यासाठी ते अजूनही महत्त्वपूर्ण आहेत, त्यांचा आदर करा. अशा विश्वासांचेही एक स्थान आहे, एक उपयोग आहे. आपण मुक्तपणे व चांगले लिहिण्यास शिकेपर्यत आपल्याला सरळ व समान अक्षरे काढण्यासाठी मदत करणाऱ्या दुहेरी रेषांप्रमाणे ते आहेत. असाही काळ होता की आपल्याला त्यांची गरज होती पण आता आपण त्याच्या पुढे गेलो आहोत.

एका महान शिक्षकाने लिहिले आहे, 'जेव्हा मी बालक होतो मी बालकासारखे बोललो, बालकासारखेच समजलो, बालकासारखाच विचार केला; पण जेव्हा मी प्रौढ झालो मी सर्व बालीशपणा मागे सोडला." ज्या तरीही जो आपले बालपण विसरुन गेला आहे, ज्याला बालकांबद्दल सहानुभुती नाही तो त्यांना शिकवू शकणार नाही, सहाय्य करु शकणार नाही. म्हणून सर्वांवर करुणेने, सौम्यपणे, सहिष्णूतेने पहा. सारख्या दृष्टीने पहा, मग तो बौध्द असो वा हिंदू, जैन असो वा ज्यू, ख्रिस्ती असो वा मुसलमान.

**४) आनंदीवृत्ती -**

'दु:ख आले तरी तो माझा बहुमान आहे असे समजून आपले कर्म, मग ते कोणतेही असो, आनंदीवृत्तीने केले पाहिजे. कितीही अवघड असले तरी त्यापेक्षा खराब नाही म्हणुन

आभार मानले पाहिजेत. जोपर्यंत तुमचे वाईट कर्म भोगून त्यातून तुम्ही मुक्त होत नाही त्या स्वामीसाठी तुम्ही उपयोगी नाही. तुम्ही सर्व मालकीहक्काच्या भावनांचा त्याग केला पाहिजे. तुमचे कर्म तुमच्या अत्यंत आवडीच्या वस्तू वा व्यक्ती तुमच्याकडून दूर नेईल. तरीही तुम्ही आनंदी राहिले पाहिजे - कोणत्याही गोष्टीचा व सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी दर्शवून बऱ्याच वेळेला तो स्वामी त्याच्या सेवकाद्वारे त्याची शक्ती दुसर्यांवर वर्षाव करतो; जर सेवकच उदास असेल तर तो ते करु शकत नाही. म्हणून आनंदीवृत्ती हा नियम आहे.'

### ५) एकमार्गी कृत्य -

आपल्या स्वामीच कार्य करणे हे एक ध्येय आपण ठरविले पाहिजे. सर्व निस्वार्थी, सहाय्यक कार्य हे त्या स्वामीचं कार्य आहे, त्यामुळे अशा कार्यात कोणतेही अडथळे येणार नाही. प्रत्येक छोट्या कार्याला महत्त्व देऊन ते अत्युत्तम करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. तेच शिक्षक लिहितात, 'तुम्ही जे काही करता ते मनापासून करा, देवासाठी करा माणसांसाठी नको.' एकमार्गी कृत्य म्हणजे ज्या मार्गांवर तुम्ही प्रवेश केला आहे त्यापासून एका क्षणासाठीही तुम्हाला कोणी विचलित करु शकणार नाही. ऐहिक मोह, ऐहिक सुखे, ऐहिक प्रेम तुम्हाला त्या मार्गावरुन ढळू देणार नाही. त्यासाठी तुम्ही त्या मार्गाबरोबर एक होणे आवµयक आहे, तो तुमच्या स्वरुपाचा असा अंश बनला पाहिजे की तुम्ही अजाणताही त्याच मार्गाचा अवलंब कराल.

### ६) आत्मविश्वास -

पूर्ण विश्वासाशिवाय प्रेम व प्राबल्याचा पूर्ण ओघ असू शकत नाही. आपण स्वत:मध्ये विश्वास ठेवला पाहिजे. जरी आपण म्हटले की आम्ही स्वत:स चांगले जाणतो तरीही आपण स्वत:स ओळखत असू असे नाही, फक्त बाह्य स्वरूपाची जाण आपल्याला असेल. आपण देवाच्या अग्नीची एक ठिणगी आहोत आणि म्हणून आपली दृढ इच्छा असेल तर अशी कोणतीही गोष्ट नाही जी आपण करु शकणार नाही. स्वत:स संबोधा, 'मी हे करु शकतो, आणि मी ते करणारच.' आपण ह्या मार्गावर चालणार असू तर आपली दृढ इच्छा प्रमाणशीर पोलादासारखी असली पाहिजे.

## ४ क. ७ कृष्णमूर्तीची आदर्श विद्यालयाची संकल्पना

बहुजन अध्यापन संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास करण्यास सहाय्यक ठरत नाही म्हणून कृष्णमूर्ती अनुसार आदर्श विद्यालयामध्ये विद्यार्थी संख्या मर्यादित असावी. विद्यालयामध्ये समर्पित, विचारी व जागरुक शिक्षक असावे. विद्यार्थ्यांच्या क्षमता व मर्यादा समजण्यासाठी विद्यालयामध्ये काळजीपूर्वक अभ्यास झाला पाहिजे. आत्मत्यागाच्या भावनेतून आदर्श विद्यालय चालावे.

त्यांच्या स्वप्नांतील आदर्श विद्यालय कोणत्याही पायाभूत कल्पनांच्या प्रभावाशिवाय कार्यरत असेल. त्यांच्या विद्यालयामध्ये एकत्रीत जबाबदारीचे वातावरण असते. सर्व शिक्षकांमध्ये प्रामाणिक सहकार्य असते. संपूर्ण गटाच्या कल्याणासाठी त्यांसबंधी

मुद्दयांवर चर्चा करण्यासाठी विद्यार्थी मंडळाची निर्मिती केली जाते. विद्यार्थी स्वत:स ओळखू शकेल आणि त्याच्या अभिरुची जाणू शकेल असे वातावरण विद्यालयांत असते. सर्वांना योग्य मार्गदर्शन मिळण्याची सोय असते. विद्यालयामध्ये आत्मविश्वासाचे व सहकार्याचे वातावरण असते.

**तुमची प्रगती तपासा -**

दिलेल्या विधानास योग्य पर्याय अधोरेखित करा.

अ) योग्य प्रकारच्या शिक्षकास जाणीव असते की विद्यार्थी एक सजीव अस्तित्व आहेत जे

१) संवेदनशील २) भित्रे

३) सहनशील ४) ठसा उमटण्याजोगे असतात.

ब) खरा शिक्षक तो असतो

१. जो फक्त मानधनासाठी काम करीत नाही
२. जो राजकारण्यांचा हुकूम मानतो
३. जो राष्ट्राच्या आदर्शांनी बंधित असतो
४. ज्याचे कृत्यामध्ये आत्म नियंत्रण नसते.

क) जिड्डू कृष्णमूर्ती अनुसार

१. विद्यार्थी व शिक्षक समान नसतात
२. शिक्षक व विद्यार्थी अध्ययनार्थी असतात.
३. शिक्षकवर्ग व विद्यार्थी ह्यांत श्रेणी रचना नसते.
४. अन्योन्य शिक्षण विद्यार्थी व शिक्षकात वेगळे संबंध प्रस्थापित करते.

ड) कृष्णमूर्तींचे आदर्श विद्यालयामध्ये

१. मर्यादित विद्यार्थी संख्या असते
२. एकत्रीत जबाबदारीचे वातावरण असते
३. समर्पित, विचारी व जागरुक शिक्षक असतात
४. आध्यात्मिक त्यागातून चालविले जाते.

## ४ क. ८ कृष्णमूर्तींचे शिक्षणाप्रति योगदान

शिक्षण नेहमीच कृष्णमूर्तींच्या हृदयस्थ होते. त्यांच्या कल्पनांना मूर्त रुप देण्यासाठी त्यांनी भारतात व परदेशात जवळजवळ डझनभर सहशिक्षण विद्यालये सुरु केली. ह्या संस्थांतील दहा टक्के जागा विनामूल्य प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राखीव असत. विद्यार्थी व शिक्षकांबरोबर चर्चा करण्यासाठी ते दरवर्षी ह्या संस्थांना भेटी देत असत. जरी ह्या विद्यालयांमध्ये सर्वसामान्य अभ्यासक्रम शिकविला जात असला तरी ह्या विद्यालयाची सुरुवात करण्यामागील उद्दिष्ट होते, दोन व्यक्तींमध्ये अडथळा निर्माण करुन

हिंसाचारास जन्म देणार्या राष्ट्रीय, वांशिक वर्ग आणि सांस्कृतिक पूर्वग्रहांपासून स्वतंत्र वाढ होण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेशी संधी उपलब्ध करुन देणे. कृष्णमूर्तींचे अध्यापनाच्या पध्दती, शालेय व्यवस्थापन व शिक्षकाच्या भूमिकेवरील विचार पुरोगामी होते. संपूर्ण शिक्षणाद्वारे परिपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास करण्यावरील कृष्णमूर्तींच्या विचारांची जवळजवळ सर्वच विचारवंतांनी प्रशंसा केली आहे.

## ४ क. ९ सारांश

कृष्णमूर्ती काही धार्मिक अधिकार नव्हते की समाज सुधारक पण त्यांचे शिक्षणाप्रति योगदान एकमेवाद्वितीय आहे. जगातील संघर्ष आणि दु:ख यांवर ईलाज म्हणून त्यांनी लोकांना बदलण्याचे आवाहन केले. त्याचा एक भाग म्हणून व्यक्तीने जीवनाचा हेतू समजावा आणि ते ज्ञान सर्व काही साध्य करण्यासाठी वापरावे. व्यक्तीला काय करण्यास आवडते हे ओळखणे म्हणजे शिक्षण. ते म्हणतात 'करणे म्हणजे असणे' नाही तर 'असणे म्हणजे करणे.'

दुसऱ्यांनी त्यांच्या कल्पना बालकावर थोपविण्यापेक्षा त्याला काय बनायचे आहे ते निवडण्यास स्वातंत्र्य द्यावे असा त्यांचा दावा होता. आपण सर्व गोष्टी पूर्णत्वाने पहाव्या अंश नाही. सत्य अंशामध्ये नाही तर पूर्णामध्ये शोधावे. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे अभिसंधित होण्यापासून मुक्तता. मानवाने विभाजना पलिकडे जाऊन शांतीने जगले पाहिजे.

जेव्हा पूर्ण मन व ह्रदय सहभाग घेते तेव्हाच खरे संप्रेषण होते. आपल्यासाठी एक संपूर्ण व्यक्ती असणे आवµयक आहे. संपूर्ण व्यक्ती बनण्यासाठी व्यक्तीला त्याची जागृतावस्थेची प्रक्रिया समजली पाहिजे. बुध्दिवरील अवाजवी भर व्यक्तीला विभाजीत बनविल. जीवनाची समज म्हणजे स्वत:ची ओळख.

धर्माबद्दल ते म्हणतात की धर्मात शर्त नसते. त्यांनी मुक्त धर्मामध्ये विश्वास ठेवला. परंतु त्यांची धर्माची समज वेगळी आहे. ती कोणत्याही निश्चितच मतास, संस्कृतीस किंवा काळास बांधित नाही. त्यांनी वर्तमान शिक्षण प्रणालीचे दोष जाणले व संपूर्ण शिक्षण सुचविले. संपूर्ण शिक्षण सुचविले. संपूर्ण शिक्षण आणि संपूर्ण मानव शिक्षणाचा केंद्रीय विषय आहे आंतरिक मुक्ती. शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही अध्ययनार्थी म्हणून समान. प्रत्येक बालक एकमेवाद्वितीय निर्मिती आहे त्याला त्याच्या क्षमता व शिकवणीनुसार वाढू देत. परंतु हा पैलू दुर्लक्षितच राहिला आहे. त्याने खऱ्या शिक्षकाचे गुण विचार केले आहेत. शिक्षक हा ज्ञान देणारा नसावा तर शहाणपण व सत्याचा मार्ग दर्शक असावा. शिक्षकापेक्षा सत्य अधिक महत्त्वपूर्ण आहे. सत्याचा शोध म्हणजे धर्म. सत्याच्या शोधाविना समाजाचा ऱ्हास होईल. नवीन समाज निर्माण करण्यासाठी आपणा प्रत्येकाने शिक्षक बनले पाहिजे. चांगल्या शिक्षकामध्ये मनाचा व कृत्याचा आत्म-संयम, दर्जेदार सहिष्णुता, आत्मविश्वास व आनंदीवृत्ती असली पाहिजे.

munotes.in

## ४ क. १० प्रश्नावली

१. जिड्डू कृष्णमूर्तीअनुसार धर्माची संकल्पना स्पष्ट करा.

२. कृष्णमूर्ती अनुसार शिक्षणाची कार्ये कोणती आहेत?

३. कृष्णमूर्ती प्रणित संपूर्ण शिक्षण म्हणजे काय आहे?

४. वर्तमान शिक्षण प्रणालीच्या मर्यादा लिहा.

५. जिड्डू कृष्णमूर्तींनी सूचविल्याप्रमाणे खर्या शिक्षकाचे वर्णन करा.

६. टिपा लिहा: -

१) स्व संकल्पना

२) श्रवण व अध्ययन

३) 'असणे आणि करणे'

४) कृष्णमूर्तीअनुसार आपल्या संबंधाचे स्वरुप

❖❖❖❖

munotes.in

# ५ अ

## प्लेटोचे शैक्षणिक तत्त्वज्ञान

**प्रकरणाची रचना:**


५ अ.० उद्दिष्ट्ये

५ अ.१ प्रस्तावना

५ अ.२ प्लेटोची अकादमी

५ अ.३ शिक्षणाशी संबंधित कार्य

५ अ. ३.१ प्लेटोची तत्त्वमीमांसा

५ अ. ३.२ प्लेटोची ज्ञानमीमांसा

५ अ. ४ समाजरचना

५ अ. ४.१ वर्गरचनेनुसार शिक्षण / वर्गानुसारी शिक्षण

५ अ. ५ शिक्षण व्यवस्था

५ अ. ५.१ संघटन आणि अभ्यासक्रम

५ अ. ५.२ अध्यापन पध्दती

५ अ. ५.३ शिक्षणाची उद्दिष्टे आणि कार्ये

५ अ. ५.४ शिक्षकाची भूमिका

५ अ. ५.५ स्त्री शिक्षण

५ अ. ५.६ शिक्षण: राज्याचे कार्य

५ अ. ६ प्लेटोच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे मूल्यमापन

५ अ. ७ प्रश्नावली


## ५ अ.० उद्दिष्ट्ये

हा घटक वाचल्यानंतर तुम्ही,

१) प्लेटोच्या तत्त्वज्ञानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करु शकाल.

२) प्लेटोच्या तत्त्वज्ञानातील वैशिट्यपूर्ण तांत्रिक शब्द ओळखू शकाल.

३) प्लेटोच्या शैक्षणिक उपपत्तीचे तात्त्विक अधिष्ठान स्पष्ट करु शकाल.

४) प्लेटोच्या शैक्षणिक उपपत्तीचे सामाजिक अधिष्ठान स्पष्ट करु शकाल.

५) प्लेटोच्या प्राथमिक शिक्षणाची योजना सांगू शकाल.



munotes.in

६) पुढील बाबींबर प्लेटोच्या तत्त्वज्ञानाच्या झालेल्या परिणामाची चर्चा करु शकाल.

a. शिक्षणाची ध्येये

b. अभ्यासक्रम आणि विषय

c. अध्यापकाची भूमिका

d. शिस्त

७) प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचे चिकित्सक मूल्यमापन करु शकाल.

८) जात, वर्ग आणि लिंगभेद अभ्यासाच्या संदर्भांत आजच्या भारतीय शिक्षणपध्दतीची प्लेटोच्या तत्त्वज्ञानाशी तुलना करु शकाल.

९) आजच्या शिक्षण व्यवस्थेवर प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा असलेला प्रभाव सांगू शकाल.

## ५ अ.१ प्लेटो : प्रस्तावना

प्लेटोचा जन्म अथेन्समध्ये ४२७ बी. सी. मध्ये एका अत्यंत सधन कुटुंबात झाला. सॉक्रेटिसचा शिष्य म्हणून त्याने नाव कमविले. आपल्या गुरुच्या मृत्युनंतर त्याने इजिप्त आणि इटली येथे भ्रमण केले, पायथागोरसच्या विद्यार्थ्यांबरोबर अध्ययन केले आणि अनेक वर्षे सिरॅकसच्या राजघराण्याचा सल्लागार म्हणून व्यतीत केली. यथावकाश तो अथेन्सला परतला आणि स्वत:चे तत्त्वज्ञान सांगणारी अकादमी स्थापन केली.

३८७ बी.सी. च्या दरम्यान देवस्वरुप (demigod) असलेल्या ॲकॅडेमसला प्रिय असलेल्या पवित्र अशा उपवनात 'ॲकॅडेमी' नावाची शाळा स्थापन केली. (ज्यावरुन इंग्रजीमधील ॲकॅडेमिक्स शब्द तयार आला.)

## ५ अ.२ प्लेटोची अकादमी

एका अर्थाने भौतिक विज्ञाने, खगोल, गणित आणि तत्त्वज्ञानाचे हे विद्यापीठच होते. प्लेटोने ह्या अकादमीचे प्रमुखपद भूषविताना अनेक व्याख्यानेही घेतली जी कधीही प्रसिध्द झाली नाहीत. अथीना आणि इतर अमर्त्यांसाठी ऑलिव्हच्या उपवनात वसलेली ही अकादमी अत्यंत पवित्र होती. त्या ठिकाणी प्लेटोची स्वत:ची अशी बाग होती जिथे त्याच्याकडून शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिंची त्याने सोय केली. अकादमीबाबत फारशी माहिती उपलब्ध नाही परंतु व्याख्याने, चर्चा आणि परिचर्चेद्वारे अध्यापन केले जात असावे.

## ५ अ.३ शिक्षणाशी संबंधित कार्य

उत्तम समाजनिर्मितीसाठी कशाप्रकारचे शिक्षण आवµयक आहे याची चर्चा 'रिपब्लिक' मध्ये आहे. हे वेगळ्या प्रकारचे शिक्षण आहे; ज्याला तो 'पायडेइया' (Paideia) असे संबोधतो. प्रचलित भाषेत पायडेइयासाठी समर्पक शब्दच सापडणे कठिण आहे. व्यक्तिच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकासाला जिथे आत्यंतिक महत्त्व

दिले जाते अशी प्रक्रिया म्हणजे पायडेइया होय. संपूर्ण व्यक्तित्वाचे शिक्षण म्हणजे पायडेइया.

इ.स.पू. ३८५ त लिहिलेल्या 'द रिपब्लिक' या ग्रंथात आणि अंतिम काळातील अपूर्ण राहिलेल्या 'लॉ' (Laws) या ग्रंथात तो प्राथमिक शिक्षणाबद्दल लिहितो.

## ५ अ. ३.१ प्लेटोची तत्त्वमीमांसा

प्लेटोने हिरीरीने मांडले की वास्तवाचे ज्ञान हे केवळ मन:चक्षुद्वारेच होऊ शकते. आपल्या इंद्रियांनी अनुभवत येईल असे एक अलौकिक जग अस्तित्त्वात आहे. इंद्रिय आपल्याला फसवू शकतात, म्हणून एक अलौकिक जग अस्तित्त्वात असणे, कल्पना किंवा आकृतीबंधाचे जग - की जे अनित्य, सार्वकालिक आहे. दूसऱ्या शब्दात लौकिक जगातील सुंदर, चांगल्या किंवा न्यायी वाटणार्या वस्तूंबाबत प्लेटो म्हणतो की, ह्या पलिकडे पारलौकिक जगात ह्या सर्वांचे अखंड सत्य जग आहे. शिक्षणाने ह्या वैश्विक मानकां- सोबत राहिले पाहिजे. वस्तुच्या रचनेचे आकलन होणे म्हणजे वैश्विक सत्याचे आकलन होणे होय.

## ५ अ. ३.२ प्लेटोची ज्ञानमीमांसा

प्लेटो ज्ञानेंद्रियांनी दाखवलेल्या सत्य, दृश्य, स्पर्श, चव, नाद आणि गंध - आणि रचनेचे यथार्थ यात फरक करतो.  दूसऱ्या शब्दात सत्य हे बदलणारे आहे.  सत्याचे ज्ञान हे व्यक्तिनिष्ठ आहे, ते विशिष्ट आहे; व्यक्तिपूरते ते ज्ञान आहे, ते वैश्विक नाही.

**ज्ञानप्राप्तीचे तीन स्त्रोत (मार्ग)**

- ज्ञानेंद्रियाद्वारे प्राप्त केलेले ज्ञान उदा. वस्तूंबाबतचे ज्ञान, रंग, चव, स्पर्श इ. प्लेटो ह्याला ज्ञान म्हणत नाही.
- कोणत्याही वस्तूबाबतचे मत. पण ह्या ज्ञानावर विश्वास ठेवता येत नाही कारण विशिष्ट वस्तूबाबत प्रत्येक व्यक्तिची मते भिन्न असू शकतात.
- प्रज्ञेद्वारे ज्ञान. ही ज्ञानाची सर्वोच्च पातळी होय; ज्यात सत्य, चांगूलपणा आणि सौंदर्य ह्या सद्गुणांचा समावेश असतो. हे ज्ञान आदशर्वादी असते आणि मूलभूत विचारावर आधारलेले असते. ह्या ज्ञानाचे वैशिष्ट्य असे की ते वैश्विक सत्यामध्ये आढळते.

प्लेटोच्या मते शिक्षणाचे सर्वोच्य ध्येय हे उत्तमत्त्वाचे ज्ञान प्राप्त करणे; माणसातील मनुष्यत्वाचे जतन करणे होय. नुसताच आनंद किंवा फायद्याबाबत जागरुकता आणणे नव्हे.

munotes.in

## ५ अ. ४ समाजरचना

समाजरचना ही विशिष्ट हेतूपूर्तीसाठी असते असे प्लेटो म्हणतो. एकटे राहून व्यक्ती जीवनावश्यक गोष्टी प्राप्त करु शकत नाही. ह्या समस्येवर मात करण्यासाठी समान ध्येयासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे. असे एकत्रित आल्यामुळे सर्वांचेच हित साधले जाते कारण प्रत्येकातील विशिष्ट गुणाचा उपयोग होतो. एखादी व्यक्ती सर्वांसाठी बूट बनवू शकते, एखादी भाजीपाला उगवू शकते तर एखादी सुतारकाम करु शकते.

### ५ अ. ४.१ वर्गानुसारी शिक्षण

व्याक्तिंची वर्गविभागणी करावयाच्या समस्येवर उपाय म्हणून प्लेटोने वयानुसारी चाचण्या सूचविल्या.

- वय वर्षे ७-२० पर्यंत सर्वांना प्राथमिक शिक्षण दिले जाईल. त्यानंतर सर्वांना एक चाचणी द्यावी लागेल. ह्या चाचणीत अनुत्तीर्ण झालेले लोक हे विविध उद्योगधंदे आणि उत्पादनकार्यात सहभागी होतील.
- उत्तीर्ण विद्यार्थी पुढील दहा वर्षे लष्करी प्रशिक्षणासाठी जातील. त्यानंतर पुन्हा चाचणी घेतली जाईल. ह्यात अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी लष्करातच राहतील. उत्तीर्ण झालेले विद्यार्थी शासनकर्ते बनण्यासाठी पाठविले जातील.
- ह्या शासनकर्त्या वर्गाला पुढे विज्ञानाचे शिक्षण दिले जाईल त्यानंतर निवडणूक होऊन एकजण 'तत्त्वज्ञ प्रशासक' बनेल. त्याचे काम हे राज्याचे शिक्षण व शासन सांभाळणे हे असेल.
- ही व्यक्ती राज्याच्या सर्वोच्च स्थानी असेल आणि त्याचा शब्द प्रमाण असेल. ह्या सर्वोच्च स्थानी असलेल्या व्यक्ति व्यतिरिक्त इतर व्याक्तिंचे शिक्षण आजीवन चालू राहील आणि त्यात प्रामुख्याने तात्त्विक शिक्षणाचा समावेश असेल. ह्यावरुन असे दिसते की प्लेटोला हे सर्वोच्च स्थान मिळाले होते.

**आपली प्रगती तपासून पहा.**

१) शासनव्यवस्था ही जर विशिष्टांची मक्तेदारी असेल तर 'स्वत:पूरते पहा' (Minding one’s own business) ह्या वाक्यप्रयोगात पुराणमतवादी सूचितार्थ दडलेला आहे. 'विशेष कसबानुसार कार्य' हा सामाजिक जीवनाचा आधार आहे का? चर्चा करा.

२) a. प्लेटोची तत्त्वमीमांसा

b. प्लेटोची खऱ्या ज्ञानाची संकल्पना

c. वर्गानुसारी शिक्षण.

३) प्लेटोचे वर्गानुसारी शिक्षण आणि भारतीय वर्णव्यवस्था यांची तुलना करा.

munotes.in

## ५ अ. ५ शिक्षण व्यवस्था

मुलांना वयाच्या ६व्या वर्षी शाळेत प्रवेश घेतल्यानंतर सर्वप्रथम तीन 'R' चे शिक्षण (Reading, Writing and Counting) दिले जाई. त्यानंतर संगीत व क्रीडेचे शिक्षण असे. प्लेटोचे तत्त्वज्ञ पालक ५० व्या वर्षापर्यंत शैक्षणिक मार्ग अनुसरत. वयाच्या १८ व्या वर्षी ते शारीरिक आणि लष्करी प्रशिक्षण घेत; वयाच्या २१ व्या वर्षी ते उच्च शिक्षणात प्रवेश घेत असत; वयाच्या ३० व्या वर्षी ते तत्त्वज्ञानाचा अभ्यास करुन लष्कर किंवा प्रशासनात सेवा देत असत. पन्नासाव्या वर्षी ते शासनकर्ते म्हणून प्रशिक्षित असत. ह्या पध्दतीलाच आपण आजकाल निरंतर किंवा आजीवन शिक्षण म्हणतो. (१९ व्या शतकातील काही जर्मन लेखकांनी ह्या पध्दतीस ॲन्ड्रॉगॉगी – असे संबोधले आहे.) 'अध्ययनशील समाजाचेही' हे आदर्श उदाहरण आहे - राजकारण हे शिक्षित समाजाद्वारे सांभाळले जाते. जेव्हा अशातर्हेने शिक्षित नागरिक शासनकर्ते असतात तेव्हाच त्याचे अस्तित्त्व हे तर्कशुध्द असते.

- त्यामुळे प्लेटोच्या शिक्षणपध्दतीचे उद्दिष्ट हे नैतिक आणि राजकीय आहे. फक्त एखादी गोष्ट जाणून घेण्यासाठी केलेली ती उमेदवारी नसून जीवनावश्यक कौशल्याचे ते शिक्षण आहे.

- मन व शरीर दोहोंचे आरोग्य आणि सौदर्य हे प्लेटोच्या शिक्षणाचे ध्येय असल्यामुळे (पहा, लॉज् ७८८०), ग्रीक पध्दतीनुसार शिक्षण दोन भागात विभागले आहे. जिमनॅस्टीक्स आणि संगीत. (म्हणजे संस्कृती)

- शारीरिक शिक्षण जन्मापूर्वीच सुरु होई. गरोदर स्त्रियांना भरपूर चालण्यास व हालचाली करण्यास सांगितले जाई.

**शाळांमधील प्लेटोनिक शिक्षण प्रणाली**

| वय | शाळा | विशेष विकास किंवा अभ्यास |
|---|---|---|
| जन्म ते ३ वर्षे | शिशु | शारीरिक वाढ, इंद्रियांचा विकास, भीतीचा अभाव, आनंद व वेदनेला बालकाचा प्रतिसाद |
| ४ ते ६ वर्षे | नर्सरी | खेळ, परीकथा, शिशुगीते, पौराणिक कथा, स्वत:च्या इच्छेचा त्याग करण्यास शिकणे. |
| ६ ते १३ वर्षे | प्राथमिक शिक्षण | खेळ, कविता, वचन, लेखन, गायन, नृत्य, धर्म, शिष्टाचार, अंक, भूमिती. |
| १३ ते १६ वर्षे | वाद्यसंगीत | सितारवादन, धार्मिक मंत्र, काव्यपठन (विशेषत: धार्मिक आणि राष्ट्रभक्तीपर), अंकगणित (उपपत्ती) |

| | | |
|---|---|---|
| १६ ते २० वर्षे | जिमनॅस्टिक्स आणि लष्करी | औपचारिक जिमनॅस्टिक्स आणि लष्करी प्रशिक्षण. कोणतेही बौद्धिक शिक्षण नाही. |
| २० ते ३० वर्षे | विज्ञान | तर्क आणि सवयींचा समन्वय, भौतिक शास्त्रांचा मेळ |
| ३० ते ३५ वर्षे | भाषिक | तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, शासन कायदाम शिक्षण |
| ३५ ते 50 वर्षे | देशदेवा | |
| ५० ते शेवटपर्यंत | तत्त्वज्ञ | उच्चतर तत्त्वज्ञान |

## ५ अ. ५.१ संघटना आणि अभ्यासक्रम

a. **प्राथमिक -** सर्व मुले आणि मुलींचे एकत्रित शिक्षण होईल. ते गणित, साहित्य, काव्य आणि संगीताचे प्रशिक्षण वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत घेतील.

b. **लष्करी प्रशिक्षण -** तरुणांची पुढील दोन वर्षे फक्त शारीरिक शिक्षणासाठी असतील. त्यातील सर्वोत्तम तरुणांची निवड उच्च शिक्षणासाठी केली जाईल, ज्यात राज्याचे भावी पालनकर्ते बनण्याचे शिक्षण असेल.

c. **उच्च शिक्षण -** वयाच्या २०-३५ दरम्यान राज्याचे भावी पालक उच्च शिक्षण घेतील ज्यायोगे ते शासनकर्ते म्हणून प्रशिक्षित होतील. त्यांच्या शिक्षणात गणित, संगीत आणि साहित्याचा समावेश असेल. वयाच्या ३० व्या वर्षी त्याच्याकडे तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासठी आवश्यक परिपक्वताही असेल. ३५ व्या वर्षी त्याचे औपचारिक शिक्षण थांबेल आणि एखाद्या उच्चपदस्थ कारभार सांभाळण्यापूर्वी तो एखाद्या छोट्याशा प्रशासकीय पदावर रुजू होईल.

## ५ अ. ५.२ अध्यापन पध्दती

प्राथमिक स्तरावर त्याने क्रीडनपध्दती / खेळ पध्दती सूचविली. विद्यार्थी हा कृतीद्वारे शिकला पाहिजे. ती किंवा तो जेव्हा शिक्षणाच्या उच्चस्तरापर्यंत जाईल, तोपर्यंत त्याचा तर्क हा विचार आणि अमूर्ततेच्या संदर्भात प्रवीण झालेला असेल.

प्लेटोला अध्ययनात प्रेरणा आणि अभिरुची अपेक्षित होती. शिक्षणामध्ये जोरजबरदस्ती करण्याच्या तो विरोधात होता. ज्ञान जर जबरदस्तीने दिले गेले तर त्याचा मनावर परिणाम होत नाही असे त्याचे मत होते.

प्लेटोच्या मते, 'तरुणांना सक्ती किंवा कठोरतेने शिकवू नका तर त्याच्या मनाला आनंद देईल अशा तर्हेने शिक्षित करा, ज्यायोगे तुम्हाला त्यांच्या मनाचा कल समजून प्रत्येकाचे वैशिष्ट्य लक्षात येईल."

प्लेटोला एक अशी जागा अभिप्रेत होती की जिथे जायला मुलांना आवडेल. तिथे राहून, खेळातून मुले शिक्षण घेतील. प्लेटोने नर्सरी शिक्षणाला खूप महत्त्व दिले कारण ह्याच स्तरावर बालकाचे नैतिक चारित्र्य आणि मनाची जडणघडण होत असते. 'शिक्षणातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे नर्सरीत मिळणारे योग्य प्रशिक्षण होय."

सॉकेट्रिक पध्दत ही ग्रीक तत्त्वज्ञ सॉकेट्रिस याच्या नावे प्रसिध्द असलेली अध्यापनाची एक पध्दत आहे ज्यात शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्नाद्वारे विचारप्रवण करुन त्यांना माहिती असेलल्या बाबी त्यांच्याकडून काढून घेतात आणि माहीत नसलेल्या गोष्टींवर विचार करण्यास भाग पडतात. प्रश्नोत्तर सत्रांमुळे बौध्दिक खाद्य मिळते, विद्यार्थी कार्यप्रवण राहातो आणि नवनव्या कल्पनांचा जन्म होतो.

उपदेशवजा (Didartic) आणि व्दंव्दात्मक (dialectie) अशा दोन्ही पध्दती बऱ्याचदा विद्यार्थ्यांना विशिष्ट गोष्ट माहिती करुन देण्यासाठी, 'सांगणे' हा एकमेव मार्ग असतो. परंतु हे प्रश्नपद्धती/व्दंव्द 'विद्यार्थी आंतरक्रियेसाठी' तसेच 'अध्ययनप्रक्रियेत आपणही सामील आहोत' यासाठी आवश्यक आहे. व्दंव्दात्मक (dialectie) पध्दतीमुळे एखाद्या समस्येवर वादविवादाची संधी मिळते, कल्पनांची पडताळणी करता येते आणि उच्च दर्जाची वैचारिक कौशल्ये वापरता येतात. अध्ययनाचे उद्दिष्ट हे समजून घेऊन ज्ञानाच्या आधारे निर्णय घेणे असल्यामुळे, ही पध्दत ज्ञानवृध्दीच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे.

प्लेटोनुसार, ह्या पध्दतीपेक्षा चांगली पध्दत सापडणे कठीण आहे कारण इतक्या शतकांच्या अनुभवावर ती आधारलेली आहे. थोडक्यात तिच्याबद्दल असे म्हणता येईल की शरीरासाठी जशी कसरत (जिमनॅस्टीक्स) आणि आत्म्यासाठी जसे संगीत. हयाच कारणासाठी संगीत शिक्षण अत्यावश्यक; लय आणि ताल आपल्या आत्म्याला सौंदयाने भरुन टाकतात आणि मानवाचे मन सुंदर बनवतात.

प्लेटोचे वरील उद्गार हे त्याचा शिक्षणविषयक दृष्टिकोन दशर्वितात. त्याला हरप्रयत्नाने मानवाचे मन, शरीर आणि आत्म्याचा विकास अभिप्रेत होता.

**कथाकथन आणि साहित्य :** प्लेटोच्या मते कथाकथन हे चारित्र्यनिर्मितीचे प्रमुख साधन आहे. मुलांसाठी लिहिलेल्या कथा, खऱ्या किंवा काल्पनिक असोत, दंतकथा किंवा आख्यायिका असोत, खूप काळजीपूर्वक लिहिल्या पाहिजेत. माता किंवा दायांनी बालकांना राक्षसांच्या, शोकाच्या किंवा नरकाबद्दलच्या भयकथा सांगून त्यांना भेकड बनवू नये. (रिपब्लिक bk २, ३७७-३८३).

**खेळ / क्रीडा :** खेळाद्वारे बालकाचे चारित्र्य घडेल. शिस्तीचा वापर जरुर करावा परंतु बालकाचा अपमान करण्यासाठी नव्हे. फक्त सुखप्राप्ती आणि वेदना पूर्णत: टाळण्याकडे बालक किंवा गरोदर स्त्रियांचा कल नसावा. (लॉज, bk 7, 792). ऐषोआराम बालकाला तिरसट, तापट आणि चिडके बनवतो, अनाठायी दडपणाखाली मुले अतिनम्र बनतात

आणि जगात वेगळे पडतात. मुले आणि प्रौढांनी नाटक करतान किंवा खेळताना हलक्या पात्रांचे अनुकरण करू नये. यातून तशाच सवयी लागण्याची शक्यता असते.

चांगूलपणाची कास धरणे आवश्यक का आहे हे समजण्याची परिपक्वता जोपर्यंत शिकणार्याच्यात येत नाही तोपर्ंत वाईट विचार आणि कृतींना प्रतिबंध केला पहिजे. त्यांना जेव्हा चांगूलपणाबद्दल कळेल तेव्हा ते लाचलूचपतीला आपोआपच निषिध्द मानतील.

प्लेटोच्यामते स्वयं - शिस्त ही महत्त्वाची आहे. तिच्यामुळे व्यक्ती संयमी राहून स्वत:वर जय मिळवते, स्वत:चा आनंद किंवा उत्कटतेची स्वामी बनते.

शिक्षकांनी विविध उद्योदधंद्यातील साधनांची लहान प्रतिकृती बालकांना उपलब्ध करुन दिली पाहिजे. अशा तर्हेच्या खेळातून बालकांच्या अंगभूत इच्छा व गुणांना त्यातून भावी काळात करावयच्या कामाचे वळण लागेल.

बालकांना खेळासाठी एकत्र आणले पाहिजे. वयाच्या ६० व्या वर्षापासून मुले व मुली वेगवेगळे खेळतील. परंतु मुलींना देखिल घोडेसवारी, तिरंदाजी आणि इतर सर्व मुलांप्रमाणेच असतील. त्याचप्रमाणे, मुले व मुली नृत्य (त्यातून डौलदारपणा येईल) आणि कुस्ती (ताकद आणि सहनशीलतेसाठी) शिकतील. प्लेटोने बालकांच्या खेळाला खूप महत्त्व दिले. 'राज्यात कुणाच्याही हे लक्षात येत नाही की बालकांचे खेळ हे इतके महत्त्वाचे आहेत की ज्यायोगे तुम्ही पारित केलेले कायदे टिकतील की नाही हे ठरते."

काही अनिष्ट गोष्टींमधील बदल वगळता बदल ही एक धोकादायक गोष्ट आहे - अगदी लहान लहान बालकांच्या खेळातील बदलसुध्दा (लॉज bk ७, 795-797).

**शारीरिक शिक्षण :** "शारीरिक शिक्षण २-३ वर्षे चालेल ज्याकाळात इतर काही केले जाऊ नये, कारण थकवा आणि झोप हे अभ्यासासाठी अयोग्य आहेत. त्याचबरोबर व्यायामामुळेही चारित्र्यनिर्मितीस मदत होईल." (रिपब्लिक, bk 7, 537). जी बालके शूर आहेत त्यांनी युध्द बघण्यासाठी जावे. स्वत:चा व्यवस्थित बचाव करुन, सुरक्षित राहून त्यांनी भावी जीवनात त्यांना सामोरे जावे लागणार्या लढाईचा अनुभव घ्यावा. (रिपब्लिक, bk 5, 466; bk 7 537). मुलींनीदेखिल घोडेसवारी, मैदानी खेळ आणि चिलखती प्रशिक्षण दिले जावे कारण युध्द प्रसंगी त्यांना मागे राहिलेली बालके व इतर जनतेचे संरक्षण करावे लागेल. (लॉज bk 7, 804 -805, 813).

वाचन आणि लेखन, संगीत, अंकगणित: प्लेटोच्या शिक्षणव्यवस्थेत वयाच्या दहाव्या वर्षापासून बालक ३ वर्षे वाचन, लेखन आणि आणखी तीन वर्षे लायर (तंतुवाद्य) शिकेल, आणि वयाच्या १७-१८ वर्षापर्यंत प्राथमिक अंकगणित शिकेल. हे सर्व कमीतकमी सक्तीने आणि 'लढाईसाठी पुरेसे, घर चालवता येईल इतपत आणि प्रशासनापयोगी" असेल. (रिपब्लिक, bk 7, 535-541). सक्तीच्या व्यायामाने शारीरिक त्रास होत नाही परंतु सक्तीचे अध्यन मनावर ठसत नाही. (लॉज bk 7, 536). त्यानंतर त्याने विद्यार्थ्याला तत्त्वज्ञानासाठी तयार करणार्या चार विशेष विषयांवर भर दिला - अंकगणित, भूमिती, खगोल आणि सुसंवाद हे विषय आत्म्याला स्थिरतेकडे नेतील.

**आपली प्रगती तपासून पहा.**

**खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

१) प्लेटोने सूचविलेल्या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन करा.

२) "प्लेटोने शारीरिक शिक्षण आणि खेळाला दिलेले महत्त्व त्याची दूरदृष्टी दर्शविते." चर्चा करा.

३) सॉक्रेटिक पध्दत आणि उपदेशवजा पध्दतीत काय फरक आहे?

४) प्लेटोच्या शिक्षणप्रणालीतील कथाकथनाचे स्थान स्पष्ट करा.

५) "प्लेटोची अभ्यासक्रम रचना ही आधुनिक शिक्षण शास्त्राचे समाधान करते." तूम्ही सहमत आहात का? तुमच्या उत्तराचे समर्थन करा.

## ५ अ. ५.३ शिक्षणाची उद्दिष्टे आणि कार्ये

१) पहिले उद्दिष्ट हे राज्याची एकात्मता

शिक्षणाचे पहिले उद्दिष्ट हे सामुदायिक जीवनाची भावना विकसित करणे हे होय, कारण देश हा व्यक्तिपेक्षा श्रेष्ठ आहे. प्रत्येक नागरिकाने व्यक्तिगत आवडनिवड दूर सारुन देशासाठी वाहून घेतले पाहिजे. सर्व नागरिक हे आदर्श नागरिक असले पाहिजेत.

२) दुसरे उद्दिष्ट म्हणजे सदाचरण किंवा नागरी कार्यक्षमतेचा विकास.

शिक्षणाद्वारे सहिष्णुता, धैर्य, लष्करी कौशल्यांची रुजवणूक तरुणांमध्ये झाली पाहिजे. प्लेटो तरुणांना शासन आणि सत्याचे तंतोतंत ज्ञान देऊन नागरी जीवनातील मोठ्या जबाबदाऱ्या आणि सामाजिक जीवनासाठी तयार करु इच्छित होता. शिक्षणाने व्यक्तिला त्याची कर्तव्ये आणि नागरिकत्वाच्या हक्कांसाठी तयार केले पाहिजे.

३) पुढील उद्दिष्ट हे बालकाच्या जीवनात तर्काचे महत्त्व ठरविणे हे आहे.

४) सौंदर्यात्मक संवेदनांचा विकास हे पुढील कार्य होय. शिक्षणाने सत्य, सौदर्य आणि चांगूलपणाप्रती प्रेम निर्माण केले पाहिजे. बालकाला चांगल्या वातावरणात ठेवले पाहिजे. श्रेष्ठ आत्म्याने प्रत्यक्षापेक्षा आदर्शाला, अस्थिरतेपेक्षा स्थिरतेला, क्षणिकापेक्षा निरंतरतेला महत्त्व देण्यास शिकले पाहिजे. आदर्श सत्याबाबत आसक्ती असलेल्या माणसात बालकाचे रुपांतर झाले पाहिजे.

५) बालकांना सुसंवाद साधण्यास शिकविणे हे शिक्षणाचे आणखी एक कार्य होय. शाळा ही सामाजिकरण आणि मानवीकरण करणारी सर्वात मोठी संस्था असली पाहिजे.

६) शिक्षणाचे उद्दिष्ट हे मानवातील सर्वोत्कृष्टता प्राप्त करणे हे होय. यासाठी चारित्र्यिशक्षण आणि नैतिकदृष्ट्या परिपक्वतेची आवश्यकता असते. दूसऱ्या शब्दात

munotes.in

यालाच मूलभूत नीतीमत्ता असे म्हणतात. यात चारित्र्यशिक्षणाचा समावेश आहे. त्याचा उद्देश हा चांगल्याकडे आकर्षिले जाणारे आणि दुष्कर्माचा तिरस्कार करणारे लोक घडविणे हा होय.

शिक्षणाचे उद्दिष्ट हे अंतरात्म्यातील प्रकाशाकडे नजर वळवणे हे आहे. शिक्षणाचे कार्य म्हणजे आत्म्याला ज्ञानी बनविणे नसून उत्तमत्त्वाचा विकास करणे हे आहे. शिक्षणाचे काम हे तो विकास योग्य वातावरणात करणे हा आहे. हेच तत्त्वज्ञानाचे मर्मदृष्टी प्रतिमान होय.

## ५ अ. ५.४ शिक्षकाची भुमिका

प्लेटोच्या शिक्षणात शिक्षकाला सर्वाधिक महत्त्व होते. अंधाऱ्या गुहेतून प्रकाशाचा मार्ग एखाद्या व्यक्तिला दाखवणाऱ्या टॉर्चधारकासारखा तो आहे. विद्यार्थ्यांसाठी तो सदोदित मार्गदशर्क आहे. शिक्षकाकडे उच्च दर्जाची अखंडता आणि उच्च दर्जाचे स्वयं मूल्य असले पाहिजे. त्याच्याकडे आनंदी व्यक्तिमत्त्व, सखोल ज्ञान, आणि व्यावसायिक प्रशिक्षण असले पाहिजेत. तो व्यवसायनिष्ठ, जबाबदारीने वागणारा आणि आदशार्चे खरे प्रतीक असला पाहिजे. शिक्षकाचे नैतिक जीवन चांगले असले पाहिजे. त्याने बोलल्याप्रमाणे वागले पाहिजे.

## ५ अ. ५.५ स्त्री शिक्षण

प्लेटोने स्त्री शिक्षणावर भर दिला. स्त्रियांनाही शारीरिक आणि शैक्षणिक शिक्षण दिले पाहिजे. त्यांना युध्दकला अवगत असली पाहिजे. शिक्षणाचा मुख्य हेतू हा समाजातील प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी उचलणे हा होता.

सॉक्रटिसच्या मते आदशर् समाजात स्त्री आणि पुरुष हे समान उद्दिष्टांसाठी उपयोगी पडतील. “आपण पुरुषांना बौध्दिक आणि शारीरिक शिक्षण दिले; स्त्रियांसाठीही आपल्याला तेच करावे लागेल, आणि त्यांना युध्दाचे प्रशिक्षणही द्यावे लागेल, आणि वागणूकही समानच असेल.”

प्लेटोच्या मते काही स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षा लहान आणि अशक्त असल्या तरी काही स्त्रिया पुरुषांप्रमाणेच असतात; स्त्रिया ह्या पुरुषांच्या बरोबरीच्याच असतात. ज्या स्त्रिया शारीरिकदृष्ट्या सबळ असतात त्यांना पुरुषांप्रमाणेच सर्व कौशल्ये शिकण्याची संधी दिली पाहिजे. त्याच्या रिपब्लिक या ग्रंथात तो स्त्री आणि पुरुषांना कशाप्रकारे समान शिक्षण दिले पाहिजे याच्या वर्णनाबरोबरच सामाजिक कर्तव्येही पुरुषांप्रमाणेच दिली पाहिजेत असे प्रतिपादन करतो. रिपब्लिकनुसार आदशर् समाजाचे नेतृत्व तत्त्वज्ञांकडे असेल, तेच त्याचे राजे असतील. दुसऱ्या शब्दांत, ज्यांना समाजाचे, मानवाचे हित समजेल आणि ते त्यांच्या ज्ञानावर आधारित हितकारक निर्णय घेतील.

munotes.in

**आपली प्रगती तपासून पहा.**

**खालील प्रश्नांची उत्त्तरे द्या.**

१) प्लेटोच्या स्त्रीविषयक मताबद्दल आपणास काय वाटते?

२) प्लेटोच्या मते शिक्षणाची कार्ये आणि उद्दिष्टे कोणती आहेत?

३) शिक्षणाचे उद्दिष्ट हे बालकांचा सर्वांगीण विकास साधणे हे होय. तुमच्या मते हे उद्दिष्ट साध्य होते का ? चर्चा करा.

४) प्लेटोच्या मते शिक्षकाची भूमिका काय आहे?

५) तत्त्वज्ञानाचे मर्मदृष्टी प्रतिमान काय आहे?

## ५ अ. ५.६ राज्याचे कार्य म्हणून शिक्षण

प्लेटोच्या मते शिक्षण हे मुख्यत्वे राज्याचे कार्य आहे. म्हणून शासनाच्या कोणत्याही चर्चेमध्ये शैक्षणिक तत्त्वज्ञान हे असतेच. द रिपब्लिक आणि लॉ मध्ये प्लेटोने सांगितले की शिक्षण हे पूर्णपणे राज्याच्या अखत्यारित असले पाहिजे. राज्याने शिक्षक, इमारती, देऊन अभ्यासक्रम व पध्दतींवर नियंत्रण ठेवले पाहिजे.

अथेन्समधील जुनी शिक्षणव्यवस्था अपयशी ठरण्याचे कारण म्हणजे बालकांमध्ये सद्गुण रुजवण्यात पालकांना आलेले अपयश. कोवळ्या भावना आणि कुटुंब जीवनात व्यक्तिगत बाबींना महत्त्व देण्याचा प्लेटो अगदी विरुध्द होता. त्याच्या म्हणण्यानुसार कुटुंबात मिळालेले प्रशिक्षण विश्वासार्ह नाही. राज्याने बालकांची निपज, वाढ आणि प्रशिक्षणाकडे व्यवस्थित लक्ष दिले पाहिजे.

थोडक्यात, प्लेटोचे पोलिस (Polis/राज्य) हा शैक्षणिक वर्ग आहे.

- शिक्षणातून त्याची निर्मिती होते. नागरिकांना तर्कनिष्ठ राजकीय निर्णय घेण्याचे शिक्षण मिळते या अटीवर ते रुजते.
- राज्याला एकसंघ ठेवून अपायकारक गोष्टींपासून त्याचा बचाव करणे हे शिक्षणाचे काम आहे.
- व्यक्तिगत विकास हे शिक्षणाचे ध्येय नसून राज्याला सेवा देणे होय; कारण राज्यावर नागरिकांना आनंदित ठेवण्याची जबाबदारी असून ते न्यायाचेही प्रतीक आहेत.

असे राज्य हे फक्त गुणवत्ताप्रधान असून नागरिकांची विभागणी (ज्याला सर्वसामान्यत: पण चूकीने वर्ग (Classes) म्हणतात) ही उत्पादक, सहाय्यक (अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा व्यवस्थेचे अधिकारी), आणि तत्त्वज्ञांमध्ये केलेली आहे; शेवटच्या दोहोंना मिळून पालनकर्ते (Gurdians) असे म्हणतात.

- रिपब्लिक हे पालनकर्त्यांच्या शिक्षणाशी संबंधित आहे पण द लॉमध्ये प्लेटो राज्यासाठीचे कायदेकानू सांगतो आणि जवळपास क्षमतांनुसार सर्वांनाच सारखे शिक्षण द्यावे असे सांगतो.

त्याच्यामते, बालकांचे शिक्षण ही राज्याची जबाबदारी आहे. (Republic, bk 2,376)

- शिक्षण हे सर्वांना सक्तीचे असले पाहिजे. राज्याने जिमखाना, प्रशिक्षक, अधिकारवर्ग, शिक्षण निरीक्षकांचा (सांस्कृतिक आणि शारीरिक) आर्थिक भार उचलला पाहिजे.

## ५ अ. ५. ७ प्लेटोच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे मूल्यमापन

१) उत्पादन कार्यात सहभागी असलेल्यांसाठी कमी शिक्षण.

प्लेटोच्या शिक्षणव्यवस्थेत उत्पादनवर्गाला फक्त प्राथमिक शिक्षण दिले जाते, म्हणजेच उच्च शिक्षण हे फक्त सैनिक आणि शासनकर्त्यांसाठी आहे. मजुरांना अशाप्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता नाही.

२) व्यक्तिभिन्नतेचा अभाव

समाजातील सर्व व्यक्तिंसाठी एकसारख्या अभ्यासक्रमाद्वारे सर्वांना एकसमान शिक्षण प्लेटाने सूचविले. ह्यामुळे वैविध्यता जाऊन एकसमान नागरिक तयार होतील.

३) साहित्याच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष

गणिताचे महत्त्व विशद करताना त्याने साहित्याच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष केले.

४) तत्त्वज्ञानावर भर

काहीना असे वाटते की प्लेटोचा तत्त्वज्ञानावरील भर अनाठायी आहे कारण त्यामुळे प्रत्यक्ष काम करणार्या व्यक्तींपेक्षा वैचारिक दृष्ट्या सजग व्यक्तिंची संख्या वाढेल. परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की प्लेटोने शारीरिक आणि बौध्दिक अशा दोन्ही विकासाकडे लक्ष दिले आहे आणि दोहोंचा चांगला सुवर्णमध्य गाठला आहे.

वरील सर्व दोष गृहीत धरुनही प्लेटोची शिक्षणाची संकल्पना सर्व काळात प्रभावशाली ठरली आहे. आदर्शवादी तत्त्वज्ञानावर तिचा सर्वात जास्त प्रभाव दिसून येतो. बरेच उत्तम शिक्षक हे अजुनही प्लेटोला आपला गुरु मानतात.

## ५ अ. ७ प्रश्नावली

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) 'कुटुंबातील शिक्षण हे विश्वासार्ह नसते हा प्लेटोचा निष्कर्ष होता." तुमच्या उत्तराचे समर्थन करुन मूल्यमापन करा.

२) प्लेटोचे शैक्षणिक योगदान स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ५ ब

## कार्ल जॅस्पर्स
## (१८८३-१९६९)

**प्रकरणाची रचना:**


५ ब.० उद्दिष्ट्ये

५ ब.१ प्रस्तावना

५ ब.२ एक अस्तित्ववादी म्हणून जॅस्पर्स

५ ब.३ शिक्षणावर जॅस्पर्स

- ५ ब.३.१ शिक्षणाची ध्येये
- ५ ब.३.२ शिक्षकांची भूमिका
- ५ ब.३.३ शिक्षण व शाळा
- ५ ब.३.४ शिक्षण व विद्यापीठ
- ५ ब.३.५ शिक्षण व लोकशाही
- ५ ब.३.६ शिक्षण व परंपरा
- ५ ब. ३.७ शिक्षण व कुटुंब

५ ब. ४ सारांश

५ ब. ५ प्रश्नावली


## ५ ब.० उद्दिष्ट्ये

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही पुढील गोष्टी करु शकाल.

१. जॅस्पर्सच्या शैक्षणिक तत्वज्ञानाच्या पार्श्वभूमीचे आकलन होणे.

२. अस्तित्ववादी म्हणून यास्पर्सचे समर्थन करणे.

३. यास्पर्सच्या तत्वज्ञानाचे शैक्षणिक पैलू स्पष्ट करणे.

४. यास्पर्सच्या शिक्षणाच्या तत्वज्ञानातील विद्यापीठाच्या भूमिकेचे मूल्यमापन.

५. शिक्षणाचा लोकशाही, परंपरा आणि कुटुंबाशी संबंध साधणे.

६. यास्पर्सच्या शिक्षणाच्या तत्वज्ञानाचे चिकित्सक मूल्यमापन करणे.

munotes.in

## ५ ब.१ प्रस्तावना

कार्ल जॅस्पर्स यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८८३ रोजी, ओल्डेनबर्ग, जर्मनी येथे झाला.

मानसोपचार तज्ञ म्हणून प्रिशक्षण घेऊन मानसोपचारतज्ञ म्हणून काम केले. त्यानंतर यास्पर्स तत्वज्ञानविषयक पृच्छे कडे वळला व त्याने नाविन्यपूर्ण तत्वज्ञानविषयक प्रणाली शोधण्याचा प्रयत्न केला. जर्मनीतील अस्तित्ववादाचा एक प्रमुख पुरस्कर्ता म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. मानसिक रुग्णांमध्ये, मानसशास्त्र आणि तत्वज्ञान यांतील सांगड घालण्याची सुरुवात जॅस्पर्सने केली. तत्ववेत्ता जीन-पॉल सात्र्े आणि विश्लेषक व्हिक्टोर फ्रँकल व रोलो मे यांच्या कामातही मनोविश्लेषण व अस्तित्ववाद यांची सांगड घातलेली दिसून येते. लोक त्यांच्या निवडीतून व कृतीतून जीवनाला अर्थ देतात असे प्रतिपादन कार्ल जॅस्पर्सने केले. अस्तित्ववादामध्ये कार्ल यास्पर्सची भूमिका बऱ्याच वेळेला दुर्लक्षित राहते; पण त्याने अस्तित्ववादाप्रति महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याने 'अस्तित्वतत्वज्ञान" ही संज्ञा तयार केली, जी अस्तित्ववाद ह्या संज्ञेचे पूर्व चिन्ह होते. यावरुनच त्याचे योगदान कितीतरी महत्त्वपूर्ण ठरते. जॅस्पर्सने त्याच्या तत्वज्ञानाकडे नेहमीच क्रियाशील व परिवर्तनशील म्हणून पाहिले.

**जॅस्पर्सचे प्रमुख कार्य तीन पुस्तकांतून: -**

- तत्वज्ञान (१९३२), तत्वज्ञानाच्या इतिहासाबद्दलचे त्याचे दृष्टिकोन देते व त्याच्या मुख्य विषयांचा परिचय देते. यास्पर्सने तत्वज्ञानाची तत्वज्ञान विषयक विचारांशीच ओळख दिली, दुसऱ्या कोणत्या विशिष्ट निष्कर्षांशी नाही. अनुभवांच्या कक्षा व मर्यादांचा शोध घेऊन त्यांचे वर्णन करण्याचा प्रयत्न त्याचे तत्वज्ञान करते. त्याने 'दास उमग्रेइफेन्डे' (घेरुन ठेवणारा) ही संज्ञा वापरली ज्याद्वारे त्याने अस्तित्वाच्या अंतिम मर्यादांचा संदर्भ दिला आहे, अमर्याद क्षितीज ज्यामध्ये सर्व व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ अनुभव शक्य आहेत पण ज्याचे तर्कनिष्ठ आकलन कधीही शक्य नाही.

- दुसरे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे 'अस्तित्वतत्वज्ञान" (१९३८; तत्वज्ञान आणि अस्तित्व, १९७१). अस्तित्व ही संज्ञा स्वातंत्र्याचा अवर्णनीय अनुभव देते आणि व्यक्तीच्या खर्या अस्तित्वाची शक्यता व्यक्त करते. असे अस्तित्व ज्यामध्ये व्यक्तीस मृत्यू, अपराधी भावना, संघर्ष, दु:ख, संधी यांसारख्या मर्यादा – परिस्थितींचा सामान करुन घेरुन राहिल्याची जाणीव होते. आधुनिक विज्ञान आणि आधुनिक आर्थिक व राजकीय संस्थांपासून मानवी स्वातंत्र्यास असलेल्या धोक्याबद्दल यास्पर्सने विस्ताराने लिहिले आहे.

- त्याच्या राजकीय कामांपैकी एक 'जर्मन अपराधीपणाचा प्रश्न (१९४६,भाषांतर १९४७)



munotes.in

**मानवाच्या मिती किंवा बाजू: -**

मानवाच्या विविध मितींची किंवा बाजूंची संकल्पनात्मक व्याख्या म्हणजे, स्वत्व, शुध्द जागृतावस्था, बुध्दि आणि त्याच्या आवµयक ऐक्यावरची दृष्टी ढळू न देता अस्तित्वाची शक्यता.

शुध्द जागृतावस्था म्हणून मानव: एक जीवीत प्राणी म्हणून व्यक्तीला त्याच्या जागृतावस्थे पलिकडे जाण्याची एकमेवाद्वितीय शक्यता ह्या संज्ञेतून दर्शविली आहे. ही जागृतावस्था 'यथार्थ विचारांचे केंद्र' आहे, जे फक्त मानवाला शक्य आहे.

बुध्दि म्हणून मानव: म्हणजे इच्छेनुसार विस्तार करता येईल अशा विषम ज्ञानाच्या गोंधळ निर्माण करणाऱ्या विपुलतेमध्ये व्यवस्थितपणा आणण्यासाठी कल्पना निर्मिती करण्याची क्षमता असलेला मानव, ही क्षमता व्यक्तिगत घटकांतील संबंधावर प्रकाशझोत टाकते आणि घटनांच्या वैविध्यातील ऐक्य प्रस्थापित करण्याचे त्याचे ध्येय असते.

अस्तित्व म्हणून मानव: म्हणजे, स्व ची प्रचिती येण्यासाठी मानवाचा बिनाशर्थ संकल्प किंवा निश्चय. अस्तित्व हे असे चिन्ह आहे की स्वत्व, शुध्द जागृतावस्था आणि मन वेगवेगळे समजणे अवघड आहे. आणि त्यांचा स्वत:चा असा काही तर्कही नाही, की मानव स्वाभाविकतेस मर्यादित नाही तर तो आवश्यकरित्या अलौकिकतेवर अवलंबून आहे.

मात्र स्वत्व, शुध्द जागृतावस्था आणि मन यांशिवाय अस्तित्व शक्य नाही. जर अस्तित्वास त्याच्या स्व मध्ये यायचे असेल आणि वास्तव बनायचे असेल तर ह्या आवश्यक अटी आहेत. 'ते स्वत्वामध्ये अंतर्भुत असते, शुध्द जागृतावस्थेने स्पष्ट होते, आणि त्याचा आशय मनामध्ये उघड होतो."

## ५ ब.२ एक अस्तित्ववादी - जॅस्पर्स

व्यक्तीच्या खऱ्या स्वत्वाची शक्यता आणि मुक्त अवस्था यांचे वर्णन करण्यासाठी यास्पर्सने 'अस्तित्व' ही संज्ञा वापरली. अशी व्यक्ती जी 'घेरुन टाकणे' या स्थितीशी जाणीवपूर्वक परिचित आहे आणि जी मृत्यू, संघर्ष, अपराधीपणा यांसारख्या मानवी जाrवनातील सीमा घालून देणार्या परिस्थितींचा सामना करते. जीवनामध्ये वस्तूबद्दल विचार करण्यावर तर्कामुळे मर्यादा येतात, परंतु वैयक्तिक विषय जो मनन करतो त्यावर विचार करण्यासाठी अस्तित्व सीमा आखते.

'अलौकिकत्व हा शुध्द वैयक्तिक अनुभव" आहे, ज्याची आपल्याला जाणीव होते, जसजसे आपण आपल्या निश्चित स्वरुपास जाणू लागतो. अलौकिकत्वाची जाणीव प्रत्येक व्यक्तीमध्ये मूलाग्र स्वातंत्र्याची जाणीव निर्माण करते – निवडीचे स्वातंत्र्य, निश्चयाचे स्वातंत्र्य आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वत:स एखाद्या विशिष्ट कार्यासाठी समर्पित करण्याचे स्वातंत्र्य ज्यामुळे जीवनास एक हेतू व अर्थ प्राप्त होईल.

येथे, जॅस्पर्सच्या विचारांमध्ये किर्केगार्डच्या कल्पनांचा प्रतिध्वनी उमटलेला दिसतो. तर्कनिष्ठ, वस्तुनिष्ठ मान्यतांच्या पलिकडे जाणाऱ्या 'श्रध्देच्या वृध्दि' च्या महत्त्वावर तो भर देतो. वस्तुनिष्ठ पुराव्या अभावी किंवा योग्य निवड करण्यासाठी आवश्यक ज्ञानाअभावी व्यक्तीला निर्णय घेताना हो की नाही परिस्थितीस तोंड द्यावे लागते या मुद्द्यावर दोघेही सहमत आहेत.

**तुमची प्रगती तपासा**

१. जॅस्पर्स अस्तित्ववादी शाखेशी निगडित आहे असे का म्हटले आहे?

२. 'घेरुन टाकणे' ची उदाहरणे द्या.

३. जॅस्पर्स अनुसार मानवाच्या विविध मिती कोणत्या आहेत?

## ५ ब.३ शिक्षणावर जॅस्पर्स

बनविणे, आकार देणे, पाळणे आणि सत्ता गाजविणे यांपेक्षा वेगळे असे शिक्षणाचे विशेष स्वरुप यास्पर्सने शोधले.

- बनविण्याच्या प्रक्रियेतून, साहित्यापासून काहीतरी उपयुक्त बनविले जाते.

- तर्कनिष्ठ विचार; आकार देण्याच्या प्रक्रियेतून मानव अशी निर्मिती करतो जिचा आकार अमर्याद व पूर्वविचार अशक्य असलेला असतो. आपल्या आधुनिक तांत्रिक जगामध्ये, पाळणे किंवा पोषण करणे यांना 'बनविणे' चे भेसूर साम्य लाभले आहे, तरीही ते तरच यशस्वी होतील जर ते सजीवाचा आवाज ऐकतील जो अगण्य प्राणी आहे.

- सत्ता गाजविण्याची प्रक्रिया म्हणजे व्यक्ती किंवा निसर्ग यांना बाह्य हेतू किंवा इच्छेनुसार वागविणे.

कार्ल जॅस्पर्स शिक्षणाच्या निर्णायक मितीस स्पशर् करुन शिक्षणाची व्याख्या करतो, 'स्वतंत्र्य वृत्तीने/ चैतन्याने व्यक्तीस स्व मध्ये येण्यासाठी सहाय्य करणे, एखाद्या प्रिशक्षित प्राण्याप्रमाणे नाही.'

'जेव्हा आशय मुक्तपणे ग्रहण केला जातो तेव्हा शिक्षण होते परंतु हकुमशाही वृत्तीमुळे त्यात अपयश येते.'

म्हणजेच, अगदी बालवयापासूनच बालकांना त्यांच्या 'मुक्त इच्छेनुसार कृती करण्यास मुभा असली पाहिजे; फक्त आज्ञाधारकतेने शिकण्यापेक्षा त्यांनी त्यांच्या वैयक्तिक मर्मदृष्टीतून अध्ययनाची गरज जाणून शिकले पाहिजे.'

सच्च्या शिक्षणाचा स्त्रोत म्हणून खरा अधिकार आणि जोरदार बल म्हणून प्रेम यांवर भाष्य करताना जॅस्पर्सचे शिक्षणावरील चिंतनाचे स्वरुप एकदम स्पष्ट होते. हे दोन्ही

घटक परस्पर वेगळे आहेत असे तो मानीत नाही. ते वेगळे न करता येण्यासारखे आहेत. वर्चस्वाची इच्छा आणि विद्यार्थ्यांना निश्चित हेतूसाठी आकार देणे यांपासून शिक्षणाचे संरक्षण करते प्रेम; आणि शिक्षणाला एक वैयक्तिक आंतरक्रिया बनविते. 'व्यक्तीतील प्रेमळ संप्रेषण वस्तूंच्या, जगाच्या व देवाच्या प्रेमास गवसणी घालते.'

**शिक्षणाच्या विविध छटा: -**

शिक्षण ही एकसमान प्रक्रिया नाही. इतिहासाच्या ओघात ती बदलते आणि विविध समाजांमध्ये विविध आकार घेते. पुनरुद्भवी असे मूलभूत तीन प्रकार यास्पर्स मानतो.

**विद्यालयीन शिक्षण** जसे मध्य युगामध्ये प्रचलित होते आणि निश्चित विषय वस्तुच्या प्रेषणापर्यंतच मर्यादित होते, सूत्रांमध्ये बंदिस्त व पुरक भाष्यासह दिले जात असे.

**शिक्षकाद्वारा शिक्षण** हा एक वेगळा प्रकार ज्यामध्ये वर्चस्व दशर्क व्यक्तिमत्वास विद्यार्थ्यांकडून निष्कलंक अधिकार म्हणून आदर दिला जातो. हे विद्यार्थी त्यास पूर्णत: अधीन असतात.

**सॉक्रेटिक शिक्षण** यामध्ये खोलवर अर्थ दडलेला आहे कारण त्यांत 'निश्चित शिकवण नसून, अमर्याद प्रश्न आणि निरंकुश अज्ञानता' (१९४७, P 85). कल्पनांच्या संदर्भात शिक्षक व विद्यार्थी एकाच स्तरावर असता.

जॅस्पर्स अनुसार, शिक्षण विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांना स्पष्ट जागृतावस्थेत आणण्यास सहाय्य करते; त्याच्यामध्ये असलेल्या क्षमतांना उद्दिपन देते, परंतु त्याच्यावर बाहेरुन काहीही जबरदस्ती केली जात नाही. येथे शिक्षणाचा अर्थ असा की 'आंतरव्यक्ती संपर्कातून सत्य उघड करुन व्यक्ती त्याच्या स्व मध्ये येते.' म्हणजेच शिक्षण हे संकल्पना निर्मितीची एक तर्कनिष्ठ पध्दती आहे.

**तुमची प्रगती तपासा**

१. बनविणे, आकार देणे, पाळणे व सत्ता गाजविणे यांपेक्षा यास्पर्सची शिक्षणांची संकल्पना वेगळी कशी आहे?

२. विद्यालयीन शिक्षण व सॉक्रेटिक शिक्षण यांतील फरक काय आहे?

३. संकल्पना निर्मितीची एक तर्कनिष्ठ पध्दतीम्हणून शिक्षणाचे कार्य स्पष्ट करा.

## ५ ब. ३.१ शिक्षणाची ध्येये

**परिपूर्ण मानव :** परिपूर्ण मानव बनण्यासाठीचे सहाय्यक साधन म्हणून शिक्षण पूर्ण मानवाच्या अस्तित्वास संधी देते. मानव एक स्वत्व, मानव एक शुध्द जागृतावस्था, मानव एक बुध्दि आणि मानव एक अस्तित्वाची शक्यता या संकल्पनांच्या संधीकरणातून निर्मित विविध मार्गांद्वारे शिक्षण एका पूर्ण मानवाच्या दिशेने निर्देश करते. संकल्पनात्मक

munotes.in

ऐक्यामध्ये ज्ञानाचे विशिष्ट घटक एकत्र आणले पाहिजेत. स्वत्व साध्य करण्यासाठी मानवाला सहाय्य करणे हे शिक्षणाचे अग्रतम कार्य आहे.

त्यांच्या स्वाभाविक मर्यादांसह शिक्षणाची इतर ध्येये या कार्यामध्ये समन्वित केली पाहिजेत. या उच्चतम ध्येयापासून सुरुवात करुन, व्यक्तिगत अवस्थांचे अपरिहार्य स्वरुप त्यांचा संबंधित अधिकारांतून व त्यांच्या स्वाभाविक मर्यादित नियमांतून प्रतित होते.

जर मानव एक स्वत्व म्हणून समजला, तर शिक्षण म्हणजे वाढणाऱ्या जीवनाचे ज्याचा विकास करावयाचा आहे, जे वृध्दिंगत करावयाचे आहे व परिपक्व बनवायचे आहे त्याचे संरक्षण. शारीरिक बळ आणि मानसिक आरोग्याची सांगड घालण्याचा प्रयास शिक्षण करते. ते स्पर्धेतून आवश्यक ऊर्जेची वृध्दि करते, व्यक्तिला कधी नाही अशा उच्चतम स्तरावर जाण्यास प्रोत्साहन देते, सौदर्यामध्ये आस्वाद घेण्यास प्रेरित करते, नैसर्गिक जीवनाचा आनंद घेण्यासाठी चौकट निश्चित करते. ते दुर्बलाची काळजी घेते आणि आजाराची शुश्रुषा करुन आणि आजार बरा करते.  पण शिक्षण फक्त जोपासना, वृध्दि आणि जीवनशक्तीचे संरक्षण यापुरते मर्यादित नाही. फक्त जीवशास्त्रीय पालनपोषणापेक्षा ते खूपच जास्त आहे.

जर मानव एक शुध्द जागृतावस्था मानला, तर शिक्षण म्हणजे स्पष्ट अवबोधापर्यंत नेणे, उपयुक्त असे ज्ञान देणे, आवµयक विचार प्रक्रियेचे प्रशिक्षण देणे, शिस्त लावणे. त्याच्या विविध प्रकटीकरणांत जगाचे संबोधात्मक नैपुण्य मिळविण्यासाठी शिक्षण अनेक विचारांचे मार्ग निर्माण करते. संयमित भाष्य, स्पष्ट तर्कशुध्द विचार, अचुक निर्णय आणि तीक्ष्ण निष्कर्ष यांचा ते शोध घेते.

**शिक्षणाचे सामाजिक ध्येय**

मानव एक स्वत्व म्हणून नेहमी इतर स्वत्वांबरोबर राहत असल्यामुळे, शिक्षणामध्ये प्रकार आणि रचनांच्या प्रक्रियांचा समन्वय अंतर्भुत होतो तसेच समाजातील समुह व संस्थांचा देखील सामाजिक रचनेशी एकात्मता साधून स्वतंत्र अस्तित्वाचे संवर्धन केले जाते. सामाजिक परस्परसंबंध, नैतिकता आणि रीतीरिवाज, नियम आणि कायदे या सर्व प्रकारांचा परिचय शिक्षण देते. प्रतिकाराच्या धैर्याबरोबर अनुकुलन साधण्याच्या क्षमतेचे साहचर्य शिक्षण स्थापित करते. व्यवसाय आणि राजकारण यांमध्ये प्रत्येक नागरिकास संरक्षण मिळवून देण्याचे काम शिक्षण करते, परंतु ते सार्वजनिक वर्तनाच्या प्रकारांचा परिचय देण्यापुरते, व्यावसायिक प्राविण्य मिळविण्यापुरते आणि राजकारणाबद्दल समज निर्माण करण्यापुरते मर्यादित नसते.  समाजामध्ये एकात्मता साधण्या पलिकडे शिक्षणाचा विस्तार आहे. वस्तुनिष्ठ कृती होण्यासाठी कौशल्यपूर्ण व विश्वसनीय  पध्दती वापरण्यासाठी चिकित्सक विचारांस चालना शिक्षण देते.  ते भेद जाणण्याची क्षमता तीक्ष्ण करते आणि व्यक्तिगत समावेशास प्रतिबंध न करता वस्तुनिष्ठतेसाठी क्षमता निर्माण करते. शिक्षण म्हणजे, तर्कनिष्ठरित्या वर्तन करण्याच्या क्षमतेपलिकडे काहीतरी निर्माण करणे.

## ५ ब. ३.२ शिक्षकांची भूमिका

आजीवन स्वयं-शिक्षण आणि प्रिशक्षण यांतून जनतेस शिक्षण देण्याचे कार्य करणार्या शिक्षकांच्या गुणवत्तेशी शाळेचे मूल्य प्रत्यक्ष संबंधित आहे ह्या तथ्याबद्दल यास्पर्सच्या मनात जराही शंका नव्हती. 'संप्रेषणाद्वारे स्वयं-शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये कायमचा व्यग्र तोच खरा शिक्षक. शिक्षण तरच बरोबर असेल जर ज्याला ते द्यायचे आहे त्याच्यामध्ये कडक आणि निग्रही अध्ययनाने स्वत:स शिक्षित करण्याची क्षमता विकसित करता येईल.' शास्त्रज्ञ असो वा विद्वान दोघांनाही सद्य, प्रचलित अद्ययावत गोष्टींची चिंता नसते; त्यांच्या पध्दती अचूक आहेत की नाही हे दूसर्यांना ते ठरवू देत नाही; ते स्वत:च्या बुध्दिमत्तेवर विश्वास ठेवतात. फक्त संशोधन देऊ शकते अशा 'तात्पर्यासाठी अध्यापन' याची गरज त्यांच्या शिकवणीतून दिसून येते. येथे यास्पर्स लिहितो की, 'जो स्वत: संशोधन करतो तोच खर्याअर्थाने अध्यापन करु शकतो.'

## ५ ब. ३.३ शिक्षण आणि शाळा

त्यांचा कल आणि क्षमता यांनुसार बालकांचे शिक्षण झाले पाहिजे. (पान क्र. ३२) 'अध्यापन शास्त्रीय आधार आणि निर्णय' म्हणून मानसशास्त्र एक शास्त्र मानावे यास यास्पर्स हरकत घेतो. तथा, तो मानतो की, शिक्षकाच्या मार्गदर्शक हाताखाली त्याला दुय्यम भूमिका आहे.

समुदायाच्या उपयुक्त घटक बनण्याच्या दृष्टीने बालकाला प्रशिक्षण देण्याच्या शाळेच्या आवश्यक भूमिकेला दोन फलितार्थ आहेत. (पान ३३). 'समुदायाच्या ऐतिहासिक वृत्तींना आणि त्या समुदायाच्या चिन्हातून जीवनाला उत्तेजन' हे प्रथम कार्य यास्पर्स लिहितो. (पान ३३). समुदायाच्या अगोदरचा इतिहास आणि युवा जनता आणि त्यांचे शिक्षक यांच्या संपर्काद्वारे हे साधता येईल, जरी हे ध्येय बुध्दिपुर्वक व तर्कशुध्द उद्देश नसेल. दुसरे कार्य आहे, काम व व्यवसायासाठी आवश्यक सर्व काही अध्ययन करावयाचे व त्याचा सराव करावयाचा (पान ३३). ही बुध्दिपुर्वक नियोजन करावयाची गोष्ट आहे. दोन्ही कार्ये अपरिहार्य आहेत. संपूर्ण जनसंख्येसाठी नैतिक, बौध्दिक आणि राजकीय आधार घालून देण्यामध्ये प्राथमिक शाळेच्या भूमिकेवर यास्पर्स जोर देतो. बहुतांश लोकसंख्या आणि शासनकर्ते यांनी आवश्यक आर्थिक संसाधनांचे समर्थन करायचे तर शिक्षकांनी प्रदान केलेले बौध्दिक नुतनीकरण हा निर्णायक घटक आहे. मानवी मनाच्या विशाल परंपरांवर आधारित शिक्षणाच्या आशयास निर्णयात्मक महत्त्व आहे. सर्व अध्यापनात नैतिक आशयाची आवµयकता यास्पर्स मांडतो; वाचन व लेखन फक्त तांत्रिक साध्य न राहता, आध्यात्मिक कृती बनतील एक चमत्कार.

जेव्हा ते चैतन्य, वृत्ती जीवीत असेल, प्रयत्न आणि कष्ट, सराव आणि पुनरावृत्ती जे नेहमी एक भार म्हणून अनुभवास येतात, त्यांना नवीन अर्थ प्राप्त होईल आणि त्यांतून खरा आनंद मिळेल. माध्यमिक शाळांनी त्यांच्या विविध प्रकारांतून ह्या ध्येयाचा पाठपुरावा करायलाच हवा.

## ५ ब. ३.४ शिक्षण आणि विद्यापीठ

जॅस्पर्सच्या विद्यापीठामध्ये जेथे संशोधन हा प्रमुख हेतू आहे, शोध आणि संशोधन अविभाजनीय पूर्ण आहे आणि त्या पूर्णाशी असलेल्या संबंधावर विद्वत्ता अवलंबून असते. 'एखाद्या युगाचा बौध्दिक सद्सद्विवेक' म्हणून विद्यापीठाने कार्य करावे आणि ती अनेक संदर्भात 'विविध ज्ञान शाखांची व जागतिक दृष्टिकोनांची भेटण्याची जागा आहे' असे यास्पर्स लिहितो.

विज्ञान आणि विद्वत्ता, जॅस्पर्सच्या दृष्टिकोनांतून तेव्हाच अर्थपूर्ण असतात जेव्हा ते सर्वंकष बौध्दिक जीवनाचा अंश असतात. असे बौध्दिक जीवन जो विद्यापीठाचा जीवनरस आहे.

संशोधन, शिक्षण आणि अध्यापन ही विद्यापीठाची उद्दिष्टे आहेत; ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्वानांनी परस्परांशी व विद्यार्थ्यांशी संप्रेषण साधणे व विद्यार्थ्यांनी परस्परांशी संप्रेषण साधणे अत्यंत आवµयक आहे.

विद्यापीठाचे कार्य फक्त अध्यापन नाही ह्या त्याच्या कल्पनेशी यास्पर्स आयुष्यभर समर्पित राहिला; 'वैयक्तिक संशोधनामध्ये व्यग्र राहणे विद्यार्थ्यांने आपल्या प्राध्यापकांकडून शिकले पाहिजे आणि त्यासाठी विचारांचा शास्त्रीय मार्ग अंगिकारला पाहिजे जो त्याच्या संपूर्ण असित्वास रंग देईल.'

यास्पर्स विद्यापीठाच्या कार्यांचा खूप मोठा रंगपट रंगवितो, संशोधन, अध्यापन आाणि शिक्षण; प्रिशक्षण; संप्रेषण; विज्ञान जग.

जॅस्पर्सने केलेल्या अनेक विधानांतून हा अंतर्गत मिलाफ स्पष्ट होतो.

१. विज्ञानाद्वारे सत्याचा शोध ज्या प्रमाणात विद्यापीठ घेते, संशोधन त्याचे मूलभूत कार्य आहे. कारण हे कार्य ज्ञानाचे वहन गृहीत धरते, संशोधन हे अध्यापनासह सांधलेले असते. अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांना संशोधन प्रक्रियेमध्ये भाग घेण्याची संधी देणे.

२. संपूर्णत्वाच्या बौध्दिक प्रिशक्षण प्रति ज्ञानदानाची अचूक पध्दती आणि कौशल्ये योगदान देतात.

३. ह्या कार्याचे कृत्य विचारी व्यक्तींच्या संप्रेषणाशी बांधलेले आहे म्हणजेच, संशोधकांमधील, शिक्षक व विद्यार्थ्यांमधील, आणि काही परिस्थितीमध्ये या सर्वांमधील.

४. विज्ञान हा आवश्यकरित्या एक पूर्ण आहे. विद्यापीठाची रचना अशी असली पाहिजे की सर्व वेगवेगळ्या शास्त्रांचे प्रतिनिधित्व होईल (१९२३; १९६१, PP ६४-६५).

व्यावसायिक प्रिशक्षणाचे ध्येय 'स्वयसिंध्द ज्ञान देणे नसून प्रिशक्षण व विचारांचे वैज्ञानिक मार्ग विकसित करणे' असेल तर त्यासाठी विद्यापीठ पूर्वस्थिती व पाया निर्मिती करते.

प्रश्न तंत्राचा सराव झाला पाहिजे. एखाद्या ज्ञानशाखेमध्ये पक्का पाया तयार झाला पाहिजे, परंतु परीक्षांसाठी विशिष्ट तथ्यांचे पाठांतर करण्याची काहीही आवश्यकता नाही.' संशोधनाद्वारे मिळविलेल्या निर्णय वृत्तीवर भर असावा, ते दैनंदिन व्यवसायाचे मूल्य सिध्द करते, ज्ञान मिळविण्याजोग्या गोष्टींवर दृष्टी वळविते आणि विस्तिर्ण क्षितीजांची द्वारे उघडते. विद्यार्थ्यांची जबाबदारीची वृत्ती व स्वातंत्र्य उपयोगात येत असल्यामुळे विद्यापीठीय शिक्षण हे 'सॉक्रेटिक स्वरुपाचे' (पान ८६) आहे, यांवर यास्पर्स भर देतो. 'ज्ञानासाठीची मूलभूत आस अनुभवण्यासाठी व मिळविण्यासाठी स्वातंत्र्याची गरज असते आणि म्हणून मानवी स्वातंत्र्य ही देवाची देणगी आहे व देवाशी बांधलेली आहे' (पान ८६). अध्ययनाच्या स्वातंत्र्याची दुसरी बाजू आहे अध्यापनाचे स्वातंत्र्य.

जेव्हा दुसरे सर्व तत्वज्ञानाच्या अभ्यासामध्ये गुंतलेले होते, जॅस्पर्स त्याच्या विद्यार्थ्यांना 'तत्वान्वेषणाच्या' कृतीमध्ये गुंतुन राहण्यास प्रेरित करीत असे. भूतकाळात काय लिहिले गेले आहे किंवा तात्विक स्तरावर दोन प्रसिध्द व्यक्ती काय म्हणताहेत याचे विश्लेषण करण्यापेक्षा चर्चा आणि वादविवाद यास्पर्सला अधिक महत्त्वपूर्ण होते. संशोधकाशी संप्रेषण आणि संशोधन प्रक्रियेमध्ये सहभाग विद्यार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनास उत्तेजन देतो ज्याला यास्पर्स वैशिष्ट्यपूर्ण रित्या 'वस्तुनिष्ठता, विषयाप्रति आस्था, तर्कनिष्ठ संतुलन, परस्परभिन्न शक्यतांचा शोध, स्वयं चिकित्सा' असे संबोधतो. हेतूपुरस्सर उद्देशाविना किंवा नियोजनाविना जे घडते ते 'तर्का मध्ये शिक्षण.'

## ५ ब. ३.५ शिक्षण आणि लोकशाही

पूर्णपणे औपचारिक लोकशाही संपूर्ण वर्चस्वास जन्म देऊ शकते. म्हणून तो आपल्याला वेळोवेळी आठवण करुन देतो की लोकांमधील विμवास आवश्यक आहे व स्वयं संवर्धित होईल अशी लोकांची तर्कनिष्ठ वृत्ती ही लोकशाहीची पूर्वकल्पना आहे. लोकांना आदर्श मानणे किंवा दुसऱ्या टोकास त्यांना बदनाम करणे यांसाठी यास्पर्सची संमती नाही. सार्वभौमत्वासाठी स्वयं-शिक्षणाची गरज असलेले सार्वभौम लोक असे तो लोकांबद्दल मानतो. राजकीय दृष्ट्या सक्रिय बनून व मूर्त समस्या निरसनाची जबाबदारी स्वीकारुन लोक लोकशाहीसाठी पक्व बनतात. लोकशाही सर्व लोकांच्या शिक्षणाची मागणी करते हेच स्वयंस्पष्ट आहे असे जॅस्पर्स मानतो.

'लोकशाही, स्वातंत्र्य आणि तर्क हे सर्व शिक्षणावर अवलंबून आहेत. अशा शिक्षणातूनच आपल्या अस्तित्वाच्या ऐतिहासिक आशयाची जोपासना करणे शक्य आहे आणि आजच्या नवीन जगामध्ये आपल्या जीवनावर श्रध्दा निर्माण करणारे बल म्हणून विस्तृत करणे शक्य आहे.' (१९५८, पान ४४४).

'अस्पष्टतेची झुडपे विरळ करुन' स्वयं शिक्षणाची सुरुवात होते हे थोडे आμचर्यकारक वाटेल. संविधानात्मक घटना नागरिकांच्या हृदयांमध्ये खंबीरपणे रुजविण्याचा प्रयास ते करते. या सर्वांमध्ये, व्यक्तीमध्ये तो स्वत:साठी स्वत: जबाबदार असल्याची जाणीव निर्माण करण्याची अत्यावμयक गरज आहे'. (पान ५२).

## ५ ब. ३.६ शिक्षण आणि परंपरा

जॅस्पर्सला स्वत:ला त्याच्या मॅक्स वेबर सह वैयक्तिक संपर्कामुळे परंपरेच्या अस्तित्ववादी विनीयोगासाठी शाश्वत प्रेरणा मिळाली, त्यामुळे परिणामत: भूतकाळाची मूलभूत भूमिका व त्याचे शिक्षणावरील परिणाम तो मानू लागला.

व्यक्तीला त्याच्या स्वत:च्या अस्तित्वाचा पुनशोर्ध घेण्यासाठी संधी प्रदान करणे हा महान व्यक्तींच्या अभ्यासाचा हेतू शिक्षण ठेवते, त्यांच्याद्वारे फलद्रुप होण्यासाठी सहाय्य करते. दुसऱ्या व्यक्तीशी गृहितकात्मक ओळख सांगण्याची गरज न ठेवता वस्तुनिष्ठता बाणवणे व निर्णय घेणे यांतून मानव खरा व नवीन बनतो. जॅस्पर्स साठी ह्या सूत्राची निश्चिती नेहमी झालेली आहे- 'जो महानता पाहतो, तो स्वत:ही महान बनण्याची इच्छा बाळगतो.'

## ५ ब. ३.७ शिक्षण आणि कुटुंब

स्वानुभवातून आणि श्रध्देतून, जॅस्पर्स कुटुंबाला सर्व शिक्षणासाठीचे पायाभूत कार्य करण्याची जबाबदारी सोपवितो. पालकांच्या प्रेमातून आणि बालकांच्या भल्यासाठी असलेल्या सततच्या काळजीतून त्यांना मानवतेचा अनुभव मिळतो. दैनंदिन जीवनातील अडचणींवर मात करणे, भविष्यात जबाबदार जीवन जगण्याचे धैर्य विकसित करण्याचे सहाय्य मिळते. येथे बालकांना दृढ ऐक्य आणि पावित्र्य श्रध्दा आणि परस्परावलंबन ज्यांत सर्व एकमेकांस आधार देतात, असे अनुभव मिळतात. येथे वाढणाऱ्या मुलांना त्याच्या जीवनाला आकार देणारे धडे मिळतात, असे धडे जे बंधनकारक नसतात तर प्रत्येकाला स्वातंत्र्य बहाल करतात.

## ५ ब.४ सारांश

अस्तित्व साध्य करण्यासाठी शिक्षण म्हणजे निव्वळ एक गोष्ट: स्वत:ची प्रचिती येण्यासाठीच्या शक्यता लपवून न ठेवणे, अस्तित्वाकडे जाणारा मार्ग न चुकणे, हुशारी आणि स्वास्थ्य यांना बळीपडून मानवाचे उच्चतम ध्येय गाठण्याची गरज दुर्लक्षित न ठेवणे. मानव त्याच्या स्वत्वा मध्ये किती प्रमाणात प्राविण्य मिळवील हे भाकित वर्तविणे अशक्य होते.

## ५ ब. ५ प्रश्नावली

१. कार्ल जॅस्पर्सचे शैक्षणिक तत्वज्ञान स्पष्ट करा.

२. शिक्षण व लोकशाही, शिक्षण व परंपरा आणि शिक्षण व कुटुंब यांतील संबंधाची चर्चा करा.

❖❖❖❖

# ५ क

## पावलो फ्रेअरे
## (१९२१-१९९७)

**प्रकरणाची रचना:**

५ क.० उद्दिष्टे

५ क.१ प्रस्तावना

५ क.२ पावलो फ्रेअरेची शिक्षणाची संकल्पना

५ क. २.१ राजकीय व अध्यापनशास्त्रीय तत्वे

५ क. २.२ बँकींग शिक्षण

५ क. २.३ समस्या विचारार्थ मांडणे प्रतिमान

५ क. २.४ अध्ययन वर्तुळे

५ क. २.५ अध्यापन साहित्य

५ क. २.६ संवाद

५ क. २.७ राष्ट्रीय साक्षरता कार्यक्रम

५ क. २.८ पावलो फ्रेअरेची पध्दती

५ क. ३ सारांश

५ क. ४ प्रश्नावली

## ५ क.० उद्दिष्टे

ह्या घटकाच्या वाचना नंतर तुम्ही –

१. फ्रेअरेच्या शैक्षणिक तत्वज्ञानाच्या पार्श्वभूमीबद्दल आकलन करु शकाल.

२. प्रचलित शिक्षण प्रणालीवरील पावलोच्या समीक्षेचे समर्थन करु शकाल.

३. फ्रेअरेच्या तत्वज्ञानाचे शैक्षणिक पैलू स्पष्ट करु शकाल.

४. बँकींग शिक्षणाचे मूल्यमापन करु शकाल.

५. अध्यापन शास्त्रीय व राजकीय तत्वांचा संबंध दशर्वू शकाल.

६. सांकेतिकीकरणाचे आकलन करु शकाल.

७. अध्ययन वर्तुळांचे मूल्यमापन करु शकाल.

८. फ्रेअरेच्या साक्षरता कार्यक्रमाची कार्यप्रणाली समजू शकाल.

९. फ्रेअरेच्या शिक्षणाच्या तत्वज्ञानाचे चिकित्सक मूल्यमापन करु शकाल.

munotes.in

## ५ क.१ प्रस्तावना

२० व्या शतकाच्या उत्तरार्धातील बहुतांश प्रभावशाली विचारवंतांपैकी ब्रझीलीयन शिक्षणतज्ञ पावलो फ्रेअरे एक होय. त्याचा जन्म १९ सप्टेंबर १९२१ रोजी रेसीफे, ब्रझील येथे झाला व २ मे १९९७ मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने त्याला साओ पावलो, ब्रझील येथे मृत्यू आला. वकीलीच्या छोट्याशा कारकीर्दीनंतर त्याने १९४१-१९४७ दरम्यान माध्यमिक शाळेमध्ये पोर्तुगीझचे अध्यापन केले. त्यानंतर तो प्रौढ शिक्षणामध्ये व कामगार प्रिशक्षणामध्ये सक्रीय सहभागी झाला. १९६१ – १९६४ दरम्यान तो रेसिफे विदयापीठाच्या सांस्कृतिक विस्तार विभागाचा संचालक बनला.

ईशान्य ब्रझीलमधील त्याच्या साक्षरता प्रिशक्षण अनुभवांमुळे फ्रेअरेला लवकरच आंतरराष्ट्रीय ओळख मिळाली. मिलिटरी राजवटीमुळे १९६४ मध्ये त्याला नवीन सरकारकडून तुरुंगवास भोगावा लागला व पुढे पंधरा वर्षे राजकीय वनवासात काढावी लागली.

१९६९ मध्ये तो हार्वर्ड विदयापीठामध्ये अभ्यागत विद्वान होता व पुढे जेनेवा, स्वीत्झलँड येथे वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ चर्चेसचा विशेष शैक्षणिक सल्लागार बनला. १९७९ मध्ये तो ब्रझीलला परतला. शेवटी १९८८ मध्ये तो साओ पावलोसाठी शिक्षणमंत्री बनला (रेज आणि होप: पावलो फ्रेअरे, n.d.) ह्या स्थानामुळे जवळपास संपूर्ण ब्रझीलमध्ये शैक्षणिक सुधारणा घडवून आणणे त्याला शक्य झाले.

## ५ क.२ पावलो फ्रेअरेची शिक्षणाची संकल्पना

पावलोचे सर्वांत परिचित काम आहे 'दडपणाचे अध्यापनशास्त्र' (१९७०). ह्या व इतर पुस्तकांमधून तो अशा शिक्षण प्रणालीची बाजू मांडतो ज्यामध्ये एक सांस्कृतिक व स्वातंत्र्याचे कृत्य म्हणजे शिक्षण यांवर भर दिलेला आहे. फ्रेअरे हा आदशर्वादी किंवा वास्तववादी किंवा यंत्रवादी नव्हता. मानव अमूर्त, एकाकी, स्वतंत्र व जगापासून अलिप्त आहे ह्या मताचा त्याने अस्वीकार केला. मानवापासून भिन्न असे जगाचे अस्तित्व मानण्यासही त्याने नकार दिला. त्याच्या मते जागृतावस्था आणि जग एकसमान आहेत. आदर्शवादींच्या विचारसरणीप्रमाणे जगाच्या आधी जागृतावस्था नाही व आधिभौतिक वादींच्या प्रमाणे जगाच्या नंतर जागृतावस्था नाही असे पावलोचे मत होते. त्याचे मत अस्तित्ववादाच्या जवळपास होते, मानव त्याच्या प्रबळ इच्छा शक्तीच्या आधारे जग बदलू शकतो हा तो विश्वास. म्हणजे मानवाची जगातील एक कर्ता म्हणून भूमिका.

फ्रेअरेचे काम प्रामुख्याने साक्षरतेशी संबंधीत होते व स्त्रीपुरुषास स्व बळावर त्यांच्या प्रभावहीनतेवर मात करण्यास सहाय्य करणे. त्यांना त्याने दडपणाखालील असे संबोधले, त्याच्या मते हे लोक वास्तवाचा चिकित्सक विचार करुन व कृती करुन जीवनाची परिस्थिती बदलू शकतील. त्याच्या मते दडपण टिकवून ठेवण्यामध्ये शिक्षण प्रणाली केंद्रीय भूमिका निभावते म्हणून दडपणाखालील लोकांसाठी गोष्टी बदलायच्या असतील तर प्रथम शिक्षण प्रणालीमध्ये सुधारणा आली पाहिजे.

ज्ञान ही अलग घटना नाही. ती कृती व चिंतन दोहोंचे आकलन करते. त्याच्या शब्दांत माहित असण्याची कृती तर्कविद्या हालचालींचा समावेश करते जी कृतीकडून चिंतनाकडे जाते व चिंतनाकडून नवीन कृतीकडे.

## ५ क. २.१ राजकीय व अध्यापनशास्त्रीय तत्वांचा संच

**राजकीय तत्वांचा संच –**

- आपल्या समाजातील प्राबल्य संबंधामध्ये बदल घडवून आणण्याच्या शिक्षणाच्या प्रसिध्द ध्येयाचे तत्व.
- समाजातील सर्व संरचनांवर एकत्रीत प्राबल्याची यंत्रणा निर्माण करण्याचे उद्दिष्ट.
- हे ध्येय साध्य करण्याचे मार्ग अंतिम उद्दिष्टाच्या विरुध्द नसावे – खरोखरचा लोकशाही समाज निर्माण करण्यासाठी हूकूमशाही पध्दती वापरुन चालणार नाही.
- राजकीय प्रक्रियेमध्ये वापरलेले प्रकल्प, धोरणे व क्लुप्त्या स्वत: सहभागी व्यक्तींनी एकत्रीतरित्या तयार करावे.

**अध्यापनशास्त्रीय तत्वांचा संच –**

- अध्ययनार्थी हे अध्ययन प्रक्रियेतील वस्तू नसून, ते कर्ते असतात; ह्या प्रक्रियेतून ते समाजाचे कर्ते बनू शकतात.
- अध्ययन प्रक्रियेमध्ये शिक्षक व अध्ययनार्थी समान सहभागी असतात; सर्व ज्ञानाची निष्पत्ती असतात.
- शिक्षक व अध्ययनार्थीतील सततच्या संवादाने अध्ययन प्रक्रिया विकसित होते.
- सहभागी व्यक्तींना बाह्य व आंतरिक दडपणांतून मुक्त करणे हे अध्ययन प्रक्रियेचे उद्दिष्ट असते; ते राहत असलेल्या समाज, त्यांचे जीवन व वास्तव बदलण्यासाठी त्यांना सक्षम बनविणे.

**तुमची प्रगती तपासा –**

पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा


१. दडपणाखाली असलेल्यांच्या अध्यापन शास्त्राच्या ऐतिहासिक संदर्भाचे वर्णन करा.

२. फ्रेअरे एक अस्तित्ववादी का मानला जातो?

३. राजकीय व अध्यापनशास्त्रीय तत्त्वांची चर्चा करा.

munotes.in

## ५ क. २.२ बँकींग शिक्षण




ह्या प्रकारच्या शिक्षणाच्या प्रकारामध्ये, बँकेच्या रिक्त खात्यामध्ये ज्याप्रमाणे आपण धनराशी जमा करतो त्याप्रमाणे अध्ययनार्थीच्या रिक्त व अज्ञानी मनामध्ये माहिती व ज्ञान जमा करणे हे शिक्षकाचे काम आहे. म्हणून त्याला फ्रेअरेने 'बँकींग शिक्षण' नाव दिले.

ह्या प्रतिमानामध्ये अध्ययनार्थी शिक्षकाने ज्यावर कार्य करावयाचे आहे अशी निष्क्रीय वस्तू ठरतो, म्हणून फ्रेअरे त्या प्रतिमानावर टिकात्मक समीक्षा करतो.

प्रबळ संस्कृतीची सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय स्थिती स्वीकारुन लोकांनी अस्तित्वातील शक्तीस अभिसंधित व्हावे व त्यामुळे त्यांचे विभाजन व्हावे हा बँकींग शिक्षणाचा हेतू आहे असे मत फ्रेअरे मांडतो.

विद्यार्थ्यास सिमांत, अज्ञानी व साधन हीन अध्ययनार्थी मानून त्याला शिक्षक ज्ञानाची/ शिक्षणाची भेट देतो असा दृष्टिकोन बँकींग शिक्षण प्रतिमानामध्ये दिसून येतो. फ्रेअरे म्हणतो ही प्राबल्य गटाकडून (दडपण देणारा गट) दाखविलेली खोटी उदारता आहे. स्वत:चे स्वार्थ साधण्यासाठी लोकांना नियंत्रणाखाली ठेवून त्यांच्यावर प्राबल्य गाजविण्याचा हा मार्ग आहे.

बँकींग शिक्षणासारखे हुकूमशाही शिक्षण प्रकार अध्ययनार्थीस जगाची ओळख होण्यापासून वंचित ठेवतात आणि त्या मध्ये बदल घडू शकतो ही जाणीव होऊ देत नाही. हुकूमशाही प्रकारचे शिक्षण दडपलेल्यांच्या मुक्ती व स्वातंत्र्यास बाधा आणते. पुढील वृत्ती आणि प्रथांच्या माध्यमांतून बँकींग शिक्षण विसंगती टिकविते व त्यास उत्तेजनही देते, ह्यातून दडपलेल्या समाजाचे प्रतिबिंब दिसून येते:

अ) शिक्षक शिकवितो आणि विद्यार्थ्यांना शिकविले जाते;

ब) शिक्षक सर्वज्ञ आहे आणि विद्यार्थी अज्ञानी आहेत;

क) शिक्षक विचार करतो आणि विद्यार्थ्यांचा विचार केला जातो;

ड) शिक्षक बोलतो आणि विद्यार्थी नम्रतेने ऐकतात;

इ) शिक्षक शिस्त लावतो आणि विद्यार्थ्यांना शिस्त लावली जाते;

munotes.in

ई) शिक्षक त्याची निवड करतो व विद्यार्थ्यांवर लादतो, विद्यार्थी स्वीकार करतात;

फ) शिक्षक कृती करतो व विद्यार्थी शिक्षकाच्या कृत्याद्वारे स्वत: कृती करीत असल्याची कल्पना करतो;

ग) शिक्षक कार्यक्रमाचा आशय निवडतो आणि विद्यार्थी (ज्यांना मत विचारलेले नाही) तो स्वीकारतात.


ह) ज्ञानावरील प्रभुत्वाचा शिक्षक त्याच्या व्यावसायिक अधिकाराशी गोंधळ करतो आणि ते विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्याच्या विरोधात वापरतो.

ज) शिक्षक अध्ययन प्रक्रियेचा कर्ता आहे, विद्यार्थी फक्त/ निव्वळ वस्तू किंवा कर्म.

बँकींग शिक्षण मनुष्याला अनुकुलनक्षम, कह्यात ठेवण्याजोगे अस्तित्व मानते ह्यात काही आश्चर्य नाही. सोपविलेल्या माहितीची (जमा) साठवणूक करण्याच्या कामात विद्यार्थी जेवढा गुंतून राहील तेवढी त्याची चिकित्सक जागृतावस्था कमी विकसित होईल जी जगाशी साधलेल्या आंतरक्रियेतून निष्पन्न होत असते. जेवढी निष्क्रीय भूमिका ते स्वीकारतील तेवढे ते जग आहे तसे स्वीकारतील.

फ्रेअरे मत मांडतो की, संवाद आणि चिंतनाच्या प्रक्रियेतून बदल घडू शकतो ज्याचा परिणाम म्हणजे कृत्यातून किंवा हस्तक्षेपातून राजकीय बदल दिसेल. ह्या प्रक्रियेला फ्रेअरे 'प्रॅक्सीस' म्हणतो.

## ५ क. २.३ समस्या विचारार्थ मांडणे प्रतिमान




बँकींग शिक्षण प्रतिमानास आव्हान देण्यासाठी फ्रेअरने समस्या विचारार्थ मांडणे प्रतिमान सूचविले. ह्या प्रतिमानामध्ये, शिक्षक आणि अध्ययनकर्ता त्यांचे अनुभव, भावना व जगाचे ज्ञान एकत्र विश्लेषण करतात व चर्चा करतात. शिक्षक व अध्ययनकर्ता ह्यांच्या परिस्थिती ह्या जगामध्ये निश्चित आहेत ह्या बँकींग प्रतिमानाच्या सूचनेऐवजी समस्या विचारार्थ मांडणे प्रतिमान समस्या व लोकांच्या वास्तवांचा बदल घडविण्याच्या दृष्टीने शोध घेते.

पावलो फ्रेअरेच्या मानव व प्राणी ह्यातील भेदावर आधारित 'संस्कृतीची मानवशास्त्रीय संकल्पना' वर आधारित पावलोची 'समस्या विचारार्थ मांडणे शिक्षणाची संकल्पना' आहे. फ्रेअरे म्हणतो, 'मानव एकच असा प्राणी आहे जो स्वत:च्या कृत्यांवर व स्व वर चिंतन करतो, जे इतर प्राण्यांना शक्य नाही."

प्राणी फक्त एक अस्तित्व असतात जे अऐतिहासिक व फक्त उत्तेजित असते. त्यांच्यामध्ये समर्पणाची भावना नसते.

पावलो फ्रेअरेची 'संस्कृतीची मानवशास्त्रीय संकल्पना' अशी आहे –

समस्येची उत्तरे पुरविणे हे शिक्षकाचे काम नाही, तर चिकित्सक विचार करुन उत्तरे शोधण्यासाठी आवµयक क्षमता विकसित करण्यास विद्यार्थ्याला सहाय्य करणे (ज्याला फ्रेअरे सद्विवेकबुध्दीकरण (Conscientization) असे संबोधतो).

जग किंवा समाज स्थिर नाही आणि बदलास खुली आहे यावर विश्वास ठेवणे त्यामुळे शक्य होते. नवीन व वेगळ्या वास्तवाची कल्पना करणे शक्य होते. दडपण झुगारुन देण्यासाठी विद्यार्थी प्रथम चिकित्सक विचार करु लागले पाहिजेत.

बँकींग शिक्षण आराखड्यामध्ये चिकित्सक विचार शक्य नाही असा फ्रेअरेचा विµवास आहे, ते फक्त समस्या विचारार्थ मांडणे शैक्षणिक आराखड्यातच शक्य आहे. बँकींग शिक्षण प्रणालीमध्ये, विद्यार्थी बहुतांश वेळा अर्थहीन तथ्ये स्मरणात ठेवतो आणि पुन्हा प्रस्तुत करतो; समस्या विचारार्थ मांडणे आराखड्यामध्ये विद्यार्थ्याला चिकित्सक विचाराची कौशल्ये वापरुन जगातील विविध समस्यांचा शोध घेण्यास सांगितले जाते.

फ्रेअरेने ह्या दोन शैक्षणिक आराखड्यांतील फरक POTO (Pedagogy of the Oppressed) मध्ये दिले आहे.

बँकींग शिक्षण सर्जनशील क्षमतांना अटकाव करते.

- समस्या विचारार्थ मांडणे शिक्षण सतत वास्तवावरील पडदा दूर करते.

  समस्या शिक्षण जागृतावस्थेचे निमज्जन करते.

- समस्या विचारार्थ मांडणे शिक्षण जागृतावस्थेचा उदय करण्याचा प्रयत्न करते आणि वास्तवामध्ये चिकित्सक हस्तक्षेपास प्रोत्साहन देते.

ह्या आराखड्याअंतर्गत विद्यार्थी समस्या विचारार्थ मांडतात आणि नंतर त्या समस्या का अस्तित्वात आहेत ह्याचा शोध घेतात. (उदा. विद्यार्थी विचारु शकतात: युनायटेड स्टेटस् मध्ये गरीबी का आहे? फ्रेअरेचा विश्वास आहे की समस्या विचारार्थ मांडणे शिक्षण विद्यार्थ्यांना चिकित्सक विचारवंतच बनवणार नाही तर जग सतत बदलत आहे हे ही दृश्यमान करील.

'समस्या विचारार्थ मांडणे शिक्षणामध्ये समस्येकडे चिकित्सक दृष्टीने पहाण्याची शक्ती लोकांमध्ये विकसित होईल. ही प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी लोकांनी त्यांचे स्वत:चे प्राबल्य गटाबद्दलचे अवबोध तपासून पाहिले पाहिजेत. फ्रेअरे म्हणतो की दडपणाखालील लोक स्वत:ला कमी लेखतात किंवा स्वत:मध्ये काही कमी आहे असे समजतात. प्रबळ गटांचे वर्तन व प्रथा परिपूर्ण व अचूक आहे असे मानण्याची लोकांना सवय झालेली असते असे फ्रेअरे सुचवितो. आपणही संपूर्ण व अचूक बनण्यासाठी ते प्रबळ गटांच्या प्रथांचे अनुकरण करतात. ह्याचा विरोध करायचा म्हणजे अध्ययनार्थीला

प्रबळ संस्कृतीच्या प्रथांपासून असहमत होण्याच्या प्रक्रियमध्ये गुंतविणे आणि स्वत:च्या तर्कबुध्दि अनुसार नवीन जीवनाची, नवीन अस्तित्वाची कल्पना करणेस सहाय्य करणे."



## ५ क. २.४ अध्ययन वर्तुळे

अध्ययन वर्तुळ म्हणजे अश्रेणीबध्द 'वर्ग' प्रतिमान, जेथे त्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण असणार्या उत्पादक विषयांवर सहभागी व्यक्ती चर्चा करतात. जेथे प्रत्येकाला समान अधिकार आहे अशा लोकतांत्रिक वातावरणाची निर्मिती यामध्ये अंतर्भुत आहे. अशी परिस्थिती हेतू पुरस्सर निर्माण करावी लागते कारण ती नेहमीच नैसर्गिक रित्या निर्माण होत नाही. ह्याचा अर्थ सांस्कृतिक, लिंग व दर्जा संबंधी प्राबल्य संबंध आणि स्तरीकरणास आव्हान देणे.

हा 'चिकित्सक व मुक्तीदायी सवांद' ज्याला 'संस्कृती वर्तुळे' असेही म्हणतात, फ्रेअरेच्या अध्यापनशास्त्राच्या केंद्रस्थ आहे. ह्या वर्तुळामध्ये जवळपास १२ ते २५ विद्यार्थी आणि काही शिक्षक, सर्व संवादामध्ये भाग घेतात. ह्या नागरी शिक्षणामध्ये लोकांमध्ये/ विद्यार्थ्यामध्ये मिसळून संवादामध्ये सहभाग घेण्याची 'शिक्षकांची' भूमिका असते. 'क्रांतीकारी नेतृत्वासाठी अचूक पध्दती म्हणजे' मुक्ततेचा प्रचार नव्हे. तसेच फक्त नेतृत्व दडपलेल्या लोकांमध्ये स्वातंत्र्याची भावना व वि µवास रुजवू शकत नाही. योग्य पध्दती आहे 'संवाद.'

### उत्पादक विषय आणि सांकेतिकीकरण

फ्रेअरे अशिक्षित प्रौढ शेतकऱ्यांबरोबर कार्य करीत असल्याने, त्याचा आग्रह असे की अध्ययन वर्तुळामध्ये बोलण्याचे व समजून घेण्याचे मार्ग ह्या शेतकऱ्यांप्रमाणे असावेत. ह्या वर्तुळामध्ये अध्ययनार्थी त्यांच्या समस्या ओळखून त्यांची गट संवादाद्वारे उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. फ्रेअरे ज्याला 'सांकेतिकीकरण' म्हणतो, जे अध्ययनार्थीच्या दैनंदिन परिस्थितीचे प्रतिनिधित्व करीत, त्यावर संवाद केंद्रित असे. त्यांच्या रुचिनुसार सहभागी व्यक्ती उत्पादक विषयांचा शोध घेत. उत्पादक विषय म्हणजे एखाद्या सांस्कृतिक किंवा राजकीय विषय जो सहभागीसाठी अत्यंत चिंतेचा किंवा महत्त्वाचा असेल व ज्यातून चर्चेची निर्मिती होईल. ह्या उत्पादक विषयांची नंतर सांकेतिकीकरणाच्या स्वरुपात मांडणी होई (शब्द किंवा शब्दसमूह किंवा दृक् प्रतिनिधित्व – चित्त किंवा छायाचित्र). त्यानंतर सहभागी त्यांच्या कल्पनांचे चिकित्सक शोध घेत, त्यांचा वस्तुनिष्ठपणे विचार करीत. समाजामध्ये हस्तक्षेप करुन बदल घडवून आणण्यास त्यामुळे शक्य होत असे.

फ्रेअरे सुरुवातीला साक्षरता अध्ययनाशी संबंधीत राहिला. सांकेतिकीकरणामुळे चालना मिळालेले शब्द, शब्दसमूह, चर्चा अध्ययनार्थी कौशल्यांचा विकास करण्यासाठी वापरत.

अर्थपूर्ण चर्चेतून निर्मित सांकेतिकीकरणातून साक्षरता अध्ययन पध्दती खूपच यशस्वी झाली. तरीही फ्रेअरे आग्रह धरतो की ही प्रक्रिया निव्वळ यांत्रिकपणे वापरु नये तर अध्ययनार्थीची जागृतावस्था सर्जनशीलरित्या जागृत करावी. सांकेतिकीकरण म्हणजे

एखादा शब्द, कविता, चित्र वा छायाचित्र असेल. सांकेतिकीकरणामुळै दैनंदिन परिस्थितीच्या अमूर्ततेचे प्रतिनिधित्व होते. उदा. ऊसाच्या μ◌ोतामध्ये काम करणार्या कामगारांचे छायाचित्र कामगारांना त्यांच्या कामाचे वास्तव व कामाची परिस्थिती यांवर भाष्य करण्यास संधी देते. अधिक अमूर्त स्थितीतून सहभागी व्यक्तीच्या विशिष्ट परिस्थितीचे आकलन होण्यासाठी संवाद त्या दिμ◌ोने वळविता येतो. शिक्षक व अध्ययनार्थी दोघेही शेतकऱ्यांनी ओळखलेल्या समस्यांचे आकलन होण्यासाठी एकत्र काम करीत, फ्रेअरे ह्या प्रक्रियेला 'संकेताचे रुपांतरण' असे संबोधतो आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी कृत्य सुचवित. ह्या वर्तुळांना चार मूलभूत अंगे आहेत –

१) समस्या विचारार्थ मांडणे २) चिकित्सक संवाद ३) समस्येची उकल विचारार्थ मांडणे ४) कृत्याची योजना.

प्रमुख ध्येय समस्या निराकरण असले तरी, त्यांच्या वैयक्तिक व समूह जीवनातील दडपशाही दूर करण्यासाठी जागृती करणे हे देखिल उद्दिष्ट असे.

## ५ क. २.५ अध्यापन साहित्य

अध्ययनार्थीच्या मतांचा किंवा ज्ञानाबद्दल कोणताही विचार न करता किंवा त्यांना गृहीत धरुन चालणारा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम किंवा पाठ्यपुस्तक साधने म्हणून बँकींग शिक्षण प्रतिमान वापरु शकते. फ्रेअरे ह्या पूर्वनिर्धारित योजनांना किंवा पाठ्यपुस्तकांना 'प्राथमिक पुस्तक' असे संबोधतो. पावलो फ्रेअरेला परंपरागत प्राथमिक पुस्तके निरुपयोगी वाटतात. 'इवाने द्राक्ष पाहिले' ह्या विधानाची पुनरावृत्ती व्यक्तीला कशी लाभदायक आहे? ह्या विधानाचा वास्तवाशी अजिबात संबंध नाही. फ्रेअरे म्हणतो, जर विद्यार्थी वस्तुशी विशिष्ट संबंध प्रस्थापित करु शकला नाही तर अध्ययन घडणार नाही.

ह्याचा परिणाम म्हणजे, क्रांतीकारी समाज बांधणीसाठी १९५० मध्ये फ्रेअरेने सांस्कृतिक प्राथमिक पुस्तके लिहिली. प्राथमिक पुस्तके लिहिण्याचा त्याचा मूळ हेतू होता रुपांतर करण्यासाठी मूर्त वास्तव प्रस्तुत करणे. आशय आहे तसा स्वीकारण्यापेक्षा त्यावर हळू हळू नियंत्रण मिळविण्यास विद्यार्थ्याला संधी मिळेल अशा तर्हेने कार्यक्रमाचा आशय प्रस्तुत झाला पाहिजे. अध्यापन साहित्य प्रांतीय किंवा कधी कधी स्थानिक पातळीवर लिहिले जावे. वाचनासाठी अध्यापन साहित्याचे सार्वत्रिकीकरण ही शास्त्रीयदृष्ट्या हास्यास्पद व राजकीय अधिकारवृत्ती आहे. (गोडोट्टी, १९९४).

फ्रेअरिअन सांस्कृतिक वर्तुळे पोलडंवरुन आयात केलेल्या स्लाइड प्रक्षेपकांचा उपयोग करीत असत. ते फ्रेअरेच्या साक्षरता अध्ययन प्रिशक्षणाचे केंद्रीय आकर्षण होते कारण त्यांच्यामुळे अध्ययन वातावरण निर्माण होत असे आणि चिंतनांचा टप्पा विस्तृत करीत असे. (सेयर्स आणि ब्राऊन, १९९३, PP ३२-३३). स्लाईड्स साठी फ्रेअरेने प्रसिध्द चित्रकार फ्रॅान्सिस्को ब्रेनान्डला नेमले. तो सांकेतिक चित्रे बनवीत असे ज्यामध्ये गरीब शेतकऱ्याना आकृत्यांद्वारे त्यांच्या जीवनाची वास्तवता पहाण्यास सहाय्य केले जाई. सांस्कृतिक निर्माण क्षमता मध्ये १० परिस्थितीची रचना केलेली होती ज्यांचा हेतू शेतकऱ्याचे जीवन कसे सांस्कृतिक आहे व नैसर्गिक नाही त्यामुळे ते मनुष्य आहेत

munotes.in

जनावरे नाही हे उघड करण्याचा प्रयत्न केला. फ्रेअरेच्या फिल्म स्लाइड्स शेतकऱ्याच्या घरांच्या भिंतीवर प्रदिशर्त केलेल्या होत्या, त्यांचे विश्लेषण करुन संवाद घडत ज्यांतून अनेक चित्रात्मक घटकांचे विश्लेषण होई. चित्रांतून पूर्व आधूनिक व आधूनिक तंत्रज्ञानाची मालिका व सांस्कृतिक कलावस्तू दशर्विलेल्या असत.

फ्रेअरेच्या स्लाइड्स शेतकऱ्याच्या घरांच्या भिंतीवर प्रदर्शित केलेल्या असत, त्यांतून घडणाऱ्या संवादामध्ये मानवाच्या आंतरिक उत्पादनक्षमतेबद्दल व संप्रेषण क्षमतांबद्दल तसेच आधुनिक तत्रंज्ञान वापरण्याच्या शक्यतांबद्दल चिकित्सक विश्लेषण होई.

## ५ क. २.६ संवाद

पावलो फ्रेअरेचा केंद्रीय विषय आहे संवाद. संवाद हा मानवी प्रवृत्तीचा भाग आहे. शोधासाठी आपल्याला एकमेकांची गरज आहे आणि शोध ही सामाजिक प्रक्रिया आहे व चर्चा त्यातील सिंमेट. त्याला वाटे संवादाचा क्षण म्हणजे परिवर्तनाचा क्षण. लोकांचा संवाद लंबरुप असतो हे फ्रेअरने पाहिले. त्याने त्यास 'बँकींग अध्यापनशास्त्र' असे नाव दिले. शिक्षक ज्ञान जमा करीत असताना अध्ययन करणाऱ्या व्यक्तीस फक्त ऐकायचे असते. हा शिक्षणाचा कथनात्मक प्रकार ज्ञानी व अज्ञानी यांमध्ये विभाजन करतो. प्रेम, आदर आणि सहिष्णूता यांवर आधारित क्षितिज समांतर संबंध म्हणजे संवाद. म्हणजे बँकींग शिक्षण आणि समस्यात्मक शिक्षण ह्या दोन विरुध्द पध्दती आहेत. फ्रेअरे म्हणतो, 'खरा संवाद अस्तित्वात येऊच शकत नाही जोपर्यंत संवादक चिकित्सक विचार करीत नाही ...... असा विचार ज्यांत वास्तव एक प्रक्रिया आहे, एक परिवर्तन आहे, स्थिर कृती नाही.“ (Ibid, 92)

फ्रेअरेसाठी खरा संवाद म्हणजे नागरी शिक्षण. जर नागरी शिक्षणामध्ये त्याचा समावेश नसेल तर दडपलेल्यांसाठी भविष्यात फारच थोडी आशा असेल, फक्त वर्तमानाची अखंडता. ‘अस्सल, खरे शिक्षण ‘अ’ ने ‘ब’ साठी किंवा 'अ' ने 'ब' बद्दल नसून 'अ' ने 'ब' बरोबर असते...”

अशा शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे अनुभव आवµयक असतात, मग त्यांचे वय व परिस्थिती कोणतीही असो.

'तर्कयुक्त हालचाल जी कृत्याकडून चिंतनाकडे व चिंतनाकडून कृत्याकडे जाते ज्यांत नवीन कृत्य असते, ही ज्ञानाची कृती असते.“ (फ्रेअरे १९७२).

'जर लिहिणे व वाचणे शिकणे म्हणजे ज्ञानाचा भाग असेल तर प्रारभांपासूनच अध्ययनार्थीस सर्जनशील कर्त्याची भूमिका स्वीकारावी लागेल. दिलेली मुळाक्षरे, शब्द किंवा शब्दसमूह पाठ करुन त्यांची पुनरावृत्ती करणे म्हणजे शिक्षण नव्हे तर वाचन व लिहिणे प्रक्रियेवर चिकित्सक चिंतन करणे व भाषेच्या प्रचंड महत्त्वावर चिंतन करणे.“ (फ्रेअरे १९८५). स्वत:स दडपणापासून मुक्त करण्यासाठी ही शक्ती वापरणे. दडपण झुगारुन देण्यासाठी हे अध्यापनशास्त्र, फ्रेअरे म्हणतो, 'लोकांबरोबर घट्ट बसविले पाहिजे, लोकांसाठी नाही.” (१९७०, ८८) ते बालक असो की प्रौढ. फ्रेअरेचे बहुतेक कार्य दक्षिण अमेरिकेतील प्रौढ शेतकऱ्यासह होते पण त्याची उपयुक्तता शाळा व शालेय



munotes.in

वयाच्या बालकांसाठीही आहे. हे अध्यापन शास्त्र सर्वांसाठी आहे, फ्रेअरे दडपलेले व दडपणारे दोहोंचा समावेश करतो.

काही प्रथा व नीतीतत्वांवर प्रश्न उठवतानाच त्यांच्या संस्कृतीचे मूल्य राष्ट्राच्या युवकांनी जाणावे मग ते विद्यार्थी असो वा प्रौढ शेतकरी असे फ्रेअरेला वाटे. फ्रेअरेने त्यास 'शब्द वाचणे' असे संबोधले – साक्षरतेचा अंतकरण्यातील आणि 'जग वाचणे' – विशेषत: मर्यादित लोकांच्या जीवनातील संधींवर प्रभाव करणार्या सामाजिक व राजकीय परिस्थितींचे विश्लेषण करण्याची क्षमता. फ्रेअरेसाठी फक्त प्रश्न पुरेसे नाही लोकांनी कृत्य करणेही आवश्यक आहे.

मुक्तता, म्हणजे ‘Praxis. पण त्यात फक्त कृत्य असू शकत नाही, ज्यास फ्रेअरे 'कृतीवाद' संबोधतो. कृत्य गंभीर चिंतनासह सांगड घालून असावे (Ibid, 79,65). जे सर्व एकाच जाणीवेच्या व कृत्याच्या स्थानावर असतात त्यांच्यामध्ये संवाद घडताना चिंतन किंवा चिंतनात्मक सहभाग घडून येतो.

म्हणून दडपणातील लोक जुलुमावर मात करण्यासाठी त्यांचे स्वत:चे अनुभव उपयोगात आणतात. स्वत:ची दडपणातील स्थिती स्पष्ट करण्यासाठी ते कोणावरच, शिक्षकावर देखिल अवलंबून रहात नाही. ’संवादामुळे विद्यार्थ्यांचा शिक्षक आणि शिक्षकाचे विद्यार्थी असे अस्तित्व संपुष्टात येते आणि नवीन संज्ञेचा उदय होतो, शिक्षक – विद्यार्थी विद्यार्थी-शिक्षकांबरोबर.“ भूमिकांचा परस्पर संबंध म्हणजे जसे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवितात तसे विद्यार्थी शिक्षकांना शिकवितात. संवाद प्रत्येकाला शिकविण्यास व एकत्र निर्मिती करण्यास प्रोत्साहित करतो.

**तुमची प्रगती तपासा –**

पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा: -

१. बँकींग शिक्षण म्हणजे काय?

२. टिपा लिहा: -

अ) अध्ययन वर्तुळे

आ) संवाद

इ)समस्या विचारार्थ मांडणे प्रतिमान

ई)सांकेतिकिकरण

३. कारणे लिहा: -

अ) जुलूम सुरु ठेवण्यामध्ये शैक्षणिक प्रणालीने केंद्रीय भूमिका निभावली असे फ्रेअरेला वाटते.

आ) बँकींग शिक्षण आराखड्यामध्ये चिकित्सक विचार शक्य नाही.

इ) पावलो फ्रेअरेस परंपरागत प्राथमिक पुस्तकांचा उपयोग वाटला नाही.

ई) क्षितीज समांतर व लंबरुप संवादात फरक आहे.

उ) फ्रेअरेच्या सांस्कृतिक वर्तुळांमध्ये स्लाइड प्रक्षेपक वापरला जाई.

## ५ क. २.७ राष्ट्रीय साक्षरता कार्यक्रमाचे नेतृत्व

१९६२ मध्ये, रेसिफेच्या महापौरांनी फ्रेअरेला शहरातील प्रौढ साक्षरता कार्यक्रमाचा प्रमुख नेमले. त्याच्या पहिल्या प्रयोगामध्ये फ्रेअरेने ४५ दिवसांमध्ये ३०० प्रौढांना लिहायला व वाचायला शिकविले. हा कार्यक्रम इतका यशस्वी झाला की पुढच्याच वर्षी ब्रझीलच्या अध्यक्षांनी फ्रेअरेला राष्ट्रीय साक्षरता कार्यक्रमांचे नेतृत्व बहाल केले. १९६४ मध्ये दोन दशलक्ष प्रवेशांसह हा कार्यक्रम देखिल यशाच्या वाटेवर होता. परंतु ब्रझीलच्या संविधाना नुसार अशिक्षितांना मतदानाचा अधिकार नव्हता. ओ ग्लोब ह्या प्रभावी परंपरावादी वृत्तपत्राने फ्रेअरेच्या साक्षरता पध्दती लोकांमध्ये असंतोष निर्माण करीत आहेत, त्यांना समाज परिवर्तनास व विध्वंसास प्रोत्साहन देत आहेत असे जाहीर केले. १९६४ मध्ये, लष्कराने सरकारचा पाडाव केला आणि फ्रेअरेला ७० दिवस कैद झाली, व पुढे पाच वर्षे बोलिविया व चिलीमध्ये हद्दपारी झाली.

पावलो आणि त्याच्या शिक्षकांच्या गटास दुहेरी काम होते: प्रौढांसाठी प्रभावी साक्षरता पध्दती विकसित करणे आणि ब्रझीलियन कामगारांची जागृतावस्था वृध्दिंगत करणे. त्यांच्या लक्षात आले की कामगार प्रारब्धवादी होते, समाजातील त्यांच्या परिस्थितीप्रति उदासीन होते व समजत की ही परिस्थिती बदलणे अशक्य आहे.

चिलीमध्ये राजकीय हद्दपारी दरम्यान १९६९ मध्ये पावलो फ्रेअरेने 'दडपलेल्यांचे अध्यापनशास्त्र' ह्या पुस्तकात त्याच्या पध्दतीबद्दल लिहिले. ह्या व इतर पुस्तकांमध्ये, फ्रेअरेने त्याच्या पध्दतीचा सिध्दांत लोकप्रिय शिक्षक म्हणून मांडला. कार्याचे तत्वज्ञान संकल्पना, सर्वसाधारण निदशर्क ह्या बद्दल ह्या पुस्तकांत लिहिले आहे, वर्गातील पध्दती, प्रकरणे, उपक्रम याबद्दल नाही. कारण प्रत्येक अध्ययनार्थीच्या गटाबरोबरचा प्रात्यक्षिक अनुभव वेगळा असतो.

पावलो फ्रेअरेची पध्दती कार्यवाहीत आणण्यासाठी आयती तयार सूत्रे नसल्यामुळे अनेक शिक्षकांसाठी ती मोठी अडचण ठरते. फक्त शिक्षक ज्ञानदाता, ज्ञानाचा प्रवाह आणि विद्यार्थी ज्ञान ग्रहण करणारा ह्या शैक्षणिक प्रक्रियांच्या परंपरागत प्रक्रियांतून त्यांनी स्वत:ला मुक्त करावयास हवे, आणि हे शिकण्याचा एकच मार्ग म्हणजे सराव.

शिक्षकांनी फ्रेअरेच्या पध्दतींचा उपयोग केला तरच त्यावर प्रभुत्व मिळविता येईल. सिध्दांत व आचरण वेगळे करता येत नाही: सिध्दांत हा सरावाचाच क्षण आहे; आचरणातूनच सिध्दांत जन्म घेतो, चालरीत बदलणे व पुन:मांडणी करणे सिध्दांत करतो.

**ह्या पध्दतीचा सर्वांत महत्त्वाचा नियम आहे: -**

अध्ययन प्रक्रियेमध्ये अध्ययनार्थी कर्ता आहे आणि एखादी वस्तू किंवा कर्म नाही – कारण त्यांना त्यांच्या प्रारब्धाचे कर्ता असणे आवश्यक आहे.

अध्ययन प्रक्रियेमध्ये शिक्षक आणि अध्ययनार्थी समान सहभागी असतात. शिक्षक आणि अध्ययनार्थी ह्यातील सततच्या संवादाद्वारे ही प्रक्रिया विकसित होते.

## ५ क. २.८ पावलो फ्रेअरेची पध्दती

- सहभागी व्यक्तीं जगत असलेली परिस्थिती पहाणे.
- ह्या परिस्थितीचे विµलेषण करणे, मूळ कारणांचे विµलेषण (सामाजिक – आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी)
- सामाजिक न्यायाचे नियम पाळून ही परिस्थिती बदलण्यासाठी कृती करणे.

**पावलो फ्रेअरेची सविस्तर पध्दती: -**

'समस्याकरण"

**समस्या शोधन (उत्पादक विषय)**

- सहभागी व्यक्तींचे संशोधन – सहभागीबद्दल, त्यांच्या कामाबद्दल व जीवनाबद्दल परिचय
- त्यांना प्रभावित करणार्या मुद्द्याविषयी तथ्ये व पार्श्वभूमी मिळविणे.
- ज्या जगात आपण एकत्र राहतो त्याची समज / वाचन.

**संकेत तयार करणे (सांकेतिकीकरण)**

- उत्पादक विषय पकडण्यासाठी प्रातिनिधिक साहित्य निर्मिती (चित्र, विडिओ, छायाचित्र, कठपुतळीबाहुल्यांचा खेळ, ध्वनिमुद्रण इ.)
- बहुतेक किंवा सर्व उत्पादक विषयांचा समावेश असलेले नाटयप्रयोग निर्मिती
- तुमच्या कल्पना काय आहेत?

**तीन पायर्यांची उद्गामी विचार प्रक्रिया : -**

**अ) सहभागी व्यक्ती जशी अनुभवतात तशी परिस्थिती पहाणे**

- संकेतामध्ये दशर्विलेल्या परिस्थितीचे वर्णन करा.
- त्या परिस्थितीतील समस्यांची व्याख्या करा.
- सहभागी व्यक्ती व समस्या यांमध्ये सांगड घाला.

**ब) परिस्थितीचे विश्लेषण (समस्या वृक्ष)**

- असे का घडले?
- हे कशाप्रकारे चिरस्थायी होईल?
- ह्या समस्येची मूळ कारणे व तात्काळ परिणाम काय आहेत?

  (सामाजिक – आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक)

**क) परिस्थिती बदलण्यासाठी कृती करणे**

- नजिकच्या काळातील कृती (पुढील ३ दिवस, ३ महिने: समस्या वृक्षाच्या एखाद्या पर्णास प्रभावित करणारी)
- दूरगामी कृती (पुढील ३ महिने, ३ वर्षे: समस्या वृक्षाच्या एखाद्या स्त्रोतमूळास प्रभावित करणारी)

ह्या पध्दतीच्या तीन मूलभूत पायर्या आहेत:

पहाणे, विμलेषण करणे, कृती करणे.

सहभागी व्यक्तींच्या परिस्थितीतील बदलांच्या अनुभवांचा आढावा घेऊन ह्यांची पुनरावृत्ती केली जाते.

## ५ क. ३ सारांश

पावलो फ्रेअरेस बर्याचदा मानवतावादी म्हणून संबोधले जाते. मूर्त संदर्भातच शिक्षणाची उकल सापडते असा विश्वास असलेला तो एक लढाऊ शिक्षक होता. विद्यार्थ्यांना विचारायला हवे की त्यांना काय शिकायचे आहे. सहकार्य, युती, ऐक्य व सांस्कृतिक संश्लेषण असणे आवश्यक आहे. शिक्षकाने विद्यार्थ्यात अवाजवी हस्तक्षेप करु नये व त्यास त्याच्या नशीबावरही सोडू नये. त्याने विद्यार्थ्यांना काम व अभ्यास देऊन मार्गदशर्न करावे, विद्यार्थ्यांना आज्ञा देऊ नये. तो विश्वास ठेवता की मुक्तीदायी शिक्षक विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रवृत्त करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे जग बदलण्याची संधी मिळते व ते चांगले मानव बनतात. माहिती संकीर्ण असली तरीही संप्रेषण सहज सुलभ असावे. सुलभीकरणामुळे विद्यार्थ्यांना समजणे सुसाध्य होते.

## ५ क. ४ प्रश्नावली

पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा –

१. फ्रेअरेच्या पध्दतीचे वर्णन करा.

२. फ्रेअरेच्या शिक्षक गटास दुहेरी काम का असे?

३. लोकप्रिय शिक्षक म्हणजे काय?

४. फ्रेअरेच्या शिक्षणाच्या तत्वज्ञानाचे चिकित्सक मूल्यमापन करा.

❖❖❖❖

munotes.in

# ६

# उत्तर आधुनिकीकरण आणि शिक्षण

**विभाग रचना**

६.० उद्देश

६.१ परिचय : उत्तर आधुनिकीकरणाची संकल्पना

६.२ उत्तर आधुनिक युगातील शिक्षण

६.३ उत्तर आधुनिक युगातील शैक्षणिक आव्हाने

६.४ सारांश

६.५ तुमची प्रगती तपासा

६.६. संदर्भ

## ६.० उद्देश

हा विभाग वाचल्यानंतर विद्यार्थ्याला पुढील गोष्टी शक्य होतील.

१) उत्तर आधुनिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे.

२) आधुनिक शिक्षण व उत्तर आधुनिक शिक्षण यामधील फरक स्पष्ट करणे.

३) उत्तर आधुनिक शिक्षणाचे शैक्षणिक परिणाम वर्णन करणे.

४) उत्तर आधुनिक युगाच्या शैक्षणिक आव्हानांची यादी करणे.

## ६.१ उत्तर आधुनिकीकरणाचा परिचय

आधुनिक काळ हा साधारणत: इसवी सणाच्या १६ व्या शतकापासून ते २० व्या शतकाच्या मध्यापर्यंतचा म्हणजेच साधारणत: मागील ४०० वर्षांचा काळ आहे. हा काळ वैज्ञानिक कारणातील दृढ आत्मविश्वासाने अधोरेखित झाला आहे. वैज्ञानिक पद्धतीतून मिळवलेले ज्ञान हे ज्ञानाच्या इतर स्वरुपांपेक्षा अधिक विश्वसनीय आणि उच्च मानले गेले आहे.

उत्तर आधुनिक विचारवंतांद्वारा आधुनिक काळ हा पुढील वैशिष्ट्यांनी अधोरेखित झाला आहे. तर्कशुद्धता, द्वैतवाद, पूर्ण ज्ञानासाठीचा शोध, प्रगतीशील विश्वास, विज्ञानाला दिल्या गेलेल्या स्थानाचा अभिमान, संस्कृती व देशांचे केंद्र- परीघ विभाजन.

उत्तर आधुनिकता वाद म्हणजे प्रस्थापित आधुनिकतावादाची कट्टर तत्त्वे व पद्धतींच्या प्रतिक्रिया म्हणून किंवा नकार म्हणून १९७० च्या दशकात विकसित झालेल्या कला व साहित्यातील खूप साऱ्या रूढी किंवा चळवळी विशेषत: स्थापत्यशास्त्रातील चळवळ



munotes.in

आणि आंतरराष्ट्रीयशैलीचा प्रभाव आपण ऐतिहासिक औपाच्रिक शैली व बऱ्याचदा खेळकर भ्रम आणि सजावट व जटिलता यापासूनच्या घटकांच्या वापरला उत्तेजन देणे होय.

उत्तर आधुनिकतावाद ही एक संकल्पना आहे जी साधारणत: १९८० च्या दशकाच्या मध्याच्या आसपास शैक्षणिक अभाय्साचे क्षेत्र म्हणून उद्भवले ही एक विस्तृत अशी वैविध्यपूर्ण संकल्पना आहे. ज्यात स्थापत्य शास्त्र, संगीत साहित्य, फॅशन, तंत्रज्ञान, चित्रपट इत्यादींचा समावेश होतो.१९८० च्या दशकात राजकीय वातावरण बदलले या काळात उत्तर आधुनिकतावादात संस्कृती, व्यक्तीत्व, इतिहास आणि भाषा आधुनिक समाजाचा मुलागणी पुनअंदाज सामावतो. तो काळे किंवा गोरे, सरळ किंवा समलिंगी, पुरुष किंवा स्त्री  इत्यादींसारख्या वर्गीकरणाच्या अर्थावर हल्ला करतो.

उत्तर आधुनिकतावाद  हा वास्तुकलेसह सुरु झाला. ते आदर्श परिपूर्णता स्वरूप व कार्याचा सुसंवाद व दागिन्यांचे पुनरागमन यावर केंद्रित होते. आधुनिकतावादी चळवळींचे कार्यात्मक व औपचारिक आकार यांचा जागा सौंदर्य विषयक, खेळकरपणा, असामान्य पृष्ठभाग व दिखाऊ शैलीने घेतली.

उत्तर आधुनिकतावाद वाद ही आज वेगवेगळ्या विषयातील खूप वापरली गेलेली व अति वापरली गेलेली सुद्धा अशी संज्ञा तिची व्याख्या करणे कठीण आहे. कारण ती काही खरोखर एक शिक्षण नाही. परंतु एक विशिष्ट प्रकारची संवेदना आहे, वस्तूंकडे बघण्याचा एक मार्ग आहे, ज्याने साहित्य, कला, स्थापत्यकला, धार्मिक लिखाण आणि नैतिक व सामाजिक सराव व प्राधान्य यातील शैलींना प्रभावित केले आहे.

जरा गोंधळात टाकणाऱ्या या स्थितीच्या स्पष्टीकरणासाठी हे समजीन घेणे फायदेशीर होईल की उत्तर आधुनिकता वाद हा समकालीन लिखाणात ४ भिन्न अर्थांनी वापरला जातो.

१) समाजातील घडामोडींची स्थिती म्हणजेच एक विशिष्ट समाज हा वस्तुत: कसा आहे व तो कसा कार्य करतो.

२) कलेतील शैली जसे जेव्हा आपण एक उत्तरआधुनिक इमारत किंवा चित्राविषयी बोलतो.

३) आधुनिक काळातील समाज कसा होता त्यापेक्षा वेगळा असा आजच्या समाजाचा कोणताही पैलू दर्शविण्यासाठी वरचेवर वापरली जाणारी संज्ञा.

४) अशा कल्पना आणि सिद्धांत जे समाजाची ही नवीन स्थिती आणि वस्तूच्या संघटनाचे तिचे मार्ग समजण्यासाठी किंवा स्पष्ट करण्यासाठी प्रयत्न करतात.

काही लोक उत्तर आधुनिकता या संज्ञेचा वापर आजच्या समाजाची स्थिती दर्शविण्याकरता करतात आणि उत्तर आधुनिकतावाद या शब्दाचा वापर आजची वैशिष्यपूर्ण अशी विचारसरणी किंवा तत्त्वज्ञान म्हणून करतात. इतर लोक उत्तर आधुनिकता वाद या संज्ञेचा वापर दोन्ही अर्थाने करतात.

munotes.in

## ६.२ उत्तर आधुनिक युगातील शिक्षण

### शिक्षणाचा उद्देश

१) शिक्षणाने विद्यार्थ्यांना त्यांच्या संस्कृतीच्या संदर्भात वैविध्यपूर्णव व्यक्तीमत्व उपयोगी मूल्यांच्या बांधणीत मदत करायला हवी.

२) शिक्षणाने व्यक्तीला बहुआयामी ओळख दर्शविणाऱ्या पद्धतीत स्वातंत्र व उत्पादनक्षम नागरिक बनण्यास सहकार्य करायला हवे.

३) शिक्षण हे व्यक्तीला त्याची ओळख शोधण्याऐवजी ती निर्माण करण्यास मदत करते.

४) शिक्षणाचे ध्येय म्हणजे लोकांना त्यांचे इच्छित ध्येये प्राप्त करण्यास सक्षम करणे आहे आणि तदनंतरच व्यक्तींची व समाजाची प्रगती शक्य आहे.

५) शिक्षण हे गत व व्यक्तींना टिकविणाऱ्या जीवनाच्या वेगवेगळ्या सांस्कृतिक स्वरूपाच्या मूलगामी विविधता आणि संभाव्य अतुलनीयता यांच्या वाढत्या जागरूकतेचे ध्येय ठेवते.

### अभ्यासक्रम

१) विद्यार्थी व शिक्षक या दोहोंद्वारा एक 'प्रयत्नप्रसाद' दृष्टीकोण हा अध्ययन केल्या जाणाऱ्या सामग्रीच्या तसेच अध्ययन घडून येत असलेल्या संदर्भाच्या सततच्या पुनर्व्यवस्थापन खात्री देतो.

२) एक अभ्यासक्रम जो एखाद्या विशिष्ट नमुन्याकडे नेत नाही.

३) त्यामध्ये शिकविण्याची महत्त्वाची मुल्ये समाविष्ट आहेत जी पुढीलप्रमाणे :

- **वैविध्यतेसाठी प्रयत्नशील –** याचा अर्थ असा नव्हे की विद्यार्थी कुठलीही प्रश्न केल्याविना सांस्कृतिक कृती आंधळेपणाने स्विकारतील.

- **सहिष्णुता –** इतर लोकांच्या भिन्न दृष्टिकोनांचा मतांचा स्वीकार आणि ही भिन्न मते असणाऱ्या लोकांप्रती निष्पक्षता.

- **स्वातंत्र्य –** शिक्षक (वर्गातील स्थानिक क्रिया) आणि विद्यार्थी (त्यांच्या निर्णय घेण्याच्या संदर्भात) या दोघांना पुरेशी स्वायत्तता दिली जाते.

- **सृजनशीलता –** नवनवीन व असला कल्पना व वस्तूंच्या विकासासाठी कल्पनाशक्तीच्या वापराची क्षमता.

- **भावना –** एखाद्या विशिष्ट वस्तूप्रती प्रत्यक्षपणे एक तीव्र भावना व्यक्त करणे ज्यासोबत शरिरात तत्त्वज्ञानविषयक बदल घडून येतात.

- **अंतर्ज्ञान –** तात्काळ अनुभूती किंवा एक जाणीव जी व्यक्तीला एका विशिष्ट मार्गाने, त्या मार्गाचे पूर्ण आकलन झाल्याविना, कृती करण्यास मार्गदर्शन करते.



munotes.in

**डॉलची प्रतिकृती : वैशिष्ट्ये**

- ही परावर्तन (चिंतन) संकल्पनेवर जोर देते.
- अध्ययन व आकलन हे संवाद व चिंतन-मननद्वारे होते.
- अभ्यासक्रम ही काय ज्ञात आहे ते हस्तांतरित करण्याची प्रक्रिया असून काय अज्ञात आहे त्याचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे.
- स्वसंघटन व अर्थाच्या नवनिर्मितीवर जोर देते.
- त्यामध्ये समृद्धी, पुनरावृत्ती, संबंध आणि अविचलता असावयास हवी.

१. **समृद्धी –** ही अभ्यासक्रमाची खोली (ग्रहनता), त्याचे बनविण्याचे स्तर व त्याच्या बहुविध शक्यता किंवा अर्थ यांच्याशी संबंधित आहे.

२. **पुनरावृत्ती –** याचा संबंध एखाद्या कल्पनेच्या पुनरावृत्तीशी परंतु उच्च व नवीन पातळीशी आहे. उदाहरण – चक्राकार अभ्यासक्रम.

३. **संबंध –** यात एखादी व्यक्ती त्याच्या पाठाचा त्याच्या स्वत:च्या अध्यापनशास्त्र व संस्कृतीशी कसा संबंध जोडू शकते याचा संदर्भ आहे.

४. **अविचलता –** एखादी गोष्ट करण्यातील अचूक क कडक माणकांचे उपयोजन म्हणजे अविचलता.

**उत्तर आधुनिक शैक्षणिक ध्येये आणि सुजान्शिलातेशी त्यांचा संबंध**

उत्तर आधुनिक शैक्षणिक ध्येये ही निश्चित केली जात नाहीत आणि ती शैक्षणिक प्रक्रियेत प्रकट होतात. ही ध्येये अध्ययन वातावरणातून निर्माण होतात आणि टप्प्याटप्प्यांनी तयार केली जातात. या परिचयासह आपण उत्तरआधुनिक शिक्षणासाठी या ध्येयांना मानू शकतो.

**टिकात्मक विचार शिकवणे**

विचार करणे व टीका करणे यावरील जोराचा खूप जुना इतिहास असला तरी उत्तर आधुनिक चिकाटीच्या सध्याच्या शिक्षणावर गहन प्रभाव आहे. कार (१९९८:२०४) लिहितात :

“विचार करणे शिकवणे हे प्लेटोपासून सर्वात महत्वाच्या शैक्षणिक धेयांपैकी एक राहिलेले आहे. कॉन्ट, देवे, शेफलर यासारख्या विविध तत्त्ववेत्यांनी त्यावर जोर दिलेला आहे. परंतु अलीकडील दोन दशकात टिकात्मक (समीक्षरणात्मक) विचारसरणीप्रती विशेष लक्ष आपण बघू शकतो. टिकात्मक विचारसरणी म्हणजे विश्लेषण व समर्थन विचारण्याची व उत्तर देण्याची प्रक्रिया. अशा प्रकारे ती परंपरा व सार्वजनिक विचारसरणीला आव्हान देऊ शकते.” गिरॉक्स प्रतिपादन करतात की गतकाळात शाळेची भूमिका ही फक्त असमीक्षणात्मक मानसिकता शिकविण्याची व जे समाजात आहे ते पुन्हा निर्मित

करण्याची होती. परंतु गिरॉक्स विचार करतात की ज्ञान ज्या मार्गाने तयार झाले व प्रकट झाले त्याविषयी समीक्षणात्मकरित्या विचार करणे आपल्यासाठी आवश्यक आहे. आपण फक्त बघ्याची भूमिका घेणे गिरॉक्स यांना मान्य नाही. त्यांच्या कल्पना ह्या टिकात्मक एक प्रकार आहे. ज्या कृतींना लक्षात घेतात : हॉफनफेल २००५

ज्यामध्ये तो केंद्रबिंदू आहे त्यामध्ये त्याने मूळ रुजवले आहे. जे पद्धतींची वैशिष्ट्ये आणि उत्तरआधुनिकतावाद नेतृत्व प्रतिकृतींच्या सैद्धांतिक आधारावर केंद्रित आहे. अनौपचारिक तर्कशास्त्र किंवा टिकात्मक विचारसरणी ही स्पष्टीकरण आणि अध्यापनशास्त्रीय धोरणे बाहेर काढते जे तुर्काच्या पारंपारिक भूमिकेपासून वाढ करतात आणि त्याचा उद्वेश म्हणजे अर्थपूर्ण विचार प्रक्रियेला आधार देण्यासाठीचे एक तंत्र असा आहे. शैक्षणिक नेत्यांसाठी संज्ञानात्मक (आकलनात्मक) उपाय आणि बौद्धिक तयारी ने शिक्षण ज्या क्रमाने विस्तार पावत आहे त्याला प्रतिसाद द्यायला हवा. शिक्षणातील विविध कलांवर विचार करता ज्यामध्ये औपचारिक आणि अनौपचारिक तर्काच्या घटकांशिवाय विकासात्मक व संज्ञानात्मक मानसशास्त्र, अभ्यासक्रम सिद्धांत, समस्या निराकरण आणि साधनांचा वापर करण्याच्या अनुभवांचा अंतर्भाव असणाऱ्या पद्धती यातील काळ सुद्धा सामावतात, याची परिणती सध्याचे विषय साहित्य विशेषत: के.जी. ते बारा वर्षापर्यंतच्या शाळा तसेच अध्यापन व अध्ययनाच्या सर्व समावेशक शोधाचे ज्ञान यांच्या एकीकरणासाठी योग्य असलेल्या कमीत कमी पात्रता शैक्षणिक नेत्यांमध्ये झाली आहे. टिकात्मक विचारसरणी ही शैक्षणिक सुधारणांची अपुर्णतेशी समान धरली जाऊ शकते. अध्यापनकृती, धोरणे आणि पद्धती तसेच नेतृत्व हे सर्वसाधारणपणे तयारी कार्यक्रम, नेतृत्व तत्त्वज्ञान, अध्यापन तत्त्वज्ञान, संवाद किंवा लेखन यांच्यामध्येच अडकून राहिलेले आहे; आणि साधारणत: ते सक्षम शैक्षणिक नेते व शिक्षकांच्या संदर्भात शिस्तबद्ध शिक्षणाची अभेद्यता नसल्यास राजकीय अखंडतेला चिकटते.

**ज्ञानाची निर्मिती**

लीओटार्ड आधुनिक संस्थांवर टीका करतात आणि मानतात की विज्ञान व ज्ञानाच्या प्रगतीसाठी आपण नवीन नियम शोधून काढण्यासाठी नवीन व्याख्याने व नवीन चर्चांचा वापर करायला हवा. या मार्गाने सर्जनशीलता प्रकट होईल. त्यांच्या मते सर्जनशीलतेसाठी आपण निर्धारित संभाषणे थांबवायला हवी.

त्यांच्यानुसार भाषिक खेळाचे स्वरूप व विशिष्ट नियम मागणी करतात की लोक हे स्वत: ज्ञान निर्माण करायचा व नवीन गोष्टी शोधायचा प्रयत्न करतात. ते मानतात की याची भूमिका म्हणजे फक्त ज्ञान निर्माण करणे. ज्ञानाची व नवीन विचारांच्या निर्मितीला ते भर देतात. या लेखाच्या आधीच्या भागात या विषयाविषयी चर्चा झाली आहे. क्लाईव्ह बेक विचार करतात की वर्गातील शिक्षणाचे ध्येय म्हणजे ज्ञानाची निर्मिती आहे. म्हणून वैज्ञानिक पद्धती आणि संशोधनाला सर्जनशील ज्ञानाचा भाग बनवले गेले आहे.

munotes.in

गिरॉक्स (२००३) मानतात की प्रत्येक विचार आणि तत्त्वज्ञान जे मानवी, सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांची काळजी करत नाही, ते अपयशी ठरतात. तसेच ते सीमा अध्यापनशास्त्र याचा उल्लेख करतात. गिरॉक्स त्यांचे पुस्तक 'उत्तर आधुनिक शिक्षण यामध्ये सीमा अध्यापन शास्त्राची सखोल तपासणी करतात. ते या संकल्पनेची इतर शिर्षकांसह असे 'प्रति, मजकूर' ;प्रति स्मरणशक्ती' आणि 'मतभेदाचे राजकारण' चर्चा करतात. या संकल्पनांचा अर्थ म्हणजे सीमा अध्यापनशास्त्र हे विद्यार्थ्यांना संस्कृती आणि संदर्भ किंवा वेगवेगळे मजकूर यांच्याशी परिचित करण्यास आणि त्यांच्याकडे समीक्षणात्मक पद्धतीने बघण्यास सक्षम करतात. विद्यार्थ्यांनी त्यांचा स्वत:चा इतिहास आणि कथा बनवायचा प्रयत्न करायला हवा आणि त्यांनी स्वत:ला एका विशिष्ट संदर्भात सिमित करू नये. त्यांच्या पुर्वजांपासून टिकून राहिलेल्या सर्व गोष्टी त्यांनी स्वीकारु नये आणि शक्ती संबंधाचा शोध घ्यावा. त्ये ज्ञान आणि शक्तीमधील संबंधावर टीका करतात आणि त्यांच्या सीमा स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. (गिरॉक्स, १९९१ पण नं ११८ ते १३२) हिर्ष (१९६८) मुख्य कार्य असायला हवे. आपल्याजवळ संस्कृतीचा अशिक्षितपणा आहे कारण आपण तंत्रज्ञान आणि व्यवसायाच्या उच्च पातळीत आहोत परंतु आपण अजूनसुद्धा समाजाच्या  सांस्कृतिक मुद्द्यांशी अपरिचित आहोत.

रोर्टी (१९८९) मानतात की शिक्षणाच्या उच्च स्थरावर स्वनिर्मिती ही अधिक व्यावहारिक आहे कारण लोक हे सामाजीकतेकडून वैयक्तिकपणा कडे जात आहेत. या पातळीवर व्यक्तिगत विश्वास हा नवीन निर्मितीसाठी जागरूक आणि ते विचार करतात की प्रत्येक गोष्ट जी वास्तविकता आहे ती बदलली जाऊ शकते व पुन्हा नवीन बनवली जाऊ शकते. याप्रकारे ते स्वत:चे वर्णन पुन्हा करतात आणि स्वनिर्मिती सुरु करतात. याउलट डिलीव्हस च्या कल्पनेतील 'बनवण्याची' संकल्पना जी 'रायझोम' (दुय्यम मूळ) शी निगडीत आहे. ती पेशिनिर्मितीचे चिन्ह आहे. रायझोम म्हणजे दुय्यम मुळे आणि मुख्य मुळांप्रमाणे त्यांना निश्चित व स्पष्ट मार्ग नसतो. ते विचार करतात की झाड हे 'असण्याचे' चिन्ह आहे आणि 'रायझोम' हे बनण्याचे चिन्ह आहे. (सेमेट्स की २००५) रायझोम ही अशी व्यवस्था दर्शविते जी निश्चित नियम पाळत नाही. ही पद्धत मुक्त नैकरेषीय आहे. रायझोम हे बहुलता वादाचे निर्देशक आहे आणि ते कुठलीही स्थिरता स्वीकारत नाही. 'बनणे' हे खूप महत्वाचे आहे आणि डिलीव्हस प्रतिपादन करतात की याशिवाय विचार करणे अशक्य आहे. त्यांच्या मते विचार करणे हा इतरांपेक्षा वेगळे असण्याचा परिणाम आहे.

वस्तुत: दुसऱ्या कशात रुपांतरीत होणे हे विचार करण्याचे कारण आहे. काही बनवण्याची क्षमता नसलेल्या अस्तित्वांजवळ खरे पाहता विचार करण्याची क्षमता नसते. उदा. वनस्पती, प्राणी वस्तू या विचार करू शकत नाहीत आणि नेहमीच रेषीय मार्गाने चालतात. म्हणून 'दुसरे काहीतरी बनणे' ही विचार करण्याची प्राथमिक अट आहे. (गिल्सो – २००७) डिलीव्हस मानतात की विचार करणे हे सुजानशीलतेत अत्यंत महत्वाचे आहे. ते सर्व अभ्यासक्रम व क्षेत्रात विश्वास ठेवतात की विचार करण्याने आपण सृजनशील बनू शकतो. त्यांचा तत्त्वज्ञानाप्रति विशेष दृष्टीकोण आहे, कारण त्यांच्या मते

तत्त्वज्ञान हे बौद्धिक ज्ञान आहे. डिलीव्हससाठी संकल्पना ह्या तत्त्वज्ञानाची मुख्य साधने आहे आणि तत्वज्ञान हे वस्तुत: निर्मित शोध आणि संकल्पना वापरण्याची कलाआहे. ह्या त्यांच्या स्वत:च्या पुनर्निमितीकडे लक्ष देत नाहीत, त्यांचे वेगवेगळे प्रकार, स्वरूपे आहेत. तत्त्वज्ञान हे जगाशी संबंधातील संकल्पना बनवितात; या प्रकारे ते सृजनशीलता वापरतात. सर्व संकल्पना ह्या समस्यांशी निगडीत असतात आणि त्या त्यांच्या शिवायसुद्धा राहू शकतात. तसेच त्या एकमेकांशी सततच्या संबंधात असतात. काही संकल्पना ह्या जगाचे अधिक चांगले स्पष्टीकरण देणारे असल्याने इतरांपेक्षा उत्कृष्ट असतात.

### अध्यापनाच्या प्रक्रियेतील शिक्षकाची भूमिका

अध्ययन आणि सर्जनशील अध्यापन-अध्ययन प्रक्रियेतील प्रवेश हे शैक्षणिक पद्धतीतील सर्वात महत्वाच्या कार्यांपैकी एक आहे. या प्रक्रियेत अध्यापन व अध्ययनाच्या पद्धती या मुख्य चर्चेच्या बाबी आहेत. उत्तर आधुनिकतावादाचा या प्रक्रियेशी विशेष दृष्टीकोण आहे. गिरॉक्स (२००२) मानतात की माहिती बँकांपासून विद्यार्थ्यांच्या जाणीवेतील संबंधित वाढीमुळे शिक्षकाची भूमिका ‘कसे शिकवावे’ ही असायला हवी. होल्सस (१९९५) हे अध्यापन प्रक्रियेत शिक्षक विद्यार्थ्यांमधील संबंध सुधारण्यातील मुख्य अट म्हणजे विद्यार्थ्यांसोबत समीक्षरणात्मक भाषणे. ज्ञानाच्या हस्तांतरणाऐवजी शिक्षकाचा जोर हा विश्लेषण व समर्थनावर असतो.

गिरॉक्स लिहितात : “जर शिक्षकांना ते ज्याविषयी शिकवीत आहे त्याविषयी गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात सक्रीय भूमिका घ्यायची इच्छा असेल तर ते कसे शिकवतील आणि ते ज्यासाठी प्रयत्नशील आहे असे मोठी ध्येये कसे प्राप्त करतील. याचाच अर्थ त्यांनी त्यांच्या कार्याचे स्वरूप परिभाषित करण्यासाठी तसेच ते ज्या परिस्थितीत कार्य करत आहेत त्याला आकार देण्यात एक अधिक निर्णायक व राजकीय भूमिका वाढवायलाच हवी. आपण मानतो की शिक्षकांनी स्वत:ला विचारवंत म्हणून बघण्याची गरज आहे. जे कल्पना आणि अंमलबजावणी, विचार व कृती यांना मुक्ती व न्यायाच्या संस्कृतीसाठीच्या संघर्षावर आधारित राजकीय प्रकल्पाशी एकत्रित करतात.

पहिले म्हणजे ते अशा अध्यापनशास्त्राच्या स्वरूपावर संदर्भित टीका प्रदान करतात जे स्थिर म्हणून वागवितात आणि विद्यार्थ्यांना त्यांचा स्वत:चा इतिहास व अभिव्यक्तीबाबत प्रश्न विचारण्याची संधी नाकारतात. दुसरे म्हणजे सार्वजनिक विचारवंतांची कल्पना ही शिक्षकांना ते व विद्यार्थी यांच्यामधील समीक्षणात्मक संवादात गुंताण्यासाठी एक सैद्धांतिक व राजकीय पाया पुरावियें जेणेकरून ते फक्त मनाचे जीवन सुधारण्यासोबतच जाचक, वादग्रस्त व संस्थात्मक सीमांशी लढण्याच्या व त्यांच्या रुपांतरणाच्या हेतुस्तव त्यांना आवश्यक असलेल्या परिस्थितींसाठी व इतरांना त्यांच्या कार्यात सहभागी करण्यासाठी लढतील. तिसरे म्हणजे ही श्रेणी शिक्षकांना एक शैक्षणिक नेते म्हणून त्यांची भूमिका पुनर्व्याखित करण्याची गरज सूचित करते जेणेकरून ते असे कार्यक्रम निर्मित करतील जे त्यांना व त्यांच्या विद्यार्थ्यांना सामाजिक समीक्षणाची भाषा हाती घेण्यास, नैतिक धैर्य दर्शविण्यास आणि आजच्या सर्वात जबरदस्त समस्या व संधींपासून त्यांना

अलग ठेवण्याऐवजी त्यांच्याशी जुळल्यास परवानगी देतील." (गिरॉक्स १९९१, पण नं. १०८-१०९).

**उत्तर आधुनिकतावादाने नमूद केलेल्या अध्यापन पद्धती :**

१) **सहकारी अध्ययन पद्धत –** गटामध्ये घेतल्या जाणाऱ्या या पद्धतीत विद्यार्थी निवडणे व ठरविणे. शिकण्यासाठी एकमेकांना मदत करतात. एकमेकांचे ऐकणे, विरोधी मते ऐकून घेण्याची क्षमता वाढविणे, समीक्षणाची क्षमता मजबूत करणे हे या पद्धतीचे परिणाम आहेत.

२) **स्वतंत्र अध्ययन पद्धत –** उत्तर आधुनिकतावादात सहकारी पद्धतीच्या महत्त्वाशिवाय व्यक्तिगत परिस्थितीसुद्धा विचारात घेतली जाते. डेरीड (२००१) विचार करतात की तेथे विचार करण्याची आणि शिक्षणाची पद्धत नाही. म्हणून स्थिती व परिस्थिती ही नेहमीच सर्वोत्कृष्ट पद्धत आहे. या मुद्द्यांनुसार, आपण प्रतिपादन करू शकतो की अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत स्वतंत्र व सहकारी अध्ययन यातील समतोल अत्यंत महत्वाचा आहे.

३) **बोलीभाषिय पद्धत –** ही एक परस्परसंवादी पद्धत आहे जी अध्यायानाविषयीच्या वेगवेगळ्या घटकांकडे लक्ष देते. बेक (१९९३) मानतात की शिक्षक व विद्यार्थ्याने माहिती संसाधने पाहायला हवीत व त्यांच्याजवळ संभाषणप्रति पुरेशी जाणीव असावयास हवी. अशा प्रकारे त्यांच्याजवळ स्वत: त्यांच्याकडूनच विधायक मूल्यमापन असेल.

४) **समीक्षणात्मक पद्धत –** टिकात्मक संभाषणे, वचन व लेखन हे या पद्धतीचे प्रकार आहेत. या पद्धतीत विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या अभ्यास केल्यानंतर त्यांना स्पष्टीकरण देण्यास व टीका करण्यास प्रेरित केले जाते. गिरॉक्स (२००३) समजतात की अध्ययनातील समीक्षणात्मक विचारसरणी ही विचार करणे व कृतीमधील व्यक्तिगत स्वातंत्र्य हे स्वीकृतीच्या विरोधातील अडथळा आहे आणि तर्कशुद्ध स्पष्टीकरण हे कल्पनानिर्मितीचे कारण आहे.

५) **शाब्दिक पद्धत –** उत्तर आधुनिकतावादाचे इतर वैश्विक संस्कृती व संभाषण यांकडील लक्ष हे भाषेचे महत्व दर्शविते. उत्तरआधुनिकतावाद कारणाची जागा भाषेने घेतली आहे कारण विचारसरणी ही भाषेने वर्णन केली जाते. (बधेरी, १९९६) उत्तरआधुनिकतावाद हा शिक्षक व विद्यार्थ्याचा एक नवीन चेहरा दर्शवितो. उत्तरआधुनिकातावादातील परिपूर्ण शिक्षण म्हणजे असे शिक्षण ज्यात इतरांचे म्हणणे ऐकून घेतले जाते. शिक्षक एक उदारमतवादी व्यक्ती आहे. जो विद्यार्थ्यांना विचार करण्यास मार्गदर्शन करतो. तसेच विद्यार्थी स्पष्टीकरण व समीक्षणासाठी क्षमता वापरतात. बायोकार्डचे भाषिक खेळ दर्शवितात की व्याख्याने ही स्थिर नाहीत आणि व्याख्याने बनविण्यासःती तेथे विशिष्ट चौकट नाही. जे तेथे काहीही नियम नसतील तर तेथे कोणतेही भाषिक खेळ असणार नाहीत. संभाषणांना या खेळांच्या चळवळी म्हणून समजले जाते. म्हणून ते आपल्याला सांगायचा प्रयत्न



munotes.in

करतात की मानव वेगवेगळ्या भाषिक खेळांमध्ये भाग घेतो व या खेळांच्या नियमांनुसार त्यांच्याजवळ नवीन नियम असतील.

### सामग्री आणि अभ्यासक्रमातील सृजनशीलता

शैक्षणिक अभ्यासक्रम आणि सामग्रीचा पाया समस्या निराकरण असायला हवा. कारण सध्याच्या जगात विद्यार्थ्याची प्रमुख गरज म्हणजे समस्या सोडविण्याची क्षमता असणे होय. उत्तर आधुनिक अभ्यासक्रमाने विद्यार्थ्याला बनण्याच्या प्रक्रियेत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रक्रियेत शिक्षक आणि विद्यार्थी वस्तूंचा शोध घेण्यासाठी एका शोध मोहिमेत भाग घेतात. तसेच पर्यावरण विषयक, सामाजिक आणि भौतिक ह्या उत्तर आधुनिक अभ्यासक्रमाच्या सूचना आहेत. (पिनार १९९६ फार्माहीन पान १३८) पाल्मेर (२०००) हे रद्द करणारी रचना आणि विशिष्ट चौकटीसह उत्तर आधुनिक शिक्षण व अभ्यासक्रमाचे वर्णन करतात आणि दैनंदिन अनुभव, स्मृती यांच्यापासून उद्भवणाऱ्या ज्ञानाच्या निर्मितीसाठी नवीन क्षमता शोधण्याच्या प्रयत्न करतात. सरतेशेवटी आपण मानतो की उत्तर आधुनिक अभ्यासक्रम जो लवचिक, चल आणि बहुलतावादी आहे आणि बहुलतावादी आहे आणि जीवनाच्या तथ्यात्मक समस्यांशी निगडीत आहे. तो सृजनशील आणि नाविन्याच्या शोधासाठी सुयोग्य सुयोग्य संधी बनू शकतो.

### स्वनिर्मिती

या बदलत्या उत्तर आधुनिक वातावरणात स्वनिर्मितीची कल्पना ही फायद्याची आहे. या खंडित, बहुकथात्मक समाजात व्यक्ती त्यांची ओळख कशी तयार करू शकतात. हा नाक्कींच असा मुद्दा आहे जो समाजशास्त्रीय महत्त्वात वाढणे चालूच आहे. कारण आपल्या ओळखीच्या निर्मितीशी संबंधित घटक व परिस्थिती या बदलल्या आहेत, वैविध्यपूर्ण झाल्या आहेत, पसरल्या आहेत आणि या उत्तर आधुनिक जगात अधिक गतिशील झाल्या आहे.

स्वनिर्मिती ही अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे एखादी व्यक्ती ही इतर लोकांपेक्षा भिन्न व्यक्तिमत्त्व विकसित करते. ही प्रक्रिया व्यक्तीला फक्त इतरांसाठीच नव्हे तर त्याच्या स्वत:साठी सुद्धा परिभाषित करण्याचे कार्य करते. (लेवीन २००२) ही व्याख्या कशाप्रकारे टिकवली जाते त्या भाषेत ती ओळख एकमेव द्वितीय असण्याच्या विकासाच्या प्रक्रियेतून कार्यान्वित होते आणि सलगता व संलग्ननेतून तिला मजबुती दिली जाते. (लेवीन २००२) स्वनिर्मितीची ही प्रक्रिया शेवटी स्वत:च्या ओळखीच्या कल्पनेकडे घेऊन जाते. जेथे ओळख ही व्यक्तीगतता आणि एखाद्याच्या स्वत:च्या स्वकल्पनेच्या जगण्याद्वारे सुलाखून निघते. (लेवीन २००२)

उत्तर आधुनिक जगात बोलाख म्हणजे काय आहे "बऱ्याच जनासाठी ओळख म्हणजे आता एक प्रवाही संकल्पना, एक मुक्त प्रश्न. एक बांधणी आहे. जी एखादा त्याच्या वातावरणानुसार, आवडीनिवडीनुसार आणि परस्परसंवादानुसार, मग या भौतिक असो की आभासी, चलन वळण करतो. त्याप्रमाणे बांधली जाते. उत्तरआधुनिकतेच्या दृष्टीने स्व हे बदलेते व प्रवाही आहे किंवा बर्झोन्स्की यांच्या मताप्रमाणे ओळख ही गतिशील,

गुणात्मक, सापेक्षवादी, संदर्भ वैशिष्ट्यपूर्ण आणि खंडित आहे. (बर्झोन्स्की २००५) यापुढे (बर्झोन्स्की २००५) सांगतात की अहं ओळख हा असा मार्ग होऊ शकतो की ज्यात व्यक्ती या खंडीत उत्तर आधुनिक जगात वैयक्तिक दृष्टीकोनातून पोहचतात.

डन १९९९ मतभेद व्यक्त करतांना म्हणतात की उत्तर आधुनिकता वादाने स्वनिर्मितीसाठीच्या पायातील बदलाकडे नेले आहे. जे स्वत: उत्तर आधुनिक युगावर ठसा उमटविते. लेऑनने (२०००) अगदी वक्तृत्वरित्या मांडलेले आहे. "…..आपण स्वत:साठी खरेदी व मनोरंजनाचे प्राप्तकरते आहोत." (लेऑन २००० पान ७५) माहिती तंत्रज्ञानातील विकास आणि कुठेही, केव्हाही खरेदी करण्याच्या क्षमतेने वेळ व जागेची बचत केली आहे. याचाच अर्थ असा की आपण आता माहिती क्षणात प्राप्त करण्याच्या क्षमतेची मागणी करत आहोत.

लोक २४ तास ७ दिवस मागणी करतात. जे आपण जगात आपल्या स्वत:ला आणि आपल्या ठिकाणाला कसे बघतो त्याच्या पुनर्रचनेकडे घेऊन जाते. आपण अशा जगात आहोत ज्याला आपण अधिक चांगल्या जाणतो असे आपल्याला वाटते, असे जग जे मागणीनुसार एक बटणाच्या स्पर्शावर किंवा माउसच्या क्लीकवर) आभासिरीत्या उपलब्ध आहे. आपल्याला हव्या असलेल्या कोणत्याही गोष्टीवरून माहिती तात्काळ सापडू शकते. या मुक्त, तात्काळ प्रक्रियेद्वारे आपल्याला जाणवते की आपण पूर्वीच्या दीर्घकाळापासून स्थापित, स्थानिक संस्कृतीपेक्षा एक खूप मोठ्या संस्कृतीचे भाग आहेत.

लेऑनसाठी (२०००), त्यांचे पुस्तक जीझस इन डीसेनलँड : उत्तर आधुनिक काळातील धर्म ही एक जटील सामाजिक परिस्थिती आहे. यामध्ये आधुनिकतेपासून आलेली गतिशीलता पारशाने आलेली आहे आणि यामध्ये काही हे ओळखीच्या पलिकडे अस्ताव्यस्त झाले आहे. लेऑनसाठी (२००२) उत्तर आधुनिकतेची व्याख्या माहिती तंत्रज्ञान आणि सामाजिक जाळ्याचा विकास आणि उपभोग वादाचा उदय अशी केली गेली. माहिती तंत्रज्ञानाचे जगाला लहान बनवले आहे. ओळखीला अधिक खंडित केले आहे आणि उपभोग वादाने आपल्याला पूर्वी कधीही नाही अशा प्रकारे अभिव्यक्त करायला परवानगी दिली आहे.

ही प्रक्रिया व्यक्तीला पूर्वी कधीही नाही इतक्या अधिक लोक, माहिती आणि ठिकाणांशी जोडत असतानाच आपण म्हणू शकतो की लोक वास्तवात – शारीरिक, जिव्हाळ्याने, समोरासमोर, संबंध कमी प्रमाणात जोडले जाऊ लागले आहे. जे सामाजिक अलागीकारानाकडे नेते. मॅकफर्सन (२००१) ने उदाहरणादाखल दाखवले की अमेरिकन लोकांचे दोन दशकापूर्वी जेवढे मित्र होते त्या तुलनेने आता कमी मित्र आहेत. त्याचा परिणाम म्हणून सामाजिक अलगीकरण वाढत आहे.

तथापि मॅकफर्सन आणि स्मिथ लोवीन (१९८७) यांचा होमोफिली (समआवड) चा सिद्धांत – मित्र हे चरित्र व ओळखीत सारखे असतात – हा आभासी मित्रांसाठीसुद्धा लागू पडतो. उदा. ऑनलाईन मंचाचे सभासद जे सायबर स्पेस द्वारे जवळ आलेले आहेत : सारखे लोक हे नेहमीच एकत्र बांधले जातील, लोकांचे वैयक्तिक जाळे (नेटवर्क) हे बऱ्याच

सामाजिक लोकसंख्याशास्त्रीय घटक व औद्योगिक वैशिष्ट्यांच्या संदर्भात एकजिनसी असते. (मॅकफर्सन २००१)

बॉब डेलॅन ने गायले आहे “ड टाइम्स दे आर अ चेंजिंग” (ते बदलत असण्याची वेळ आहे) आणि हे आता इतके कधीही सत्य नव्हते. जेथे मुले त्यांच्या ipodमध्ये गुंतलेले आहेत. त्याच्या इच्छेनुसार संगीत download करत आहेत, जशी आणि जेव्हा इच्छा होईल तशी इंटरनेटवरून माहिती मिळवत आहे. तुमच्या इच्छेनुसार जगाला स्वतंत्र गटामध्ये विभागले जाणे आता शक्य आहे.

तंत्रज्ञानाने व्यक्तीला ipod सह त्यांच्या सहकाऱ्यांसोबत त्यांनी केव्हा व कसा संवाद साधायचा, इतरांपासून दूर राहायचे ipod द्वारेच सायबर मित्रांसोबत सामाईक संगीत आवड सहभागी करून घ्यायची, त्यांची इच्छा असेल तर ऑनलाईन मंचात जोडले जाण्याचे पर्याय दिलेले आहेत. पर्याय सर्वत्र आहेत. पर्यायाला या पिढीचा मुलभूत अधिकार म्हणून अपेक्षिले जाते.

पर्यायाद्वारे आजूबाजूला असलेल्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याद्वारे, ब्लॉग्झद्वारे इंटरनेट साईटपासून जवळजवळ कुठल्याही वैशिष्ट्यपूर्ण आवडीसाठी उपलब्ध असलेल्या ऑनलाईन मंचाद्वारे जसे युट्युब आणि मायस्पेस, व्यक्ती त्यांना कोणाशी संवाद साधायचा आहे आणि त्यांना केव्हा संवाद साधायचा आहे हे निवडू शकतात. बऱ्याच तरुण व्यक्तींसाठी हे ‘कृत्रिम’ , ‘सायबर प्लाईफ’ त्यांचे जीवन आहे. हे त्यांच्या आजी आजोबांद्वारा ओळखले जाणारे किंवा त्यांच्या पालाकांद्वारे समजले जाणारे नसू शकते परंतु ती त्यांची वास्तविकता आहे. ते तसेच जीवन निवडतात व त्यांनी संवाद साधण्यासाठी सक्रियपणे निवडलेल्या व्यक्तींसोबत बहुआयामी कथा टिकवतात.

विद्यार्थी शिकत असलेल्या व शिक्षक शिकवत असलेल्या प्रकारांवर उत्तर आधुनिकता वादाचा परिणाम उत्तर आधुनिक जीवन हे अंदाज करणे योग्य नाही. सतत बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी आपण क्षणातच जगायला हवे. कुठले धोरण आखायचे याच्या विषयी आपल्याला अधिक आकलनात्मक धोरणांची गरज आहे. यापेक्षा अधिक चांगले म्हणजे आपल्याला हे जाणण्याच्या मार्गाची गरज आहे की आपल्या विविध संदर्भात अध्ययन गरजांना प्रतिसाद देण्यासाठी नवीन धोरणे कशी निर्माण करायची आणि त्यांना अनुरूप कसे करायचे हे जाणणे निर्णायक आहे की संधीग्धतापूर्ण आणि निर्विवाद विकासासाठी मुक्त असलेल्या एका मुक्त पद्धतीत कसे जगावे व कसे शिकावे.

उत्तर आधुनिक समाज हा माहितीने खचून भरलेला आहे. एकविसाव्या शतकात माहितीची रेलचेल असून ती मुक्त बनली आहे. आता माहिती ही पूर्णपणे प्राप्त करता येऊ शकते. आपण आपण डिजिटल परस्पर असलेल्या एका लोकशाही प्रदान समाजात राहतो. उत्तर आधुनिक विद्यार्थ्यांना सांख्यिकी सामग्री, माहिती आणि ज्ञान यामधील फरक जाणणे, सक्तीचे आहे. विद्यार्थ्यांनी माहिती साक्षरता कौशल्ये आणि त्यांच्या स्वत:च्या निवड पक्षपाताची जाण विकसित करायलाच हवी. उत्तर आधुनिक शिक्षकाने त्याच्या विद्यार्थ्यासोबत सांखिकी सामुग्री आणि माहितीद्वारे त्या दिशेकडे जायला समर्थ

व्हायला हवे जे अभ्यासक्रमाच्या हेतूसह आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनाशी संबंधित अर्थासह समाविष्ट आहे.

आधुनिक विचारसरणी ही कार्यकारी मेंदू वापरते. कार्यकारी मेंदू हा तर्कयुक्त आहे आणि नियंत्रणाचे कार्य पार पडतो. जीवन हे संरचित, क्रमीत आणि पदानुक्रमित आहे. जीवनात प्रत्येक गोष्टीसाठी योग्य ठिकाण व योग्य कार्य आहे. जर ते क्रमागत किंवा तर्क्युक्त नसेल तर ते आपण शोधून काढू या. अनुक्रमणिक, वैज्ञानिक विचार जे या जगात प्रचलित आहे ते जाणले जाऊ शकतात. कार्यकारी मेंदू हा संवाद व कृतींवर नियंत्रण ठेवतो आधुनिक विद्यार्थी हे तार्किकतेच्या या प्रकारावर आणि ठाम मतप्रणालीवर विसंबून असतात. त्यांना जे सांगितले तसे जाते त्या शिकण्यावर ते विसंबून असतात. कारण ते पार पडत असलेल्या भूमिकेच्या ते सर्वात जास्त हिताचे असते. आधुनिक शैक्षणिक सिद्धांत अध्ययनाला वर्गीकृत अध्ययनाला वर्गीकृत करण्याचा व विभागण्याचा प्रयत्न करतो. जगाला वेगळे घेतले जाते, विद्याशाखांमध्ये विभागले जाते, वस्तुनिष्ठ केले जाते, प्रमाणबद्ध केले जाते आणि त्यानंतर शिकणाऱ्याच्या हेतुनुसार एक अभ्यासक्रम म्हणून त्याची पुनर्बांधणी केली जाते. ही प्रतिकृती अध्ययन कर्त्याला माहिती पाठवण्यासाठी 'मंचावर कृषी' वर विसंबून आहे. विद्यार्थी अध्ययन सुधारण्यासाठी डावपेच वापरू शकतात. ही शिक्षकाने निश्चित केलेली ध्येये विद्यार्थ्याने किती प्रमाणात साध्य केली आहे. त्यावर आधारित एक श्रेणी त्यांना दिली जाते.

उत्तर आधुनिक जीवन हे काही फक्त जलद व सळसळत्या बदलांविषयीच नाही तर ते जुन्या पद्धती अपेक्षा यांच्या खंडिभवनाविषयी सुद्धा आहे. तेथे सततचे व्यव्यय आहेत. कुठलेही एका मूल्यांच्या गटाची किंवा कुठल्याही एका नमुन्याची गणना करणे कठीण आहे. जुन्या नमुन्याच्या खंडिभवनाला तोंड देताना उत्तर आधुनिक विद्यार्थी हे अध्ययन वातावरणाची त्यांच्या स्वत:ची गोष्ट आणि अनुभव याचे उपयोजन करतात; ते त्याच्या स्वत:च्या तर्कसंगत प्रक्रियेवरच (मेंदूच्या) प्री फ्रंटल सॉर्टेक्स या भागात प्रामुख्याने असते) विश्वास करणे शिकत नाहीत तर त्यांच्या अपवादात्मकरित्या भेट मिळालेल्या अंतर्ज्ञानावर (त्यांच्या खूप जंत, मोठ्या आणि अधिक परिपक्व लिम्बीक मेंदूत प्रामुख्याने असतात.) सुद्धा विश्वास ठेवणे शिकतात. (लेहरर २००९) एका कौतुकास्पद दृष्टीकोनापासुनच्या विद्यार्थ्यांसोबत गुंतलेला एक उत्तर आधुनिक शिक्षक हा त्या व्यक्तीला ते म्हणजे एक जुने सामान आहे जे शैक्षणिक अनुभवातून दूर सारले जायला हवे असे बघण्याच्या ऐवजी त्या अभ्यासक्रम किंवा कार्यक्रमाची दिशा त्याच्या व्यक्तिगत अनुभवांशी जोडण्यास प्रोत्साहित करतात. शिक्षक आणि विद्यार्थी नवीन अध्ययन आणि आकलन त्या क्षणी सहनिर्मित करतात.

उत्तर आधुनिक अध्ययन ही सृजनात्मक कृती आहे. त्यामध्ये सतत बदलणाऱ्या वातावरण आणि अध्ययन व्यवस्थांचा समावेश होतो. जेथे शिकणारा हा एकसक्रीय सहभागी असतो तिथे व्यक्तीगत योजना निर्माण केल्या जाऊ शकतात. उत्तर आधुनिक शिक्षक आणि परिपक्व विद्यार्थी हे समकालीन संदर्भात ज्ञानाच्या अध्ययनात भागीदार असतात. इतर पद्धती टाकून दिल्या जात नाही तर त्या हाताशी असलेल्या परिस्थितीशी अनुरूप वापरल्या जातात, रुपांतरीत केल्या जातात आणि पुनर्निर्मित केल्या जातात.

उत्तर आधुनिक प्रशिक्षक हा एक 'बाजूकडील मार्गदर्शक' असतो, ज्याची भूमिका अर्थपूर्ण हेतुप्रती अध्ययन अनुभव अधिक सुकर करण्याची असते. पर्यायी दृष्टीकोण आणि सामग्री एकत्रिकरण यांना उत्तेजन दिले जाते. जगाला जाणण्याचे नवीन मार्ग तयार करण्याकरता एक समग्र दृष्टीकोनातून कल्पनांना एकत्र आणले जाते. नवीन अध्ययन संबंध आणि ज्ञान निर्मितीक्षमता वाढविल्या जातात आणि तो उत्तर आधुनिक वर्गाचा एक रोमांचक पैलू बनतो.

**प्रौढ शिक्षणासाठी उत्तर आधुनिक परिस्थितीचे परिणाम**

एक उत्तर आधुनिक शिक्षण प्रौढांना देण्यासाठी निर्देशकांनी कोणत्या प्रवृत्ती, प्रक्रिया व रचना देणे गरजेचे आहे?

**उत्तर आधुनिक जगातील अध्यापन व अध्ययन पुढील मुद्द्यांना संबोधित करते.**

- कुठले धोरण लावायचे याच्याविषयीचे विचारसरणीचे मार्ग (मेटा-स्ट्रॅटेलीझ); आपल्या विविध संदर्भात अध्ययन गरजांना प्रतिसाद देण्यासाठी नवीन धोरणे कशी निर्माण करायची आणि त्यांना अनुरूप कसे करायचे हे जाणण्याचे मार्ग ;
- पुरेशी संदिग्धता आणि निर्विवाद विकास असलेल्या एका मुक्त पद्धतीत जगायचे व शिकायचे कसे त्या मार्गांविषयीचे ज्ञान ;
- विद्यार्थ्यांसाठी माहिती साक्षरता कौशल्ये आणि त्यांच्या स्वत:च्या निवड पक्षपाताची विद्यार्थ्यांद्वारे जाण; उत्तर आधुनिक निर्देशाकाने त्यांच्या विद्यार्थ्यांना सांख्यिकी सामग्री व माहितीद्वारे त्या ज्ञानाकडे घेऊन घेऊन जायला हवे जे अभ्यासक्रमाच्या हेतूसह आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनाशी संबंधित अर्थासह समाविष्ट आहे;
- अभ्यासक्रम आणि कार्यक्रमाच्या दिशा आणि व्यक्तीचा वैयक्तिक अनुभव यांमधील संबंध; नवीन अध्ययन व आकलन हे क्षणात सह-निर्मिले जाते;
- व्यक्तिगत योजनांची निर्मिती ज्यात शिकणारा हा सक्रीय सहभागी असतो; समकालीन संदर्भात ज्ञानाच्या अध्ययनात शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये भागीदारी निर्माण होते;
- अर्थपूर्ण हेतुप्रती अध्ययन अनुभवांचा 'बाजूकडील मार्गदर्शक'-शिक्षक प्रशिक्षक व गोष्टी सुकर करणारा – म्हणून निर्देशाकाच्या भूमिकेची निर्मिती.
- जगाला जाणण्याचे नवीन मार्ग तयार करण्याकरिता एक समग्र दृष्टीकोनातून कल्पनांना एकत्र आणले जाते; नवीन अध्ययन संबंध आणि ज्ञान निर्मितीक्षमता वाढविल्या जातात आणि त्या उत्तर आधुनिक वर्गाचा एक रोमांचक पैलू बनतात :
- मेटा-स्ट्रॅटेलीझ किंवा कॉग्निटीव्ह स्ट्रॅटेलीझ – अधिक अनुसरणात्मक धोरणे गरजेची आहेत; कसे शिकावे हे विद्यार्थी शिकतात;

munotes.in

- अध्ययनातून व्यक्तीगत अर्थ काढण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते. कारण शिक्षकाला अधिकाराचा मुखवटा टाकून देण्यास आणि आधुनिकतावादाच्या आजीवन अध्ययन मूल्याचे आदर्श होऊन स्वत: तसे अधिकाधिक बनण्यास परवानगी असते; आणि

- विद्यार्थ्याला (उत्तरआधुनिक जगात जगणारा) त्यांची स्वत:ची एक स्पष्ट स्थिर व टिकाऊ प्रतिमा निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

**उत्तर आधुनिक नेतृत्वाची ठळक वैशिष्ट्ये**

**१) कोठूनही उद्भवते -**

उत्तर आधुनिक नेतृत्व हे काही प्रकारचे ज्ञान किंवा अंतर्दृष्टीवर आधारित आहे, ज्यात व्यक्ती किंवा गट हा एकतर उदाहरणाद्वारे नेतृत्व करण्यास पहिल्यांदा समायोजन करतो किंवा दुसऱ्यांना सल्ला देतो. नेतृत्व हे नेहमीच ताकदीवर आधारित राहिलेले आहे. आता ते पत किंवा व्यक्तीमत्त्वाऐवजी ज्ञानाची ताकद आहे. ती एक प्रभाव प्रक्रिया आहे जेथे काय प्रभावित केले जाते ते म्हणजे कामगिरीतील सुधारणा आवश्यक नसून दिशेतील बदल आहे.

**२) स्वतंत्र नेतृत्व कार्य करते, भूमिका नव्हे –**

नेतृत्व जे एक आहे, ती एक स्वतंत्र घटना आहे आणि ना की एक बुमिका आहे. ही अशीच बाब असायला हवी जी अनुसरण करणाऱ्या गटात काहीही भूमिका नसणाऱ्या बाहेरील व्यक्तीद्वारे दाखविली जाऊ शकते. जेव्हा गटाचे नेतृत्व हे उदाहरण प्रस्थापित करून दुसऱ्या गटाद्वारे केले जाते, जसे बाजार नेतृत्व , तेव्हा दुसरा गत हा नक्कीच पाहिल्या गटाचा मालक असतो. हे काही असामान्य नाही. प्रभात हा सर्वसाधारणपणे एक स्वतंत्र घटना आहे. असे नेतृत्व हे अनपेक्षित दिशेपासून उद्भवू शकते. उदा. एखाद्या सभेमध्ये एक सामान्यत: शांत असंघ सदस्याला एखाद्या विषयावर बोलण्याविषयी आणि चर्चेतील मुद्द्यांवर दुसऱ्यांचे मन वळविण्यासाठी पुरेशी तळमळ जाणवू शकते. परंतु लाजाळू असल्याने ती व्यक्ती त्या गटाचा ताबा घेण्यास किंवा भूमिका आधारित दृष्टीकोनातून त्याचा अनौपचारिक नेतासुद्धा समजला जाण्यास उत्सुक नसते किंवा हुशार असते.

**३) एकदा अनुयायांनी कृती केली की नेतृत्व संपते –**

एक कारचा विक्री प्रतिनिधी एकदा का तुम्ही खरेदी फॉर्मवर सही केली की तुम्हाला कार विक्री चालू ठेवत नाही. तसेच एकदा का तुमच्या मुलांनी भाजीपाला खायला सुरुवात केली की तुम्ही त्यांना भाजीपाला खाण्यासाठी प्रभाव टाकीत बसत नाहीत. याचप्रमाणे एक मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) एकदा का एखादा नवीन दृष्टीकोण स्वीकारला गेला व त्यावर कृती केली गेली की ज्याला वाढ देणे चालू ठेवत नाही. मॉडेल T नेतृत्वाखाली कामगिरीची मानके टिकविण्यासाठी कर्मचाऱ्यांना सतत प्रेरित करण्याच्या गरजेसः प्रभाव चालू आहे. मॉडेल A नेतृत्वात बदलावरील त्याच्या केंद्रासह, त्या

व्यवस्थापकाला तो बदल पूर्णपणे अंमलात येईपर्यंत गती टिकविण्यासाठी स्वतंत्र कृतींची मालिका म्हणून नेतृत्व दाखविणे गरजेचे असू शकते.

**४) लोकांना व्यवस्थापित करत नाही किंवा त्यांच्यासाठी निर्णय घेत नाही –**

जेव्हा मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर यांनी बसेसवरील पृथक्करण बेकायदेशीर करण्यासाठी युएस सुप्रीम कोर्टवर प्रभाव टाकला तेव्हा कोणत्याही गोष्टीच्या अंमलबजावणीत त्यांचा सहभाग नव्हता. बदलांच्या संमतीसाठी त्यांनी संसद सदस्यांच्या गटाला बोलावले नाही, याउलट ते प्रत्यक्षपणे लोकांशी बोलले, त्याचप्रमाणे जेव्हा सोनी कंपनीचे कर्मचारी कर्मचारी प्ले स्टेशन विकसित करण्यास सोनी व्यवस्थापनाचे मन वळवण्यात यशस्वी झाले, तेव्हा त्यांना अंमलबजावणी करण्यासाठी काही देणे घेणे असू शकत नव्हते. बरेच ज्ञान कर्मचारी जे तळागाळातील नेतृत्व दर्शवितात. त्यांच्याजवळ पारंपारिक स्थितिवादी नेता असण्याची एक तर प्रेरणा किंवा बुध्दिमत्ता नसू शकते. आपल्याला व्यवस्थापनाची श्रेणी सुधारण्यासाठी त्याला अंमलबजावणीची काळजी घेण्यासाठी सहाय्यक, सुविधा देणारे कार्य बनवण्याची गरज आहे.

जर नेतृत्व हा शुद्ध प्रभाव असेल आणि बाहेरच्या व्यक्तीकडून दाखविले जाऊ शकत असेल तर ते त्याच्या अनुयायांसाठी निर्णय घेऊ शकत नाही, याचाच अर्थ असा की तेथे निरंकुश नेतृत्व अशी काही गोष्ट नाही. मालकांमधील केवळ एखादी व्यक्तीच ही हुकुमशाही प्रवृत्तीची असू शकते. परंतु ती व्यक्ती एक व्यवस्थापक असेल नेता नसेल. व्यवस्थापक अधूनमधून नेतृत्व दाखवू शकतात, परंतु तेथे नेतृत्व भूमिका नसते.

**५) गटाद्वारे दाखविले जाऊ शकते –**

स्थितिवादी नेतृत्व हे पदानुक्रमात उच्च जागा व्यापणाऱ्या व्यक्तीविषयी आहे परंतु कंपनी खेळाचे संघ यासारखे गत उदाहरणाद्वारे त्यांच्या स्पर्धकाचे नेतृत्व करतात. ते त्यांच्यावर दिशा बदलण्यासाठी किंवा कामगिरीच्या उच्च पातळीसाठी झगडण्यासाठी प्रभाव टाकतात. ग्रीमपीसच्या पर्यावरण पूरक कृती सुचवून समुदायावर नेतृत्व प्रभाव असू शकतो.गट कुठेतरी पहिल्यांदा जाऊन नेतृत्व करू शकतात व अशा प्रकारे इतर गटांना अनुसरण करण्यास त्यांचे नेतृत्व करू शकतात किंवा एक चांगला मार्ग सुचवून नेतृत्व करू शकतात.

अशा 'गट' नेतृत्वाचे चित्त वेधक फायदे आहेत :

१) नेतृत्व ही काही फक्त व्यक्तीगत बाबा नाही याची खात्री देणे.

२) एक बाहेरच्या व्यक्तीद्वारे नेतृत्व दाखवले जाऊ शकते. या दाव्याला मजबुती प्रदान करणे.

३) एखाद्या गटाचा प्रमुख असणे म्हणजे नेतृत्वाची एक फक्त विशेष बाब आहे ती काही एक पूर्ण गोष्ट नव्हे. अजून म्हणजे प्रतिस्पर्ध गटामधील नेतृत्व हे एक संयुक्त ध्येय

प्राप्त करण्यासाठी एक सहयोगी प्रयत्न नक्कीच नव्हे आणि हेतूपुरस्कार सुद्धा नाही. पेटंटस हे प्रतिस्पर्ध्यांना खूप जवळून अनुसरण करण्यापासून अटकाव करण्याचे साधन आहे.

### ६) प्रवाहीपणा

एक व्यक्ती एखाद्या गटावर शक्य असेल तोपर्यंत वर्चस्व गाजवते म्हणजे पारंपारिक नेतृत्व होय. परंतु आजच्या ज्ञानाने चालणाऱ्या जगात कुठल्याही व्यक्तीची चांगल्या कल्पनांवर एकाधिकारशाही असू शकत नाही. एका विचारमंथन संघात नेतृत्व हे चर्चेदरम्यान शेकडो वेळा बदलवू शकते आणि त्याची व्याप्ती त्या गटाच्या अखेरच्या निर्णयावर अगदी छोट्यापासून ते खूप मोठ्या प्रभावापर्यंत असू शकते. असा प्रवाहीपणा म्हणजे उत्तर आधुनिक नेतृत्वाचा ठेवा म्हणून साजरा केला जातो. कारण तो अधिक लोकांना त्यांचे मत प्रकट करण्याची संधी देतो. ते पितृसत्ताक प्रमाणे नाही, व ते कर्मचाऱ्यांच्या कल्पनांना 'खऱ्या नेत्याने' निर्णय घेण्यासाठीचे 'सूचना पेटी' सामग्री म्हणून विनम्रपणे शिक्का मारत नाहीत. कुठलीही सूचना त्या गटाला अगदी थोडे का होईना पण पुढे सरकवते ती म्हणजे एक स्वतंत्र कृती असते.

## ६.३ उत्तर आधुनिक युगातील शैक्षणिक आव्हाने

उत्तर आधुनिकतावादाचा कुणी संस्थापक नसला किंवा त्याची एक निश्चित तत्त्वप्रणाली नसली तरी बहुतांश उत्तर आधुनिकतावादी विचारवंत व कलाकार आधुनिक विचारांच्या टीकेचे खालील प्रकार उचलून धरतात किंवा त्यांना त्याबद्दल आत्मीयता असते.

सर्वात प्रभावी आत्मीयता युक्त्या (मेटा) – कथांची टिका जीन फॅक्वाईस लिओटार्ड, उत्तर आधुनिकतावादाशी सर्वात जास्त जुळलेले ज्ञान; हे उत्तर आधुनिकतेची व्याख्या मेटा कर्ता प्रती अविश्वास अशी करतो, "त्यांच्या अशा म्हणण्याचा अर्थ काय? लिओटार्ड हे ज्ञानाच्या कोणत्याही शाखेला ज्ञानाची केवळ एक शाखा म्हणून बघतात. वस्तुत: ते म्हणतात वैज्ञानिक ज्ञान हे एक प्रकारचे व्याख्यान आहे. ते विज्ञानाला मुलत: इतरांपेक्षा श्रेष्ठ म्हणून बघत नाही. एखाद्याची स्थिती किंवा तत्त्वप्रणाली ही श्रेष्ठ आहे किंवा सर्वांसाठी सर्वत्र वैध आहे.हे सादर करण्यासाठी एखाद्याला कशाची गरज असेल तर ते म्हणजे लिओटार्ड म्हणत असलेल्या 'मेटाफच्या' त्यांच्यानुसार मेटाकथा म्हणजेच सर्वसाधारण सिद्धांत किंवा न तपासलेले जागतिक दृष्टीकोण जे एखाद्या विशिष्ट स्थितीचे समर्थन करतील, अशाप्रकारे मला जर विज्ञानाला सर्वोत्कृष्ट प्रकारचे ज्ञान म्हणून बढती द्यायची असेल तर मला अशा एका मेटाकथाची गरज भासेल जे मला सांगेल की वैज्ञानिक सत्य हे सामान्य व्यवहार ज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहेत किंवा सर्व वैज्ञानिक कार्य हे मानवाच्या भल्यासाठी केले जाते. किंवा जेव्हा कार्ल मॉक्र्स यांनी १९व्या शतकातील खाण आणि कारखान्यातील कर्मचारी व मुलांच्या शोषणाबद्दल लिहिले तेव्हा एक वस्तुस्थिती कथन करत होते. जेव्हा त्यांनी सर्वत्र आढळणाऱ्या आर्थिक शोषणासाठीचा उपाय म्हणून मार्क्सवाद सुचविला तेव्हा ते एक सार्वत्रिक वैध सिद्धांत एक निदान व उपचार असण्याचा दावा करत होते, जो सर्व व्यवस्थांमध्ये कार्य करेल. उत्तर

munotes.in

आधुनिकतेसाठी ही एक मेटाकथा ठरेल आणि म्हणूनच ती संशयाच्या भोवऱ्यात येईल. सामान्यत: उत्तर आधुनिक संवेदनशीलता ही कुठलीही तत्त्वप्रणाली किंवा दृष्टीकोण जो त्याला स्वत:ला टिकेच्या वर ठेवतो आणि निरपेक्ष दावा करतो, त्याच्या संशय घेण्यात आणि तसेच मोठ्या सिद्धांतामागे दडलेल्या लहान कथा ऐकण्यात दडलेली आहे. यामुळे आपण उत्तर आधुनिकता वादाशी संबंधित दुसरी महत्वाची चळवळ, विखंडनापाशी येऊन ठेवतो.

## विखंडन

ही संज्ञा तसेच ती दर्शवत असलेली बौद्धिक चळवळ ही फ्रेंच जाकीस डेरीडा यांच्याशी संबंधित आहे. डेरीडांच्या कल्पना ह्या समजण्यास किंवा सारांश करण्यास म्हणीप्रमाणेकठीण आहे. थोड्या शब्दात सांगायचे म्हणजे विखंडन हे एखाद्या विषयाच्या टिकात्मक अभ्यासाशी, लिखाणात वापरलेली भाषा आणि त्यात समाविष्ट गृहीतकांच्या तपासणीशी संबंधित आहे. एखद्या मजकुराचे विखंडन करायचे म्हणजे त्याला घडविणाऱ्या घटकांमध्ये वेगळे करणे आणि मग बघायचे की मजकूर स्वत: त्यात असलेल्या तत्त्वप्रणालीला कसा ढासळून टाकतो. आपल्याला शब्दांचा वापर करावा लागतो कारण आपल्याजवळ कल्पनांच्या देवाणघेवाणीसाठी दुसरा मार्ग नाही; त्याचवेळेस आपल्याला जे व्यक्त करायचे आहे, त्यासाठी वापरले जाणारे शब्द हे अपुरे आहेत या दृष्टीने शब्द हे बरोबर व चूक असे दोन्ही आहेत. त्यांना वापरले जाने जरुरी आहे तसेच त्याचवेळेस त्यांना न वापरणे (आपण जे लिहितो ते पुसून टाकण्याच्या गरजेविषयी ते बरेच म्हणाले) गरजेचे आहे.

## स्वायत्त विषय, इतिहास आणि पूर्ण सत्याचा अंत

उत्तर आधुनिकतावादाशी संबंधित ही अजून एक प्रसिद्ध घोषणा आहे. याचा अर्थ उत्तर आधुनिकतेनुसार इतिहासाचा अंत 'म्हणजे तीन गोष्टी; ते या समजाविषयी प्रश्न करतात की माणूस हा स्वत:च्या किंवा समाजाच्या सततच्या अधिक चांगल्या स्थितीकडे प्रगती करत चाललेला आहे. इतिहासाचा टप्पा हा आधीच्या टप्प्यापेक्षा अधिक वाईट असू शकतो. दुसरे म्हणजे ते इतिहास लेखनाकडे टिकात्मकरित्या पाहतात. आपल्याजवळ काही कच्चा इतिहास नाही आहे तर विशिष्ट देश किंवा व्यक्ती किंवा संस्कृतीद्वारा केले गेलेले इतिहास लेखन आहे. आपल्याजवळ इतिहास आणण्याचा किंवा लिहिण्याचा कोणताही एक हेतू नाही आहे. अशा प्रकारे भारतातील ब्रिटीश काळाचा इतिहास हा एका इंग्रजी इतिहास काराने लिहिला गेल्यावर वेगळा भासेल----विशेषत: अशी व्यक्ती जी ब्रिटीश संस्कृतीच्या वर्चस्वात विश्वास ठेवते किंवा जी विजयाच्या बाजूने आहे. एखाद्या भारतीयाद्वारा लिहिल्या गेलेल्या इतिहास ज्या व्यक्तीला वसाहतीकरण हे अनैतिक भासते. तिसरे म्हणजे उत्तर आधुनिकतावादी हे इतिहासाला दिशा किंवा एकी असते यात विश्वास ठेवत नाही. याउलट ते विचार करतात की इतिहास बनवणाऱ्या घटना ह्या इतक्या वेगवेगळ्या प्रकारच्या असतात की त्या एका सुसंगत संपूर्णत चपखल बसू शकत नाही.

अलगाव विषयाचा अंत असा जेव्हा ते उल्लेख करतात, तेव्हा त्यांच्या म्हणण्याचा काय अर्थ आहे. उदाहरणार्थ डिकार्टसमध्ये आपल्याजवळ एक तत्त्वज्ञानी आहे जो विचार विषयाचे स्वरूप ओळखण्याचा दावा करतो. डिकार्टसचा दावा असेल की त्याचे निष्कर्ष हे सर्व मानवजातीसाठी सर्वत्र वैध ठरतील हीच गोष्ट कान्ट सारख्या इतर तत्त्ववेत्यांच्या बाबतीत सत्य आहे. या (आणि इतर विचारवंत) आपल्याला कुठेही व कोणत्याही मानवाविषयी वाक्य बनवण्याचा प्रयत्न दिसतो. एक विशिष्ट तत्त्वज्ञानी ज्या अमूर्त निष्कर्षापाशी येऊन ठेपतो त्यांना सर्व मानवांसाठी सर्वत्र धरले जाते. उत्तर आधुनिक विचारवंताद्वारा हा दृष्टीकोण मोठ्या प्रमाणावर टाकून देण्यात आलेला आहे.

## पूर्ण सत्याच्या अंताविषयी का बोलायचे?

याला सुद्धा कारण म्हणजे उत्तर आधुनिकतावादी हे विशिष्ट स्थिती आणि परिस्थिती या अंतर्गत तथाकथित सत्य विकसित केले जाते, त्यांना सामान्यतः अधिक संवेदनशील आहेत. हा विचार करण्यास ते आधुनिक काळातील लोकांपेक्षा अधिक नाखूष असतात की कुणीही व्यक्ती सार्वत्रिकरीत्या वैध अमूर्त सत्य सुचवू शकतो. ज्यांना आव्हान दिले जाऊ शकत नाही किंवा जी बदलली जाऊ शकत नाही आणि जी ह्या परिस्थिती वर अवलंबून नाही ज्या अंतर्गत ती शोधली गेली किंवा त्यांना सुचवले गेले.

## भाषिक खेळ

'भाषिक खेळ' ही कल्पना वीट जेन्सटील सारख्या ख्यातनाम तत्त्वज्ञानांनी तत्त्ववेत्याद्वारा दिली गेलेली आहे व तिचा आधी उल्लेख आलेला आहे. या ठिकाणी मुद्दा असा आहे. ज्ञानाच्या प्रत्येक शाखेचे स्वतःचे असे काही नियम असतात. आपण प्रायोगिक विज्ञानाला ज्ञानाचा सर्वोच्च प्रकार म्हणून बघू शकत नाही किंवा विज्ञानाच्या निकषाद्वारे अध्ययनाच्या इतर क्षेत्राचे परिक्षण करू शकत नाही. अशा प्रकारे भौतिकशास्त्र किंवा खगोलशास्त्राच्या तुलनेत संगीत किंवा धार्मिक लिखाण किंवा वास्तुकलाशास्त्र हे वेगवेगळ्या नियमांद्वारे चालतात. ही कल्पना प्रत्येक विद्याशाखेला त्याची स्वत:ची भाषा आणि नियम अनुसरण्यास मुक्त करते. विज्ञानाला आता सर्वोच्च विद्याशाखा म्हणून किंवा सत्याचा मध्यस्थ म्हणून बघितले जात नाही. अशा प्रकारे आपण कला आणि गूढ वाक्याचे सत्य याचे परिक्षण कसे करतो हे वैज्ञानिक वाक्याची सत्यता किंवा वैधता याचे परिक्षण कसे करतो यापेक्षा वेगळे असेल.

## परीघ आणि केंद्र

आधुनिक आणि वसाहतविषयक युगाचे केंद्र आणि परीघाने त्यांचा अर्थ बऱ्याच प्रमाणात गमावला आहे. एक वेळेस जो परीघ होता तो केंद्र बनू शकतो. (उदा. यु.के.च्या तुलनेत यु.एस.) किंवा जगाला एकाच आर्थिक किंवा राजकीय किंवा सांस्कृतिक केंद्र असण्याऐवजी शक्ती व प्रभावाची अनेक केंद्रे असू शकतात. हा 'पेकिंग ऑर्डर' मधील बदल आणि त्या अनुषंगाने येणारा आंतरराष्ट्रीय संबंधातील बदल आणि संस्कृती व लोकांची जाण यांचे पूर्वीचे अत्याचारितव बहिष्कृत गटांचे सक्षमीकरण म्हणून किंवा पूर्वीच्या उच्च पदानुक्रमापासून (मग ते वंश किंवा देश किंवा जात किंवा इतर काही

पदानुक्रम असू देत) लाभ झालेल्या गटांचे धमकावणे आणि अस्थिर करणे स्वागत केले जाई.

**संस्कृतीचा अनेक तत्ववाद**

कुठलीही संस्कृती ही स्वत:ला एक प्रमाणित नमुना किंवा मुलत: उत्कृष्ठ म्हणून सुचवू शकत नाही. अलीकडेच ऑस्ट्रेलिया सरकारने त्या खंडाचा मूळ रहिवाशांप्रती केलेल्या भयावह अन्यायाची माफी मागितली. असा पवित्र पूर्वी विचार करण्याजोगा नव्हता. आधुनिक काळात गोरे स्थायिक हे खंडाचा ताबा घेणे, आदिवासींचे (ज्यांच्या त्यांनी कनिष्ठ म्हणून तिरस्कार केला) शोषण करणे या गोष्टींना त्यांचा अधिकार म्हणून बघत. आज जगामध्ये सर्वांच्या मानव अधिकाराच्या स्वीकृतीसह वेगवेगळ्या संस्कृतीच्या समृद्धीबद्दल खूपच जाण आली आहे.

**बऱ्याच सत्यांचे ऐतिहासिक स्वरूप**

सार्वत्रिक वैध सत्याच्या बांधणीच्या डिकार्टस किंवा कान्ट किंवा हेगेल यांच्या शोधाच्या विपरीत, उत्तर आधुनिकता वादी हे बऱ्याच सत्यांच्या ऐतिहासिक स्थितीशी संवेदनशील आहे. म्हणून एखाद्या तत्वप्रणाली विषयी विचारला जाणारा प्रश्न म्हणजे फक्त 'सत्य काय आहे?' असा नसावा. आपल्याला हे सुद्धा विचारण्याची गरज असेल की; "कुठल्या परिस्थितीत हे बोलले गेले? ते का बोलले गेले? ते माझ्या/ आमच्या स्थितीसाठी वैध असेल का?"

**उत्तर आधुनिकतावादाचे योगदान**

आपण पुन्हा पुन्हा सांगितल्याप्रमाणे उत्तर आधुनिकतावाद ही एक पद्धती नाही की तत्त्वप्रणालीचा सुसंगत संच नाही. म्हणूनच तो सादर केला जाऊ शकत नाही किंवा त्याचा बचाव केला जाऊ शकत नाही किंवा त्याला नाकारले जाऊ शकत नाही. त्याला चळवळींचा एक नवीन संच म्हणून बघण्याची गरज आहे. जो वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतंत्रपणे उदयास आला आणि ज्याने प्रत्येक दुसऱ्याला प्रभावित केले. विचार करण्याच्या या नवीन मार्गांना पुढील गुण किंवा विचार आणि संस्कृतीच्या जगाप्रती योगदानाचे श्रेय दिले जाऊ शकते.

**विसरलेल्या लघुकथा ऐकणे.**

उत्तर आधुनिकतावाद्यांच्या मेटाकथांचा (बऱ्याच विशिष्ट तत्त्वप्रणाली आणि सरावांना पाठींबा देणाऱ्या तपासणी न केलेल्या सिद्धांताचा स्विकार) संशय सामान्य लोक छोटे देश, कमी शक्तिवान संस्कृती यांच्या बऱ्याच विस्मृतीत गेलेल्या गोष्टी ऐकण्यासाठी मदत करू शकतो. उदा. वसाहतीने युरोपीयन सांस्कृतिक श्रेष्ठत्व आणि वसाहतीतील लोकांना सभ्य करण्याच्या दाव्याच्या मेटाकथांनी स्वत:चे समर्थन केले. या प्रक्रियेत जिंकलेले लोकांचे म्हणणे ऐकले गेले नाही. १९४२ मधील अमेरिकेच्या तथाकथित शोधाचा अर्थ म्हणजे विजयी युरोपियन स्थानिकांसाठी आणि ज्यांनी त्यांची सर्व जमीन गमावली आहे. अशा मूळ अमेरिकनांसाठी वेगळ्या गोष्टी आहेत. हीच गोष्ट मोठे धारण बांधून भारताने

केलेल्या प्रगतीसाठी म्हटले जाऊ शकते; या प्रक्रियेत ज्यांनी त्यांची घरे आणि जमिनी गमावले आहे अशा लक्षावधी लोकांचे म्हणणे आपण सामान्यतः ऐकून घेत नाही.

वेगवेगळ्या क्षेत्राचे वेगळेपण व स्वातंत्र्य : उत्तर आधुनिकतावाद हा प्रत्येक विद्याशाखेला प्रयोगीज विज्ञानाशी तुलना करणे आणि त्याला कनिष्ठ समजले जाने त्याच्या ऐवजी स्वतंत्र म्हणून मुक्त करतो. अशा प्रकारे कालीदासाचे लिखाण किंवा अजिंठा वेरूळ येथील चित्रकारी किंवा भगवतगीता किंवा बायबल यांचे विज्ञानाच्या तत्त्वानुसार परिक्षण केले जाऊ शकता नाही. प्रत्येक क्षेत्र हे अद्वितीय आणि स्वतंत्र आहे. (आणि त्याला अस्तित्वात असण्याचा हक्क आहे, अट एकच की त्याने इतर मानवांच्या अधिकारांचे उल्लंघन करायला नको)

केंद्र-परीघ जगापासून बहुकेंद्रीय जगाकडे : कुठलीही संस्कृती (उदा. युरोपियन) किंवा वंश (उदा.गोरा) किंवा जात (उदा. ब्राम्हण) यांना स्वतःला श्रेष्ठ म्हणण्याचा किंवा इतरांचे परिक्षण करण्यासाठी नियम करण्याचा अधिकार नाही. कोण श्रेष्ठ आहे हे कोण ठरवणार आणि कोणत्या निकषावर? अशी उच्च नीचता आपण का बाळगावी? माणसे इतर माणसांना माणूस म्हणून वर्तणुकीत देऊन जगू शकत नाही का; मह ती माणसे काही प्रकारे वेगळी असोत (वंश किंवा लिंगात, दिसण्यात किंवा भाषेत किंवा चालीरितीत) परंतु प्रतिष्ठा व मूल्यात मात्र समान?

**अतर्कसंगतचा** प्रभाव

कारणाला, आधुनिकतेतील राणी, सत्यापर्यंत पोहचण्याचा मार्गांपैकी फक्त एक मार्ग म्हणून बघितले जाते. उत्तर आधुनिकता वाद हा अतार्कीकतेच्या भूमिकेला महत्वाचे स्थान प्रदान करतो, हे अंशत: या भयावह सत्यामुळे असावे की खूप बुद्धिमान लोक युद्धादरम्यान किंवा आंतरवांशिक भांडणादरम्यान किंवा आंतरधार्मिक झगड्यादरम्यान काही भयानक गोष्टी इतरांप्रती करतात. मानवी समस्या दरम्यान एकटे कारण हे एक विश्वसनीय मार्गदर्शक आणि शिक्षक म्हणून भासत आपल्याला इतर क्षेत्रे जसे आपल्या भावना; आपली सौंदर्यविषयक संवेदना, आपल्या परंपरा आपली स्वप्ने यांचेही जरुरी आहे.

**भाषेचे विश्लेषण**

भाषेचा वापर आणि गैरवापर केला जातो ते टिकात्मकरित्या तपासणे जरुरी आहे. शब्द कल्पना अभिव्यक्त करतात; तसेच शब्द हे ज्या कल्पनांना दर्शविण्याचादावा करतात त्यांचा विश्वासघातही करतात. भाषा हे संवादाचे केवळ एक मध्यम नाही; तर ती संस्कृतीचे वाहक आणि विशिष्ट मुल्यांची बचावकर्ता सुद्धा आहे. शब्द हे मानवी अनुभव तंतोतंतपणे कधीही अभिव्यक्त करू शकत नाही.

munotes.in

**कला, स्थापत्यकला आणि इतर क्षेत्रातील सृजनशीलता**

आधुनिकतेची तत्त्वे अंधपणे अनुसरायचे आकारून उत्तर आधुनिक विचारवंत, कलाकार वास्तुकलाकर शिल्पकार आणि लेखक हे नवीन कथानक आणि नवीन शैली नवीन मार्गाने शोध घेऊन अप्रचलित मार्गावरून चालविणे आहे.

**उत्तर आधुनिकतावादाच्या मर्यादा**

उत्तर आधुनिकतावादाचे प्रबळ प्रशंसक व ठाम टिकाकार असे दोन्ही आहेत. उत्तर आधुनिकतावादाच्या काही कमजोरी पुढे दिल्या आहेत.

**सिद्धांताची सैद्धांतिक टिका**

ही तत्त्वज्ञानातील फार जुनी समस्या आहे. एका सैद्धांतिक स्थितीवर टिका करण्यासाठी तुम्हाला दुसरे सैद्धांतिक गृहीतके वापरावी लागतात. उदा. आपण सर्व मेटाकथांना नाकारायला हवे असे म्हणणे म्हणजे स्वत: एक मेटाकथा आहे. माणूस हा काही थोर सिद्धांताशिवाय बोलू किंवा जगू शकत नाही. मग ते सिद्धांत धार्मिक किंवा सामाजिक किंवा आर्थिक असू देत. तर्काव्यातिरिक्त तेथे सत्याचे इतर मार्ग आहेत असे सांगणे सुद्धा स्वत: एक तार्किक सैद्धांतिक वाक्य आहे. आपण तर्काच्या वापरला टाळू शकत नाही. ते सिद्ध करू शकते त्यापेक्षा अधिकच दावा करते.

**उत्तर आधुनिकतावादाचा दावा**

उत्तर आधुनिकतावादाचा दावा की आपण एक अतिशय वेगळ्या प्रकारच्या युगात जगतो हे सिद्ध केले जाऊ शकत नाही. काही लोक उत्तर आधुनिकता वादाला आधुनिकतेपेक्षा काहीतरी वेगळे असण्याऐवजी आधुनिकतेचाच एक्सालाग्पणा म्हणून बघतात. (तार्किक टीकेचा इतर प्रकार म्हणून) इतिहासाच्या काळादरम्यान आणि संस्कृतीच्या दरम्यान तिथे फरक आहे हे असे सिद्ध करत नाही की एका शतकापासून दुसऱ्यापर्यंत किंवा व्यवस्थेपासून दुसऱ्यापर्यंत मानवामध्ये जे काही सामाईक आहे ते त्यांच्यातील फाराकापेक्षा कमी आहे. तिसऱ्या किंवा दुसऱ्या किंवा अठराव्या शतकात राहणारी एक व्यक्ती आणि आपण त्यांच्यामध्ये असलेल्या फरकापेक्षा त्यामधील सामाईक बाबी अधिक आहेत.

**अत्यावश्यक आणि कायम स्वरूपाकडे दुर्लक्ष**

लोक जुनी धार्मिक पुस्तके का वाचतात किंवा दुसऱ्या संस्कृतीतील एखादी कादंबरी किंवा चित्रपटाला प्रतिसाद का देतात याचे कारण म्हणजे तेथे असे काहीतरी अत्यावश्यक आणि कायमस्वरूपी आहे जे आपण सर्व सहभागी करतो, आपल्यापैकी प्रत्येकजण काही एकमेव द्वितीय नाही की इतरांपासून पूर्णपणे वेगळा आहे. हा अत्यावश्यक व कायम स्वरूपी घटक उत्तर आधुनिक विचारवंताद्वारा मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षिला जातो किंवा नाकारला जातो.

### आधुनिकतेच्या योगादानाकडे कानाडोळा करणे

जरी आधुनिकतेत बरेच दोष होते, तरी त्याचे निर्विवाद यश होते. उदा. मानसिकदृष्ट्या आजारी असलेल्या रोग्याला मृत पिशाच्चांनी पछाडलेले आहे असे समजाने आणि त्यांना कर शिक्षा देणे यापेक्षा त्यांच्यावर मानसोपचार तज्ञांद्वारा उपचार करणे ही नक्कीच सुधारणा आहे. याचप्रमाणे आपली प्रवासाची आधुनिक साधने, आपले मोबाईल फोन आणि कंप्युटर्स, पुस्तकांचा प्रसार, बऱ्याच उपलब्ध वैद्यकीय उपचार पद्धती ही मानवजातीने तर्काच्या भेटीचा वापर करून केलेली प्रगती आहे. मानवी अधिकारांची सार्वत्रिक घोषणा एक फारमोठे यश आहे. एखाद्याचे धार्मिक श्रद्धा (किंवा तीचा अभाव) काहीही असो, लोकांजवळ मानव म्हणून विशिष्ट अविभाज्य अधिकार आहे. आपल्या तर्काद्वारा पहिला जाणारा आपला मानवी स्वभाव हा सामाईक पाया आहे. पूर्व आधुनिक व्यवस्थेत राहणाऱ्या बहुतांश लोकांसाठी आधुनिकता हा खूपच फायदेशीर आणि मुक्त करणारा बदल होता. आपल्यापैकी कोणाला पूर्व आधुनिक युगात परत जावे असे आवडेल का?

### सामाजिक सुधारणांना नाकारणे

भारतातील सती प्रथा करणे असो की पश्चिमेतील गुलामगिरी बंद करणे असो, जेव्हा एखाद्याचा धार्मिक विश्वास हा एखाद्याचा प्रेरक शक्ती होता तेव्हा अन्यायाविरुद्धचा खरा वाद हा तर्काच्या आवाहनावर आधारित होता. अस्पृश्यतेविरुद्धची लढाई किंवा आफ्रिकी लोकांच्या गुलामगिरीच्या विरोधातील राजकीय कृती किंवा स्त्रियांना चांगली वागणूक देण्यासाठी किंवा बहुधार्मिक समाजात वेगवेगळ्या धर्माच्या लोकांना दिला जाणारा आदर यांचा विचार करा. असे बदल घडवून आणण्यातील एक मुख्य घटक हा आधुनिक, तार्किक दृष्टीकोण होता. देवाणघेवाणीसाठी एक सामाईक तार्किक मंच असल्याशिवाय एका समाजाचे निर्णय हे कशावर आधारित असू शकतात? आपण सर्वकाही व्यक्ती किंवा छोट्या गटांचा प्राधान्यक्रमावर सोडून देऊ शकत नाही.

### नैतिक सापेक्षतावाद

खूप सारे लोक उत्तर आधुनिकतावादाचा अभ्यास करतात ते त्यात काही मजबूत नैतिक तत्त्वे नाहीत आणि प्रत्येक गोष्टीला खाजगी मताची बाब बनविण्याचा त्यावर आरोप करतात. आपण हे विसरता कामा नये की 'प्रत्येक गोष्ट सापेक्ष आहे' ही स्थिती स्वत: स्वविरोधाभासी वाक्य आहे कोणीही याला स्वत: विरोधाभास केल्याशिवाय तार्किक दृष्ट्या पकडू शकत नाही. आपल्याला संस्कृतीचा आदर करायची गरज आहे आणि आपले सर्व अध्ययन हे इतिहास व व्यवस्थेद्वारा अंगवळणी पडलेले आहे असे म्हणणे ही एक गोष्ट आहे. यावरून या निष्कर्षावर उडी मारणे की प्रत्येक गोष्ट सापेक्ष आहे आणि तेथे सार्वत्रिक दृष्ट्या वैध सत्ये नाहीत, ही एक अतार्किक पायरी आहे. उत्तर आधुनिकतावाद ही चूक करतांना दिसतो.

munotes.in

**अनावश्यकपणे किचपट वा अस्पष्ट भाषा**

भाषेच्या वापराचा अभ्यास करतांना आणि त्याच्या मर्यादा दर्शविताना बरेच उत्तर आधुनिक लेखक हे क्लीष्ट शब्दजालाचा अतिरेकी वापर करण्यासाठी आणि एखाद्या शिकलेल्या व्यक्तीला अनुसरण्यास किंवा एखाद्या वाचकाला मुद्दे काढण्यास सुद्धा कठीण असलेल्या मार्गाने लिहिण्यासाठी कुविख्यात आहेत.

## ६.४ सारांश

हे बघू सादरीकरण उत्तरआधुनिकतावाद म्हटल्या जाणाऱ्या महत्वाची समकालीन सांस्कृतिक घडलेल्या परिचयात्मक, अत्यांतिक स्वरूपाकडे उद्देशून आहे. उत्तरआधुनिकतावादाविषयी त्यामध्ये आधी खूप प्रचंड साहित्य आहे. एक चांगले वाचनालय किंवा इंटरनेट विद्यार्थ्यांना अधिक साहित्यासोबत जोडून ठेऊ शकतो.

उत्तरआधुनिकतावाद हा शिकवण किंवा संगठन किंवा कहर तत्त्वे असण्यापेक्षा मनाची अवस्था किंवा संवेदनशीलता अधिक आहे. एखाद्याची जीवनशैली, प्राधान्य मुल्ये, जवळचे सहकारी आणि दृष्टीकोण यावर अवलंबून त्याला प्रगती किंवा पीछेहाट म्हणून बघितले जाऊ शकते. काही लेखक याला आधुनिकतेच्या आधिक्याची कडक टीका म्हणून बघतात; इतर त्याला पूर्व आधुनिकतेचे पुनरागमन म्हणून बघतात; अजून काही त्याला आधुनिकतेचा विस्तार म्हणून किंवा आधुनिकतेतील वैध असलेल्या बऱ्याच गोष्टींचा दोषपूर्ण त्याग म्हणून सुद्धा बघतात.

तुम्हाला कशावर जोर द्यायचा आहे यावर अवलंबून माणूस हा सर्व ठिकाणी सदासर्वदा सारखाच आहे किंवा खूपच वेगळा आहे असे म्हटले जाऊ शकते. हीच बाब लोकांमधील सारखेपणा आणि वेगळेपणाविषयी म्हटले जाऊ शकते. उत्तरआधुनिकतावाद हा आधुनिकतावादाशी सारखेपणा किंवा सातत्यापेक्षा फरकावर अधिक जोर देतो.

मोठ्या आवाजांनी (मेटा-कथा) लहान आवाजांना दाबून टाकू नये किंवा स्वशैली केंद्रांनी (युरोप किंवा यु.एस. किंवा पाश्चात्य संस्कृती किंवा तथाकथित उच्च जात) कमी शक्तीवानांची प्रतिष्ठा व आवाजाकडे दुर्लक्ष करण्यास परवानगी देऊ नये याचे एक आवाहन म्हणून हा एक धारिष्ठ्यपूर्ण आणि आव्हानात्मक टीकात्मक आवाज आहे.

विचार करण्याचे, जगण्याचे आणि जगाकडे पाहण्याचे हे मार्ग किती प्रमाणात विस्तारले आहे आणि मतदार कोण आहेत हे मूळ प्रश्न आहेत. आपल्या स्वतःच्या देशात पूर्व आधुनिक युगात राहणारे लोक (देवी सारख्या रोगाचे धार्मिक स्पष्टीकरण शोषणारे लोक किंवा खेड्यातील भूत-पिशाच्च निराकरणासाठी स्त्रियांचा चेटकीण म्हणून खून करणारे लोक) आधुनिकतेत राहणारे (उदा. आपला गणित व विज्ञानाच्या अभ्यास, फोन, संगणक, रेल्वे, विमानांचा आपला वापर, लसीकरणासाठीची आपली संधी, रक्त तपासणी व हृदय शस्त्रक्रियाची संधी) उत्तर आधुनिक व्यवस्था (सामान्यतः कॉलेज परिसरात आणि संशोधनात आढळणारे छोटे छोटे गट) यात राहणारे लोक आहेत. कुणीही व्यक्ती किंवा देश किंवा संस्कृती ही पूर्णपणे पूर्व आधुनिक किंवा आधुनिक किंवा उत्तर आधुनिक

munotes.in

नाही. परंतु त्यानंतर याच तर्काला अनुअसरुन उत्तरआधुनिकतावादाचे स्वतःचे विचार करण्याचे मार्ग प्रमाणित केले जाऊ शकत नाही किंवा त्यांचा बचाव केला जाऊ शकत नाही. म्हणून तत्वज्ञ रिचर्ड टर्नास उत्तरआधुनिकतावादाविषयी म्हणता, "जे सरतेशेवटी स्वतःच्या तत्त्वाने स्वतःला उत्तर आधुनिक मानाने ज्यांच्या विरोधात स्वतःला परिभाषित केले आहे. त्या विविध आधिभौतिक विहंगावलोकनापेक्षा अजून आर्थिक परीक्षित करू शकत नाही."

समारोप करता, जसे उत्तर आधुनिकतावाद हा आपल्याला आधुनिकतेकडे टीकात्मकरित्या बघण्यास उदयुक्त करतो तसेच सामान्य व्यवहारात वा मानवी शहाणपण आपल्याला स्वत: उत्तरआधुनिकतावादाकडे, त्याची शक्तीस्थळे बघून व त्याच्या कमकुवतपणाला न नाकारता, टीकात्मक प्रशंसेसह बघण्याची आठवण करून देतो.

## ६.५ तुमची प्रगती तपासा:

१) 'मेटा कथा' म्हणजे तुम्हाला काय समजले?

२) 'परिघ व केंद्र' यावर एक टीप लिहा.

३) उत्तरआधुनिकतावादाची संकल्पना स्पष्ट करा.

४) सृजनशीलतेचे उत्तरआधुनिकतावादाशी असलेल्या संबंधाचे वर्णन करा.

५) उत्तर आधुनिकतावादातील शिक्षकांच्या भूमिकांची यादी करा.

## ६.६ ऑनलाईन संदर्भ


1) https://www.oxfordhandbook.com/view/10.1093/oxfordhb/9790195312881.001.0001/ oxfordhb-9780195312381-e-029

2) https:/revisesociology.com/2019/09/25/postmodernism-and-education/

3) https:/www.slideshare.net/anduena10/postmodernism_30801816

4) https://www.slideshare.net/arnieariasvalera/postmodernism-in-education

5) https;//www.sciencedirect.com/science/articles/pii/51877042811004629

6) https:/egyankosh.ac.in/bitstream/123456789/38435/1/Unit-2-pdf


❖❖❖❖

munotes.in